# प्रथम वर्ष कला

# तत्त्वज्ञान अभ्यासपत्रिका क्र. १

# नैतिक तत्त्वज्ञान

## (Moral Philosophy)

# नैतिक तत्त्वज्ञान अभ्यासपत्रिका -१

(F.Y.B.A. Paper-I)

**अभ्यासक्रम** (Syllabus)

## विभाग - १

### गट - १

**प्रकरण-१:** नैतिक तत्त्वज्ञानाची प्रस्तावना

अ) तत्त्वज्ञानाची व्याख्या, स्वरुप आणि व्याप्ती (तत्त्वज्ञानाच्या शाखा)

ब) नैतिक तत्त्वज्ञानाचे स्वरुप (तथ्य आणि मूल्ये, साध्य मूल्ये आणि साधन मूल्ये) आणि नीतिशास्त्राची क्षेत्रे-वर्णनात्मक नीतिशास्त्र, आदर्शात्मक नीतिशास्त्र, आधि-नीतिशास्त्र (परा-नीतिशास्त्र) आणि उपयोजित नीतिशास्त्र

क) नैतिक विचारप्रक्रियेचा विकासः लॉरेन्स कोहलबर्ग.

**प्रकरण-२: सापेक्षतावाद आणि निरपेक्षतावाद.**

अ) नैतिक सापेक्षतावाद,

ब) नैतिक निरपेक्षतावाद

**प्रकरण-३: शुभ (चांगले) जीवनः ग्रीक नैतिक चिंतन (ग्रीकांचे नीतिशास्त्र)**

अ) चार मूलभूत सदगुणः प्लेटो

ब) चारित्र्याचे नीतिशास्त्रः ॲरिस्टॉटल

### गट - २

**प्रकरण-४: भारतीय तत्त्वज्ञानाच्या संदर्भातील नैतिकता.**

अ) ऋत, ऋण आणि पुरुषार्थ यांच्या संदर्भात धर्म संकल्पना.

ब) भगवद्गीतेतील निष्काम कर्मसिद्धांत.

**प्रकरण-५: भारतीय तत्त्वज्ञानाच्या संदर्भातील नैतिकता (अवैदिक दर्शनांचे नीतिशास्त्र)**

अ) बौद्धांचे नीतिशास्त्र

ब) जैन नीतिशास्त्र

क) चार्वाकांचे नीतिशास्त्र.

## विभाग - २

## गट - ३

**प्रकरण-६: स्व-हितवादी नैतिकता (स्वहितार्थवादी नैतिकता)**

अ) मानसशास्त्रीय स्वहितवाद (अहंकेंद्रवाद)- थॉमस हॉब्ज.

ब) नीतिशास्त्रीय स्वहितवाद (अहंकेंद्रवाद)-आयन रँड

**प्रकरण-७: आधुनिक नीतिमत्तेचे सिद्धांत.**

अ) इम्यान्यूएल कांटः निरुपाधिक आदेशः सार्वत्रिक वा सामान्य नियमाचे तत्त्व आणि साध्यमूल्यांचे तत्त्व, चिकित्सक मूल्यमापन.

ब) जॉन स्टुअर्ट मिल्लः जेरेमी बेंथॅमच्या विचाराची समीक्षा, अधिकतम लोकांचे अधिकतम सुखाचे तत्त्व, उच्चस्तरीय व निम्नस्तरीय सुख, नीतीची दोन प्रेरके, चिकित्सक मूल्यमापन.

**प्रकरण-८: पर्यायी नीतिशास्त्रीय उपपत्या.**

अ) स्त्रीवादी नीतिशास्त्रः भावबंध वा आस्थाविषयक नीतिशास्त्र (Ethics of care): कॅरोल गिलीगन.

ब) अस्तित्ववादी नीतिशास्त्रः जिन पॉल सार्त्र

**गट - ४**

**प्रकरण-९: शिक्षेच्या उपपत्त्या.**

अ) शिक्षेची प्रतिशोध उपपत्ती

ब) शिक्षेची निवारणवादी (प्रतिबंधक) उपपत्ती

क) शिक्षेचा सुधारणावादी दृष्टीकोन.

**प्रकरण-१०: व्यावसायिक नीतिशास्त्र.**

अ) व्यावसायिक नैतिक आचारसंहितेचे महत्त्व

ब) व्यापाराचे नीतिशास्त्र : उद्योजकांची सामाजिक जबाबदारी : अनुकुल व प्रतिकूल युक्तिवाद.

♦ ♦ ♦

# १

**प्रकरण १**

# नैतिक तत्त्वज्ञानाची प्रस्तावना

(Introduction to Moral Philosophy)

**घटक रचना**

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ तत्त्वज्ञानाच्या व्याख्या, स्वरुप व शाखा

१.३ नैतिक तत्त्वज्ञानाच्या व्याख्या व स्वरूप

१.४ नैतिक तत्त्वज्ञानाच्या शाखा

१.५ नैतिक विचारप्रक्रियेचा विकास

१.६ सारांश

१.७ विद्यापीठीय दीर्घोत्तरी प्रश्न

## १.० उद्दिष्ट्ये

- तत्त्वज्ञानाचा अर्थ व अभ्यासविषय समजून घेणे.
- तत्त्वज्ञानाच्या विविध शाखांची ओळख करुन घेणे.
- नैतिक तत्त्वज्ञानाचा (नीतिशास्त्राचा) अर्थ व अभ्यास विषय जाणून घेणे.
- नीतिशास्त्राच्या शाखांची माहिती करुन देणे.
- व्यक्तीच्या नैतिक विचारप्रक्रियेचा विकास कसा होतो ते समजून घेणे.

## १.१ प्रस्तावना

मनुष्य एक बुद्धिमत्ता असलेला जीव आहे. त्याला सुट्या-सुट्या अनाकलनीय घटनांच्या गोंधळामध्ये जगणे अशक्य आहे. त्याच्या अवतीभोवती घडणाऱ्या घटनांचा संदर्भ लागला नाही तर संपूर्ण विश्व त्याला परके होऊन जाते. सभोवार असणाऱ्या सृष्टीचे अंतिम स्वरुप कसे आहे हे जाणून घेण्याची मनुष्याची एक आंतरिक प्रेरणा असते. अंतिम सत्ता शोधण्याचा प्रयत्न दुहेरी असतो. तो म्हणजे ज्ञान आणि व्यवहार्यता; सिद्धान्त आणि आचरण.

अंतिम सत्तेविषयीच्या चिंतनात्मक व समीक्षात्मक शोधातून तत्त्वज्ञान निर्माण होते. या विश्वात घडणाऱ्या घटनांचे एक सुसंगत स्पष्टीकरण तत्त्वज्ञान देऊ शकते.

तसेच या विश्वामध्ये कार्यरत असलेल्या शक्तींचा मागोवा सुद्धा तत्त्वज्ञानामध्ये घेतला जातो. म्हणजेच तत्त्वज्ञान विचारांची एक पद्धतशीर गुंफण आहे.

अंतिम सत्तेचा शोध घेताना मानवी मनाची व्यावहारिक बाजू सुद्धा कार्यरत असते. सभोवरची परिस्थिती जाणून घेऊन योग्य तो प्रतिसाद देण्याच्या क्षमतेवर मनुष्याचे अस्तित्व अवलंबून आहे. ज्ञानाची उपयुक्तता प्रतिसाद देण्याच्या क्षमतेमधून सिद्ध होते. बाह्य परिस्थिती नुसार योग्य निर्णय घेण्याच्या बौद्धिक परिपक्वतेवर मानवी अस्तित्व अवलंबून असते. मानवी मनाची ही बाजू नीतिशास्त्राच्या उगमास कारणीभूत आहे.

नीतिशास्त्र अथवा नैतिक तत्त्वज्ञानातील प्रश्न मानवी अस्तित्व तसेच एका सुसंघटीत, सुसंगत अश्या नैतिक जीवन जगण्यासाठी आवश्यक बाबींचा विचार यातून उद्‌भवतात. मनुष्य अन्य जीवांपेक्षा अधिक विवेकशील जीवन जगणारा प्राणी आहे. मनुष्याला सत्याचे आकलन होते, शुभची प्राप्ती करुन घेता येते व सौंदर्याची निर्मिती करता येते. बौद्धिक व्यवहार्यतेमधून मनुष्याने नैतिकतेचा मोठाच प्रवास केला, सहज प्रवृत्तीनुसार आचरण करणाऱ्या मनुष्याने तर्काधिष्ठित आचरणास सुरवात केली. मनुष्य समूहाच्या बाह्य नियमांपेक्षा स्वतःच्या सारासार विवेक बुद्धीला अनुसरुन स्वतःच्या परमप्राप्तव्याकडे वाटचाल करु लागला आहे. सूज्ञ मनुष्य सत्य, शुभ (कल्याण) व सौंदर्य या मानवी आदर्शाची एकात्मता साधू पाहतो.

## १.२ तत्त्वज्ञानाच्या व्याख्या, स्वरुप व शाखा

तत्त्वज्ञान विचारांची पद्धतशीर मांडणी आहे. जीवनाचा अर्थ व जीवन मूल्यांचे आकलन तत्त्वज्ञानामुळे होते. अंतिम सत्ता काय आहे, ज्ञानाची मूलतत्त्वे काय आहेत ह्याचा शोध तत्त्वज्ञानात घेतला जातो. आपल्या सर्व अनुभवांचा सुसंगत अर्थ लावणे, त्यांचे सुसंघटीत स्वरुप दर्शविणे हे तत्त्वज्ञानाचे काम आहे.

Philosophy हा शब्द Philosophia ह्या ग्रीक शब्दापासून आलेला आहे. त्याचा अर्थ ज्ञानाचा शोध अथवा शहाणपणाचे प्रेम असा होतो. तत्त्वचिंतक हा ज्ञानाचा शोध घेणारा, ज्ञानाचा प्रेमी असतो. प्लेटोच्या मते संपूर्ण सृष्टीच्या प्रवाहाकडे तटस्थपणे, स्थिरपणे पाहणारा प्रेक्षक म्हणजे तत्त्वचिंतक होय. सुरवातीच्या काळामध्ये तत्त्वज्ञान म्हणजे कोणतेही ज्ञान संपादन करण्याची तळमळ होती. त्याचा अभ्यासविषय विशिष्ट किंवा मर्यादित नव्हता.

भारतामध्ये तत्त्वज्ञानाला ‘दर्शन’ म्हटले जाते. दर्शन म्हणजे ‘दृष्टि’ व ‘दृष्टिसाठी उपयुक्त’ साधने होय. भारतीय तत्त्वज्ञानाचा उगम अंतिम सत्तेची अनुभूती घेण्याच्या उत्कट इच्छेतून झाला आहे. त्याची बीजे उपनिषदांमध्ये सापडतात.

तत्त्वज्ञानाचा उगम कुतूहल आणि आश्चर्य भावनेतून झाला आहे. ह्या निसर्गातील घटना, पाऊस, वादळे तसेच आकाशात दिसणारे सूर्य, चंद्र व तारे

याविषयी मनुष्याच्या मनात कुतूहल होते. हे निसर्गातील चमत्कार नेमके कसे घडतात ह्याचे कोडे सोडविण्याचे प्रयत्न त्याने बुद्धिच्या सहाय्याने केले. हळूहळू आश्चर्य भावनेचे रुपांतर चिंतनामध्ये झाले. निसर्गातील चमत्कार एक किंवा अधिक मूल तत्त्वांच्या सहय्याने स्पष्ट होऊ लागले. तत्त्वज्ञानाची चिंतनात्मक तत्त्वमीमांसा म्हणून अभिव्यक्ती होऊ लागली. दृश्य असणाऱ्या भौतिक वस्तू व घटनांचा शोध व हळूहळू त्यामागील तत्त्वांचा शोध झाला. तत्त्वज्ञान प्रथम भौतिक व त्यानंतर अधिभौतिक तसेच गूढानूभूती यांची चिकित्सा करु लागले.

### १.२.१ तत्त्वज्ञानाच्या व्याख्या व स्वरुपः

आपल्या अवतीभोवती जे काही आहे ते (तत्), त्याचे सार म्हणजे तत्त्व होय. विश्वाचे एकूण आस्तित्व, त्याचा आशय म्हणजे विश्वाचे तत्त्व होय. ह्या तत्त्वाचे स्वरुप जाणण्याचा प्रयत्न म्हणजे तत्त्वज्ञान होय. म्हणून तत्त्वज्ञानाची नेमकी व्याख्या करणे अतिशय कठीण आहे. तत्त्वज्ञानाची व्याख्या करण्याचे अनेक प्रयत्न आजवर झाले आहेत त्यातील काही व्याख्या व स्वरुप आपण जाणून घेऊ या.

### १. तत्त्वज्ञान इंद्रियगोचर विश्वाला आधार असणाऱ्या अनुभवातीत सत्तेचा अभ्यास करतेः

तत्त्वज्ञान अंतिम सत्तेचा शोध आहे. हे विश्व आपल्याला पंचेंद्रियांद्वारे समजते. आपली ज्ञानेंद्रिये ह्या विश्वाचे वास्तविक ज्ञान करुन घेण्यास असमर्थ ठरतात. तत्त्वज्ञानाचे उद्दिष्ट आपल्या अनुभवांच्या पलीकडे असणाऱ्या अंतिम सत्तेचे ज्ञान करुन घेणे हे आहे. जडद्रव्य, आत्मतत्त्व, ईश्वर, दिक्, काल या सारख्या संकल्पनांचा आपण प्रत्यक्ष अनुभव घेऊ शकत नाही. आपल्याला अनुभवास येणाऱ्या विविध भौतिक गोष्टींमध्ये काही समान तत्त्व असल्याची जाणीव आपणास होत असते. विविध, विभिन्न वस्तुंमागील एकता समजून घेण्याचा प्रयत्न तत्त्वज्ञानामध्ये केला जातो. उदा. प्रकाश कमी जास्त झाल्यावर एकच वस्तु विविध रंगछटा दर्शविते. त्यामुळे वस्तुचा नेमका रंग कोणता आहे हा प्रश्न उपस्थित होतो. बाह्य परिस्थिती बदलत असताना वस्तूचे मूलभूत स्वरुप काहीतरी वेगळेच असावे असे तर्कनिष्ठ बुद्धीला जाणवत राहते. विविध अनुभवांमधून प्रकट होणाऱ्या त्या एकाच अंतिम सत्तेचा शोध घेण्याचा प्रयत्न तत्त्वज्ञान करते.

### २. तत्त्वज्ञान समग्रतेचा दृष्टिकोन आहेः

तत्त्वज्ञान अंतिम सत्याचा शोध घेत असल्यामुळे त्याचे स्वरुप अत्यंत व्यापक आहे. विविध ज्ञानशाखा विश्वाच्या विशिष्ट क्षेत्राचा अभ्यास करतात. मानसशास्त्र मानवी मनोव्यापारांचा अभ्यास करते. खगोलशास्त्र आकाशस्थ ग्रहगोलांचा व त्यातील घडामोडींचा अभ्यास करते. भौतिकशास्त्र जड वस्तूंशी संबंधित आहे.

तत्त्वज्ञान कोणत्याही एका विशिष्ट क्षेत्राशी संबंधित नसून संपूर्ण मानवी जीवन व त्याच्या सभोवारची परिस्थिती त्यांच्याशी संबंधित आहे. जड द्रव्य तसेच सचेतन मनोव्यापार; आत्मतत्त्व तसेच ईश्वर तत्त्व, दिक्-काल कार्यकारण संबंध, त्यांचे परस्परसंबंध, उद्दिष्ट्ये या सर्वांची चिकित्सा तत्त्वज्ञान करते. विल ड्यूरँटच्या मते, तत्त्वज्ञान म्हणजे समग्र अनुभवाचा किंवा विशिष्ट अनुभवाचा समग्रतेच्या संदर्भामध्ये अभ्यास होय.''

तत्त्वज्ञान म्हणजे विविध शाखेतील ज्ञानकणांची एक सूत्रबद्ध मालिका आहे. तत्त्वज्ञान आपल्यासमोर विश्वातील वेगवेगळ्या तत्त्वांचे एकत्रित असे संयुक्तिक चित्र उभे करते.

**३. तत्त्वज्ञान म्हणजे सुसंगतपणे प्रश्न सोडविण्याचा आटोकाट प्रयत्न होयः**

तत्त्वज्ञान चिंतनात्मक आहे. त्यातील प्रश्न अत्यंत व्यापक व अंतिम स्वरुपाचे असतात. तत्त्वज्ञानात काहीच गृहीत धरले जात नाही. आपल्या सर्व अनुभवांना तर्कशुद्धतेचा निकष लावून त्यांचे परीक्षण तत्त्वज्ञानात केले जाते. त्यामुळे तत्त्वज्ञान म्हणजे अंतिम सत्याचा शोध घेण्यासाठी केलेली अविरत चिकित्सा आहे. अत्यंत तर्ककठोरपणे प्रश्नांची उत्तरे शोधताना ह्या विश्वाचे सुसंगत आकलन होऊ शकते. सुसंगतपणे प्रश्न सोडवितांना चुकीच्या कल्पना, संदिग्ध संकल्पना, पूर्वग्रह यांचा त्याग केला जातो. व ह्या विश्वाचे तर्कसंगत आकलन होऊ शकते. म्हणून प्लेटोच्या मते तत्त्वज्ञान म्हणजे सुसंगतपणे तर्कनिष्ठतेने प्रश्न सोडविण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न आहे.

**४. तत्त्वज्ञान विविध ज्ञानशाखांमधील सिद्धांन्ताचा समन्वय करतेः**

हर्बट स्पेन्सर च्या मते तत्त्वज्ञान एक सुसंघटित ज्ञान आहे. तत्त्वज्ञान जणू एक समवायी सेंद्रिय रचना आहे. त्यातून वेगवेगळ्या ज्ञानशाखांच्या तत्त्वांचे अनुमान काढले जाऊ शकते. विविध शास्त्रे जे निष्कर्ष स्थापित करतात त्यांच्यातील सुसंगती व एकात्मता दर्शविण्याचे कार्य तत्त्वज्ञान करते.

हर्बर्ट स्पेन्सरच्या विचारांना संश्लेषणात्मक तत्त्वज्ञान म्हटले जाते. स्पेन्सरच्या मते तत्त्वज्ञान विशिष्ट शास्त्रानी स्थापन केलेल्या सिद्धान्तांची समन्वयात्मक संरचना करणारे विश्वव्यापी शास्त्र आहे.

**५. तत्त्वज्ञान सर्व शास्त्रांची जननी आहेः**

जीवन एक संघर्ष असून त्यात टिकून राहण्यासाठी ज्ञान आवश्यक आहे. अस्तित्वाच्या संघर्षामध्ये विशिष्ट पद्धतीचे किंवा विशिष्ट क्षेत्राचे ज्ञान प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या वेगवेगळ्या ज्ञानशाखा म्हणजेच शास्त्रे निर्माण झाली.

कुतूहलामधून प्रश्न उपस्थित करुन त्या त्या प्रश्नांची उत्तरे शोधत असताना ज्ञानसाठा निर्माण होत गेला. ज्या प्रश्नांची उत्तरे मिळाली त्यांची वेगवेगळी शास्त्रे बनत

गेली. एकेकाळी भौतिकशास्त्र हे नैसर्गिक तत्त्वज्ञान होते. प्राणीशास्त्र, मानसशास्त्र इ. तत्त्वज्ञानातूनच विकसित झालेली शास्त्रे आहेत. त्यामुळे तत्त्वज्ञानाला सर्व शास्त्रांची जननी म्हटले जाते. तत्त्वज्ञानाला शास्त्रांचे शास्त्र व सर्व शास्त्रांची साम्राज्ञी असेही म्हटले जाते.

**६. तत्त्वज्ञान संकल्पनांचे विश्लेषण आहे:**

ए. जे. एअर सारखे विश्लेषणवादी तत्त्वचिंतक असे मानतात की तत्त्वज्ञानाचा अनुभवातीत संकल्पनांशी काही संबंध नाही. मानवी अनुभव हाच तत्त्वज्ञानाचा अभ्यास विषय आहे. तत्त्वज्ञानातील सर्व प्रश्न भाषेशी संबंधित आहे. अनेक संकल्पनांचे अर्थ सुस्पष्टपणे न कळल्यामुळे गंभार प्रश्न निर्माण होतात. उदा. जड, द्रव्य, चैतन्य तत्त्व, सत्यता, शुभ, सौंदर्य, धर्म, राष्ट्रीयत्व, मैत्री, प्रेम इत्यादि यासारख्या संकल्पनांचे अर्थ वेगवेगळ्या रुपाने अभिव्यक्त होतात. काही वेळा तर त्यांचे सिद्धान्त एकमेकांच्या विरोधी ठरतात. ॲरिस्टॉटलच्या मते कार्यकारण संबंध मूलभूत संकल्पना आहे. तर ह्यूमच्या मते असा संबंध अस्तित्वात नाही.

आजच्या युगात मैत्री, प्रेम तसेच राष्ट्रीयत्व, देशप्रेम या सारख्या संकल्पनांचे अर्थ निर्धारित करीत असताना समाजामध्ये गंभीर समस्या निर्माण होत आहेत. अशा संकल्पनांचे नेमके सुस्पष्ट अर्थ उलगडून सांगितले गेले तर तत्त्वज्ञान मानवी अनुभवांशी व मानवी व्यवहारांशी जोडले जाईल. विश्लेषणवादी तत्त्वज्ञांच्या मते भाषेचे विश्लेषण करणे हे तत्त्वज्ञानाचे कार्य आहे.

हा विचार सॉक्रेटीसच्या मतांशी जुळणारा आहे. सॉक्रेटीसच्या मते तत्त्वचिंतकाचे काम संकल्पनांचा सुस्पष्ट, बिनचूक व निश्चित अर्थ प्रकट करण्यास मदत करण्याचे आहे. सॉक्रेटीसच्या मते प्रत्येक मनुष्य विवेकनिष्ठ जीव आहे. प्रत्येक व्यक्तीच्या मनात ज्ञान सुप्त अवस्थेत असते. तत्त्वचिंतकाचे काम मानवी मनातील ज्ञान विश्लेषणाद्वारे व्यक्त करविणे हे आहे. एक सुईण बाळास जन्म देत नाही पण त्याला या जगामध्ये येण्यास मदत करते. त्याप्रमाणेच तत्त्वचिंतक कोणतेही ज्ञान नव्याने निर्माण करीत नाही परंतु विश्लेषणाद्वारे व्यक्तीच्या मनातील अव्यक्त ज्ञानाला आविष्कृत होण्यास मदत करतो.

**१.२.२ तत्त्वज्ञानाच्या शाखा**:

तत्त्वज्ञानाचा अभ्यासविषय अतिशय व्यापक आहे. तत्त्वज्ञानामध्ये विविध प्रकारच्या समस्यांचा विचार केला जातो. या समस्यांच्या स्वरुपानुसार तत्त्वज्ञानाच्या विविध शाखा होतात.

**१. सत्ताशास्त्र :** सत्ताशास्त्र अथवा सद्‌वस्तूमीमांसा अंतिम सत्तेविषयीच्या प्रश्नांचा अभ्यास करते. या शाखेचे दोन उपविभाग आहेत. **वस्तुमीमांसा** अंतिम सत्तेच्या स्वरुपाविषयी चिकित्सा करते. **विश्वशास्त्र** भौतिक विश्वाच्या स्वरुपाचा अभ्यास करते.

**२. ज्ञानमीमांसा:** या शाखेमध्ये मानवी ज्ञानाचा आधार, स्वरुप व ज्ञानाची साधने यांचा अभ्यास केला जातो.

**३. तर्कशास्त्र :** तर्कशास्त्र युक्तिवादांतील तत्त्वे व त्यांच्या पद्धतिंची चिकित्सा करते. योग्य व अयोग्य युक्तिवादांतील फरक तर्कशास्त्रामुळे करता येतो.

**४. नीतिशास्त्र :** मानवी आचरण, चारित्र्य व जीवनमूल्ये यांच्याशी संबंधित असलेली ही शाखा नैतिक तत्त्वज्ञान म्हणूनही ओळखली जाते. जीवनाच्या व्यावहारिक बाजूशी नीतिशास्त्र संबंधित आहे.

**५. सौंदर्यशास्त्र :** सौंदर्य ह्या मानवी मनाच्या भावनिक बाजूशी संबंधित प्रश्नांची चिकित्सा सौंदर्यशास्त्र करते. याच्या क्षेत्रामध्ये मानवी भावना, कला निर्मिती, साहित्य निर्मिती व त्यामधील तत्त्वे, यांचा समावेश होतो.

**६. धर्माचे तत्त्वज्ञान :** या शाखेमध्ये धर्मामधील विविध धारणांचा अभ्यास केला जातो. ईश्वर, दुरित, कर्मकांड इत्यादि धार्मिक संकल्पनांसाठी बुद्धिनिष्ठ स्पष्टीकरण तसेच समर्थन करण्याचा प्रयत्न या शाखेमध्ये केला जातो.

**७. विश्लेषणात्मक तत्त्वज्ञान :** तत्त्वज्ञानातील समस्या प्रामुख्याने भाषेचे प्रश्न असून संकल्पनांचे विश्लेषण या शाखेमध्ये केले जाते.

**८. सामाजिक तत्त्वज्ञान :** व्यक्तीचे सामाजिक संस्थांशी असलेले संबंध तसेच ह्या संस्थांचे आंतर-संबंध यांचा अभ्यास सामाजिक तत्त्वज्ञानात केला जातो.

**९. राजकीय तत्त्वज्ञान :** राज्याचे आदर्श, त्याचे कार्य यांचा विचार राजकीय तत्त्वज्ञानात केला जातो.

प्रत्येक ज्ञानशाखेचा उगम तत्त्वज्ञानातून झाला आहे. मानवी ज्ञानाचा अधिकाधिक विस्तार होत असताना तत्त्वज्ञानाच्या नवनवीन शाखा उदयास येत आहेत. उदा. व्यवस्थापनाचे तत्त्वज्ञान, शिक्षणाचे तत्त्वज्ञान, इतिहासाचे तत्त्वज्ञान इ.

### आपली प्रगती तपासा

१) ‘तत्त्वज्ञान’ शब्दाचा अर्थ काय आहे ?

२) तत्त्वज्ञान समग्रतेचा दृष्टिकोन कश्या प्रकारे आहे ?

३) तत्त्वज्ञानाची विश्लेषक दृष्टिकोनातून व्याख्या काय आहे ?

४) तत्त्वज्ञानाच्या शाखा कोणकोणत्या आहेत.

## १.३ नैतिक तत्त्वज्ञानाच्या व्याख्या व स्वरुप

प्लेटोच्या मते तत्त्वज्ञान आश्चर्य भावनेचे अपत्य आहे. आपल्या सभोवार असलेल्या विश्वाच्या स्वरुपाविषयीच्या तसेच माणसांच्या वर्तनाविषयीच्या कुतुहलातून ज्ञान प्राप्त करुन घेण्याची प्रक्रिया सुरु होते. मानवी आचरणामध्ये दिसून येणाऱ्या मूल्यांविषयीच्या कुतुहलातून नैतिक तत्त्वज्ञान अथवा नीतिशास्त्र उदयास आले. मनुष्याच्या वर्तनामध्ये अधिक उच्चतम, श्रेष्ठ अशा आदर्शाचा शोध जाणवत असतो. मानवी कृती काही ध्येयाने प्रेरित झालेल्या असतात. मनुष्य जीवनाच्या सर्वश्रेष्ठ ध्येयाला परमप्राप्तव्य, शुभ, कल्याण, इष्ट, परम ध्येय, Summum Bonum असेही संबोधिले जाते. सर्वश्रेष्ठ ध्येयाला अनुलक्षून मानवी कृतीचे मूल्यमापन नीतिशास्त्रात केले जाते.

### १.३.१ नैतिक तत्त्वज्ञानाच्या व्याख्या:

नैतिक तत्वज्ञान अथवा नीतिशास्त्रास इंग्रजी भाषेमध्ये Ethics अथवा Moral Philosophy असे म्हटले जाते. Ethics हा शब्द Ethos ह्या ग्रीक शब्दावरुन आला आहे. Ethos म्हणजे चालीरीती, सवयी किंवा रुढी होय. Moral हा शब्द Mores ह्या लॅटीन शब्दा वरुन आला आहे. त्याचाही अर्थ चालीरीती, सवयी किंवा रुढी असा होतो. त्यामुळे शब्दशः अर्थ घेतल्यास नीतिशास्त्र हे चालीरीती, सवयी किंवा रुढींचे शास्त्र आहे. रुढी किंवा चालीरीती ह्या एखाद्या विशिष्ट समूहाने मान्यता दिलेल्या कृती असतात. त्या समूहाचा घटक असलेल्या व्यक्तीने विशिष्ट रुढी अथवा चालीरीतीप्रमाण आचरण करणे त्या व्यक्तीसाठी बंधनकारक ठरते. पाश्चात्य परंपरेनुसार नैतिक तत्त्वज्ञानाचा उदय ग्रीस देशामध्ये झाला व त्याचे श्रेय ॲरिस्टॉटल या ग्रीक तत्त्वचिंतकाला दिले जाते.

'नीती' हा शब्द 'नी' ह्या धातूपासून बनला आहे 'नी' म्हणजे नेणे. आपणास आयुष्याच्या मार्गावरुन नीटपणे घेऊन जाते ती 'नीती' ती होय. नीतिशास्त्र म्हणजे आदर्श जीवनाच्या रीतीचे शास्त्र होय.

नैतिक तत्त्वज्ञान अथवा नीतिशास्त्राच्या अभ्यासविषय स्पष्टीकरण करणाऱ्या विविध व्याख्या दिल्या जातात. त्या पुढीलप्रमाणे-

- पॉल्सनने नीतिशास्त्राची व्याख्या ''रुढी अथवा नीतिमत्ता यांचे शास्त्र'' अशी केली आहे.

- मॅकेन्झीच्या मते, 'नीतिशास्त्र आचरणाच्या इष्टतेसंबंधी अथवा योग्यतेसंबंधी एक चिकित्सा होय. नितिशास्त्र मानवी आचरणाचे सिद्धान्त सांगून इष्टानिष्टता आणि योग्यायोग्यता ह्यांच्या संदर्भात मानवी कृतींचे मूल्यमापन करते.''

- सेथ च्या मते 'इष्टतेसंबंधीचे शास्त्र ह्या दृष्टीने मानवी ध्येय आणि कर्तव्य ह्यांचे सर्वोत्तम असे शास्त्र म्हणजे नीतिशास्त्र होय. '

- जदुनाथ सिन्हा यांची नीतिशास्त्राची व्याख्या, ''जीवनात अनुस्यूत असलेल्या परमप्राप्तव्याची मीमांसा म्हणजे नीतिशास्त्र होय. ''

- विलियम लिली यांची व्याख्या सर्वव्यापी व अधिक योग्य आहे. नीतिशास्त्र हे समाजात राहणाऱ्या मानवांच्या आचरणाचे आदर्शी शास्त्र असून ह्या आचारणाच्या इष्टानिष्टतेसंबंधी आणि योग्यायोग्यतेसंबंधी निर्णय देणारे शास्त्र आहे.

### १.३.२ नैतिक तत्त्वज्ञानाचे स्वरुपः

नीतिशास्त्राच्या उपरोक्त व्याख्यामधून नैतिक तत्त्वज्ञानाचे स्वरुप पुढील प्रमाणे सांगता येईल :-

**• नीतिशास्त्र एक शास्त्र आहेः**

एखाद्या विशिष्ट प्रकारच्या घटनांविषयीचे व्यवस्थाबद्ध व जास्तीत जास्त परिपूर्ण ज्ञान म्हणजे शास्त्र होय. घटनांचे निरीक्षण, वर्गीकरण व स्पष्टीकरण या तीन पायऱ्यांमधून विशिष्ट प्रकारच्या घटनासमूहामध्ये सूत्रबद्धता आणली जाते.

नीतिशास्त्र शास्त्रीय पद्धतीच्या वरील तिन्ही पायऱ्यांचा अवलंब करते. आपल्या सामाजिक जीवनामध्ये आपण मानवी वर्तनाविषयी निंदात्मक अथवा प्रशंसात्मक विधाने करीत असतो. मानवी आचरणाचे व अश्या प्रकारच्या नैतिक विधानांचे निरीक्षण तसेच वर्गीकरण नीतिशास्त्र करीत असते. नैतिक विधानांचा परस्परांशी तसेच आदर्शाशी कसा संबंध आहे ह्याचे स्पष्टीकरण नीतिशास्त्र करते.

**• नीतिशास्त्र एक आदर्शी शास्त्र आहेः**

मानवी मनाचे चिंतनक्षमता, भावात्मकता व क्रियात्मकता असे तीन पैलू आहेत. चिंतनक्षमतेमुळे मनुष्य ज्ञानाचा शोध घेतो व सत्य जाणण्याचा प्रयत्न करतो. मनुष्याला भावात्मकतेमुळे मनोविकारांचा (भावनांचा) अनुभव येतो व सौंदर्याची निर्मिती केली जाते. क्रियात्मकतेमुळे मनुष्य अनुभव येणाऱ्या वस्तुस्थितीच्या पलीकडे जाऊन शुभ (कल्याण) प्राप्त करुन घेण्याचा करतो. म्हणजेच मनुष्य जीवनाची सत्य, सौदर्य व शिव (शुभ/कल्याण) ही तीन अंतिम ध्येये आहेत. ह्या तीन अंतिम ध्येयांवर आधारित तीन प्रकारची शास्त्रे उदयास आली. सत्य ह्या आदर्शाचा अभ्यास तर्कशास्त्र करते. सौंदर्य या आदर्शाचा अभ्यास सौंदर्यशास्त्रामध्ये केला जातो. नीतिशास्त्र शिव (शुभ/कल्याण) या ध्येयाचा अभ्यास करते. त्यामुळे नीतिशास्त्र, तर्कशास्त्र व

सौदर्यशास्त्र ही तीनही आदर्शी शास्त्रे ठरतात. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र ह्या सारख्या नैसर्गिक अथवा वर्णनात्मक शास्त्रांपेक्षा आदर्शी शास्त्र भिन्न असते.

नैसर्गिक शास्त्रांमध्ये वस्तुस्थितीचे यथार्थ वर्णन केलेले असते. ही शास्त्रे घटनांशी संबंधित असतात. आदर्शी शास्त्र मूल्यांशी अथवा आदर्शांशी संबंधित असते. नैसर्गिक शास्त्रे काय आहे याचा विचार करते तर आदर्शी शास्त्र काय असावयास हवे याचा विचार करते.

नैसर्गिक शास्त्रांमध्ये घटनांची कारणे त्यांच्या विकासाच्या अवस्था सांगून घटनांचे स्पष्टीकरण केले जाते. आदर्शी शास्त्रांमध्ये मूल्यांचे विवेचन केले जाते. परंतु त्यांचा उगम अथवा विकास याबद्दल काहीच स्पष्टीकरण केले जात नाही.

नैसर्गिक शास्त्रांचे कार्य मापनाचे असून प्रत्येक शास्त्र त्याच्या क्षेत्रातील तथ्यांचे यथार्थ बारकावे नोंदविते. आदर्शी शास्त्रांचे कार्य मूल्यमापनाचे आहे. मानवी कृतींचे इष्ट किंवा अनिष्ट, योग्य किंवा अयोग्य असे मूल्यमापन नीतिशास्त्र करते.

नैसर्गिक शास्त्रांमधील नियमांची अथवा तत्त्वांची सिद्धता दिली जाते. त्यात घटनांकडे बघण्याचा दृष्टिकोन तर्कनिष्ठ असतो. आदर्शी शास्त्रांमधील मूल्यांची सिद्धता देता येत नाही. मूल्यांची केवळ प्रशंसाच केली जाऊ शकते. तसेच नेमकी कोणती मूल्ये आचरणात आणावीत हे मनुष्याची संकल्पशक्ती ठरविते, बुद्धी नाही.

नैसर्गिक शास्त्रांमधील विधानांना तथ्यविषयक (वर्णनात्मक) विधाने म्हटले जाते. अशी विधाने सत्य किंवा असत्य यापैकी एक  असतात. आदर्शी शास्त्रांमधील विधानांना मूल्यविषयक विधाने (निर्णय) म्हटले जाते. अशी  मूल्यविषयक विधाने सत्य किंवा असत्य म्हणता येत नाहीत.

नैसर्गिक शास्त्रांच्या बाबतीत मनुष्याचा ज्ञानविषयक भाग महत्त्वाची भूमिका पार पाडतो. आदर्शी शास्त्राच्या बाबतीत मनुष्याचा क्रियाशीलतेचा भाग म्हणजे मनुष्याची संकल्पशक्ति अत्यंत जोरकसपणे कार्यरत असतो.

**• नीतिशास्त्र मानवी आचरणाच्या आदर्शांचे शास्त्र आहे:**

नीतिशास्त्र मानवी चालीरीतींचे अथवा सवयींचे शास्त्र आहे. जीवन म्हणजे कृतींची एक अखंड मालिका आहे.  वारंवार केलेल्या कृतींची सवय बनते व सवयीतून व्यक्तीचे चारित्र्य घडत जाते. व्यक्तीचे चारित्र्य त्याच्या आचरणामधून प्रकट होते.

स्पेन्सरच्या मते आचरण म्हणजे कृतींचे ध्येयाशी समायोजन होय. एखादे विशिष्ट ध्येय प्राप्त करुन घेण्यासाठी व काही साधने निवडून केलेली सहेतुक कृती म्हणजे आचरण होय. आचरण हे एका विशिष्ट ध्येयाने (आदर्शाने) प्रेरित झालेले असते. म्हणून नीतिशास्त्र मानवी आचरणातील आदर्शाचे शास्त्र आहे.

**• नीतिशास्त्र मानवी कृतींचे मूल्यमापन करतेः**

नैतिकतेचा विचार मानवी कृतींशी संबंधित असतो. नीतिशास्त्र मानवी आचरणाची म्हणजेच मनुष्याच्या सहेतुक कृतींची आदर्शाशी तुलना करुन त्या कृतींचे मूल्यमापन करते. मूल्यमापन करताना त्या सहेतूक कृतींना इष्ट किंवा योग्य तसेच अनिष्ट किंवा अयोग्य ठरविले जाते.

Right (योग्य) हा शब्द लॅटिन भाषेतील (Rectus) या शब्दापासून आला आहे. Rectus ह्या शब्दाचा अर्थ ''नियमानुसार'' असा होतो. कोणताही नियम काही अन्य ध्येय प्राप्त करण्याचे साधन असतो. नियम स्वतः साध्य नसतो.

(Good) इष्ट हा शब्द जर्मन भाषेतील Gut या शब्दापासून तयार झाला आहे. Gut या शब्दाचा अर्थ कोणत्याही ध्येयास उपयुक्त असा होता. त्यामुळे इष्ट हा शब्द ध्येय तसेच ध्येयाप्रत जाण्यास उपयुक्त या अर्थाने वापरला जातो.

आचरण म्हणजे ध्येयांशी कृतींचे समायोजन होय. जर हे समायोजन नियमानुसार असेल तर ते आचरण योग्य ठरते. जर असे समायोजन ध्येय प्राप्त करुन घेण्यास उपयुक्त असेल तर असे आचरण इष्ट असते. नियमबाह्य कृती अयोग्य असते व ध्येयाप्रत जाण्यास अयशस्वी ठरलेली कृती अनिष्ट असते.

मानवी ध्येये व ध्येयासाठी उपयुक्त साधने यांच्या आधाराने मानवी आचारणाचे मूल्यमापन नीतिशास्त्रामध्ये केले जाते.

**आपली प्रगती तपासा :**

१. नीतिशास्त्राची व्याख्या कश्या प्रकारे केली जाते ?

२. नैतिक तत्त्वज्ञानाचा अभ्यास विषय काय आहे ?

३. मानवी मनाचे कोणकोणते पैलू आहेत ?

४. नीतिशास्त्रास आदर्शी शास्त्र का म्हणतात ?

**• नीतिशास्त्र : सैद्धान्तिक शास्त्र की व्यावहारिक शास्त्र ?**

अनेक पाश्चात्य तत्त्वचिंतकांच्या मते नैतिक तत्त्वज्ञान हे व्यावहारिक किंवा उपयोजित शास्त्र नाही. व्यावहारिक शास्त्र आपणास 'कसे करावे' याचे ज्ञान देते. विशिष्ट ध्येय तसेच ध्येयप्राप्तीची साधने याचे मार्गदर्शन व्यावहारिक शास्त्रांमध्ये केले जाते. वैद्यकशास्त्र हे एक व्यावहारिक शास्त्र आहे. चांगले आरोग्य म्हणजे नेमके काय

तसेच चांगले आरोग्य कोणत्या मार्गाने प्राप्त होते. आरोग्य बिघडल्यास रोग दूर कसे करावे ह्या सर्व बाबींचे मार्गदर्शन वैद्यकशास्त्रात केले जाते. पाश्चात्य विचारवंतांच्या मते नीतिशास्त्र सिद्धान्तांची स्थापना करते. परंतु जीवनाची ध्येये प्राप्त कशी होतील याचे मार्गदर्शन करीत नाही.

भारतीय परंपरेमध्ये नीतिशास्त्र एक व्यावहारिक शास्त्र आहे. बहुतेक भारतीय दर्शने मोक्ष हे जीवनाचे परमप्राप्तव्य मानतात. त्याचबरोबर मोक्ष हे सर्वोच्च ध्येय प्राप्त करुन घेण्यासाठी विशिष्ट आचरण संहिता निर्धारित करतात. **योग** दर्शन, बौद्ध दर्शन, जैन दर्शन तसेच वेदान्त दर्शन त्यांच्या अनुयायांसाठी विशिष्ट मार्ग आखून देतात. श्रीमद्‌भगवद्‌ गीतेमध्ये तर व्यक्तीची नेमकी कर्तव्ये सुद्धा सांगितली गेली आहेत.

**• नीतिशास्त्र कला नाहीः**

नीतिशास्त्र मनुष्याच्या जीवनाच्या व्यावहारिक बाजूशी म्हणजे आचरणाशी संबंधित आहे. त्यामुळे असा प्रश्न उपस्थित होतो की चांगले आचरण आत्मसात करता येते का ? ज्या प्रमाणे संगीत, नृत्य, चित्रकला इत्यादि कला वारंवार विशिष्ट कृती केल्याने शिकता येतात. त्याप्रमाणे नीतिमान बनणे शिकता येईल का? मॅकॅन्झीने ह्या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी नीतिशास्त्र व कला यांची तुलना केली. त्याच्या मते नीतिशास्त्र कला नाही. चांगल्या आचरणाची कला शिकता येणार नाही. मॅकॅन्झीच्या मते नीतिशास्त्र व कला यांतील भेद पुढील प्रमाणे आहेः-

मॅकॅन्झीच्या मते कला एक विशिष्ट क्षेत्राशी संबंधित असते तर नीतिशास्त्र संपूर्ण मानवी जीवनाशी संबंधित असते. कलेचे क्षेत्र मर्यादित असून आचरणाचे व नैतिकतेचे क्षेत्र अत्यंत व्यापक आहे.

ज्या व्यक्तीमध्ये कलाकृती निर्माण करण्याचे सामर्थ्य असते तो कलाकार ठरतो. परंतु चांगली कृती करण्याचे सामर्थ्य असणारा माणूस नीतिमान ठरत नाही. जो प्रत्यक्षात नीतीने वागतो तो माणूस चांगला माणूस ठरतो.

एखाद्या कलाकृतीचे मूल्यमापन करताना त्या कलाकाराचा अंतस्थ हेतू लक्षात घेतला जात नाही. मानवी आचरणाचे मूल्यमापन करताना कर्त्याचा अंतस्थ हेतू निर्णायक असतो.

कलाकार कालांतराने आपली कला सोडून देऊ शकतो. गायक गाणे गाण्याचे थांबवू शकतो व तरीही तो जिवंत असेतो किंवा त्याच्या मृत्युनंतरही तो गायकच राहतो. सद्‌गुणी माणूस जिवंत असेपर्यंत सदाचरणी असावयास हवा. ज्यावेळी त्याचे आचरण योग्य रहात नाही त्यावेळी तो सद्‌गुणी रहात नाही. कलेपासून निवृत होता येत नाही.

मॅकॅन्झी चे हे विचार आजच्या युगातही महत्त्वाचे आहेत. आज अनेक नवनवीन अभ्यासक्रम उदयास येत आहेत. विशेषतः व्यक्तिमत्त्व विकासाचे

अभ्यासक्रम. मॅकॅन्झीच्या मते आचरणाची कला आत्मसात करता येणार नाही. चांगले आचरण व नैतिकता ही व्यक्तीची आंतरिक बाजू आहे. अभ्यासक्रमामधून बाह्य वर्तन शिकविले जाऊ शकते. परंतु मनुष्याच्या चारित्र्यामधील सद्‌गुण शिकविले जाऊ शकतील काय ? व्यक्तिमत्व विकासाच्या शिबिरामधून व्यक्ती खरोखर नीतिमान बनू शकेल का हा प्रश्न अनुत्तरीत राहतो.

**• नीतिशास्त्र मूल्याशी संबंधित आहेः**

नीतिशास्त्र मानवी आचरणाच्या इष्टतेसंबंधी अथवा योग्यतेसंबंधी चिकित्सा करते. नीतिशास्त्रातील प्रश्न मूल्यांशी संबंधित असतात. मूल्यविषयक निर्णय इंद्रियानुभव, बुद्धि व अंतःप्रेरणा यातून दिले जातात. नैतिक तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून मूल्य म्हणजे काय योग्य आहे, काय इष्ट आहे तसेच मानवी जीवनात काय महत्त्वाचे आहे किंवा इच्छा करण्यासारखे आहे ते होय. मूल्यांचा संबंध कृतीची निवड करण्याशी येतो. ज्या कृतीमुळे जीवनाचे संवर्धन होते अश्या कृतीची निवड करावयास हवी. अंतिम सत्ता आणि अंतरात्मा, निसर्ग आणि चैतन्य यांच्या आंतरक्रियेमधून मूल्ये निर्माण होत जातात. यातून मानवी अस्तित्व अधिकाधिक समृद्ध होत जाते. मानवी मूल्ये ही विकसित होत जाणाऱ्या मनाला जाणविलेल्या अंतिम सत्तेच्या स्वरुपाच्या खाणाखुणा आहेत. कान्ट ने अस्तित्व आणि मूल्य यातील फरक दर्शविला आहे.

**तथ्य आणि मूल्ये :**

नैसर्गिक शास्त्रे तथ्यांशी संबंधित असतात. जे अस्तित्वात ‘आहे’ त्याच्याशी तथ्ये जोडलेली असतात. विशिष्ट दिक्‌काल मध्ये असणाऱ्या वस्तू किंवा घडणाऱ्या घटनांना तथ्य म्हटले जाते. मानवी अनुभवाच्या कक्षेमध्ये जेवढे जाणवते त्याच्या पलीकडे तथ्यांना अन्य काही सुप्त अर्थ नसतो. घटनांचे वर्णन करता येते. तथ्य म्हटले की ते सत्य आहे असे गृहीत धरले जाते. तथ्य सभोवार असणाऱ्या विश्वाच्या माहितीचा एक अंश असते. तथ्याचा संबंध मानवी बुद्धीशी असतो.

आदर्शी शास्त्रे मूल्यांशी संबंधित असतात. मूल्यांचा संबंध ‘काय असावयास हवे’ याच्याशी असतो. जीवनामध्ये ज्यांचा मागोवा घ्यावा, ज्यांना साध्य मानावे अश्या गोष्टी म्हणजे मूल्य होय. मूल्ये नेहमीच घटनांच्या, तथ्यांच्या पार्श्वभूमीवर असतात आणि त्यांची अंतर्मनाने जाणीव होते. मूल्ये आदेशात्मक आणि मूल्यांकन करणारे असतात. विश्व जड द्रव्य, दिक्, काल, कारणता या धाग्यानी बनलेलेआहे. मूल्ये ह्या विशिष्ट चौकटीच्या कक्षेबाहेर तसेच अधिक श्रेष्ठ असतात. मूल्यांना सत्य अथवा असत्य म्हणता येत नाही. मूल्ये मानवी मनाच्या भावात्मक भागाला संतुष्ट करतात.

अन्य जड वस्तूंप्रमाणे मूल्यांना भौतिक अस्तित्व नसते. मूल्यांचे अस्तित्व दिक् कालाच्या पलीकडे असून ती स्वतःहून अस्तित्वात असतात. ह्या विश्वाचे ज्ञान

आपल्याला इंद्रिये व बुद्धि यांच्या द्वारे होते. मूल्यांचे ज्ञान अंत:प्रज्ञेने व तात्काळ होते. मूल्ये आपल्याला अनुभवास येणाऱ्या विश्वाच्या पलीकडे असतात.

ह्या विश्वात होणाऱ्या घडामोडींच्या बौद्धिक आकलनाचा अपरिहार्य परिणाम म्हणून मूल्यविषयक संवेदना विकसित होत जातात. तथ्य आणि मूल्य यांचा अतिशय निकटचा संबंध आहे. जोपर्यंत तथ्य आहेत तोपर्यंत त्यांच्या पार्श्वभूमीवरील मूल्यांचे अनुमान होत राहणार. मूल्य व वस्तुस्थिती एकमेकांपासून वेगळे करता येणार नाहीत. मूल्यांशिवाय अस्तित्व नाही व अस्तित्वाशिवाय मूल्ये नाहीत.

**साध्य मूल्ये व साधन मूल्ये :**

मूल्यांकडे बघण्याचे वेगवेगळे दृष्टिकोन असू शकतात. सर्व मूल्ये मानवी व्यक्तित्वाच्या विकासामधील महत्त्वाच्या पायऱ्यांवरील अनुभव आहेत. मूल्यांना दिल्या जाणाऱ्या महत्त्वानुसार मूल्यांचे वर्गीकरण करता येते.

साध्य मूल्यांना आंतरिक मूल्य अथवा स्वतोमूल्य म्हटले जाते. सत्य, सौंदर्य, सहिष्णुता, संयम, धैर्य ह्यांना साध्य मूल्ये म्हटले जाते. स्वतोमूल्य असलेली मूल्ये त्यांच्या परिणामांमुळे महत्त्वाची न ठरता ती मूलतः महत्त्वाची ठरतात. सत्य अथवा सौंदर्य ही अन्य कशाशीही समष्टी झाली नाही तरीही, स्वतंत्रपणे साध्य करावीत अशी मूल्ये आहेत. सहिष्णुता, चारित्र्य इ. मूल्यांची इच्छा सहिष्णुतेसाठी किंवा चारित्र्यासाठीच केली जाते. म्हणजेच ह्या मूल्यांना आंतरिक मूल्य आहे व दुसऱ्या काही ध्येयांच्या प्राप्तीची त्यांना अपेक्षा नाही.

साधन मूल्यांना स्वतःचे काही मूल्य नसून अन्य मूल्यांच्या प्राप्तीसाठी त्यांची इच्छा केली जाते. साधन मूल्यांना बहिःस्थमूल्य असेही म्हटले जाते. काही विशिष्ट उद्देशाने साधन मूल्यांना प्राप्त केले जाते. साधन मूल्यांना त्यांच्या पेक्षा बाहेरील गोष्टी प्राप्त करण्यासाठी महत्त्व प्राप्त होते. साधन मूल्यांमुळे अधिक मूल्यवान ध्येय प्राप्त होते. चष्म्याला साधन मूल्य आहेय. चष्म्यामागे बघणारे डोळे असले तर चष्मा मूल्यावन असतो. 'स्वच्छ' बघणे या ध्येयासाठी चष्म्याला साधन मूल्य आहे. साधन मूल्ये एका समष्टीचे घटक असतात. साधन मूल्यांना साध्यामुळे मूल्य प्राप्त होते. त्यांना स्वतंत्रपणे मूल्य नसते.

साध्य मूल्य व साधन मूल्ये ह्या संज्ञा सापेक्ष आहेत. ही दोन्ही प्रतीचीं मूल्ये एकमेकांपासून संपूर्णतया स्वतंत्र नाहीत. उद्दिष्टाला अनुसरुन मूल्ये साध्य मूल्ये अथवा साधन मूल्ये ठरतात. एखाद्या व्यक्तीसाठी जे उद्दिष्ट असेल ते अन्य व्यक्तीसाठी केवळ साधन असू शकते. उदा. बुलेट ट्रेन एखाद्या अभियंत्यासाठी साध्य असेल तर तीच बुलेट ट्रेन एखाद्या प्रवाशासाठी इच्छित स्थळी लवकर जाण्याचे साधन असेल. चालण्याचा व्यायाम ह्या साधनाने चांगले आरोग्य हे साध्य प्राप्त होते. तर चांगले आरोग्य ह्या साधनाने तीर्थयात्रा हे साध्य प्राप्त होऊ शकते.

मूल्यांचे वर्गीकरण अथवा प्रतवारी काही वेगळ्या प्रकारे केले जाते-धन मूल्ये व ऋण मूल्ये, उत्पादक मूल्ये व अनुत्पादक मूल्ये, शाश्वत मूल्ये व नश्वर मूल्ये इत्यादि. सर्वसाधारणपणे साध्य मूल्ये साधनमूल्यांपेक्षा श्रेष्ठ मानली जातात. धन मूल्ये ऋण मूल्यांपेक्षा उच्च प्रतीची ठरतात.

मानवी मन हे मूल्याचे आश्रयस्थान आहे. बाह्य परिस्थितीला दिलेला एक विशिष्ट प्रकारचा प्रतिसाद म्हणजे मूल्य होय. मानवी मनाची तीन कार्ये आहेत-विचार, भावना व संकल्प. मनाच्या कार्यांना अनुलक्षून अनुक्रमे बौद्धिक मूल्ये (सत्य) सौंदर्यात्मक मूल्ये (सौंदर्य) व नैतिक मूल्ये (शुभ) असतात. सत्य, सौंदर्य व शिव, शुभ ही वैश्विक मूल्ये आहेत.

**आपली प्रगती तपासा :**

१. नीतिशास्त्र व्यावहारिक शास्त्र आहे काय ?

२. नीतिशास्त्र कलेपासून वेगळे कसे आहे ?

३. तथ्य आणि मूल्य यात काय फरक आहे ?

४. मूल्य म्हणजे काय ?

५. साध्य मूल्य व साधन मूल्य म्हणजे काय ?

## १.४ नैतिक तत्त्वज्ञानाच्या शाखा

एके काळी चालीरीती, सवयी अथवा रुढींचे शास्त्र असलेले नीतिशास्त्र आज चार शाखांमध्ये विकसित झाले आहे. नीतिशास्त्राच्या वर्णनात्मक नीतिशास्त्र, आदर्शी नीतिशास्त्र, अधिनीतिशास्त्र व उपयोजित नीतिशास्त्र अशा चार शाखा आहेत.

**१. वर्णनात्मक नीतिशास्त्रः**

समाजामध्ये ज्या नीतिविषयक संकल्पना असतात त्यांचा अभ्यास वर्णनात्मक नीतिशास्त्रामध्ये केला जातो. निरनिराळ्या समाजसमूहांमध्ये वेगवेगळ्या नीतिच्या संकल्पना तसेच आचारणाविषयी विभिन्न संकेत प्रचलित असतात. त्याचप्रमाणे एकाच समाजसमूहामध्ये कालानुरुप नैतिक संकल्पना बदलत जातात. वेगवेगळ्या मानव समूहांमधून व वेगवेगळ्या काळी रुढ असलेले नैतिक संकेत व आचरणविषयक संकेत अभ्यासण्याचे कार्य वर्णनात्मक नीतीशास्त्र करते. नीतिशास्त्राचा इतिहास व विकास यांचा अभ्यास वर्णनात्मक नीतिशास्त्रात केला जातो. वेळोवेळी समाजांमध्ये प्रचलित असलेल्या रुढी परंपरा, प्रथा, तसेच निषिद्ध कृती व शब्द यांची नोंद वर्णनात्मक नीतिशास्त्र करते.

जनसमूहाचे नैतिक आदर्श व समूहांमधील वर्जित आचरण (कृती व शब्दोच्चारण यांची चिकित्सा नीतिशास्त्राच्या या शाखेमध्ये केली जाते. कोणत्या कृती योग्य, कोणत्या कृती अयोग्य, सदाचार अथवा दुराचार, सद्गुण अथवा दुर्गुण या विषयी लोकसमूहाच्या धारणा संकलित केल्या जातात. मनुष्य आचरण करताना नेमक्या ज्या कृतींची निवड करतो त्यांचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न तसेच विविध समाजांतील आचारसंहिताचे परीक्षण वर्णनात्मक नीतिशास्त्रामध्ये केले जाते.

कोणत्याही समाजामध्ये जे नैतिक संकेत, रुढी, परंपरा प्रस्थापित झालेले असतात त्यांची ती केवळ तथ्ये आहेत. अश्या दृष्टीने नोंद घेऊन त्यातून काही निष्कर्ष काढले जातात. वर्णनात्मक नीतिशास्त्रामध्ये मूल्यमापनात्मक दृष्टिकोन न ठेवता मनुष्याच्या नैतिक श्रद्धा व विश्वासांचे तथ्यानुरुप परीक्षण केले जाते. लॉरेन्स कोहलबर्गचा नैतिक विचारप्रक्रियेच्या विकासाचा सिद्धान्त वर्णनात्मक नीतिशास्त्राचे उत्तम उदाहरण आहे.

**२. आदर्शी नीतिशास्त्र:**

आदर्शी नीतिशास्त्र आदेशात्मक असते. 'लोकांचे आचरण कसे असावे' या संबंधीच्या सिद्धान्तांची चर्चा आदर्शी नीतिशास्त्र करते. मानवी आचरणाचे मानदंड काय असावेत याची चिकित्सा या शाखेमध्ये केली जाते. नैतिक निर्णय घेताना उद्भवणाऱ्या संघर्षात्मक परिस्थितीमध्ये मार्गदर्शक ठरणाऱ्या नैतिक तत्त्वांची चर्चा आदर्शी नीतिशास्त्रामध्ये केली जाते. कृतीची युक्तता कशी ठरवावी. सदाचार कशास म्हणावे, जीवनामध्ये मनुष्याने काय प्राप्त करुन घ्यावे, मनुष्यांची कर्तव्ये काय असावीत इत्यादि प्रश्नांची चर्चा नीतिशास्त्राच्या या शाखेमध्ये केली जाते. योग्य अथवा इष्ट आचरणाची माहिती देण्यापेक्षा योग्य / इष्ट आचरणाचे निकष निर्माण करणे व आचरणाचे मूल्यमापन करणे हे आदर्शी नीतिशास्त्राचे कार्य आहे.

ज्यावेळी मानवी आचरण निर्धारित मानदंडापेक्षा वेगळे ठरते किंवा त्या मानदंडाच्या विरोधी असते त्यावेळी परिणामस्वरुप शिक्षा करण्याविषयीचा संकेत सुद्धा आदर्शी नीतिशास्त्रामध्ये मिळतो. सामाजिक तसेच नैतिक सुव्यवस्था विस्कळीत करणाऱ्या व्यक्तीला शासन का करावे याचे समर्थन करणारे सिद्धान्त आदर्शात्मक नीतिशास्त्रामध्ये दिले जातात.

ॲरिस्टॉटलचा सद्गुणांविषयीचा विचार, कान्टचा कर्तव्यवादी बुद्धिवाद, मिल्लचा उपयुक्ततावाद तसेच श्रीमद्‌भगवद् गीतेतील निष्काम कर्मयोग हे सर्व आदर्शी नीतिशास्त्रातील सिद्धान्त आहेत.

**३. अधिनीतिशास्त्र:**

नीतिशास्त्राच्या या शाखेमध्ये विविध नैतिक विधाने, संकल्पना व संज्ञा यांचे विश्लेषण केले जाते. मानवी आचरणाचे मूल्यमापन करताना नैतिक निर्णय दिले जातात. नैतिक निर्णय देताना ज्या संकल्पना वापरल्या जातात त्यांचे नेमके अर्थ

सुनिश्चित करणे आवश्यक ठरते. शुभ, योग्य, इष्ट, कर्तव्य इ. नैतिक संकल्पनांचे विश्लेषण व व्याख्या ह्या मुख्यतः भाषेशी संबंधित असतात. त्यासाठी नैतिक भाषेचे अध्ययन करण्याचे कार्य अधिनीतिशास्त्र करते. विश्लेषणात्मक किंवा समीक्षात्मक नीतिशास्त्र याचे एक उदाहरण आहे.

अधिनीतिशास्त्रामध्ये नैतिक निर्णयांचे स्वरुप व प्रयोजन स्पष्ट केले जाते. नैतिक निर्णयांचा अन्य ज्ञानशाखांतील निर्णयांशी कश्या प्रकाराचा संबंध आहे हे ही स्पष्ट केले जाते.

अधिनीतीशास्त्र एकूणच नैतिक तत्त्वांचे प्रमाणीकरण करते. नैतिक तत्त्वांचे अथवा निर्णयांचे समर्थन कसे करता येईल तसेच नैतिक विधानांचे प्रामाण्य कसे सिद्ध करता येईल याचा विचार अधिनीतिशास्त्रामध्ये केला जातो.

अधिनीतिशास्त्र नैतिक भाषेच्या योग्य व काटेकोर वापराबाबत निःपक्ष परंतु अतिशय आग्रही भूमिका घेते.

### ४. उपयोजित नीतिशास्त्रः

मानवी जीवन दिवसेंदिवस अधिकाधिक गुंतागुंतीचे होत चालले आहे. मनुष्याच्या वैयक्तिक तसेच सामाजिक जीवनातील घडामोडींना नैतिक सिद्धांन्त कसे लागू होतील याचा विचार आवश्यक आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे मनुष्यापुढे नवनवीन पेच उभे रहात आहेत. स्वेच्छामरण, दया मरण, गर्भपात, आत्महत्या, पर्यायी माता या सारख्या विषयांवर वेगवेगळे मतप्रवाह आढळून येत आहेत. ह्या बाबी नैतिक की अनैतिक अशा गोंधळवून टाकणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न उपयोजित नीतिशास्त्रामध्ये केला जातो.

वैज्ञानिक प्रगती व अधिकाधिक विकसित होणारे तंत्रज्ञान मनुष्यापुढे नवीन आव्हाने उभी करीत आहेत. पर्यायी मातृत्व, गर्भलिंग चाचणी, जैव तंत्रज्ञान, क्लोनिंग यातून नवीन नैतिक प्रश्न उभे रहात आहेत.

काही नैतिक प्रश्न मनुष्याच्या बेजबाबदार वर्तनातून तसेच अन्य जीवांबद्दल संवेदनक्षमतेचा अभाव यातून निर्माण होत आहेत. काही प्रजातींचे नष्ट होणे, निसर्गाची हानी यासारख्या ढासळत्या जीवन शृंखलेची व पर्यावरणाची नैतिक जबाबदारी श्रेष्ठतम बुद्धिमान मनुष्य प्राण्यावर आहे.

उपयोजित नीतिशास्त्र जनमत व कायदे निर्मिती यासाठी मार्गदर्शन करते. नैतिक प्रश्नांची हो/नाही यासारखी वस्तुनिष्ठ उत्तरे नसतात. नैतिक समस्या बहुआयामी असतात. त्यांची समाधानकारक उत्तरे मनुष्य जीवनाच्या विविध अंगांचा एकत्रितपणे अभ्यास केल्यानंतर मिळू शकतात. स्त्री-भ्रूणहत्येचा प्रश्न, प्रचलित विवाह पद्धती, हुंडा पद्धती, पालकांची आर्थिक स्थिती अश्या अनेक गोष्टींशी जोडलेला आहे.

उपयोजित नीतिशास्त्र अश्या समस्यांचा साधक-बाधक चर्चेद्वारा अभ्यास करुन निश्चित धोरणे ठरविण्यास मार्गदर्शन करते.

उपयोजित नीतिशास्त्र ही शाखा अनेक अंगांनी बहरलेली शाखा आहे. प्रसारमाध्यमांचे नीतिशास्त्र, पर्यावरणाचे नीतिशास्त्र, व्यावसायिक नीतिशास्त्र, जैवनीतिशास्त्र, शिक्षक-विद्यार्थी तसेच वकिल व व्यापारी यांच्यासाठी आचार संहिता इत्यादिंचा उपयोजित नीतिशास्त्रामध्ये सामावेश होतो. यांमध्ये मानवी जीवनातील विविध क्षेत्रातील कृतींची नैतिक दृष्ट्या चिकित्सा केली जाते.

**आपली प्रगती तपासा**

१. अधिनीतिशास्त्र म्हणजे काय ?
२. उपयोजित नीतिशास्त्र म्हणजे काय ?
३. वर्णनात्मक नीतिशास्त्र म्हणजे काय ?

## १.५ नैतिक विचारप्रक्रियेचा विकास - लॉरेन्स कोहलबर्ग

### १.५.१ नैतिक विकासाच्या अवस्था आणि नैतिकीकरण - कोहलबर्ग:

लॉरेन्स कोहलबर्ग हा एक मानसशास्त्रज्ञ व मानसशास्त्राचा प्राध्यापक होता. हार्वर्ड विद्यापीठात त्याने मानसशास्त्रात (Psychology) पूर्वबाल्यावस्थेपासूंन ते प्रौढावस्थेपर्यंत नैतिक विकास कसा होतो याचे संशोधन केले. कोहलबर्गने नैतिक विकासाच्या अवस्था आणि नैतिकीकरणाच्या बाबतीत बोधात्मक उपपत्तीही सांगितली. नैतिक विकास म्हणजे काय ? नैतिक विचारप्रक्रिया विकासाच्या प्रमुख अवस्था कोणत्या ? त्याचे मापन कसे केले जाते ? नैतिक विकास सामाजिक अध्ययनातून कसा होतो ? या विषयीचे महत्त्वपूर्ण संशोधन केले.

### १.५.२ व्यक्तिमत्त्वातील नैतिक निर्णयाचे स्थान :

व्यक्तिमत्व विकासाच्या क्रमवारीत नैतिक अवस्थांचे स्थान समजण्यात मदत होते. नीतिमत्तेचा पाया हा शैशवावस्थेत घातला जातो. शैशवावस्थेचा कालावधी २ वर्षे ते ४ वर्षापर्यंतचा असतो. या अवस्थेत शिशूना मूल्यांची वा सद्सद्विवेकतेची जाणीव नसते. त्यामुळे शिशूंचे आचरण वा वर्तन हे नैतिकही नसते व अनैतिकही नसते. त्यांचे आचरण हे नीतिबाह्य (न-नैतिक Amoral) असते. शैशवास्थेत नैतिकतेचा जो पाया घातला जातो त्यावर त्यांचे भावी जीवनातील वर्तन ठरते. मुलांचा बोधनिक विकास तीन अवस्थातून होतो. क्रियापूर्व विचार (आंतरिक क्रांती) मूर्तक्रियात्मक विचार आणि

वस्तुनिष्ठ किंवा औपचारिक (Formal) क्रियात्मक विचार. साधारणपणे मूल ७ वर्षाचे झाल्यानंतर मूर्त तर्कशुद्ध विचार करु लागते. तार्किक अनुमान करणे, वस्तुंचे वर्गीकरण, वस्तूंमधील संबंध, परिमाणात्मक वस्तूमधील संबंध हाताळणे इ. मूर्तक्रियात्मक विचार करु लागते. कुमारावस्थेत वस्तूनिष्ठ वा औपचापरिक (formal) क्रियात्मक विचार सुरु होतात. कुमार व प्रौढ अवस्थेत व्यक्ति या अमूर्त विचार करतात. ते अभ्यूपगम तयार करतात. त्यांचे विचार वास्तव व समस्यांना सामोरे जाण्याची असते. बुद्धी परिपक्व होऊ लागते. नैतिक निर्णयात योग्य काय ? अयोग्य काय? यासारख्या अमूर्त कल्पनांचा विकास होतो. समाजमान्य वर्तनाचे नियम, नीतितत्त्वे समजण्याइतपत त्यांच्या बौद्धिक क्षमतेचा विकास झालेला असतो.

### १.५.३ नैतिक विकासाच्या अवस्थांचे सैद्धांतिक वर्णन:

लॉरेन्स कोहलबर्गने नैतिक विकासाच्या तीन प्रमुख पातळ्या प्रत्येकी दोन याप्रमाणे सहा अवस्थांमधून सांगितल्या:

### अ) पूर्व सांकेतिक पातळी (Preconventional Morality) ४ ते १० वर्षापर्यंत:-

१) शिक्षा व आज्ञापालन
२) पारितोषिक प्राप्ती

### ब) सांकेतिक पातळी (Conventional Morality) १० ते १३ वर्षापर्यंत

३) चांगला मुलगा / चांगली मुलगी स्थिती.
४) सामाजिक संकेत व अधिकारवादी स्थिती

### क) सांकेतिकोत्तर नैतिक पातळी (Post Conventional Morality):

ही अवस्था प्रामुख्याने कुमारावस्था म्हणजे १३ वर्षापासून ते पूर्वप्रौढावस्थेपर्यंत असते.
५) लवचिक नैतिक तत्त्वे किंवा नीतीमत्तेच्या संकल्पनांमधील बदल
६) नैतिक नियम तयार करणे.

### अ) पूर्वसांकेतिक नैतिक पातळी (Preconventional Morality):

कोहलबर्गने पूर्व बाल्यावस्थेतील नैतिक विकासाच्या अवस्थेचे वर्णन ''पूर्व सांकेतिक नैतिकता'' असे केलेले आहे. ही नीतिपूर्व अवस्था होय. पूर्व बाल्यावस्थेचा कालावधी ४ ते १० वर्षापर्यंतचा असतो. या अवस्थेत नैतिक विकास प्राथमिक अवस्थेत राहतो. नैतिक विकासाचा तपशीलवार अभ्यास जिन पियाजे या मानसशास्त्रज्ञाने केला. त्याच्या मते पूर्वबाल्यावस्था निर्बंधातून नीतिमत्ता (Morality by constraint) या प्रकारची असते. एखादी कृती योग्य आहे की अयोग्य आहे हे हेतूवरुन न ठरविता परिणामावरुन ठरविली जाते. कोहलबर्गने पूर्वसांकेतिक नैतिक पातळीत दोन अवस्था पुढील प्रमाणे सांगितल्या.

**१) शिक्षा व आज्ञापालन :**

एखादी कृती चांगली की वाईट ते भौतिक परिणामावरुन ठरते. शिक्षा टाळणे आणि आज्ञापालनाची सवय लागणे आवश्यक आहे. यासाठी सुसंगत शिस्तीचा उपयोग केला पाहिजे. जर मुलांना शिस्त लागली तर आज्ञापालनाची सवय मुलांना लागते.

**२) पारितोषिक प्राप्ती (Gaining Reward):**

पूर्व बाल्यावस्थेतील मुले बक्षिस मिळावे म्हणून सामाजिक अपेक्षेनुसार वर्तन करतात. त्यांचा विचार केवळ उपयुक्ततेच्या रुपात केला जातो. जसे तु मला मदत कर मी तुला मदत करील.

या अवस्थेत बालकांमध्ये सद्सद् विवेकबुद्धी जागृत झालेली नसते.

**ब) सांकेतिक नैतिकता (Conventional Morality):**

ही रुढी अनुरुप अवस्था होय. १० ते १३ वर्षापर्यंतचा हा कालावधी असून या अवस्थेला उत्तरबाल्यावस्था वा मध्यमबाल्यावस्था असे म्हणतात. या अवस्थेत नैतिक संकल्पना अधिकाधिक व्यापक होत जातात. सामाजिक मानदंडाचा वा आदर्शांचा प्रभाव बालकांवर पडतो. या अवस्थेत पुढील प्रमाणे ३ री व ४ थी नैतिक उप अवस्था येते.

**३) चांगला मुलगा / चांगली मुलगी स्थिती :**

ही अवस्था काही अंशी मर्यादीत असून यात समूह स्वीकृतीचा विचार आहे. इतरांना आनंद व मान्य होणाऱ्या कृती म्हणजे चांगले वर्तन होय. यात समूह स्वीकृतीवर व छान असण्यावर भर असतो.

**४) अधिकारवादी स्थिती :**

यात नैतिक नियम वा अधिकारावर भर असतो. व्यक्तीने आपले कर्तव्य करणे अधिकाऱ्याचा मान राखणे, कायदा व सामाजिक सुव्यवस्था टिकविणे हेच योग्य होय. म्हणून ही अवस्था अधिक समाजलक्षी व व्यापक आहे.

या वयात बालके स्वतःची नैतिक संहिता तयार करु लागतात. नैतिक संकल्पनांचे सामान्यीकरण, नैतिक तत्त्वांचे एकसूत्रीकरण करतात. त्यातून नैतिक संहिता तयार होते. नैतिक संहितेच्या विकासात शिस्तीचा वाटा असतो. पुढे ही शिस्त एक गंभीर समस्या होते. शिस्त निर्मितीची तंत्रे या वयात निरुपयोगी ठरतात. मोठी मुले शिक्षेच्या तंत्रात विरोधी प्रतिक्रिया व्यक्त करतात. त्याचे विपरीत परिणाम होतात. अशावेळी शिस्त निर्मितीचे मार्ग निराळे अनुसरणे श्रेयस्कर असते. चांगले, वाईट,

बरोबर, चूक दाखवून नैतिक नियम शिकविणे कठीण होऊ लागते. तेव्हा दुसरा पर्याय शोधण्याची वेळ कोहलबर्गला वाटली. आज्ञा करुन नैतिकता शिकविण्याचे दिवस गेले. सद्‌गुणाची शिकवण मुलांना देऊन मुले नीतिमान होतील असे मानणे भोळीभाबडी समज आहे. सद्‌गुणांची त्यांना ओळख करुन द्यावयाची असा त्याचा अर्थ नाही. सद्‌गुण, चांगले, बरोबर यागोष्टी सांगण्यापेक्षा एखाद्या घटनेतील संदर्भ तपासून ती विशिष्ट कृती योग्य की अयोग्य, चांगली की वाईट हे स्वतःच व्यक्तीला ठरवून द्यावे.

**क) सांकेतिकोत्तर नैतिकता (Postconventional Morality)**:

कोहलबर्गच्या मते कुमारावस्थेपर्यंत नैतिक विकासाची ही तिसरी पातळी असून त्यास पारंपारिकोत्तर नैतिकता असेही म्हणतात. १३ वर्षापासून ते प्रारंभिक प्रौढावस्थेपर्यंतची ही पातळी होय. या पातळीच्या ५ वी व ६ वी अशा दोन नैतिक अवस्था आहेत.

**५) नीतीमत्तेच्या संकल्पनांमधील बदल :**

या अवस्थेत व्यक्तीला असे वाटते की, नैतिक तत्त्वे लवचिक असावीत. नीतिमत्तेच्या संकल्पना या बदलणाऱ्या असाव्यात. योग्य व अयोग्यतेच्या नैतिक संकल्पनांऐवजी सर्वसाधारण नैतिक संकल्पना विकसित करणे त्यांना कठिण होते. योग्यायोग्यतेचे स्पष्टीकरण दिले जात नाही व योग्य वर्तनाचे कौतूकही होत नाही. त्यामुळे नैतिक संकल्पना ह्या बदलणाऱ्या असाव्यात असे त्यांना वाटते.

**६) नैतिक नियम (Moral code) तयार करणे:**

या अवस्थेत व्यक्ती सामाजिक त्याचप्रमाणे नैतिक मापदंडाना अनुवर्तित्व दाखविते. त्या व्यक्ती नैतिक मूल्ये ही वडिलधारी मंडळी व शिक्षक यांच्याकडून शिकतात. कुमार त्यांच्याकडे शंकेने पाहतात. त्यावेळी ते वैयक्तिक नैतिक नियम प्रस्थापित करतात. नैतिक योग्यायोग्यतेबद्दल विसंगती जाणवल्यामुळे त्यांच्यात गोंधळ होतो. अनेक वादळे त्यांच्या मनात उठतात.

कोहलबर्गच्या संशोधनात मुलांचा नैतिक निर्णय त्यांचे वय, शिक्षण, बुद्धिगुणांक व त्यांचा सामाजिक व आर्थिक दर्जा यांच्याशी संबंधीत आहे. कोहलबर्गने पेचप्रसंगाची गोष्ट मुलांसमोर सादर करुन (Moral dilemma) त्या गोष्टींमधील व्यक्तिला योग्य काय व अयोग्य काय याचा न्यायनिवाडा करावयाचा आहे. नैतिक पेचप्रसंगाच्या गोष्टीतून कारणे सांगण्यावर भर दिला जातो. मुल जो निर्णय घेईल त्याचे कारण त्याने सांगावे. नैतिकतेच्या ज्या अवस्थेवर असतील त्याप्रमाणे कारणे देतील.

**१.५.४ तीन नैतिक पातळ्यांचा सामाजिक दृष्टिकोन:**

वरिल नैतिक निर्णयाच्या पातळ्यांशी संबंधीत कोहलबर्गने तीन प्रमुख सामाजिक दृष्टिकोन सांगितले.

| नैतिक निर्णय (Moral Judgement) | | सामाजिक दृष्टिकोन |
|---|---|---|
| १) पूर्व सांकेतिक पातळी | - | मूर्त वैयक्तिक दृष्टीकोन |
| २) सांकेतिक पातळी | - | समाज सभासद दृष्टीकोन |
| ३) सांकेतिकोत्तर पातळी | - | समाजपूर्व दृष्टीकोन |

एकूणच पेचप्रसंगाच्या गोष्टींवर प्रश्न विचारुन काही एक निर्णय घ्यायला लावणे म्हणजे मूल्यविवेक शिकविणे होय. एखाद्या मुलाला जे योग्य वाटेल ते दुसऱ्याला वाटेलच असे नाही. तरीही प्रत्येक कृतीचा निर्णय घेताना त्याची कारणे शोधून विचार करण्याची सवय त्याला लागेल. मग प्रौढपणी अधिक व्यापक निकषांवर समाजाचे हित लक्षात घेऊन निर्णय घेईल. आपल्या शारीरिक गरजा, कौटुंबिक गरजा व त्याहून समाजाच्या दीनदुबळ्यांच्या गरजा यांच्याशी जेव्हा संघर्ष येतो त्यावेळी कसे वागायचे, कसा निर्णय घ्यायचा या विचारप्रक्रियेची सुरुवात होते. अनेकांचे हित कसे साधणार आहे. या सार्वत्रिकनीतीच्या विचाराप्रत व्यक्ती येते. विवेकाने सारासार विचार करुनच योग्यायोग्यतेचा न्यायनिवाडाच्या प्रक्रियेवर कोहलबर्गने भर दिला आहे. वरील नैतिक विवेक विकाससंबंधीचे कोहलबर्गचे संशोधन मोलाचे आहे.

**आपली प्रगती तपासून पहा**

१) नैतिक विकास म्हणजे काय ?

२) नैतिक विचारप्रक्रिया विकासाच्या तीन प्रमुख पातळ्यांमधील सहा अवस्था कोणत्या ?

३) कोहलबर्गच्या तीन नैतिक पातळ्यांचा सामाजिक दृष्टीकोन सांगा.

## १.६ सारांश

ह्या विश्वाविषयीच्या कुतुहलामधून तत्त्वज्ञानाचा उदय होतो. अनुभवगम्य तसेच अनुभवातीत जगाविषयी चिंतन म्हणजे तत्त्वज्ञान होय.

नीतिशास्त्र म्हणजे मानवी बुद्धिमत्तेच्या व्यावहारिक उपयोगातून निर्माण होणारे शास्त्र होय. नीतिशास्त्र मनुष्याचे ह्या विश्वातील अस्तित्व व त्याचा आदर्शांचा शोध याच्याशी संबंधित आहे. मानवी कृतींची परमोच्च ध्येयांशी तुलना करुन त्या कृती इष्ट किंवा अनिष्ट, योग्य किंवा अयोग्य ठरविल्या जातात. नीतिशास्त्र एक आदर्शी शास्त्र आहे की व्यावहारिक शास्त्र आहे. असाही प्रश्न उपस्थित होतो. नीतिशास्त्र मूल्यांशी संबंधित असून मूल्ये तथ्यांपेक्षा वेगळी असतात.

व्यक्तीच्या जीवनातील महत्त्वानुसार मूल्यांचे वर्गीकरण केले जाते. मूल्यांचे वर्गीकरण साध्य मूल्ये-साधन मूल्ये, (आंतरिक मूल्ये - बहिःस्थ मूल्ये), धन मूल्ये - ऋण मूल्ये, उत्पादक मूल्ये-अनुत्पादक मूल्ये, शाश्वत मूल्ये-नश्वर मूल्ये या प्रकारे गेले जाते.

नीतिशास्त्राचा विकास वर्णनात्मक नितिशास्त्र आदर्शी नीतिशास्त्र, अधिनीतिशास्त्र व उपयोजित नीतिशास्त्र या चार शाखांमध्ये विस्तारित झाला आहे. वर्णनात्मक नीतिशास्त्र नीतिशास्त्राचा इतिहास व विकास यांचा अभ्यास करते. आदर्शी नीतिशास्त्र काही मानदंडांच्या आधारे आचरणासाठी काही सिद्धान्तांची स्थापना करु पाहते. अधिनीतिशास्त्र नैतिक संकल्पनांचे विश्लेषण करते. उपयोजित नीतिशास्त्र आधुनिक जीवनशैलीमुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नांशी संबंधित आहे.

लॉरेन्स कोहलबर्ग या मानसशास्त्रज्ञाने मनुष्याच्या नैतिक जाणीवेच्या विकासासंबंधी सिद्धान्त मांडला. त्यांच्या मते नैतिक विचारप्रक्रियेच्या विकासामध्ये सहा अवस्था सुस्पष्ट दिसून येतात. ह्या सहा अवस्थांचे तीन स्तर आहेत. सांकेतिकपूर्व (रुढी पूर्व) सांकेतिक (रुढी) व सांकेतिकोत्तर (रुढीउत्तर) अशा तीन नैतिक विचारप्रक्रियेच्या पातळ्या (स्तर) आहेत.

## १.७ विद्यापीठीय दीर्घोत्तरी प्रश्न

१. तत्त्वज्ञानाच्या विविध व्याख्यांची चर्चा करा / अथवा तत्त्वज्ञानाचे स्वरुप स्पष्ट करा.

२. नीतिशास्त्राचे स्वरुप सविस्तर सांगा

३. लॉरेन्स कोहलबर्गच्या मते नैतिक जाणीवांचा विकास कसा होतो ते सांगा.

४. टिपा लिहा

अ) तत्त्वज्ञानाच्या शाखा

ब) नैतिक तत्त्वज्ञानाच्या शाखा

क) नीतिशास्त्र व कला यातील फरक

ड) नीतिशास्त्र - एक आदर्शी शास्त्र

इ) तथ्य व मूल्य यांचा परस्परसंबंध

फ) साध्य मूल्ये - साधन मूल्ये

ग) कोहलबर्गप्रणीत नैतिक विकासाच्या अवस्था

*****

# २

**प्रकरण २**

# सापेक्षतावाद आणि निरपेक्षतावाद

(Relativism and Objectivism)
नैतिक सापेक्षतावाद व नैतिक निरपेक्षतावाद

**घटक रचना**

२.० उद्दिष्ट्ये
२.१ प्रस्तावना
२.२ नैतिक सापेक्षतावाद (Ethical Relativism)
२.३ नैतिक सापेक्षतावादाचे प्रकार
२.४ रुथ बेनेडिक्ट यांचे नैतिक सापेक्षवादाचे विवेचन
२.५ मूल्यमापन
२.६ नैतिक निरपेक्षतावाद (Ethical objectivism)
प्रस्तावना - नैतिक मूल्ये सापेक्ष असतात काय ?
२.७ नैतिक निरपेक्षतावाद - जेम्स रॅचेलचे मत.
२.८ निष्कर्ष
२.९ सारांश
२.१० विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

## २.० उद्दिष्ट्ये

१) संस्कृतीमधील भिन्न भिन्न असणाऱ्या नीतिशास्त्राच्या संकल्पनांची जाणीव व त्यांचे महत्त्व ओळखता येईल.
२) नैतिक सापेक्षतावाद ह्या संकल्पनेचे आकलन करुन घेता येईल.
३) नैतिक सापेक्षतावादाच्या उणीवा समजून घेता येईल.
४) नैतिक सापेक्षतावाद व नैतिक निरपेक्षतावाद यांच्यातील भेद ओळखता येईल.
५) नैतिक निरपेक्षतावाद ह्या संकल्पनेचा परिचय करुन घेता येईल.

## २.१ प्रस्तावना

सापेक्षतावाद (Relativism) हा निरपेक्षवादाच्या (Objectivism) विरुद्ध आहे. सापेक्ष व निरपेक्ष ही दोन्ही नीतिशास्त्रीय दृष्टीकोनातून महत्त्वाची आहेत. ही

दोन्ही पदे परस्परांशी विरोधी आहेत. सापेक्ष पद व्यक्त करण्यासाठी दुसऱ्या पदाचा आधार घ्यावा लागतो. उदा. श्रीमंत पद व्यक्त करण्यासाठी गरीब हे पद घ्यावे लागते कारण ते सापेक्ष आहेत. सापेक्ष पदे देश, काल, परिस्थितीनुसार बदलत असतात. याउलट निरपेक्ष पद व्यक्त करण्यासाठी दुसऱ्या पदावर अवलंबून राहाण्याची आवश्यकता नसते. त्याला इतर पदाचा आधार घ्यावा लागत नाही. त्याला स्वगत मूल्य असते. निरपेक्ष पदात कोणताही गुणात्मक वा परिमाणात्मक फरक पडत नाही. उदा. चित्ताच्या एकाग्रतेसाठी ध्यानाची आवश्यकता ही आध्यात्मिक आनंद मिळविण्यासाठी असतो. निरपेक्ष आनंद कशावरही अवलंबून नसतो. तो निरपेक्षच असतो.

आधुनिक नीतिशास्त्रात सापेक्षतावाद (Relativism) व निरपेक्षतावाद (Objectivism) ह्या दोन विचारसरण्या (उपपत्या) नीतिशास्त्रज्ञांनी मांडल्या. नैतिक सापेक्षतावादाचा पुरस्कार रुथ बेनेडिक्ट, गिल्बर्ट हरमन, मॉंटेग्यू यांनी केला तर नैतिक निरपेक्षतावादाचा पुरस्कार जेम्स रॅचेल फिशेर, पोजमन व लिलेगार्ड यांनी केला. नीतिशास्त्रीय संकल्पना आणि नैतिक मूल्ये ही सापेक्ष असतात की निरपेक्ष असतात या दृष्टीकोनातून आधुनिक नैतिक तत्त्ववेत्यांनी या दोन विचारसरण्या वा उपपत्त्या भिन्न रीतीने मांडल्या. त्यांचा अभ्यास आपण या प्रकरणात करणार आहोत. भिन्न भिन्न समाजातील व संस्कृतीतील अभ्यास मानववंशशास्त्रज्ञांनी करुन असा निष्कर्ष काढला की सार्वत्रिक नैतिक तत्त्वे कुठे आहेत ? सांस्कृतिक दृष्ट्याही नैतिक संकल्पना त्या त्या संस्कृतीपरत्वे भिन्न असतात. अशा प्रकारची एक नैतिक समस्या म्हणून सापेक्षतेची संकल्पना निर्माण होते.

## २.२ नैतिक सापेक्षतावाद (Ethical Relativism)

### नैतिक किंवा नीतीशास्त्रीय सापेक्षतावाद:

नैतिक किंवा नीतिशास्त्रीय सापेक्षतावाद ही विचारसरणी रुथ बेनेडिक्ट या अमेरिकन मानववंशशास्त्रज्ञीने मांडली. रुथ बेनेडिक्ट या अमेरिकन सांस्कृतिक मानवंशशास्त्रज्ञ आहेत. त्यांनी व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकासातील प्रमुख भूमिकेवर जोर दिला रुथ बेनेडिक्टेने ''संस्कृतीचे आकृतीबंध'' (Patterns of Cultur) हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात आपले विचार व्यक्त करताना त्या म्हणतात की प्रत्येक व्यक्ती ह्या भिन्न भिन्न वर्तनाच्या सांस्कृतिक आकृतीबंधाशी आणि नैतिक मानदंडाशी किंवा आदर्शांशी समायोजन करते. रुथ बेनेडिक्ट नीतिमत्तेचे स्वरुप व त्याची अवधारणे (Judgements) स्पष्ट करतांना त्या सामाजिक विचारवंतानी व तत्त्ववेत्यांनी मांडलेल्या नैतिक सापेक्षतावादाचा (Ethical Relativism) संदर्भ देतात. नैतिक वा नितिशास्त्रीय सापेक्षतावाद असे सांगतो की, योग्य आणि अयोग्य, शिव आणि अशिव यांच्या सार्वत्रिक कसोट्या नाहीत. स्थल कालानुसार नैतिक संकल्पना बदलत जातात. नीतिशास्त्राचे प्रश्न या ग्रंथात प्रा. दि. य. देशपांडे यांनी सापेक्षवादाचे प्रतिपादन असे केले की, ''नैतिक अवधारणे व्यक्तिनिरपेक्ष असून त्याचे विवेकी समर्थन शक्य आहे. म्हणजे निःपक्षपाती आणि सर्वांगिण परीक्षेत ती उतरु शकतील हे मत चुकीचे आहे असे सापेक्षतावादाचे प्रतिपादन आहे.

नैतिक सापेक्षतावादाच्या उपपत्तीचा आधुनिक काळात रुथ बेनेडिक्ट या अमेरिकन मानववंशशास्त्रज्ञाने पुरस्कार केला या उपपत्तीला बेनेडिक्ट ''सांस्कृतिक सापेक्षतावाद'' (Cultural Relativism) असेही म्हणतात. सांस्कृतिक सापेक्षतावादाचादृष्टीकोन अनेक मानववंश शास्त्रज्ञानी स्वीकारलेला आहे. रुथ बेनेडिक्टने आपल्या सांस्कृतिक आकृतीबंध'' या ग्रंथात त्याचे विवेचन केले आहे. नैतिक सापेक्षतावाद ही एक नैतिक उपपत्ती असून नैतिकता ही त्या संस्कृतीत असणाऱ्या मानदंड प्रती (Norms) वा आदर्शाप्रती सापेक्ष असते. निरनिराळ्या काळी व स्थळी मानदंड निरनिराळे असतात की एकच असतो. ज्या कृती आज योग्य समजल्या जातात त्यापूर्वी अयोग्य समजल्या जात असत. उदा. सतीची चाल पूर्वी योग्य मानली जाई पण आज त्यावर कायद्याने बंदी घातली आहे. यावरुन नैतिक मानदंड वा आदर्श हे सापेक्ष असल्याचे स्पष्ट होते. एखादी कृती योग्य आहे की अयोग्य आहे हे त्या समाजातील व्यवहारात असणाऱ्या नैतिक मानदंडावर आधारित असते. एका समाजात प्रचलीत असणारी कृती नैतिकदृष्ट्या योग्य असेल तर दुसऱ्या समाजात तीच कृती नैतिकदृष्ट्या अयोग्यही असू शकतो. नैतिक सापेक्षतावादी असे प्रतिपादन करतात की नैतिक तत्त्वे ही सार्वत्रिक नसतात. कारण सर्व काळी सर्व लोकांना ती सार्वत्रिकदृष्ट्या लागू करता येणे शक्य नाही. समाजापरत्वे नैतिक तत्त्वे सापेक्ष असतात असे नैतिक सापेक्षतावादी म्हणतात.

## २.३ नैतिक सापेक्षतावादाचे प्रकार

नैतिक सापेक्षतावादाचे दोन प्रकार आहेत ते पुढीलप्रमाणे.

अ) वर्णनात्मक सापेक्षतावाद (Descriptive Relativism)

ब) आदर्शात्मक सापेक्षतावाद (Normative Relativism)

### अ) वर्णनात्मक सापेक्षतावादः

याचे प्रतिपादन असे आहे की मानवाची आणि समाजाची मूलभूत नैतिक अवधारणे (Judgments) भिन्न असतात. मूलभूत नैतिक अवधारणे समान असूनही तदुद्भूत (Derivative) अवधारणे भिन्न असू शकतील उदा. बालविवाह करु नये असे म्हणणारे लोक व बालविवाह करावा असे म्हणणारे लोक या दोहोत विरोध आहे. परंतु या मतांची समर्थने एकाच प्रकारच्या कारणांनी देता येतील. जसे बालविवाहाने समाजाचे पोषण होईल असे एक व्यक्ती मानत असेल तर दुसरी व्यक्ती प्रौढ विवाहाने समाजाचे पोषण होईल असे मानत असेल. येथे दोन्ही व्यक्तींच्या मतांचे मूलभूत अवधारणांच्या बाबतीत एकमत आहे. थोडक्यात ज्याने समाजाचे पोषण होते ते चांगले. वर्णनात्मक सापेक्षतावाद असे प्रतिपादन करतो की, मानवाची एकाच समाजातील एकाच काळातील मानवांची आणि संस्कृतींची मूलभूत नैतिक आणि मूल्यात्मक अवधारणे (Judgements) ही भिन्न भिन्न वा परस्परविरुद्ध असतात. परंतु हे मत निर्विवादपणे प्रस्थापित झालेले नाही. उलट काही सांस्कृतिक व सामाजिक मानवंशशास्त्रज्ञांनी शंका घेतली की, अधिनीतीशास्त्रीय सापेक्षतावाद सिद्ध करण्यात वर्णनात्मक सापेक्षतावाद पुरेसा नाही. थोडक्यात वर्णनात्मक सापेक्षतावाद विविध

संस्कृतीमधील नैतिक व्यवहार आणि मानदंड यांचे समर्थनाविषयी काही एक बोलत नाहीत. सर्व नैतिक निर्णय मानवी मते असतात.

**ब) आदर्शात्मक सापेक्षतावाद :**

आदर्शवादीशास्त्रे ही मूल्यवादी असून घटना कशी असावी ? या स्वरुपाचा मूल्यवादी विचार आदर्शवादीशास्त्रे करीत असतात. यामध्ये नैतिक आचरणाचे काही मानदंड त्या त्या समाजात प्रस्थापित केलेले असतात त्यात मानवी आचरणाच्या युक्ततेचे निकष सांगितलेले असतात. आदर्शात्मक सापेक्षतावाद असा दावा करते की एका संस्कृतीत प्रस्थापित केलेले मानदंड इतर संस्कृतीतील लोकांच्या वर्तनाचे मूल्यमापन करण्यास लागू होत नाहीत. आदर्शात्मक सापेक्षतावाद हा समाजाशी वा संस्कृतीशी संबंधीत असल्याने रुथ बेनेडिक्ट त्यास सांस्कृतिक सापेक्षतावाद (Cultural Relativism) असे म्हणतात. हाच दृष्टीकोन इतर मानववंशशास्त्रज्ञ स्वीकारतात. बेनेडिक्ट असे म्हणतात की सांस्कृतिक नीतीमत्ता मानवी स्वभावाला टाळता न येणाऱ्या घटनेपासून दूर न जाता सर्वत्र असलेल्या व संस्कृतीपरत्वे भिन्न असलेल्या आचरणाच्या पद्धतीतून प्रमाणित होतात. बेनेडिक्ट ह्या नैतिक सापेक्षतावाद व आदर्शात्मक सापेक्षतावाद भिन्न मानतात. अंतिम आदर्श वा मानदंड हे योग्य काय आहे आणि योग्य काय नाही हे व्यक्ति ज्या समाजात राहते त्या समाजातील व्यक्ती कशाला योग्य म्हणते त्यावर निश्चित केले जाते. आदर्शवादी नीतिशास्त्र विविध प्रकारच्या नैतिक समस्यांना उत्तरे देण्याचा प्रयत्न करते. याशिवाय अधिनीतिशास्त्र (Meta Ethics) ही नीतिशास्त्राची एक शाखा असून त्याचा अभ्यास विषय वेगळा आहे. आधिनीतिशास्त्र (Meta Ethics) प्रामुख्याने नैतिक संकल्पना, त्यांचे अर्थ व तार्किक विश्लेषण करुन नैतिकतेचा अभ्यास करते. नैतिक विधानांचा निश्चित अर्थ शोधण्याचा प्रयत्न या शाखेत केला जातो.

## २.४ रुथ बेनेडिक्ट यांचे नैतिक सापेक्षवादाचे विवेचन

नैतिक सापेक्षतावादाचे विवेचन रुथ बेनेडिक्ट यांनी आपल्या ''संस्कृतिचे आकृतीबंध'' (Patterns of Culture) या ग्रंथात केले आहे. तसेच आधुनिक सामाजिक मानववंशशास्त्रज्ञ हे सांस्कृतिक परिसराचा आणि त्याचा मानवी जीवनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करते. जेव्हा विविध संस्कृतीचे निरीक्षण केले जाते तेव्हा त्या संस्कृतीत भिन्न प्रकारची मूल्ये आणि मानवामधील व्यवहार दिसून येतात. योग्य काय? अयोग्य काय हे त्या समाजातील संस्कृतीवर अवलंबून असते. योग्य कृती कोणती व अयोग्य कृती कोणती हे त्या त्या संस्कृतीत असलेल्या नियमावरुन ठरते. आधुनिक सामाजिक मानववंश शास्त्रज्ञानी सांस्कृतिक परिसराच्या घटकांचा परिणाम मानवी वर्तनावर वा आचरणावर कसा होतो याचा अभ्यास केला. रुथ बेनोडिक्ट ह्या त्यापैकीच एक मानववंशशास्त्राच्या अभ्यासक आहेत. विविध सामाजिक घटकांच्या अभ्यासामुळे प्राचीन काळातील लोकांचे आचार विचार समजून घेतल्यामुळे एक वैचारिक बैठक तयार होते.

उच्चभ्रू संस्कृतीमध्ये असणाऱ्या श्रद्धा आणि विश्वास यांच्या प्रमाणीकीकरणासाठी विशिष्ट प्रकारे परंतु टाळता न येणाऱ्या आकृतीबंधाना (Patterns) खोटा अर्थ दिला जातो. कोणताही निर्णय तपासण्यासाठी व्यापक प्रमाणात सर्वेक्षण पद्धतीची आवश्यकता असते. परंतु घिसडघाईने प्रसिद्ध रुढींच्या सार्वत्रिकेला आपण पाया मानतो. बहुतेक संस्कृतीमध्ये आपल्या अनुभवाच्या पलिकडे जाऊन आपण माणसांचे स्वभाव ओळखतो. त्याविषयीची ऐतिहासिक कारणेही असतात. परंतु कोणत्याही प्रकारचा सामाजिक चांगूलपणा वा सभ्यता (Sanity) या विषयीची मक्तेदारी निश्चित नसते. या दृष्टीकोनातून चांगूलपणा किंवा सभ्यता ही मानवी प्राप्तव्याच्या उच्च पातळीवर असण्याची गरजही नाही. परंतु समायोजन करण्यासाठी संधी मात्र आहे. तसेच काहीप्रमाणात सर्वसामान्य परिस्थितीवर प्रभाव पाडणारे घटक संस्कृतीतील समाजरचनेच्या पायामध्ये आहेत. केवळ चर्चा करुन त्यांना न्याय देता येत नाही. यासाठी रुथ बेनेडिक्ट या एकापेक्षा अधिक उदाहरणे देतात.  त्यापैकी एक उदाहरण पुढीलप्रमाणे दिले आहे. वायव्य प्रातांतील मलेशिया बेटावरील केलेल्या संशोधनावरुन असे दिसून आले की, ज्या गुणवैशिष्ट्यांवर समाजाची रचना झालेली आहे ती संशय विक्षोभ विकृतीच्या (Paranoia) पलिकडील वर्णन आहे. तेथील भटक्या जमातींच्या कुटुंबामध्ये परस्परांना जादूटोण्यांनी हाताळले गेले. या जमातीतील माणसे आपल्या शत्रू गटातील व्यक्तींशी विवाहबद्ध होतात. त्यांचा शत्रू हा कट्टर असून ते अशांतता निर्माण करतात. ते बागेत आलेल्या पीकाला चोरीचे तसेच पापशालन म्हणून मानतात. तेथील जमातीतील प्रत्येक व्यक्ती आपल्या शेतातील पीकाची उत्पादनक्षमता शेजारच्या पिकाशी होणाऱ्या उत्पादनक्षमतेपेक्षा जास्त व्हावे म्हणून जादूचे प्रयोग करतात. त्यामुळे शेतातील कंदमुळांच्या उत्पादनेविषयी तेथे कोणत्याही प्रकारची गुप्तता व गोपनियता राहात नाही. तसेच एखाद्याने दिलेल्या देणगीचा स्वीकार करतांना त्यांच्या नम्रतापूर्वक वाक्प्रचार असा आहे की ''या भेटवस्तूद्वारे विषाचा प्रयोग केला तर या भेटदिलेल्या वस्तूची परतफेड कशाप्रकारे करता येईल. आपल्यावर विषाचा प्रयोग करणार असा पूर्वग्रह ते कायमस्वरुपाचाच मानतात. तसेच शेतात मशागत करण्यासाठी व पेरण्यासाठी बी-बियाणांची देवाणघेवाण सुद्धा करण्यास तेथील कुटुंबातील माणसे नकार देतात. यावरुन इतरांच्या संस्कृतीवरुन आपल्या संस्कृतीचे चिकित्सक परीक्षण वा मूल्यमापन करणे त्यांचे आकलन पुरेसे होत नाही.  नैतिक सापेक्षतावादी असे म्हणतात की, नैतिक तत्त्वे व सांस्कृतिक वर्तनाची समीक्षा करणे ही इतर संस्कृतीच्या तुलनेत त्याचे आकलन करणे तसे अवघड असते.

## २.५ मूल्यमापन

बहुतेक नीतीशास्त्रज्ञ नैतिक सापेक्षतावादाची उपपत्ती नाकारतात. काही असा दावा करतात की समाजाची नैतिक तत्त्वे भिन्न असतात. मूलभूत नैतिक तत्त्वे वेगवेगळ्या समाजात व्यावहारिकदृष्ट्या प्रत्यक्ष उतरविणे अवघड असते. समाजात सुख दुःखे दोन्हीही आढळतात दुःख असण्याचे कारण कुसमायोजन होय. जेथे परिस्थितीशी समायोजन असेल तेथे सुखप्राप्ती असते असे समायोजन आदर्शसमाजरचनेत होते. थोडक्यात नैतिक सापेक्षतावाद ह्या उपपत्तीनुसार शिव-

अशिव, योग्य–अयोग्य यांच्या सर्वत्रिक कसोट्या नाहीत या  संकल्पना स्थल, काल यानुसार बदलतात. नैतिक सापेक्षतावादाची उपपत्ती ही एखाद्या समाजातील असणाऱ्या चांगल्या रुढी, परंपरा, विचार हे इतर समाजापेक्षा त्या परंपरा व विचार चांगले असतात हे ओळखण्यात नैतिक सापेक्षतावादी अयशस्वी झालेले दिसतात.

**आपली प्रगती तपासून पहा**

१) नैतिक सापेक्षतावादाचा पुरस्कार कोणी केला ?

२) सापेक्षतावादाची व्याख्या द्या.

३) संस्कृतीविषयी रुथ बेनेडिक्टचे निरीक्षण काय आहे ?

४) नैतिक सापेक्षतावाद म्हणजे काय ?

५) नैतिक सापेक्षतावाद कोणत्या मूल्यांना प्राधान्य देते ?

६) इतर संस्कृतीच्या निर्णयापासून एखाद्याने परावृत्त का व्हावे असे सापेक्षवादी विचार का करतात? यांची दोन कारणे द्या.

## २.६ नैतिक निरपेक्षतावाद (Ethical objectivism)

**प्रस्तावना - नैतिक मूल्ये सापेक्ष असतात काय ?**

डब्ल्यू टी. स्टेस या तत्त्ववेत्त्यांने नैतिक सापेक्षतावादाचे टीकात्मक विवेचन करुन नैतिक निरपेक्षतावादाचा स्वीकार केला. स्टेसच्या मते नैतिक मूल्ये ही सापेक्ष नसून ती निरपेक्ष (स्वयंमूल्य) आहेत. स्टेसने नैतिक निरपेक्षतावादाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगितली. नैतिक निरपेक्षतावाद म्हणजे अशी नैतिक आचारसंहिता की जी सर्वकाळी, सर्वस्थळी म्हणजेच स्थलकाल अशी कायम टिकणारी असून ती प्रत्येक व्यक्तीला लागू पडते. मग आपल्याला त्याविषयीची जाणीव असो वा नसो. स्टेसच्या मते सार्वत्रिक असे नैतिक मानदंड वा आदर्श हे सत्य आहेत. ऐतिहासिकदृष्ट्या पाहिले तर नीतिमत्ता ही ईश्वराची आज्ञा मानली जाते. त्याचा सद्यःकालीन परिस्थितीशी संबंध नसून ही नीतिमत्ता ईश्वराच्या अस्तित्वावर आधारित असते.

तत्त्वज्ञान शक्य तेवढ्या श्रद्धेला व तर्काला पायाभूत आधार म्हणून अतितत्वाशिवाय व पूर्वग्रहाशिवाय ईश्वराचे अस्तित्व गृहीततत्त्व म्हणून स्वीकारले जाते. नैतिक निरपेक्षतावाद हा ईश्वराच्या अस्तित्वावर आधारभूत मानला तर प्रथम ईश्वराचे अस्तित्व सिद्ध करावे लागेल, तरच नैतिक निरपेक्षतावाद सिद्ध होईल. अर्थात प्रत्येकाच्या धर्मानुसार  वेगवेगळ्या श्रद्धा, उपासना व प्रार्थना असल्याने प्रत्येकजण आपापल्या धार्मिक श्रद्धांवर विश्वास ठेवत असतो. स्टेसच्या मते नैतिक सापेक्षतावादाचा स्वीकार करणे म्हणजे नैतिक निरपेक्षतावादाला नाकारणे होय. नैतिक सापेक्षतावादात

स्थल (देश) काल व परिस्थितीनुसार नीतिमत्ता समान असू शकत नाही. ती स्थल, काल व परिस्थितीनुसार बदलणारी व व्यक्तीपरत्वे भिन्न भिन्न असते. स्टेस हा नैतिक सापेक्षतावादाच्या समर्थनार्थ दिलेल्या युक्तिवादांचे खंडन करतो. नैतिक सापेक्षता वाद्यांच्या मते सर्वच व्यक्ती सदैव व सर्वठिकाणी नैतिकदृष्ट्या सभ्य वा शाहण्या नसल्यामुळे निरपेक्षतया नैतिक मानदंड वा आदर्श हे अस्तित्वात राहात नाहीत.

स्टेसच्या मते नैतिक मानदंड वा आदर्श सिद्ध करता येत नाहीत. प्रयत्नांती जगाच्या इतिहासाने सुद्धा सिद्ध केलेले नाहीत. अर्थात स्टेसच्या वरील मांडलेल्या युक्तिवादामध्ये लोकज्ञानयुक्तिदोष दिसून येतो. शंकेच्या छायेपलिकडे ईश्वराची अस्तित्व सिद्ध झालेले नाही. ईश्वर अस्तित्वात नाही हे ईश्वराचे नास्तित्वही सिद्ध झालेले नाही. यावरुन स्टेस असे दर्शवितो की पृथ्वीच्या आकाराविषयी लोक सहमत नसतील. यावरुन पृथ्वीला आकारच नाही हे सिद्ध होत नाही. स्टेसच्या मते जर नैतिक सापेक्षतावाद हा सत्य असेल तर ते नीतिशास्त्र नव्हे.

## २.७ नैतिक निरपेक्षतावाद - जेम्स रॅचेलचे मत

नैतिक निरपेक्षतावाद म्हणजे सार्वत्रिक नैतिक मानदंडाचा वा आदर्शांचा स्वीकार होय. नैतिक निरपेक्षतावादी मानदंड (Norms) या शब्दाचा दोन अर्थ करतात. एक अर्थ म्हणजे काय करावे आणि दुसरहा अर्थ काय केले पाहिजे असा करतात. याशिवाय ते कोणता विचार युक्त आहे आणि प्रत्यक्षात काय बरोबर वा युक्त आहे असा भेदही नैतिक निरपेक्षतावादी करतात..

आधुनिक काळात जेम्स रॅचेल यांनी नैतिक निरपेक्षतावादाचे समर्थन केले. जेम्स रॅचेल यांनी प्रथम सांस्कृतिक सापेक्षतावादाचे टीकात्मक मूल्यामापन करुन नैतिक निरपेक्षतावादाचे स्पष्टीकरण केले. सांस्कृतिक सापेक्षतावाादी (Cultural Relativists) नैतिक सत्यांची सार्वत्रिकता, वस्तुनिष्ठता व सामान्य व्यक्तींच्या श्रद्धांना आव्हान दिले. सांस्कृतिक सापेक्षतावाद्यांच्या मते नितिशास्त्रात सार्वत्रिक सत्ये नसतात तर विविध प्रकारची सांस्कृतिक आचारसंहिताच (Moral code) असते. अनेकात एक अशा आचारसंहिता असतात. याविषयी ते पुढीलप्रमाणे समर्थन देतात.

१) विविध समाजाच्या विविध प्रकारच्या नैतिक आचारसंहिता असतात.
२) एखाद्या समाजाची आचारसंहिता ही इतर समाजाच्या आचारसंहितेपेक्षा चांगली असते, असा निर्णय उपयोगात आणणे ही वस्तुनिष्ठता वा निरपेक्ष मानदंड नव्हे.
३) आपल्या समाजातील असणाऱ्या आचारसंहितेला एक विशिष्ट दर्जा स्थान नसतो.
४) नीतिशास्त्रात ''सार्वत्रिक सत्य'' नसते. सर्वकाली सर्वच लोकांना एकत्र धरुन ठेवणारे नैतिक सत्य नसते.
५) त्या त्या समाजातील नैतिक आचार वा कृती काय योग्य आहे यावर निश्चित केलेली असते. एखादी कृती योग्य आहे. हे त्या समाजात असणाऱ्या योग्य कृतीवरुन निश्चित केली जाते.

६) इतर लोकांच्या कृतीवरुन निर्णय घेण्याचा प्रयत्न करणे हे एक प्रकारचे अरेरावी वृत्तीचे द्योतक आहे. इतर संस्कृतीच्या आचाराप्रती आपण सहिष्णूतेचा (Tolerance) मार्ग अनुसरला पाहिजे.

वरील विधाने स्वाभाविकरित्या एकत्र असली तरी ही विधाने परस्परापासून स्वतंत्र असून ही विधाने असत्य असू शकतात तर काही विधाने सत्यही असतात. एकूणच सांस्कृतिक सापेक्षतावाद ही एक नैतिक उपपत्ती आहे. या उपपत्तीचे बौद्धिक दृष्टीकोनातून जेव्हा विश्लेषण केले जाते तेव्हा तिचा वरवर जाणवणारा सत्यपणा हा वरवरचा सत्यपणा नव्हे. जेम्स रॅचेल भिन्न भिन्न संस्कृतीतील मतांची उदाहरणेही देतात.

१) ग्रीकांचा असा विश्वास आहे की निर्जिव पदार्थ खाणे गैर आहे याउलट कॅलेटियन्स लोक निर्जीव पदार्थ खाणे योग्य मानतात.

२) निर्जीव पदार्थ खाणे वस्तुनिष्ठपणे योग्यही नाही व अयोग्यही नाही. ते त्या त्या संस्कृतीतील मते असतात. संस्कृतीपरत्वे मतभिन्नता असू शकते. रॅचेल इतरही पर्यायी उदाहरणे देतात. एस्किमो संस्कृतीतील लोक बालहत्या करणे वाईट मानत नाहीत. परंतु अमेरिकन संस्कृतीतील लोक बालहत्या करणे अनैतिक (वाईट) मानतात. म्हणून बालहत्या निरपेक्षतया योग्यही नाही व अयोग्य नाही. अर्थात हे फक्त मत (Opinion) असून अशी मते संस्कृतीपरत्वे भिन्न भिन्न असतात. यावरुन रॅचेल म्हणतात की भिन्न भिन्न संस्कृतीतील नैतिक संहिता (Moral Code) भिन्न भिन्न प्रकारच्या असतात. म्हणून नीतिमत्ता ही निरपेक्षतया सत्य नसते. योग्य आणि अयोग्य ही मते असतात व ती मते संस्कृतीपरत्वे भिन्न भिन्न असतात.

## २.८ निष्कर्ष

वरील भिन्न संस्कृतीतील असणारी भिन्न मते उदाहरणादाखल दिली असली तरी समग्र समाजाच्या अस्तित्वासाठी सामुहिकतया असलेली नैतिकमूल्यांची (Moral Values) आवश्यकता असते. जर समाजात खून (Murder) करण्याला प्रतिबंध नसेल तर समाज अस्तित्वात राहू शकेल काय ? समाजातील प्रत्येक मनुष्य स्वेच्छेनुसार दुसऱ्याचा खून करण्यास मुक्त असेल आणि खून करण्यात तो स्वतःला वाईट कृत्य म्हणून समजत नसेल तर अशा समाजात राहणे प्रत्येक व्यक्तीला असुरक्षितच वाटेल. अशा परिस्थितीत त्या समाजातील प्रत्येक व्यक्तीला सुरक्षिततेसाठी अंगरक्षकावर अवलंबून रहावे लागेल. ज्या लोकांना आपले अस्तित्व टिकवायचे असेल तर शक्य तेवढ्या इतर व्यक्तीपासून दूर राहिले पाहिजे. इतरांच्या सहवासात राहणे हे नेहमी धोकादायक असणार. अशा प्रसंगी समाजाचे अस्तित्वच धोक्यात येऊन ते कोलमडून जाईल म्हणून इतरांबरोबर लहान लहान समूहात वा गटात एकत्र राहून, एकामेकावर विश्वास बसेल की जो त्यांना हानीकारक वा धोकादायक असणार नाही. याकरिता ते लहान लहान गटाचे समाज तयार करुन खून होऊ नयेत म्हणून नैतिक नियम स्वसुरक्षिततेसाठी तयार करतील. खूनाचा प्रतिबंध

करणे ते त्या समाजाला आवश्यक राहील. त्याप्रमाणे ते नैतिक नियम व नैतिक आचारसंहिता  समाजात आणतील रॅचेलच्या मते समाजाच्या अस्तित्वासाठी काही सामुहिक नैतिक नियमांची आवश्यकता आहे. खोटे बोलणे, खून करणे हे अनैतिक आहे.  तेव्हा नैतिक नियम तयार करुन त्यांचे पालन सर्वशक्तीनिशी केले तरच त्या समाजाचा वा संस्कृतीचा टिकाव लागेल. त्या त्या समाजापरत्वे नैतिक नियम वेगळे असणार नाहीत. अशा प्रकारे रॅचेल हे नैतिक निरपेक्षतावादाचे समर्थन करताना असे म्हणतात की, नैतिक नियम वा मानदंड हे सार्वत्रिक (Universal) असतात. तसेच नैतिक मूल्ये सापेक्ष नसून ती निरपेक्षतया सत्यच असतात. या नैतिक मूल्यांना स्वतोमूल्य असते असे रॅचेलने मान्य केलेले दिसून येते.

**आपली प्रगती तपासून पहा**

१) नैतिक निरपेक्षतावादाची व्याख्या द्या.

२) नैतिक मूल्ये सापेक्ष असतात काय ?

३) नैतिक निरपेक्षतावादाचा सार्वत्रिक दृष्टीकोन काय आहे ?

४) नैतिक निरपेक्षवादाच्या संदर्भात रॅचेलने भिन्न भिन्न संस्कृतीतील मतांची कोणती उदाहरणे दिलेली आहेत.

## २.९ सारांश

सापेक्षतावाद आणि निरपेक्षतावाद ह्या दोन नीतिशास्त्रातील आधुनिक काळातील दोन नैतिक उपपत्त्या आहेत. नैतिक सापेक्षतावादाचा पुरस्कार रुथ बेनेडिक्ट गिल्बर्ट हरमन, मॉंटेग्यू यांनी केला तर नैतिक निरपेक्षतावादाचा पुरस्कार जेम्स रॅचेल, फिशेर, लिलेगार्ड व पोजमन यांनी केला. या दोन्ही नैतिक उपपत्त्या भिन्न रीतीने मांडल्या गेल्या आहेत. नैतिक सापेक्षतावादाची उपपत्ती रुथ बनेडिक्टने संस्कृतीचे आकृतीबंध (Patterns of Culture) या ग्रंथात मांडलेले आहेत. नैतिक सापेक्षतावादात योग्य- अयोग्य, शिव-अशिव यांच्या सार्वत्रिक कसोट्या नाहीत. स्थल कालानुसार नैतिक संकल्पना बदलतात. नैतिक अवधारणे व्यक्तीनिरपेक्ष असून त्याचे विवेकी समर्थन शक्य आहे म्हणजे नि:पक्षपातीपणे परीक्षेत उतरु शकतील हे मत चुकीचे आहे असे नैतिक सापेक्षवादाचे  प्रतिपादन आहे. नैतिक सापेक्षतावादाचे वर्णनात्मक व आदर्शात्मक सापेक्षतावाद असे दोन प्रकार आहेत. नैतिक सापेक्षतावादाचे सविस्तर विवेचन रुथ बेनेडिक्टने केलेले आहे.

डब्ल्यू टी स्टेस यांनी नैतिक सापेक्षवादाचे टीकात्मक विवेचन करुन नैतिक निरपेक्षतावादाचा स्वीकार केला. त्यांच्या मते नैतिक मूल्ये ही सापेक्ष नसून ती निरपेक्ष (स्वयंमूल्य) आहेत. नैतिक निरपेक्षतावाद म्हणजे अशी नैतिक आचारसंहिता की जी

सर्वकाली, सर्वस्थळी अशी कायम टिकणारी असून ती प्रत्येक व्यक्तीला लागू पडते, मग त्याची जाणीव व्यक्तीला असो वा नसो. स्टेसने नैतिक सापेक्षतावाद हा सत्य असेल तर ते नीतिशास्त्रच नव्हे असा पवित्रा घेतलेला आहे. आधुनिक कालात नैतिक निरपेक्षतावादाचे जेम्स रॅचेलने समर्थन केले. त्याने सांस्कृतिक सापेक्षतावादाचे टीकात्मक मूल्यमापन करुन नैतिक निरपेक्षवादाचे स्पष्टीकरण केले. भिन्न भिन्न संस्कृतीतील नैतिक संहिता (Moral Code) भिन्न असली तरी ती योग्य व अयोग्य मते असतात व ही मते संस्कृतीपरत्वे भिन्न असतात. नैतिक नियम व नैतिक आचार संहिता समाजाच्या अस्तित्वासाठी आवश्यक आहेत. हे नैतिक नियम व संहिता सार्वत्रिक असते. व नैतिक मूल्ये ही निरपेक्ष असतात. असे रॅचलचे मत दिसून येते.

## २.१० विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

१) नैतिक सापेक्षतावादाची व्याख्या द्या आणि नैतिक सापेक्षतावादाच्या प्रकारांचे वर्णन करा.

२) नैतिक सापेक्षतावाद म्हणजे काय ते सांगून रुथ बेनेडिक्टचे नैतिक सापेक्षतावाद विषयीचे चिकित्सक विवेचन करा.

३) नैतिक मूल्ये सापेक्ष असतात काय? डब्ल्यू टी स्टेसच्या दृष्टिकोनातून त्यांचे विवेचन करा.

४) नैतिक निरपेक्षतावाद म्हणजे काय ? नैतिक निरपेक्षतावादाच्या समर्थनार्थ जेम्स रॅचेलने सांगितलेले युक्तिवाद स्पष्ट करा.

५) नैतिक निरपेक्षतावादाचे (Ethical objectivism) सविस्तर विवेचन करा.

६) थोडक्यात टिपा लिहा

१) नैतिक सापेक्षतावाद

२) नैतिक निरपेक्षतावाद

३) वर्णनात्मक सापेक्षतावाद

४) आदर्शात्मक सापेक्षतावाद

५) नैतिक मूल्ये सापेक्ष असतात काय ? डब्ल्यू टी. स्टेसचे मत.

*****

# ३

## प्रकरण ३
# शुभ (चांगले) जीवन: ग्रीक नैतिक चिंतन

अ) प्लटोः चार प्रधान सद्‌गुण
ब) ॲरिस्टॉटलः शीलविषयक (चारित्र्यविषयक) नीतीशास्त्र.

**घटक रचना**

३.० उद्दिष्ट्ये
३.१ प्रास्ताविक
३.२ सद्‌गुणांचे स्वरुप
३.३ प्लेटोची (इ.स.पू. ४२७ ते इ.स.पू. ३४७) सद्‌गुण विषयक संकल्पना
३.४ ॲरिस्टॉटलची (इ.स.पू. ३८४ ते इ.स.पू. ३२२) सद्‌गुण विषयक संकल्पना
३.५ सारांश
३.६ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

## ३.० उद्दीष्ट्ये

१) प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटो व ॲरिस्टॉटल यांनी मांडलेले शुभ जीवन विषयक विचार व त्यांचा अन्वयार्थ समजून घेणे.

२) मानवी शुभजीवन हे सद्‌गुणयुक्त असते हे जाणून घेणे.

३) प्लेटो व ॲरिस्टॉटल यांचे सद्‌गुण व चारित्र्य या संदर्भातील योगदान जाणून घेणे.

## ३.१ प्रास्ताविक

आदर्श निर्धारक (आदर्श नियामक) नीतीशास्त्र हे शुभाशुभ, चांगलेवाईट यांच्या संदर्भात मानवी ऐच्छिक वर्तनाचा अभ्यास करते. या संदर्भातील मानवीवर्तनाच्या नैतिक मापदंडाचाही (मानंदड) शोध घेते. त्याचबरोबर मानवी सद्‌गुणांचेही हे शास्त्र विश्लेषण करते. साधारणतः आपण मानवी वर्तनाचे व चारित्र्याचे नैतिक मूल्यमापन करतो. प्रस्तुत घटकात प्लेटोप्रणित शुभजीवन वा चांगले जीवन आणि सद्‌गुण यांची चर्चा केलेली आहे.

## ३.२ सद्‌गुणांचे स्वरुप

प्लेटो-प्रणित चार प्रधान सद्‌गुणांची चर्चा करण्यापूर्वी आपणाला सद्‌गुण ही संकल्पना समजून घेतली पाहिजे. आपण नैतिक विधाने करतो. मानवी ऐच्छिक वर्तन, त्या वर्तनाच्या मुळाशी असलेले हेतु व इच्छा, व मानवाचे शील तीन विषयांवर आपण नैतिक निर्णय देतो. यांत नैतिक निर्णयाचा महत्त्वाचा विषय असतो तो चारित्र्य वा माणसाचे शील. माणसाचे गुण, भावना, अभिवृत्ती व सवयी यांचे ते रसायन असते. ते सातत्याने घडत असते व थोडेफार बदलतही असते. ते अगदीच अपरिवर्तनशील नसते तरी त्याला एक प्रकारचा स्थायीपणा आलेला असतो. त्यात मानसिक गुणांची कमीअधीक प्रमाणात स्थायी एकात्मता आलेली असते.

**आदर्शलक्ष्यी (आदर्शनिर्धारक):**

नीतिशास्त्रात नैतिक चारित्र्य व नैतिक सद्‌गुण यांचे विश्लेषण केले जाते. अशा गुणांनाच सद्‌गुण म्हटले जाते. व्युत्पत्तिशास्त्रानुसार वीर (Vir) म्हणजे हिरो संस्कृतातील 'वीर' शब्दाचा अर्थही हिरो (Hero) होतो. प्रा.पी.बी. चटर्जी या संदर्भात लिहितातः इंग्रजीतील Virtue हा शब्द लॅटिनमधील व्हर्ट्स (Virtus) व संस्कृतातील 'वीर्य' यांच्याशी मिळता जुळता आहे. या शब्दांचा अर्थ होतो पौरुष, शौर्य, शक्ती वा उत्कृष्टता (निपुणता) इ. ग्रीकांच्या दृष्टीने व्हरच्यू शब्द निपुणतेचा, उत्कृष्टतेचा निदर्शक आहे. माणसाचे चांगले गुण म्हणजे सद्‌गुण होत. त्याचे वाईट गुण म्हणजे दुर्गुण हेत. हे सद्‌गुण जाणिवपूर्वक व निर्धारपूर्वक संपांदन केले पाहिजेत. अशा सद्‌गुणांच्या संपादनामुळे मानवाचे मनुष्यत्व व माणसांचा समाज टिकून राहतो. अर्थात मानवता व मानवी समाज टिकविण्यासाठी हे सद्‌गुण आवश्यक असतात.

ज्या माणसात असे सद्‌गुण असतात व जो माणूस इतरांच्या संदर्भात व कठीण परिस्थितीत असे सद्‌गुण अभिव्यक्त करतो, त्या माणसाची प्रशंसा केली जाते.अशा सद्‌गुणांना माणसांच्या चांगल्या सवयी असेही म्हणता येईल. एकांन्तात नैतिक जीवनाची अभिव्यक्ती दिसत नाही, बदलत्या परिस्थितीत नियमीतपणे, न चुकता सत्कर्मे, कर्तव्यकर्मे करीत राहील्यास माणूस शुभजीवनाकडे वाटचाल करतो. त्याचे नैतिक जीवन विकसीत होते. माणसांचे वर्तन व चारीत्र्य हे अविभाज्यपणे जोडलेले असते. त्याचे शील वा चारित्र्य हे विविध परिस्थितींमध्ये त्याच्या वर्तनात व्यक्त होत असते. त्या उलट चांगली कर्मे (कर्तव्यकर्म व सत्कर्म) करता करता माणसाचे नैतिक चारित्र्य घडत असते. परंतु ही सत्कर्मे सुसंगतपणे व नियमितपणे केली पाहिजेत. उदा. जर एखादा माणूस आपले कर्तव्यकर्म प्रामाणिकपणे व उत्कृष्टपणे करीत असेल तर त्यात कर्तव्यनिष्ठा हा सद्‌गुण विकसित होतो. तो कर्तव्यनिष्ठ बनतो. म्हणून एक लेखक म्हणतो-

Sow an act reap a habit,
Sow a habit, reap a character.
Sow a character and reap a destiny.

सातत्यपूर्वक चांगले कर्म करीत राहिल्यास चांगली कर्मे करण्याची सवय लागते. अशा सवयीमूळे शील तयार होते. त्यामुळेच आपण आपल्या नियतीचे शिल्पकार बनतो. अशा प्रकारे सद्‌गुण हे संपादन करता येतात. म्हणूनच त्यांना चारित्र्य-मूल्ये असेही म्हणतात. तसेच ते कष्टसाध्य असल्यामुळे त्यांना सद्‌गुण हे माणसाच्या अर्जित प्रवृत्ती असेही म्हणता येईल. अर्थात सद्‌गुण हे मानवी चारित्र्याची उत्कृष्टता दर्शवितात. दुर्गुण हे त्यासंदर्भातील दोष होत. होण्याची नैतिकता व करण्याची नैतिकता असे नैतिकतेचे भाग केल्यास सद्‌गुण हे सद्‌गुणी होण्याची नीतीमत्ता दर्शवितात. कर्तव्य व सत्कर्म हे करण्यांच्या नैतिकतेचे द्योतक आहेत. महापुरुषांचा एक अर्थपूर्ण संदेश असतो. तो म्हणजे, 'चांगले व्हा व चांगले वागा'. (Be good and do good) चागंले वा सद्‌गुण होण्याचा एक राजमार्ग म्हणजे सुसंगतपणे, सातत्यपूर्वक चांगली कामे वा सत्कर्मे करणे होय.

कर्तव्ये ही अत्यावश्यक स्वरुपाची असतात. कोणताही माणूस हा आपले कर्तव्यकर्म करीत असतो. सद्‌गुण हा त्या माणसाचे गुण दर्शवितो. म्हणून आपण रास्तपणे म्हणतो की एखादा माणूस सद्‌गुणी आहे याचा अर्थ त्यांच्या व्यक्तित्वात सद्‌गुण आहेत असा होतो. असा सद्‌गुणी माणूस केवळ सद्‌गुणी न राहता, सदाचारी वा सत्कर्मे करणाराही असतो 'सद्‌गुणांना रजा नसते' असे म्हणतात. जर माणूस नैतिक चारित्र्यसंपन्न असेल तर त्याच्या जीवनात नैतिकतेत रजा नसते. तो माणूस नीतीमत्तेचा मार्ग सोडीत नाही. एवढेच नव्हे तर त्याच्या सुसंगत सदाचरणावरुन आपण त्यांच्या चारित्र्याविषयी अनुमान करतो. अर्थात माणसाने 'सद्‌गुणी' होण्याचा निर्धार करावा लागतो व त्यासाठी सत्कर्मकरण्याचा मार्ग निवडावा लागतो. विशेष म्हणजे सद्‌गुणांमुळे सद्‌गुणी व सदाचारी माणसांचे कल्याण होते व समाजाचेही भले होते. दुर्गुण हे दुर्गुणी व दुराचारी माणसाचे व त्याच्या समाजाचे नुकसानच करतात

## ३.३ प्लेटोची (इ.स.पू. ४२७ ते इ.स.पू. ३४७) सद्‌गुणविषयक संकल्पना

प्लेटो हा महान तत्त्वचिंतक सॉक्रेटिस या तत्त्ववेत्त्याचा खरा शिष्य म्हणून ओळखला जातो. प्लेटोने चार प्रधान सद्‌गुणांची संकल्पना मांडली. ह्या चार सद्‌गुणांचा सिद्धांन्त समजून घेण्यासाठी त्याचे सद्‌गुणविषयक विचार समजून घेणे अगत्याचे होय. प्लेटोच्या मतानुसार मानवी स्वभावाच्या प्राकृतिक व योग्य कार्यात चांगलेपणा असतो. तसेच माणूस हा समाजशील प्राणी आहे. मानवाचे नैतिक जीवन हे सामाजिक परिसराच्या संदर्भात घडत असते. माणसाच्या सामाजिकतेच्या पार्श्वभूमीवर त्याची नैतिकता तपासली पाहिजे. सॉक्रेटिस म्हणत असे, **'सद्‌गुण म्हणजे ज्ञान होय'.** (Virtue is Knowedge) याचा अर्थ असा की खऱ्या अर्थाने सद्‌गुणी होण्यासाठी माणसाने सद्‌गुणांचे मर्म जाणले पाहिजे. अशी नैतिक मर्मदृष्टी प्राप्त झाल्यास माणूस सद्‌गुणी होतोच. सॉक्रेटिसचे हे मत खरे असले तरी सद्‌गुणी होण्यासाठी सद्‌गुणांचे ज्ञान होणे, पुरेसे नसते. कर्तव्यकर्मे व सत्कर्मे करीत करीत माणसाला सद्‌गुण आत्मसात करावयाचे असतात.

प्लेटोच्या मते सद्‌गुणयुक्त जीवन हेच खरे चांगले मानवी जीवन होय. त्याच्या नैतिक चिंतनात प्लेटोने चार प्रधान वा मौलिक सद्‌गुणांचा सिद्धांत मांडलेला आहे. हे चार सद्‌गुण संपादन करणे म्हणजेच नैतिक जीवन होय. हे चार सद्‌गुण म्हणजेच **शहाणपण** (ज्ञान), **धैर्य** (शौर्य), **आत्मसंयम** व **न्याय** होत. प्लेटोने या सद्‌गुणांना ‘कार्डिनल’ असे विशेषण लावलेले आहे. कार्डो या शब्दापासून कार्डिनल शब्द निष्पण्ण होतो. कार्डो म्हणजे बिजागिरी होय. ही बिजागिरी दरवाजाला आधार देते व तिच्या आधारावर दरवाजा उभा राहतो व फिरतो तसेच सद्‌गुणांचे आहे समाजाच्या संदर्भातील मानवी नैतिक जीवनांचा आधार म्हणजे हे चार सद्‌गुण होत. हे सद्‌गुण मूलभूत असून इतर सद्‌गुण  गौण होत. फ्रँकेनाच्या मते हे प्रधान सद्‌गुण परस्परांमधून निष्पन्न होत नाहीत. इतर सद्‌गुण हे त्यांच्यातून निष्कर्षित केले जाऊ शकतात. मानवी स्वभावात व व्यक्तित्वात बुद्धीप्रमाणे विकार व वासनाही असतात.

प्लेटोच्या मतानुसार मानवी व्यक्तित्वात तीन घटक असतातः-

१) वासनात्मक वा विकारप्रधान घटक,

२) गतिमान अशी इच्छाशक्ती

३) बौद्धिक वा दार्शनिक घटक

या तीन घटकांच्या कार्यामध्ये सामंजस्य वा सुसंगती असेल तर व्यक्तीच्या जीवनात ‘न्याय’ हा सद्‌गुण साकारित होतो. प्रत्येक घटकाचे काही प्राकृतिक कार्य असते. या तीन घटकांची कार्ये परस्परांशी सुसंगत राहून सुरळीतपणे होत राहिल्यास नैतिक जीवन जगता येते. त्यासाठी बौद्धिक घटकाने दिलेले आदेश इच्छाशक्तीने स्वीकारुन वासनांवर नियंत्रण ठेवल्यास तीन घटकांमधील एकात्मता साधता येते व मानवी जीवन सुरळीत चालते.

**शहाणपण :-**

**शहाणपण** (ज्ञान) हा बुद्धीचा सद्‌गुण आहे. ज्ञान संपादन करणे व ज्ञानांकुशता हे या घटकांचे कार्य होय. हे केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे. या ज्ञानामुळे निर्धारपूर्वक योग्य मूल्यांचा व सद्‌गुणांचा स्वीकार केला पाहिजे. अर्थात ज्ञानी माणूस हा ज्ञानांकुशता स्वीकारतो, ज्ञानाच्या आधारे निर्णय घेतो व वासना विकारांवर नियंत्रण ठेवतो.

**धैर्य:-**

धैर्य (शौर्य) हा इच्छाशक्तीचा सद्‌गुण होय. बुद्धीने निर्धारित केलेल्या कक्षेत या घटकाने कार्य करावयास हवे. शौर्यात दोन प्रकार दिसून येतात.

१)  सैनिकाचे भौतिक शौर्य

२) विचारवंताचे व समाज सुधारकाचे नैतिक धैर्य. युद्धात सैनिकाने शौर्य दाखविले पाहिजे. तसेच चिंतकाने व तत्त्वज्ञाने तत्त्वनिष्ठेच्या वा सत्यनिष्ठेच्या संदर्भात धैर्य दाखविले पाहिजे.

**आत्मसंयम :-**

**आत्मसंयम** (संयमाने उपभोग) हा वासनात्मक घटकाचा सद्‌गुण होय. 'वासना त्याज्य आहेत'. अशी प्लेटोची भाषा नाही. तो वासनांची निंदाही करत नाही. त्यांच्या मागण्यांकडेही माणसाने लक्ष दिले पाहिजे. विशिष्ट प्रमाणात त्यांचे समाधान करणे आवश्यक आहे. संयमित उपभोग हा या संदर्भातील सद्‌गुण होय. या घटकाने बौद्धिक नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्राकृतिक विकारांचे नियंत्रण केले जाते. त्यांच्यात एक व्यवस्था निर्माण केली जाते. इच्छाशक्तीने व वासनांनी बुद्धीचे आदेश मान्य केल्यास नैतिक जीवन जगणे सुलभ जाते. व जीवनातील घटकांमध्ये समरसता, सामंजस्य निर्माण होते.

**न्याय:-**

न्याय हा संपूर्ण व्यक्तित्वाचा सद्‌गुण होय. व्यक्तित्वाच्या विविध घटकांमध्ये व त्यांच्या कार्यात सामंजस्य निर्माण करणे म्हणजे 'न्याय' हा सद्‌गुण प्राप्त करणे होय. ज्या कार्यासाठी जो घटक योग्य आहे. ते कार्य त्या घटकाकडून व्हायला हवे. बुद्धी, इच्छाशक्ती व वासनाविकार आपले व्यापार वा कार्य परस्परांशी सामंजस्य साधून करीत असतात, तेव्हा 'न्याय' हा सद्‌गुण साधला जातो. अर्थात प्रत्येक घटकाने आपले कार्य करण्यात 'न्याय' आहे. प्रत्येक घटकाने स्वतःच्या स्वधर्मानुसार (स्वभावानुरुप) काम करावयास हवे. आदर्श नैतिक जीवन म्हणजे ज्ञानी, शूर, संयमित व न्यायी माणसाचे जीवन होय. न्यायी माणूस हा भोगांचा गुलाम नसतो. त्यांनी बुद्धीचे श्रेष्ठत्व स्वीकारलेले असते. त्यांच्या जीवनात आशा, आकांक्षा असतात. परंतु त्यांच्यावर बुद्धीचे वर्चस्व असते.

प्लेटोच्या मते हे सद्‌गुण व्यक्तिगत व सामाजिक दृष्ट्याही महत्त्वाचे असतात. ते व्यक्तीत व समाजातही दिसून येतात. माणूस हा बुद्धिमान तसाच समाजशील प्राणी आहे. तो एकटा राहात नाही. त्याला दुसरा माणूस हवा असतो. 'समाज ही व्यक्तीची विस्तृत आवृत्तीच असते.' म्हणून व्यक्ती व समाज या दोहोंनाही नीतीमत्ता आवश्यक असते. वर सांगितल्याप्रमाणे व्यक्तित्वात तीन घटक असतात. हे तीनही घटक प्रत्येकात असतात. परंतु ते प्रत्येकात कमी अधिक प्रभावी असतात. काही व्यक्तींमध्ये बौद्धिक घटक प्रभावी असतो, तर काहींमध्ये इच्छाशक्ती प्रभावी असते. बहुसंख्य लोकांमध्ये विकार अधिक प्रभावी असतात. म्हणून समाजात तीन वर्ग दिसून येतात. हे तीन वर्ग म्हणजे:-

१) लोकपालांचा वर्ग,

२) सहाय्यक वर्ग,

३) सर्वसामान्य लोकांचा वर्ग.

### १) लोकपालांचा वर्ग:-

लोकपालांमध्ये दार्शनिक वा बौद्धिक घटक प्रभावी असतो. ते ज्ञानोपासक असतात. ते सत्यशोधक असतात. तसेच ते सत्यनिष्ठ असू शकतात. शहाणपणा वा ज्ञानांकुशलता हा त्यांच्यातील प्रधान सद्‌गुण होय. त्यांन प्लेटा राजर्षी (तत्त्वज्ञ-शासक) असे म्हणतो. अशा राजर्षींचे शासन आदर्श राज्य वा आदर्श समाज निर्माण करु शकते.

### सहाय्यक वर्ग:

ह्या वर्गाचा मुख्य सद्‌गुण असतो तो म्हणजे 'दुर्दम्य इच्छाशक्ती'. ह्या वर्गातील सदस्यांचा मुख्य सद्‌गुण असतो धैर्य वा शौर्य ते कर्तृत्ववान असतात. पराक्रमाने कीर्ती व यश संपादन करण्यात त्यांना धन्यता वाटते. ते बाह्य आक्रमणे व आंतरिक बंडाळीपासून समाजाचे, राज्याचे रक्षण करतात. विद्‌वानांनी अर्थात लोकपालांनी केलेले कायदे ते अमलात आणतात. ते राजर्षीचे समर्थन करतात. त्यांच्या आज्ञांचे पालन करतात.

### बहुजन समाज:

हा सर्वसामान्य माणसांचा असतो. या वर्गात उत्पादक, शेतकरी, मच्छीमार, व्यापारी, सुतार, लोहार, चांभार, कुंभार वगैरे सर्वांचा समावेश होतो. त्यांच्यात भौतिक गरजा प्रभावी असतात. 'संयमित उपभोग' हा त्यांचा सद्‌गुण होय. उत्पादक कामे करून ते समाजाच्याही भौतिक गरजा भागवितात. हा वर्ग प्रामुख्याने श्रमजीवी असतो.

लोकपाल हे जाणते शासक असतात. ते बहुजन समाजाला दिशा दाखवितात, त्यांना नियंत्रणाखाली ठेवतात. या तीन वर्गातील व्यक्ती जेव्हा आपली कामे व्यवस्थितपणे व नियमितपणे करतात. तेव्हा समाजात 'न्याय' हा सद्‌गुण विकसित होतो. नायाधीष्ठित समाजात ज्ञानी लोकपालांनी केलेले नियम इतर दोन वर्गातील सदस्य मान्य करतात. लोकपालांच्या जीवनातसुद्धा ज्ञानांकुशता असते. ते ही आपल्या वासना नियंत्रित करतात व आपली कर्तव्यकर्मे उत्कृष्टपणे पार पाडीत असतात. 'न्याय' हा सद्‌गुण व्यक्तिच्या विविध पैलुंमध्ये समरसता निर्माण करतो, तसाच सामाजिक वर्गांमध्येही एकात्मता निर्माण करतो.

### आपली प्रगती तपासून पहा:-

१) सद्‌गुण म्हणजे काय ?
२) 'कार्डिनल' या शब्दाचे महत्त्व काय आहे ?
३) प्लेटोप्रणित चार प्रधान सद्‌गुण कोणते ?
४) राज्यातील लोकपालाचा सद्‌गुण कोणता ?

५) प्लेटोच्या मते मानवी व्यक्तित्वाचे तीन घटक कोणते ?

## ३.४ ॲरिस्टॉटलची (इ.स.पू. ३८४ ते इ.स.पू. ३२२) सद्‌गुणांविषयक संकल्पना

ग्रीक तत्त्वज्ञ ॲरिस्टॉटल हा प्लेटोचा शिष्य असला तरी तो फार थोर, प्रतिभावान तत्त्वज्ञ होता. नीतीशास्त्रावर पुस्तक लिहिणारा तो पहिला पाश्चात्य विचारवंत होय. ज्ञान, शौर्य, धैर्य व चिकाटी हे मानवी गुण आहेत. परंतु केवळ असे गुण माणसाचे नैतिक चारित्र्य घडवित नाहीत. त्यांचे नैतिक महत्त्व त्यांच्याशी संबंधित असलेल्या प्रयोजनांवर, मूल्यांवर वा हेतूवर अवलंबून असते. म्हणूनच ॲरिस्टॉटलने नैतिक सद्‌गुण व बौद्धिक सद्‌गुण यांच्यात फरक केलेला आहे. एखादा विद्वान नैतिकदृष्ट्या श्रेष्ठ असेलच असे सांगता येत नाही. ॲरिस्टॉटलने सुवर्णमध्याची कल्पना मांडलेली आहे. ती आपण पुढे पाहू. तसेच ॲरिस्टॉटलने न्यायाच्या संकल्पनेचा अर्थ अधिक स्पष्टपणे व विस्तृतपणे मांडला आहे. पहिली गोष्ट म्हणजे त्याने न्यायाला सर्वश्रेष्ठ सद्‌गुण म्हणून प्राधान्य दिले. न्यायाचे दोन प्रकार आहेत.

**१) वितरणात्मक न्याय:** संपत्ती व हुद्दे वा मानसन्मान यांचे नागरिकांमध्ये त्यांच्या योग्यतेनुसार वितरण.

**२) परिमार्जनात्मक वा निवारणात्मक न्याय:** व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समाज यांच्यामधील व्यवहारात अन्याय होता कामा नये व अन्याय झाल्यास त्याचे परिमार्जन केले पाहिजे, अन्याय दूर केला गेला पाहिजे व न्याय मिळवून दिले पाहिजे. विचार करणे व स्वतःच्या इच्छा, वासनांवर नियंत्रण ठेवणे हे माणसाचे वैशिष्ट्य होय. सत्कर्मे करता करता चांगली कर्मे करण्याची सवय लागते. या चांगल्या सवयीतूनच सद्‌गुण विकसित होतात.

ॲरिस्टॉटलने 'अति सर्वत्र वर्जयेत' हा नियम स्वीकारलेला आहे. एखाद्या गुणाचा संपूर्ण अभाव व त्या गुणाचा अतिरेक ही दोन टोके दुर्गुण दर्शवितात. उदा. भोगांचा अतिरेक व भोगांचा अतिरेकी त्याग ही दोन टोके आहेत. त्यांतला मध्य आहे संयमित उपभोग. हा आत्मसंयम नावाचा सद्‌गुण होय. भित्रेपणा व अतिरेकी उतावळेपणा टाकून धैर्य हा सद्‌गुण विकसित केला पाहिजे. कंद्रुपणा (कंजुषपणा) व उधळपट्टी हे दुर्गुण आहेत. परंतु या संदर्भात औदार्य हा सद्‌गुण होय. हा मध्यबिंदू शोधणे हे कठीण काम आहे. म्हणून विवेकनिष्ठेची वा बुद्धिनिष्ठेची आवश्यकता आहे.

सहकिअन या नीतीशास्त्रज्ञाने ॲरिस्टॉटलच्या नैतिक चिंतनाचे सार खालील विधानात स्पष्ट केलेले आहे. नैतिक दृष्ट्या योग्य बाब योग्य माणसाच्या संदर्भात योग्य प्रमाणात, योग्यवेळी, योग्य हेतूने केली पाहिजे. उदा. औदार्य योग्य व्यक्तीला उदारपणे, योग्यवेळी, योग्य प्रमाणात, चांगल्या हेतूने वित्त वा पैसे दिले पाहिजेत.

म्हणून माणसाला योग्य नैतिक वर्तन ठरविण्यासाठी वेळोवेळी बुद्धीचा उपयोग करावा लागतो. तसे करण्याची सवय लावून घेतली पाहिजे. म्हणून ॲरिस्टॉटल म्हणतो, **'सद्‌गुण हा सवयीचा परिपाक आहे.'** योग्य कर्मांची निवड करून अशी कर्मे प्रयत्नपूर्वक व सातत्याने केली पाहिजेत. दोन दुर्गुणांमधील मध्य शोधणे कठीण काम आहे. ते गणितीपद्धतीने शोधता येत नाही. व्यावहारिक शहाणपण वा विवेक ते शोधण्यास उपयोगी ठरते. त्यासाठी वेगवेगळ्या व बदलत्या परिस्थितींचा अभ्यास करावा लागतो. त्यातील साम्य/भेद हे लक्षात घ्यावे लागतात. अशा सद्‌गुणांची निश्चिती करून, त्यांचे स्वरुप निर्धारित करुन ते आत्मसात केले पाहिजेत. असे सद्‌गुणयुक्त सदाचारी जीवन हे समाधानी, सुखी जीवन होय.

**आपली प्रगती तपासून पहा:-**

१) ॲरिस्टॉटलने कोणते दोन प्रमुख सद्‌गुण सांगितले ?

२) ॲरिस्टॉटलने न्यायाचे कोणते प्रकार स्पष्ट केले ?

२) ॲरिस्टॉटल 'सद्‌गुण हा सवयीचा परिपाक आहे' असे का म्हणतो ?

## ३.५ सारांश

नैतिकदृष्ट्या शुभजीवनासाठी सद्‌गुण-संवर्धनाची अत्यंत आवश्यकता असते. सद्‌गुण विकसित केल्यास माणसाकडून नैतिकदृष्ट्या योग्य वर्तन केले जाते. बुद्धि व अनुभव यांची महत्त्वाची भूमिका नैतिक जीवनात आढळून येते. सद्‌गुणांच्या एकात्मतेतूनच चारित्र्य घडते. असा चारित्र्यसंपन्न माणूस वा शीलवान माणूस नैतिकदृष्ट्या चांगलेच वर्तन करतो. या संदर्भातील अत्यंत महत्त्वांची बाब म्हणजे ॲरिस्टॉटलने ज्ञानाबरोबर सवयीला अधिक महत्त्व दिले. केवळ पुस्तकी वा शाब्दिक ज्ञान असून चालत नाही. त्याचा विनियोग करून चांगले वर्तन निर्धारित करणे व तसे वागण्याचा प्रयत्न करणे महत्त्वाचे होय. म्हणूनच ॲरिस्टॉटल बौद्धिक सद्‌गुण व नैतिक सद्‌गुण असे सद्‌गुणांचे वर्गीकरण करतो.

कुठल्याही धर्मपंथाचा वा धर्मग्रंथाचा आधार न घेता नीतीशास्त्रावर स्वतंत्र ग्रंथ लिहिणारा ॲरिस्टॉटल हा पाश्चात्य जगातील पहिला तत्त्वज्ञ होय.

## ३.५ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

१) राज्यातील लोकपालांचा सद्‌गुण कोणता ? त्याचे विवेचन करा.
२) श्रमजीवी वर्गाचा महत्त्वाचा सद्‌गुण सांगून त्याचे विवरण करा.
३) 'सद्‌गुणयुक्त जीवन हे चांगले जीवन होय'. चर्चा करा.
४) ॲरिस्टाटलप्रणित शुभजीवनाची संकल्पना स्पष्ट करा.
५) ॲरिस्टॉटल म्हणतो, 'सद्‌गुण हा सवयीचा भाग आहे'. चर्चा करा.
६) ॲरिस्टॉटलचे नैतिक चिंतन थोडक्यात विशद करा.
७) प्लेटोप्रणित चार मौलिक सद्‌गुण या विषयावर विस्तृत टीप लिहा.
८) टिपा लिहा.
   (अ) प्लेटोप्रणित चार प्रधान सद्‌गुण.
   (ब) ॲरिस्टॉटलचे नैतिक चिंतन.
   (क) ॲरिस्टाटलप्रणित न्याय एक सद्‌गुण.
   (ड) ॲरिस्टॉटलचे चरित्रविषयक नीतिशास्त्र.
   (इ) प्लेटोची सद्‌गुणविषयक संकल्पना.

*****

# ४

## प्रकरण ४

# भारतीय तत्त्वज्ञानाच्या संदर्भातील नैतिकता

**घटक रचना**


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ भारतीय नीतिशास्त्राची वैशिष्ट्ये

४.३ ऋत, ऋण व पुरुषार्थ या संदर्भातील धर्म संकल्पना

४.४ श्रीमद्‌भगवद् गीतेमधील निष्काम कर्मयोग

४.५ सारांश

४.६ विद्यापीठीय दीर्घोत्तरी प्रश्न


## ४.० उद्दिष्ट्ये

- भारतीय नैतिक तत्त्वज्ञानातील आस्तिक व नास्तिक दर्शनांची वैशिष्ट्ये जाणून घेणे.
- नीतिशास्त्रामधील 'धर्म' संकल्पना एक परमोच्च तत्त्व म्हणून समजून घेणे.
- नीतिनिर्णय घेण्याची गरज लक्षात घेणे.
- कर्तव्य करण्यामागील नैतिक भूमिका समजून घेणे.

## ४.१ प्रस्तावना

पाश्चात्य तत्त्वज्ञानात नीतिशास्त्रास तत्त्वज्ञानाची एक शाखा मानली जाते. भारतीय दर्शनामध्ये तत्त्वज्ञान व नीतिशास्त्र यांचा एकाच वेळी उदय झाला असे मानले जाते. भारतीय परंपरेनुसार तत्त्वज्ञान केवळ बौद्धिक चिंतन नसून जीवनाची एक पद्धती आहे. अंतिम सत्तेचे केवळ ज्ञान प्राप्त करणे हे साध्य नसून अंतिम सत्तेची अनुभूती घेणे हे जीवनाचे लक्ष्य आहे. भारतीयांच्या मते सर्व तात्विक प्रश्न एकमेकांशी संलग्न असतात. या विश्वामध्ये एक नैतिक व्यवस्था कार्यरत आहे. प्रत्येक व्यक्तीला या व्यवस्थेमध्ये काही निश्चित स्थान असून त्या अनुषंगाने प्रत्येकाची काही कर्तव्ये व जबाबदाऱ्या आहेत.

प्रत्येक मनुष्याचे कर्तव्य केवळ मानव समाजापुरते मर्यादित नाही. मनुष्याची बांधिलकी संपूर्ण सजीव सृष्टीशी असते. भारतीय तत्त्वज्ञानानुसार स्वतःइतकेच आपल्या शेजाऱ्यावर प्रेम करा आणि प्रत्येक सजीव आपला शेजारी आहे.

## ४.२ भारतीय नीतिशास्त्राची वैशिष्ट्ये

भारतीय तत्त्वज्ञानातील संप्रदायांची आस्तिक व नास्तिक अशी विभागणी करता येते. वेदांना प्रमाण मानणारी न्याय, वैशेषिक, योग, सांख्य, मीमांसा व वेदान्त ही दर्शने आस्तिक दर्शने मानली जातात. वेदप्रामाण्य नाकारणारी चार्वाक, जैन व बौद्ध ही दर्शने नास्तिक दर्शने मानली जातात. आस्तिक व नास्तिक भारतीय दर्शनांची पुढील प्रमाणे वैशिष्ट्ये आढळून येतात.

१. भारतीय नीतिशास्त्र मानवी संस्कृतीइतकेच प्राचीन आहे. भारतीय दर्शनांचा नेमका कालखंड निश्चित करणे फार कठीण आहे. याला अपवाद केवळ भगवान बुद्ध हे होत. भगवान बुद्धांचा जन्म इसवीसन पूर्व ४८७ मध्ये झाला. भारतीय नीतिशास्त्राची प्राचीनताच मानवी जीवनात नैतिक तत्त्वज्ञानाला प्रस्थापित करण्यास कारणीभूत आहे. प्रत्येक दर्शन चिरस्थायी नैतिक आदर्शाचा पुरस्कार करते.

२. भारतीय दर्शनांमध्ये परिपूर्ण जीवन जगण्यासाठी व्यावहारिक साधनांचा पुरस्कार केला जातो. गेली हजारो वर्षे योग, जैन व बौद्ध दर्शनाचे अनुयायी विहित मार्गाने आध्यात्मिक प्रगती करुन घेत आहेत. भारतीय दर्शने केवळ आदर्शांचा उहापोह न करता त्यासाठी मार्ग सुद्धा सुचवितात.

३. भारतीय नीतिशास्त्राला सत्ताशास्त्राचा भक्कम पाया आहे. भारतीय दर्शने ज्या परमतत्त्वांची अनुभूती घेणे आवश्यक मानतात त्या तत्त्वांसाठी सत्ताशास्त्रीय आधार सिद्ध करतात. सिद्धान्त व आचरण तसेच बुद्धिप्रामाण्य व प्रत्यक्ष अनुभूती याची सांगड भारतीय दर्शनांमध्ये आढळून येते. उदा. बौद्ध दर्शनामध्ये निर्वाणासाठी अष्टांग मार्गाचा पुरस्कार केला आहे. भारतीय तत्त्वचिंतकांच्या मते बुद्धी व नीती या दोन पंखांच्या सहाय्याने मानवी आत्मा आध्यात्मिक भरारी घेतो.

४. भारतीय नैतिक तत्त्वज्ञान आध्यात्मिक व निरपेक्ष आहे. अंतिम सत्तेची अनुभूती सुख दुःख, योग्य - अयोग्य यांच्या पलीकडे गेल्याने होते. परमतत्त्वाची प्राप्ती विशिष्ट नैतिक आचरणाने होते. नैतिक आचरण व्यक्ती निरपेक्ष असते.

५. भारतीयांचे नैतिक तत्त्वज्ञान मानवहितवादी आहे. नैतिक नियमांचे पालन हे व्यक्तिगत उन्नती तसेच समाजकल्याणासाठी आवश्यक ठरते. नैतिकतेचे उद्दिष्ट मानव कल्याण हे आहे.

भारतीय परंपरेमध्ये केवळ मानव कल्याण अभिप्रेत नसून त्यात सर्व सजीव म्हणजे पशु, पक्षी, वृक्ष, दृश्य अथवा दृष्टीस न पडणारे जीव यांचे कल्याण अभिप्रेत आहे. या सर्वांसाठी अहिंसा, सत्य, करुणा, आस्था इ. मूल्ये आचरणात आणणे आवश्यक ठरते.

६. 'कर्म सिद्धान्त' भारतीय तत्त्वज्ञानाची महत्त्वाची संकल्पना आहे. मनुष्याच्या काही अपेक्षेने केलेल्या प्रत्येक कर्माचा परिणाम (शुभ / अशुभ ) त्या व्यक्तीच्या जीवनावर होत असतो. सोप्या शब्दांमध्ये कर्म सिद्धान्त म्हणजे जे पेराल तेच उगवते. शुभ कर्माचे फळ सुख व अशुभ कर्माचे फळ दुःख असते. व्यक्तीचे वर्तमान जीवन, त्याचा भूतकाळ व भविष्यकाळ यांना साधणारा दुवा म्हणजे कर्म सिद्धान्त होय.

## ४.३ ऋत, ऋण व पुरुषार्थ या संदर्भातील धर्म संकल्पना

भारतीय तत्त्वज्ञानामध्ये 'धर्म' ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची सर्वसामावेशक संकल्पना आहे. 'धर्म' या शब्दाचा नेमका अर्थ अन्य भाषांमध्ये करणे अतिशय कठीण आहे. धर्म हा शब्द 'धृ' या संस्कृत धातूपासून आलेला आहे. त्याचा अर्थ धारण करणे, पोषण करणे, रक्षण करणे असा होतो. तत्त्वज्ञानामध्ये धर्म शब्दाच्या विविध छटा आढळून येतात.

ऋग्वेदामध्ये 'धर्म' हा शब्द सृष्टीचे नियम या अर्थी वापरला गेला आहे. 'ऋत' या वैश्विक नियमाचे समाजव्यवस्थेतील रेखाटन म्हणजे धर्म होय.

छांदोग्य उपनिषदामध्ये धर्म म्हणजे व्यक्तीच्या जीवनातील अवस्थानुसार निर्धारित कर्तव्यांचे (आश्रम धर्म) पालन होय.

ऐतरेय ब्राह्मणामध्ये धर्म म्हणजे योग्य आचरण होय. धर्माचे म्हणजे आचारसंहितेचे पालन व रक्षण राजा करतो.

महाभारतामध्ये धर्माची व्याख्या 'धारणात् धर्मं' इत्याहु धर्मो धारयते प्रजा अशी केली आहे. ज्याने समाजाची धारणा म्हणजे संवर्धन होते तो धर्म होय.

वैशेषिक दर्शनाचे प्रणेते कणाद यांच्या मते धर्माचे प्रयोजन ऐहिक उत्कर्ष व पारलौकिक सुख संपादन करणे व त्या संपादनासाठी साधने सांगणे हे आहे.

मीमांसा दर्शनानुसार धर्म म्हणजे वेदाज्ञा व विधी यांनी ज्ञात होणारा अर्थ होय.

मनुस्मृती व याज्ञवल्क्य व स्मृती यांच्या मते धर्म म्हणजे व्यक्तीच्या वर्ण व आश्रम यांनी निर्धारित कर्तव्याचे पालन होय.

डॉ. राधाकृष्णन यांच्या मते धर्म म्हणजे चार अवस्थांमध्ये (आश्रमांमध्ये) चार वर्णाच्या लोकांनी चार पुरुषार्थ संपादन करण्याकरिता केलेले कर्तव्य होय.

भारतीयांच्या दृष्टिकोनातून नैतिकतेची तीन अंगे आहेत. वैयक्तिक, सामाजिक व आध्यात्मिक. वैयक्तिक नैतिकता व व्यक्तिच्या स्वत:च्या आदर्शांची प्राप्ती पुरुषार्थ संकल्पनेतून व्यक्त होते. मोक्ष या पुरुषार्थामधून मनुष्याच्या आध्यात्मिक नैतिकतेचा आविष्कार होतो. 'ऋण' संकल्पना तसेच वर्णाश्रम व्यवस्था यातून सामाजिक नैतिकतेचा आविष्कार होतो.

वैश्विक व नैतिक नियमांमधील धर्म म्हणजे 'ऋत' होय. सामाजिक बांधिलकी मधील धर्म म्हणजे 'ऋण' होय. वैयक्तिक पातळीवर मूल्यांच्या पाठलागामधील धर्म म्हणजे पुरुषार्थ होय.

**४.३.१ ऋत संकल्पनाः**

ऋत संकल्पना वेदांमधील अत्यंत महत्त्वाची संकल्पना आहे. ऋत म्हणजे शाश्वत अशी वैश्विक व नैतिक व्यवस्था होय. ऋत म्हणजे सत्य, सुसंगती व ज्यांचे उल्लंघन होऊ शकत नाही अशी चिरंतन प्रणाली होय. ऋत हे 'सत्यस्य सत्यम्' व 'केंद्रस्य केंद्रम्' आहे. ऋत म्हणजे 'व्रत' ही उपाधी दिलेली दैवी व्यवस्था आहे.

भौतिक विश्वामधील ऋत म्हणजे अपरिवर्तनीय असे निसर्ग नियम होत. आकाशातील ताऱ्यांचे भ्रमण, दिवस व रात्र यांचा नित्यक्रम, नद्यांचा प्रवाह, समुद्राची भरती व ओहटी या सर्व घटना ऋत ने संचालित होतात. या सृष्टीतील वेगवेगळ्या घटनांना त्यांच्या नेमक्या जागी योजणे तसेच अनेकतेतील एकता 'ऋत' मुळे शक्य होते. ऋत या सृष्टीच्या अंतर्यामी असलेले तत्त्व आहे.

नैतिक क्षेत्रामधील ऋत म्हणजे सदाचरण आहे. ऋत चा मार्ग अनुसरणारे 'व्रतानी' असून त्यांचा मार्ग देवाचा मार्ग मानला जात असे. नैसर्गिक व्यवस्थेशी सुसंगत ऋतचा मार्ग मनुष्याला समाधानी व समृद्ध जीवनाकडे घेऊन जातो.

अनृत म्हणजे चुकीचे आचरण जे ऋत च्या विरोधी असते. अनृत म्हणजे अव्यवस्था व संभ्रमावस्था होय. निसर्गनियमांच्या विरोधी असा अनृत मार्ग मनुष्याला रोग व मृत्यूकडे घेऊन जातो.

वेदांमधील देवता सुद्धा ऋत ने बद्ध आहेत. सर्वात शक्तिशाली व घृतव्रत म्हणजे दृढ संकल्प असलेली वरुण देवता ऋत ची संरक्षक देवता असून तिला 'ऋतस्य गोपः' म्हटले जाते. वरुण देवता शासक, शांतता प्रिय, रक्षक व अत्यंत दक्ष देवता आहे. सूर्य व चंद्र हे वरुण देवतेचे डोळे आहेत. वरुण देवतेच्या तीक्ष्ण व करड्या नजरेतून किंचितसेही पाप निसटू शकत नाही.

ऋत चा मार्ग अनुसरणाऱ्या लोकांवर देवतांची कृपा होते. जे ऋत चा मार्ग अनुसरत नाहीत त्यांच्यावर देवतांचा कोप होतो. म्हणजेच नैतिक व्यवस्थेमधील बक्षिस व शिक्षा 'ऋत' मुळे संचलित होते.

सदाचरणामुळे वैश्विक नैतिक व भौतिक व्यवस्थेची सार्वभौमता व एकता राखली जाते. सदाचरणाला विवेकाचे अधिष्ठान असते. वासनां आचरणामुळे ऋत ला धक्का बसतो. त्यामुळे अनाचारी लोकांना ऋत च्या संरक्षक देवतांच्या क्रोधाला सामोरे जावे लागते.

देवतांसाठी ऋत अतिभौतिक सत्ता असून मानवासाठी ऋत नैतिक नियम ठरतात. प्रारंभीच्या काळातील नित्य अश्या नैतिक व भौतिक व्यवस्थेची 'ऋत' ही संकल्पना कर्म सिद्धान्तात परिवर्तित होत गेली.

### ४.३.२ ऋण संकल्पनाः

भारतीय परंपरेमध्ये आश्रमव्यवस्था एक अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण व्यवस्था आहे. व्यक्तीच्या जीवनातील चार अवस्थांची सांगड समाज जीवनाशी घालून वैयक्तिक व सामाजिक प्रगतीचा मार्ग या आश्रमव्यवस्थेने आखला जातो. प्रत्येक व्यक्ती त्याच्या जीवनामध्ये चार अवस्थांमधून जाते- ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यासी. या अवस्थांमध्ये व्यक्तीला काही जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. मनुष्य एक सामाजिक प्राणी आहे. समाजातील अन्य लोकांच्या सहकार्याने मनुष्याची प्रगती होत असते. प्रत्येक व्यक्ती समाजातील अन्य लोकांच्या सहकार्याने विकसित होत जाते. म्हणजेच प्रत्येक व्यक्ती काही ना काही ऋणामध्ये असते.

भारतीय तत्त्वचिंतकांच्या मते जन्माला आलेल्या प्रत्येक मनुष्यावर तीन ऋणे असतात. ऋषिऋण, पितृऋण व देवऋण हे 'ऋणत्रय' होत. ऋण फेडणे, ऋणातून मुक्त होणे म्हणजे ऋणाचे अपाकरण होय.

### १. ऋषि ऋणः

ऋषि ऋणास गुरु ऋण असेही म्हटले जाते. पूर्वीच्या काळी गुरुगृही राहून अध्ययन केले जात असे. गुरुगृही राहिल्यामुळे व्यक्तीच्या भावना व विकार यांना वळण लागत असे. व्यक्तीचे मन निकोप तरतरीत व कार्यक्षम बनत असे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होऊन पुढील प्रापंचिक व सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडण्यास व्यक्ती सक्षम बनत असे. ऋषिं कडून ज्ञानाचा वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे दिला जात असे. व्यक्तीच्या विकासामध्ये ऋषींचा सहभाग अत्यंत मोलाचा असे. अध्ययन करणे, गुरुविषयी कृतज्ञता बाळगणे, गुरुविषयी आदर बाळगणे, गुरुदक्षिणा देणे अश्या कृतींमधून ऋषिऋणातून मुक्त होता येत असे. ब्रह्मचारी आश्रमामध्ये ऋषिऋणाचे अपाकरण होत असे.

## २. पितृ ऋण:

व्यक्तीचे स्वतःचे अस्तित्व त्याच्या पितरांवर अवलंबून असते. आपल्या पूर्वजांनी टिकविलेली वंशपरंपरा एका पिढीने पुढे नेण्याची जबाबदारी म्हणजे पितृऋण होय. पुत्रोत्पादनामुळे (अपत्यनिर्मितीमुळे) पितृऋणातून मुक्त होता येत असे. गृहस्थाश्रमामध्ये मनुष्याला अनेक कर्तव्ये पार पाडावयाची असतात. विवाह करुन आपल्या वंशाचे, घराण्याचे, समाजाचे व जमातीचे अस्तित्व अखंडित राहण्यासाठी प्रजोत्पादन आवश्यक ठरते. प्रजोत्पादन करुन गृहस्थाश्रमामध्ये व्यक्तीच्या पितृऋणाचे अपाकरण होत असे.

## ३. देव ऋण:

ही सृष्टी देवांनी निर्माण केली आहे. सृष्टीमधील शक्ती मानवी नियंत्रणाच्या कक्षेबाहेर आहेत. मनुष्याला जे काही निसर्गाकडून मिळते ते देवांच्या कृपेमुळे मिळते. यज्ञ व हवन करुन देवांविषयी कृतज्ञता व्यक्त केली जाते असे. त्यामुळे देवऋणाचे अपाकरण होत असे. गृहस्थाश्रमामध्ये तसेच वानप्रस्थाश्रमामध्ये यज्ञामध्ये देवतांसाठी आहुती देऊन देवऋणातून मुक्त होता येत असे.

सर्वसाधारणतः ऋण त्रय ही संकल्पना आढळून येते. मात्र शतपथ ब्राह्मणामध्ये व महाभारतामध्ये मनुष्य ऋण या चवथ्या ऋणाचा उल्लेख आढळतो. समाजसेवा व परोपकार करुन व्यक्ती मनुष्यऋणामधून मुक्त होत असे.

स्वतः वरील ऋणांचे अपाकरण झाल्यानंतरची व्यक्तीची अवस्था ‘अननृण्य’ अवस्था होय. कोणतेही ऋण शिल्लक राहिले नाही की मनुष्य मोक्ष या परम पुरुषार्थाची प्राप्ती करण्यास योग्य ठरत असे.

## ४.३.३ पुरुषार्थ:

भारतीय तत्त्वचिंतकांचे ध्येय अंतिम सत्तेचे केवळ ज्ञान नव्हे तर प्रत्यक्ष अनुभूती घेणे होते. तत्त्वज्ञान म्हणजे शुभ जीवन जगण्याची कला होय. अंतिम सत्तेची प्रत्यक्ष अनुभूती घेण्यासाठी, योग्य जीवन जगण्यासाठी पुरुषार्थांची योजना केली गेली. पुरुषार्थ म्हणजे प्रत्येक व्यक्तीने (स्त्री/पुरुष) प्राप्त करुन घ्यावीत अशी परम ध्येये होत. मनुष्याच्या बौद्धिक, नैतिक, सामाजिक व आध्यात्मिक गरजांची पूर्ती करण्यासाठी **धर्म, अर्थ, काम** व **मोक्ष** हे पुरुषार्थ सांगितले गेले. शुभ जीवन जगण्यासाठी धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थांचा पाठलाग करावयास हवा. मनुष्यजीवनातील भौतिक गरजांची पूर्ती अर्थ या पुरुषार्थाने होते. मनुष्याच्या भावनिक व मानसिक गरजांची पूर्ती काम या पुरुषार्थाने होते.मोक्ष हा पुरषार्थ मनुष्याच्या आध्यात्मिक बाजूला संतुष्ट करतो. धर्म हा पुरुषार्थ मनुष्याच्या संपूर्ण जीवनास व्यापून असतो. सुरूवातीच्या कालखंडामध्ये **धर्म, अर्थ,** व **काम** या तीन पुरुषार्थाचा संदर्भ आढळतो. त्यांना ‘त्रिवर्ग’ पुरुषार्थ म्हटले जात असे. नंतर ‘मोक्ष’ या पुरुषार्थाचा समावेश झाल्याने

पुरुषार्थ ‘चतुर्वर्ग’ झाले. अर्थ व काम या पुरुषार्थांना भौतिक मूल्य असून त्यांना दुय्यम स्थान आहे. धर्म व मोक्ष ह्या पुरुषार्थांना आध्यात्मिक मूल्य असून त्यांना श्रेष्ठ स्थान आहे. आत्मकल्याण व समाजकल्याण साधण्यासाठी चारही पुरुषार्थ साध्य करावयास हवे.

**धर्म :**

धर्म हा शब्द ‘धृ’ या धातूपासून आला असून त्याचा अर्थ संघटन करणे, संरक्षण करणे व संवर्धन करणे असा होतो. धर्माची व्याख्या ‘धारणात धर्म इत्याहू:। ’ अशी केली जाते. व्यक्तीचे जीवन व समाज व्यवस्था यातील समन्वय ‘धर्म’ या पुरुषार्थाने साधला जातो.

धर्म हा प्रथम पुरुषार्थ आहे. सर्व सजीवांमध्ये क्षुधा, निद्रा, भय व लैंगिक वासना आढळून येतात. केवळ मनुष्यप्राण्यामध्ये ‘धर्म’ प्रेरणा आढळून येते. धर्म प्रेरणा म्हणजे नैतिक व बौद्धिक चिंतनात्मकता होय. मनुष्याला इतर सजीवांप्रमाणे शारीरिक गरजा असतात. त्याचबरोबर इतर सजीवांपेक्षा अधिक उच्चतम मानसिक, नैतिक व आध्यात्मिक गरजासुद्धा असतात.

धर्म म्हणजे मनुष्याची कर्तव्ये होत. धर्माचे साधारण धर्म व विशेष धर्म असे वर्गीकरण केले जाते.

**साधारण धर्मा** मध्ये मनुष्याची निरपेक्ष कर्तव्ये येतात. सर्व मनुष्यांना काही समान कर्तव्ये असतात. **साधारण धर्म** व्यक्तीच्या व समाजाच्या प्रगतीसाठी आहे.
साधारण धर्म पुढील प्रमाणे.

अहिंसा (वैचारिक शाब्दिक व कायिक) सत्य, अस्तेय, इंद्रियनिग्रह, अपरिग्रह, संयम, धैर्य, करुणा, क्षमा, तप, परोपकार इ.

**विशेष धर्म** व्यक्तीच्या वर्णानुसार व आश्रमानुसार निर्धारित होतो.

**वर्ण धर्म:**

श्रीमद्‌भगवद् गीते नुसार प्रत्येक व्यक्ती त्रिगुणात्मक म्हणजे सत्त्व, रजस व तमस या गुणांनी युक्त असते. सत्व गुण ज्ञानाचे प्रतिक असून रजस गुण क्रियाशीलतेचे प्रतिक आहे. तमस गुण अज्ञान व अकर्मण्यतेचे प्रतिक आहे. गुणांच्या कमी अधिक प्रमाणानुसार त्रिगुणात्मक व्यक्तीचा स्व-भाव बनतो. त्रिगुणात्मक स्व-भावाप्रमाणे व्यक्तीस त्याचा वर्ण प्राप्त होतो. एकूण चार वर्ण मानले जातात.

१. **ब्राह्मण :** शिक्षक, उपदेशक व बुद्धिजीवी हे ब्राह्मण होत. ज्ञानार्जन, ज्ञानदान, नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचे संवर्धन तसेच समाजास मार्गदर्शन ही ब्राह्मणाची कर्तव्ये होती.

२. **क्षत्रिय :** शासनकर्ते, राज्यकर्ते व योद्धे हे क्षत्रिय होते. समाजाचे अंतस्थ व बाह्य शत्रुंपासून संरक्षण करणे तसेच समाजाचे संवर्धन करणे ही क्षत्रियांची कर्तव्ये होती.

३. **वैश्य :** शेतकरी व व्यापारी हे वैश्य होत. शेती, पशुपालन व व्यापार यातून समाजाच्या गरजा भागविणे हे वैश्य वर्णाचे कर्तव्य होते.

४. **शूद्र :** समाजाच्या अन्य गरजांची पूर्ती तसेच उपरोक्त तीन वर्णांच्या लोकांच्या कर्तव्यपूर्तीसाठी पूरक अशी कौशल्याची कामे शूद्र वर्ण करीत असे.

ज्ञान, सामर्थ्य, संपत्ति व सेवा ही अनुक्रमे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र वर्णाची वैशिष्ट्ये होती. समाजातील प्रत्येक व्यक्तीने स्वतःचे विहित कर्तव्य निरपेक्षपणे पार पाडले की समाज रथ प्रगतीपथावर धावू शकतो. पूर्वीची त्रिगुणात्मक, स्वभावावर निर्धारित अशी वर्णव्यवस्था आज जन्मावर आधारित जाती व्यवस्थेमध्ये कलंकित झाली आहे.

**आश्रम धर्म :**

व्यक्तीच्या जीवनाच्या चार अवस्था असून त्या अनुषंगाने असलेली कर्तव्ये म्हणजे आश्रम धर्म होय.

१. **ब्रह्मचर्य :** व्यक्तीच्या जीवनातील ही अवस्था विद्यार्थी अवस्था होय. विद्यार्थ्याने ज्ञान संपादन करावे. काही कौशल्ये आत्मसात करावीत, आत्मसंयमन शिकावे असे ब्रह्मचारी अवस्थेसाठी अपेक्षित असे. विद्यार्थ्याने जीवन मूल्यांचे आकलन करुन घ्यावे व पुढील जीवनातील जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी स्वतःला सुसज्ज करावे.

२. **गृहस्थ :** ज्ञानार्जनानंतर व्यक्तीने विवाह करुन कुटुंब या सामाजिक संस्थेत प्रवेश केल्यावर गृहस्थ जीवन सुरु होत असे. प्रजोत्पादन, वृद्धांचे संरक्षण, अतिथींचे स्वागत, यज्ञ करुन समाज हितात आपले योगदान देणे गृहस्थाचे कर्तव्य असे.

३. **वानप्रस्थ :** कुटुंबाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर कुटुंबियांच्या मोहपाशातून मुक्त होण्यासाठी निवृत्त होणे आवश्यक ठरते. आप्त स्वकीयांपासून दूर होऊन स्वतःच्या आध्यात्मिक कल्याणाचा व समाजहिताचा मार्ग स्वीकारणे अपेक्षित होते.

४. **संन्यास :** सर्व परित्याग करुन भटकंती करीत समाज कार्य करणाऱ्या साधूची ही वैराग्य अवस्था असे. मोक्ष या परम पुरुषार्थाकडे वाटचाल करणे संन्यासी आश्रमात सुकर होत असे.

प्रत्येक व्यक्तीने आपली साधारण व विशेष कर्तव्ये पार पाडली की समाजाची उन्नती होते. कर्तव्यपालन म्हणजे धर्माचरण होय. बुद्धीला प्रमाण मानून केलेले संयमित आचरण म्हणजे धर्माचरण होय. सामाजिक नीती पाळली गेली की अर्थव्यवस्था चांगली चालते. धर्माने अर्थप्राप्ती व कामपूर्ती होते.

**अर्थ :**

अर्थ पुरुषार्थ संपत्तीशी जोडला गेलेला आहे. अर्थामुळे व्यक्तीच्या नैसर्गिक व भौतिक गरजांची पूर्ती होते. पशु, शेती, अन्न, वस्त्रे, धन, जमीन जुमला तसेच नफा या सर्वाचा समावेश 'अर्थ' पुरुषार्थामध्ये होतो. संपत्ती तसेच संपत्ती निर्माण करणाऱ्या साधनांचा समावेश अर्थ या संकल्पनेमध्ये होतो. मनुष्याच्या जैविक, भौतिक व आर्थिक गरजा / इच्छांची पूर्ती अर्थ या पुरुषार्थाने होते.

अर्थ पुरुषार्थ सामाजिकदृष्ट्या सुद्धा महत्त्वाचा आहे. प्रत्येक समाजामध्ये संपत्ति निर्माण होत असते. या प्रक्रियेमध्ये त्या समाजातील प्रत्येक व्यक्तीचा सहभाग असतो. निर्माण झालेल्या संपत्तीचा वाटा प्रत्येक मनुष्याला मिळायला हवा.

अर्थ संपादन करणे तसेच त्याचा विनियोग करताना धर्मपालन आवश्यक आहे. सत्ता व अधिकार यांच्याशी अर्थ पुरुषार्थाचा संबंध आहे. संपत्ति व सत्ता यांची सांगड समाजकल्याणाशी व नैतिकतेशी घालणे गरजेचे आहे. सदाचरणाने अर्थ संपादन करुन त्याचा विनियोग सहृदयपणे व उदारपणाने समाज कल्याणासाठी व्हायला हवा.

अर्थ इच्छापूर्तीचे साधन आहे. इच्छापूर्तीने काम पुरुषार्थाचा मार्ग मिळतो. काम पुरुषार्थ, मोक्ष पुरुषार्थाचे साधन आहे. म्हणजेच अर्थ व काम हे पुरुषार्थ मोक्ष या परम पुरुषार्थाची साधने आहेत.

**काम :**

काम हा पुरुषार्थ मनुष्याच्या नैसर्गिक उर्मी, इच्छा व भावनिक गरजांशी संबंधित आहे. आस्था, आपुलकी, प्रेम ही कामाचीच रुपे आहेत. कामाची अनुभूती इंद्रियजन्य सुखे व सौंदर्यासक्त अनुभव यातूनही होते. शारीरिक प्रेरणांचे शमन तसेच भावनांची संतुष्टी यांचा समावेश काम संकल्पनेत होतो. काम पुरुषार्थाच्या प्राप्तीमुळे आत्मसंवर्धन तसेच वंश संवर्धन होते.

कामाची अभिव्यक्ती कलेच्या सौंदर्याविष्कारामधून होते. मानवी मनाच्या तीन अवस्था असतात. ज्ञानविषयक, भावनाविषयक व कृतिविषयक. भावनेशी संबंधित

आदर्श म्हणजे सौंदर्य होय. कलेच्या माध्यमातून होणाऱ्या सौंदर्याविष्कारामुळे मनुष्याच्या दमन झालेल्या अव्यक्त भावनाचे विशुद्धीकरण होते.

मनुष्याच्या शमन न झालेल्या भावना व वासना पुन्हा पुन्हा जागृत होतात व मनुष्यास अशांत बनवितात. ही अशांतता व अतृप्ती परमप्राप्तव्याच्या मार्गासाठी हानीकारक आहे. मनुष्याच्या इच्छांची पूर्ती होण्यासाठी धर्माची म्हणजे नैतिक सदाचरणाची साथ अनिवार्य आहे. वासनांचे, इच्छांचे व भावनांचे धर्माचरणाने शमन केलेला जीव मोक्षाच्या मार्गाकडे जाऊ शकतो.

**मोक्षः**

मोक्ष हा परमपुरुषार्थ आहे. मानवी जीवनाचे सर्वोच्च ध्येय म्हणजे आध्यात्मिक पातळीशी जोडला गेलेला मोक्ष पुरुषार्थ होय.

मनुष्य जेव्हा अंतर्मुख होऊन आत्मपरीक्षण करतो. तेव्हा त्याला स्वतःच्या अपूर्णतेची जाणीव होते. इंद्रियजन्य सुखे तात्कालिक, अनिश्चित व दुःखमिश्रित असतात याची मनुष्याला जाणीव होते. मनुष्याची त्याच्या आत्मतत्त्वाशी ओळख म्हणजे मोक्ष होय.

मोक्ष म्हणजे जन्म-मृत्यूच्या चक्रातून, सुख दुःखाच्या फेऱ्यातून तसेच वासनांच्या बंधनातून मुक्ती होय. आत्मतत्त्वाचे परमतत्त्वाशी एकरुप होणे म्हणजे मोक्ष होय. मोक्षाची प्राप्ती झाल्यानंतर कोणतीही इच्छा रहात नाही म्हणून मोक्षास परम पुरुषार्थ म्हटले जाते.

मोक्ष म्हणजे मानवी जीवनाच्या आदर्शांचा पाठलाग होय. जेव्हा 'काय असावयास हवे' व 'काय आहे' यातील फरक नाहीसा होतो, म्हणजेच आदर्श वास्तवामध्ये अवतरतात तेव्हा मोक्षाची प्राप्ती होते.

मोक्ष पुरुषार्थाचे दोन प्रकारे विवरण दिले जातेः

१) मोक्ष म्हणजे विदेह मुक्ती आहे. काही तत्त्वचिंतकांच्या मते मनुष्याचे शरीर व मन मर्यादित, दोषपूर्ण असते. अश्या शरीराचा त्याग केल्यानंतरच मोक्ष प्राप्ती होऊ शकते.

२) मोक्ष म्हणजे जीवन मुक्ती आहे. काही तत्त्वचिंतकांच्या मते ह्या सदोष व मर्यादित शरीरामधून योग्य व शुद्ध आचरणाद्वारे मोक्ष प्राप्ती शक्य आहे. व्यक्तीची मोक्षासाठीची तळमळ व्यक्तीला शारीरिक, मानसिक व नैतिक विशुद्धीकरणानंतर चैतन्याच्याा परमोच्च पातळीकडे नेते. त्यामुळे भौतिक शरीरामध्ये मोक्ष प्राप्ती होऊ शकते.

'मोक्ष प्राप्ती' ही मनुष्याची आंतरिक इच्छा असते. उपनिषदांमधील पुढील प्रार्थना मनुष्याची मोक्षासाठी आर्तता प्रकट करते.

असतो मा सद्गमय । तमसो मा ज्योतिर्गमय । मृत्योमा S अमृतं गमय ।

**पुरुषार्थांची एकात्मता:**

प्रा. शहा व डॉ. सुंदरराजन यांच्या मते पुरुषार्थवाद एक परिपूर्ण नैतिक सिद्धान्त आहे. पुरुषार्थवादाने मानवी जीवनाचे सर्व प्रश्न सोडविणे शक्य आहे. ह्या सिद्धान्तामध्ये व्यक्तीजीवन, समाज जीवन व जीवन ध्येये यांचा मेळ घातला गेला आहे. तसेच चारही पुरुषार्थांमध्ये एकात्मता आढळून येते. कोणत्याही एका पुरुषार्थाचा विचार स्वतंत्रपणे करता येणार नाही. धर्माचरणाने अर्थप्राप्ती होते. अर्थप्राप्ती ने कामपूर्ती होते. कामपूर्ती नंतर मोक्ष शक्य आहे.

अर्थाशिवाय धर्म म्हणजे नुसते कर्मकांड ठरेल कामाशिवाय अर्थ म्हणजे लोभीपणा होईल. मोक्षाशिवाय काम म्हणजे वासनांचा उद्रेक ठरेल. तसेच धर्म, अर्थ व काम याशिवाय मोक्ष म्हणजे एक प्रचंड पोकळी ठरेल.

**आपली प्रगती तपासा**

१. भारतीय तत्त्वज्ञानातील 'धर्म' संकल्पनेचे अर्थ काय आहेत?
२. 'ऋत' संकल्पनेचा भारतीय तत्त्वज्ञानामधील अर्थ सांगा?
३. ऋणत्रय म्हणजे काय?
४. चार पुरूषार्थ कोणते ते सांगा?

## ४.४ श्रीमद्भगवद् गीतेमधील निष्काम कर्मयोग

श्रीमद्भगवद्गीता हा हिंदूचा अत्यंत लोकप्रिय व प्रभावशाली असा धार्मिक ग्रंथ आहे. भारतीय तत्त्वज्ञानातील सर्व महत्त्वपूर्ण तत्त्वांचे गीतेमध्ये विवेचन आढळून येते. शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य तसेच संत ज्ञानेश्वर यासारख्या महान भारतीय तत्त्वज्ञांनी श्रीमद्भगवद्-गीतेवर अत्यंत उद्बोधक टीका लिहिल्या आहेत. लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यासारख्या महान राष्ट्रीय नेत्यांनीही गीतेपासून स्फूर्ती घेतली आहे.

श्रीमद्भगवद्-गीतेमधील तत्त्वज्ञान उपनिषदांवर आधारित आहे. सांख्य व योग दर्शनातील तत्त्वांचा परामर्श ही गीतेमध्ये घेतला गेला आहे.

अर्जुनाने आपल्या आप्तस्वकीयांना कुरुक्षेत्रावर आपले शत्रु म्हणून पाहिले आणि तो गलितगात्र व किंकर्तव्यमूढ झाला. आप्त स्वकीयांशी लढावे की रणांगणावरुन निघून जावे असा प्रश्न त्याच्यापुढे उभा राहिला. भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला त्याचे कर्तव्य म्हणजे लढाई करण्याचा उपदेश केला. आजच्या युगातही मनुष्याची अर्जुनाप्रमाणे ''नेमके काय करावे''? अशी किंकर्तव्यमूढ अवस्था होते. भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला केलेला उपदेश आजही मार्गदर्शन करीत आहे.

श्रीमद्‌भगवद्-गीतेनुसार मानवी जीवनाचे सर्वोच्च ध्येय 'मोक्ष' हेच आहे. मोक्ष म्हणजे जीवात्म्याची विश्वात्म्याशी एकरुपता होय. जन्म मृत्युच्या चक्रातून सुटका म्हणजे मोक्ष होय. व्यक्तीच्या आत्मसाक्षात्कारातून ईश्वर साक्षात्कार घडतो. विहित कर्तव्यांचे निष्काम भावनेने पालन करुन व निरपेक्ष समाजसेवा करुन व्यक्ती आत्मानुभूती घेऊ शकते.

गीतेमध्ये मोक्ष प्राप्त करुन घेण्यासाठी ज्ञानमार्ग, भक्तिमार्ग व कर्ममार्ग असे तीन मार्ग सांगितले आहेत.

**१. ज्ञान मार्ग :**

श्रीमद्‌भगवद्‌गीतेमध्ये ज्ञान मार्गाचा पुरस्कार केला गेला आहे. ज्ञानासारखे शुद्ध व पवित्र करणारे अन्य काहीही या जगामध्ये नाही. [न हि ज्ञानेन सदृशम् पवित्रमिह विद्यते] ज्ञानमार्ग हा सर्वोत्तम यज्ञ आहे. आत्मसंयमनाच्या अग्नीमध्ये व्यक्तीने स्वतःच्या कर्मबंधनांची आहुती द्यावी.

आपली बुद्धी, मन व इंद्रिये यांवर भावनांचे नियंत्रण असते. मनुष्याचा मोह बंधने निर्माण करतो. आपण जे कर्म करतो त्याचा परिणाम अनिवार्यतेने घडून येतो. कर्म व त्या कर्माचे फळ असे चक्र अविरत चालू असते. ज्ञानी माणूस इंद्रिय निग्रहाच्या मार्गाने कर्मफळाचा मोह न बाळगता कर्म करतो.

ज्ञानी माणूस जीवात्मा व परमात्मा यातील तादात्म्य अनुभवू शकतो. मात्र ज्ञानी माणूस कर्मापासून विन्मुख होऊ शकत नाही. सामान्य माणसे ज्ञानी जनांचे अनुकरण करतात. त्यामुळे समाजाला उदाहरण घालून देण्यासाठी मोक्ष प्राप्त झालेल्या ज्ञानी माणसाने त्यांचे विहित कर्तव्य करीत राहणे आवश्यक आहे. स्वतःच्या कर्तव्यांचे पालन करीत असताना निरपेक्षपणे मानवसेवा करावी असे गीतेमध्ये सांगितले आहे.

भगवद्‌गीता असेही सांगते की ज्ञानमार्ग जनसामान्यासांठी अतिशय कठीण आहे. केवळ काही प्रज्ञावंत हा ज्ञानमार्ग अनुसरु शकतात. सर्व व्यक्तींचा आत्मा एकच आहे असा अनुभव येणे ही कठीण गोष्ट आहे. तसेच बौद्धिक चिकित्सेने परमात्म्याची किंवा विश्वात्म्याची अनुभूती घेणे हे फार थोडया बुद्धिमंतांना शक्य आहे.

## २. भक्तिमार्गः

ज्ञानमार्गाबरोबर भगवद्गीता मोक्ष प्राप्तीसाठी भक्तिमार्गाचाही पुरस्कार करते. दिव्य शक्तीची उपासना करुन दिव्यत्वाशी तादात्म्य पावता येते. चिरंतन पण अमूर्त अशा दिव्य शक्तीची आराधना करणे सामान्य माणसाला कठीण आहे. सामान्य माणसाला निर्गुण शक्तीची उपासना करण्यापेक्षा सगुण साकार वा मूर्त ईश्वराची भक्ती करणे सोपे जाते.

भगवद्गीतेमध्ये असे सांगीतले आहे की, जो ईश्वराची आराधना करतो त्याचा कधीही नाश होत नाही (न मे भक्तः प्रणश्यति) गीतेमध्ये चांगल्या भक्ताचे वर्णन दयाळू, संयमी व निष्पक्ष व्यक्ती असे केलेले आहे. सुख किंवा दुःख चांगल्या भक्ताच्या मनाचा समतोल बिघडवू शकत नाहीत. खऱ्या भक्ताला अहंकार नसतो. तसेच ह्या भौतिक विश्वातील गोष्टींविषयी त्याला आसक्ती सुद्धा नसते.

खरी भक्ती निःस्वार्थ असते. भक्ती ही ज्ञान व कृती युक्त असते. खरा भक्त आपली सर्व कर्तव्ये निस्वार्थ व निरासक्त भावाने करतो. ईश्वराला संपूर्ण समर्पण भावनेने शरण जाणे हे खऱ्या भक्ताचे लक्षण आहे.

भक्तिचा मार्ग ही सोपा नाही. ईश्वराला सर्वस्व अर्पण करणे, स्वत्व विसरुन समर्पित होणे कठीण आहे. खऱ्या भक्ताला तो करीत असलेल्या कर्माच्या परिणामांची अपेक्षा नसते. स्वतःचा अहम् विसरुन इच्छांचा त्याग करुन खरा भक्त त्याची कर्मफळे ईश्वराला अर्पण करतो. स्वतःला पूर्णपणे विसरुन आराध्य देवतेची समर्पण भावनेने भक्ती करणे अतिशय कठीण आहे. श्रीमद्‌भगवद्गीतेनुसार ईश्वर सेवा ही समाजसेवेच्या माध्यमातून व्हायला हवी.

## ३. कर्म मार्गः

श्रीमद्‌भगवद्गीते मध्ये कोणासही अपवाद न करता, सर्वांसाठी कर्ममार्गाची शिकवण दिलेली आहे. ह्या विश्वाचे चक्र कर्मानुसार चालते व त्याचा घटक बनणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे. जीवन कर्माधिष्ठित आहे. कोणतीही व्यक्ती क्षणमात्रसुद्धा निष्क्रिय राहू शकत नाही. श्वास घेणे ही एक क्रियाच आहे. निष्क्रियता म्हणजे मृत्यू होय.

भगवद्गीता निष्काम कर्मयोगाची शिकवण देते. कर्ममार्ग दुहेरी असतो. १. व्यक्तीच्या स्वतःच्या कर्तव्यांचे पालन २. कोणतीही अपेक्षा न ठेवता कर्तव्याचे पालन

### स्व-धर्मः

निष्काम कर्मयोगाची पहिली पायरी म्हणजे स्वधर्माचे पालन करणे व्यक्तीच्या स्वभावानुसार निर्धारित असलेली कर्तव्ये म्हणजे स्व-धर्म होय. भगवद्गीतेनुसार प्रत्येक

व्यक्ती विशिष्ट वर्णाची असते. तसेच ती त्याच्या जीवनाच्या विशिष्ट अवस्थेमध्ये असते. त्या व्यक्तीचे समाजातील स्थान व जीवनावस्था यांच्याशी निगडीत कर्तव्ये असतात. म्हणजेच व्यक्तीच्या वर्णाश्रमानुसार त्याची स्वतःची कर्तव्ये म्हणजे स्व-धर्म ठरलेली असतात. गीतेमध्ये स्वधर्माचे पालन श्रेष्ठ मानले असून दुसऱ्या कोणाची कर्तव्ये पार पाडणे जोखमीचे मानले आहे. (स्वधर्मे निधनम् श्रेयः पर धर्मो भयावह :)

गीतेप्रमाणे प्रत्येक व्यक्ती सत्त्व, रजस व तमस या तीन गुणांनी युक्त असते. सात्विकता, क्रियाशीलता व अज्ञान या तीन गुणांच्या मात्रेनुसार चार वर्ण बनतात. स्वतःच्या त्रिगुणात्मक प्रवृत्तिनुसार प्राप्त वर्णाची निर्धारित कर्तव्ये पार पाडणे हेच इष्ट आहे.

भगवद्‌गीतेमध्ये आत्मविकासाबरोबर सामाजिक एकात्मतेचा म्हणजे लोकसंग्रहाचा संदेश देण्यात आला आहे. स्वधर्मानुसार आचरण केल्याने समाजाची प्रगती होते. स्वधर्म तसेच साधारण धर्म यांचे आचरण करणारा म्हणजे निस्वार्थ, अनासक्त बुद्धीने कर्तव्य करणारा, मानवतेच्या कल्याणासाठी कार्यरत असणारा तसेच परिणामांची अपेक्षा न ठेवणारा माणूस स्थितप्रज्ञ माणूस असतो.

**निष्काम कर्म (कर्तव्य पालन ):**

सामान्य माणूस जे काही कर्म करतो त्याच्या विशिष्ट परिणामाची त्याला अपेक्षा असते. सामान्य माणसे सकाम भावनेने कर्तव्य करीत असतात. परिणामांची अपेक्षा म्हणजे कर्मफलाची आसक्ती हेच बंधनाचे कारण असते. कर्मबंधन दुहेरी असते. मनुष्य स्वतःला त्या कृतीचा कर्ता समजतो. तसेच त्याला परिणामांची आसक्ती असते. कृतीचे कारकत्व व कर्मफलाची अपेक्षा असे दुहेरी बंधन प्रत्येक कृतीशी जोडलेले असते.

प्रत्येक कृतीसाठी प्रतिक्रिया निर्माण होत असते. त्यातून परत प्रतिक्रिया निर्माण होते. अश्या प्रकारे कर्मबंधांची साखळी तयार होत जाते. हे बंधन थांबविण्याचा मार्ग म्हणजे निरपेक्षपणे कोणत्याही आसक्तीशिवाय कर्तव्ये करीत राहणे.

निष्काम कर्मयोग अनुसरणे सुद्धा दुहेरी आहे. सर्वप्रथम सर्व क्रियांचे कर्तृत्व स्वतःकडे न घेता त्रिगुणात्मिका प्रकृति या तत्त्वाकडे दिले पाहिजे. त्यानंतर व्यक्तीने त्याच्याकडून होत असलेल्या कर्माच्या फळाची अपेक्षा सोडून दिली पाहिजे.

भगवद्‌गीता निष्काम कर्म मार्गाची शिकवण देते. व्यक्तीने कर्त्याचा भाव व कर्मफळ या दोन्हींचा त्याग केला पाहिजे. स्वतःची कर्तव्ये स्वार्थाने प्रेरित होऊन करु नयेत. आपण केलेल्या कर्तव्याची फळे ईश्वराला अर्पण करावीत. कर्तव्यावर आपला अधिकार आहे. मात्र कर्मफळावर आपला अधिकार नाही. (कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन)

निस्वार्थपणे कर्तव्यपालन हे मनुष्याच्या जीवनाचे ध्येय आहे. भगवद्गीता कर्माचा त्याग करायला सांगत नाही तर कर्माच्या परिणामांचा म्हणजे कर्मफलाचा त्याग करण्याची शिकवण देते. गीता स्वार्थी इच्छा, कर्त्यांचा भाव व कर्मफलाचा त्याग करण्याचा संदेश देते. स्वतःच्या कृतीच्या परिणामांविषयी आसक्ती न बाळगता निस्पृहपणे स्वधर्माचे पालन करावे असा भगवद्गीतेचा संदेश आहे.

श्रीमद्भगवद्गीतेमध्ये मध्यम मार्ग सांगितला आहे. गीतेचे तत्त्वज्ञान सुखवादी नाही तसेच निवृत्तीवादी ही नाही. वासनांची निरंकुश पूर्ती किंवा वासनांचे दमन या दोन्ही भूमिका श्रीमद्भगवदगीतेमध्ये अमान्य केल्या आहेत. आत्मसंयमनाने इच्छांची पूर्ती करावी, जीवनाच्या प्रत्येक अवस्थेमध्ये विहित सुखे उपभोगावीत तसेच विहित कर्तव्ये निष्काम भावनेने पार पाडावीत असा भगवद्गीतेचा संदेश आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. श्रीमद्भगवद्गीतेमध्ये मोक्षाप्रत जाण्याचे कोणते मार्ग सांगितले आहेत ?

२. गीतेमधील स्वधर्म म्हणजे काय ?

३. निष्काम कर्म म्हणजे काय ?

## ४.५ सारांश

नीतिशास्त्राविषयी भारतीय व पाश्चात्य दृष्टिकोन वेगवेगळे आहेत. पाश्चात्य विचारवंताच्या मते नीतीशास्त्र हा तत्त्वांचा बौद्धिक शोध आहे. भारतीय तत्त्वज्ञांच्या मते नीतिशास्त्र हा अंतिम सत्तेची अनुभूती घेण्याचा मार्ग आहे. भारतीय दर्शनातील 'धर्म' ही संकल्पना अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. ऋत, ऋण व पुरषार्थ त्या संकल्पनांमधून धर्म संकल्पना वेगवेगळ्या अर्थाने प्रतीत होते. ऋत मधील धर्म म्हणजे चिरंतन व शाश्वत अशी वैश्विक व्यवस्था आहे. ऋण मधील धर्माची अभिव्यक्ती व्यक्तीच्या जीवनातील नैतिक कर्तव्य म्हणून होते. पुरुषार्थामधील धर्म म्हणजे व्यक्तिनिष्ठ नैतिकता होय.

श्रीमद्भगवतगीता मोक्षाप्रत जाण्यासाठी ज्ञानमार्ग, भक्तिमार्ग व कर्ममार्ग अश्या तीन मार्गांचा पुरस्कार करते. निष्काम कर्ममार्गाला गीता प्राधान्य देते. गीतेमध्ये प्रत्येक व्यक्तीसाठी त्याच्या वर्ण व आश्रमानुसार कर्तव्ये निर्धारित केली गेली आहेत. स्वधर्माचे म्हणजे विहित कर्तव्याचे निरपेक्षपणे पालन केल्याने मोक्ष म्हणजे जीवनाचे परमप्राप्तव्य प्राप्त होते. भगवद्गीता केवळ व्यक्तीच्या आत्मकल्याणाचा पुरस्कार न करता समाजकल्याणाचा ही पुरस्कार करते.

## ४.६ विद्यापीठीय दीर्घोत्तरी प्रश्न

१. पुरुषार्थवादाचे सविस्तर स्पष्टीकरण करा.

२. श्रीमद्‌भगवद्‌गीतेमध्ये मोक्षाप्रत जाण्याचे कोणते मार्ग सांगितले आहेत ? त्यातील निष्काम कर्ममार्ग स्पष्ट करा.

३. टिपा लिहा

अ) ऋत संकल्पना

ब) ऋण संकल्पना

क) भगवद्‌गीते मधील स्वधर्म

ड) तत्त्वज्ञानातील ‘धर्म’ संकल्पना

इ) मोक्ष एक पुरुषार्थ

फ) धर्म एक पुरुषार्थ

*****

# ५

## प्रकरण ५

# भारतीय तत्त्वज्ञानाच्या संदर्भातील नैतिकता (अवैदिक दर्शनांचे नीतिशास्त्र)

**घटक रचना**


५.० उद्दिष्ट्ये

५.१ प्रस्तावना

५.२ बौद्धांचे नीतिशास्त्र

५.३ जैनांचे नीतिशास्त्र

५.४ चार्वाकांचे नीतिशास्त्र

५.५ सारांश

५.६ विद्यापीठीय दीर्घोत्तरी प्रश्न


## ५.० उद्दिष्ट्ये

- नास्तिक दर्शनांमधील नीतिशास्त्र समजावून घेणे.
- नास्तिक दर्शनांमधील नीतितत्त्वांची व्यापकता जाणून घेणे.
- जैन व बौद्ध दर्शनांमधील नीतितत्त्वांची व्यवहाराशी घातलेली सांगड समजावून घेणे.
- चार्वाक दर्शनाचे वैशिष्ट्यपूर्ण नैतिक तत्त्वज्ञान जाणून घेणे.

## ५.१ प्रस्तावना

भारतीय दर्शने अंतिम सत्तेची अनुभूती घेण्यास अधिक महत्त्व देतात. अंतिम सत्तेचे ज्ञान आपल्याला इंद्रिये, मन व बुद्धि या द्वारे होते. ज्ञानाचा शोध घेताना इंद्रिये व वासना यांच्यावर ताबा ठेवणे तसेच त्यांना योग्य दिशा देणे आवश्यक आहे. क्रोध, द्वेष, इर्षा या सारख्या भावनांवर नियंत्रण ठेवणे हे सुद्धा ज्ञान प्राप्तीसाठी आवश्यक आहे. म्हणजेच आत्मसंयमनाद्वारे ज्ञान प्राप्त करुन व्यक्ती अंतिम सत्तेची अनुभूती घेऊ शकते. हॉफडिंगच्या मते धर्म म्हणजे, मूल्यांच्या चिरंतनतत्वावरील विश्वास आहे. बौद्ध धर्माचे व जैन धर्माचे अनुयायी आत्मसंयमन तसेच जीवन मूल्यांना प्राधान्य देऊन मोक्ष, निर्वाण किंवा कैवल्य अशी परमोच्च जीवन अवस्था प्राप्त करु पाहतात. नास्तिक दर्शनांमध्ये चार्वाक दर्शन हे जैन व बौद्ध दर्शनापेक्षा फार वेगळे आहे.

## ५.२ बौद्धांचे नीतिशास्त्र

शाक्य राजवंशातील राजपुत्र सिद्धार्थ अत्यंत सुखविलासामध्ये वाढला. परंतु जेव्हा जगातील दुःख त्याच्या नजरेस पडले तेव्हा दुःखाचा अंत हे ध्येय घेऊन राजपुत्र सिद्धार्थाने राजवैभवाचा त्याग केला. अत्यंत कठोर तपश्चर्या केल्यानंतर राजपुत्र सिद्धार्थाला जीवनातील सत्याचे ज्ञान झाले आणि राजपुत्र सिद्धार्थ भगवान बुद्ध म्हणून ओळखला जाऊ लागला. बौद्ध दर्शनाचे जनक भगवान बुद्ध 'तथागत' व 'अर्हत' या नावानी सुद्धा ओळखले जातात.

भगवान बुद्धांनी 'ह्या विश्वाचे स्वरुप काय आहे ?' 'आत्म्याचे स्वरुप काय आहे?' 'मन व शरीर यातील संबंध नेमका कसा आहे?' यासारख्या सत्ताशास्त्रीय, तात्त्विक प्रश्नांचा उहापोह केला नाही. त्यांच्या मते अश्या प्रश्नांना व्यावहारिक दृष्ट्या काहीच महत्त्व नाही. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा उद्देश 'दुःखांचा अंत' हाच आहे. ही सृष्टी शाश्वत असली काय किंवा शाश्वत नसली काय, ह्या सृष्टीत जन्म, मृत्यु, वृद्धापकाळ, आजार अशी अनेक दुःखे आहेत. अश्या प्रकारच्या दुःखांपासून मुक्तता मिळविणे ह्या प्रश्नाचे उत्तर शोधण्यास प्राधान्य दिले पाहिजे. शरीरामध्ये शिरलेला तीर (बाण) कसा आहे. कोठुन आला आहे किंवा कोणी मारला आहे हे प्रश्न निरर्थक असतात. सर्वप्रथम शरीरातील तीर काढून टाकून व्यक्तीचे दुःख कमी करावयास हवे.

भगवान बुद्धांचे तत्त्वज्ञान मानववादी आहे. त्यांची शिकवण संपूर्ण प्राणीमात्रावर प्रेम करण्याची आहे. भगवान बुद्धानी नेहमीच दुःख संपविण्यासाठीचा नेमका मार्ग यासारख्या प्रश्नांवर लोकांना मार्गदर्शन केले.

### ५.२.१ चार आर्यसत्य :

भगवान बुद्धांची सर्व शिकवण चार आर्य सत्यांमधून प्रकट होते. बौद्ध दर्शनाची व्याावहारिक तसेच तात्त्विक बाजू ह्या चत्वारि आर्यसत्यानी मधून दिसून येते. चार आर्यसत्ये पुढील प्रमाणे.

- **दुःख**
- **दुःख समुदाय**
- **दुःख निरोध**
- **दुःख निरोध मार्ग**

**१. दुःखः-**

पहिले आर्यसत्य या जगातील दुःखाच्या अस्तित्वाबद्दल आहे. भगवान बुद्धाच्या मते मनुष्य असो की अन्य कोणी जीव असो, प्रत्येकाला दुःखाचा अनुभव येतो. 'सर्व दुःखं दुःखम्'। जीवन दुःखमय आहे. दुःखे अनेक प्रकारची आहेत. जन्म, मृत्यू,

रोग, वियोग, वृद्धत्व, विषाद, चिंता, शोक, असंतोष इ. दुःख संपूर्ण जीवनाला व्यापून राहते.

मनुष्याला सुखाचा अनुभव येतो. मात्र सुखद अनुभव क्षणिक असतात. सुख प्राप्त करण्यासाठी कष्ट करावेच लागतात. शिवाय ज्यापासून सुख मिळते त्या गोष्टी नष्ट होण्याची किंवा त्या दूर जाण्याची चिंता सदैव राहते. म्हणजेच वरकरणी सुखद वाटणाऱ्या गोष्टी ह्या प्रत्यक्षात दुःखद असतात.

पहिले आर्यसत्य मानवी जीवनाची अपूर्णता व क्षणिकता यांचा निर्देश करते. यातून निराशावाद दिसून येतो असे काही तत्त्वचिंतकांना वाटते. परंतु बौद्ध तत्त्वज्ञानातील निराशावाद केवळ सुरवातीला असून दुःखाचे निराकरण करण्यासाठी दुःखाचे विश्लेषण त्यातून केले गेले आहे.

**२. दुःख समुदायः-**

दुसरे आर्यसत्य दुःखाचे कारण काय आहे यावर प्रकाश टाकते. भगवान बुद्धाच्या मते दुःख काही अचानक निर्माण होणारी गोष्ट नाही. दुःखाचे कारण असते. काही एक विशिष्ट गोष्ट उपस्थित असल्यावर दुसरी गोष्ट निर्माण होते. म्हणजेच दुःख विशिष्ट उपाधीयुक्त व दुसऱ्या कशावर अवलंबून असते. या आर्यसत्यामधून प्रतीत्य समुत्पाद हा सिद्धान्त विकसित होतो.

मानवी जीवनातील दुःख एकूण बारा दुःखांच्या साखळीवर अवलंबून असते. या दृष्टिकोनाला **'द्वादश निदान'** असे संबोधले जाते. द्वादश निदान अथवा भवचक्र मधील बारा कड्या पुढीलप्रमाणे आहेत.

अविद्या, संस्कार, विज्ञान, नाम-रुप, षडायतन, स्पर्श, वेदना, तृष्णा, उपादान, भव, जाति व जरामरण.

पहिल्या पाच कडया भूतकाळाशी, नंतरच्या पाच वर्तमानकाळाशी व शेवटच्या दोन कड्या व्यक्तिच्या भविष्यकाळाशी संबंधित आहेत.

भगवान बुद्धाच्या मते मनुष्याच्या आंतरिक इच्छेनेच त्याच्या जीवनाचा प्रारंभ होतो.

**३. दुःख निरोधः**

तिसरे आर्यसत्य दुःखाचा नाश होऊ शकतो असे सांगते. दुसऱ्या आर्यसत्यामधून प्रतीत्यसमुत्पाद सिद्धान्त विकसित झाला आहे. प्रत्येक गोष्ट त्याच्या कारणावर अवलंबून असते. जर कारणाचा नाश झाला तर त्यातून निर्माण होणाऱ्या परिणामाचाही नाश होतो. दुःखाचे कारण जर नाहीसे झाले तर दुःखाचाही अंत होईल.

दु:खाचा अंत ज्या अवस्थेमध्ये होतो. त्या अवस्थेला भगवान बुद्धांनी निर्वाण असे संबोधिले आहे.

मनुष्याने जर राग, लोभ, द्वेष अहंकार, आसक्ती यावर विजय प्राप्त केला तर असा मनुष्य मुक्त म्हणजे अर्हत होतो. 'अर्हत' म्हणजे दु:खाचा अंत झालेली 'निर्वाण' अवस्था प्राप्त केलेला, बोध झालेला ज्ञानी मनुष्य होय. तिसरे आर्य सत्य जीवनाचे परम प्राप्तव्य म्हणजे निर्वाण ची वैशिष्ट्ये सांगते.

- निर्वाण म्हणजे विझणे
- निर्वाण म्हणजे दु:खांचा अंत
- जीवनाच्या सुख अथवा दु:ख या अवस्थांच्या पलीकडील चिरंतन शांततेची अवस्था
- जन्म-मृत्यूच्या चक्रातून मुक्तता

शाश्वत ज्ञानाचा बोध

बौद्ध तत्त्वचिंतकांच्या मते निर्वाण अवस्था ह्या जीवनात देह असताना प्राप्त होऊ शकते. मृत्युनंतरच्या निर्वाण अवस्थेस 'परिनिर्वाण' म्हटले जाते. निर्वाण प्राप्त झाल्यानंतर लोककल्याणासाठी उर्वरित आयुष्य व्यतीत करावयास हवे. भगवान बुद्धानी स्वत: निर्वाणानंतर आपले आयुष्य मानवकल्याणासाठी वेचले.

### ४. दु:ख निरोध मार्ग:-

चवथे आर्यसत्य दु:ख निरोध मार्ग म्हणून ओळखले जाते. भगवान बुद्धांनी दु:खांचा अंत करण्यासाठी निश्चित मार्ग सांगितला. भगवान बुद्धांचा हा मार्ग 'आर्यअष्टांगमार्ग' या नावाने ओळखला जातो. या आठही अंगाच्या सुरूवातीला सम्यक हा शब्द जोडलेला आहे. सम्यक् हा शब्द ''शुभ'' या अर्थी योजला गेला आहे. याची आठ अंगे पुढीलप्रमाणे आहेत.

### १. सम्यक् दृष्टि

भगवान बुद्धांनी सांगितलेल्या चार आर्य सत्यांचे यथार्थ ज्ञान म्हणजे सम्यक् दृष्टि होय. अविद्या अथवा अज्ञान हे मनुष्याच्या दु:खाचे मूळ कारण आहे. अज्ञानामुळे मनुष्य ह्या नाशिवंत जगाला शाश्वत मानतो. तसेच क्षणिक गोष्टींना सुखद मानतो. सम्यक् दृष्टि म्हणजे ह्या नश्वर गोष्टी व अनुभव यातील वास्तविकता समजून घेणे.

### २. सम्यक संकल्प

भगवान बुद्धांनी सांगितलेल्या आर्य सत्यानुसार जीवनक्रम चालण्याचा निश्चय म्हणजे सम्यक संकल्प होय. मनुष्याने इंद्रियजन्य सुखाविषयी विरक्ती बाळगावी.

दुसऱ्याविषयी द्वेष किंवा हिंसक विचारांचा त्याग करावा म्हणजेच अशुभ गोष्टी न करण्याचा संकल्प करावा.

**३. सम्यक् वाचा**

यथार्थ ज्ञान हे योग्य कृती करण्याच्या संकल्पामध्ये परावर्तित होते. तसेच सम्यक संकल्पाची अभिव्यक्ती म्हणजे सम्यक वाचा होय. मनुष्याचे चारित्र्य त्याच्या बोलण्यातून प्रकट होते. म्हणजेच मनुष्याने खोटे बोलणे, परनिंदा, कटू बोलणे तसेच व्यर्थ बडबड यापासून परावृत्त व्हायला हवे.

**४. सम्यक् कर्म**

वाईट कृतीचा त्याग म्हणजे सम्यक (शुभ, योग्य) कर्म होय. हिंसा, चोरी व इंद्रियजन्य सुखोपभोग ही वाईट कर्मे आहेत. सम्यक् कर्म म्हणजे दुसऱ्यांचे प्राण न घेणे, चोरी न करणे व इंद्रियांवर संयम ठेवणे होय.

सम्यक् दृष्टि, सम्यक् संकल्प, सम्यक् वाचा यांचे अनुसरण करणारी व्यक्ती वाईट कर्माने पथभ्रष्ट होऊ शकते. भगवान बुद्धांनी यासाठी पंचशील सांगितले आहे. पंचशील म्हणजे पाच प्रतिज्ञा आहेत. ज्यामध्ये हिंसा, चोरी, इंद्रियसुखांचा उपभोग, असत्य भाषण व मादक पदार्थांचे सेवन यापासून दूर राहण्यास सांगितले आहे.

**५. साम्यक् आजीविका**

स्वतःचा जीवन निर्वाह प्रामाणिकपणे करणे म्हणजे सम्यक् आजीविका होय. स्वतःचा उदरनिर्वाह अनैतिक मार्गाने करु नये. चोरी, लूटमार, धोकेबाजी या सारख्या वाईट कृत्यांमधून व्यक्तीचे अधःपतन दिसते. निर्वाण प्राप्तीसाठी व्यक्तीच्या आंतरिक बाजूची प्रगती आवश्यक आहे. भौतिक सुखासाठी सारासार विवेक न बाळगणारा माणूस पथभ्रष्ट होतो. अष्टांग मार्गातील सम्यक आजीविका हे अंग व्यक्तीची भौतिक पातळीकडून नैतिकतेकडे व अध्यात्मिकतेकडे वाटचाल दर्शविते.

**६. सम्यक् व्यायाम**

मानवी मन फार चंचल आहे. व्यक्ती कधीही प्रगतीचा मार्ग सोडून चुकीच्या मार्गाला जाऊ शकते. त्यासाठी मनामध्ये चांगले विचार स्थापित ठेवण्याचा प्रयत्न अविरत चालू राहिला पाहिजे. मनातील वाईट विचारांचा त्याग करावा, वाईट विचारांचा प्रवेश थांबविणे. चांगले विचार मनात आणणे व चांगल्या विचारांनाच मनात कायम राखणे याला सम्यक् व्यायाम म्हटले आहे. मनाची अशुभ स्थिती संपवून शुभ स्थिती ठेवण्यासाठी मनुष्याने सतत प्रयत्नशील राहिले पाहीजे.

## ७. सम्यक् स्मृति

व्यक्तीला जे जे ज्ञान झाले आहे त्याचे सातत्याने भान राखणे म्हणजे सम्यक् स्मृती होय. या विश्वातील वस्तुंच्या वास्तविक स्वरुपाविषयी जागरुक राहणे म्हणजे सम्यक् स्मृती होय. सर्व क्षणिक आहे, सर्व दुःखमय आहे, शरीर मन व संवेदना यांचे एकमेकांपासून भिन्न व स्वतंत्र अस्तित्व आहे, हे सर्व नश्वर आहे याची स्मृती कायम ठेवणे हे दुःखांचा नाश करण्यासाठी आवश्यक आहे.

## ८ सम्यक् समाधी

बौद्ध दर्शनामध्ये व योग दर्शनामध्ये समाधी अवस्थेला अतिशय महत्त्व दिले गेले आहे. सम्यक् समाधी मध्ये ध्यानाच्या अधिकाधिक गहिऱ्या होत जाणाऱ्या चार अवस्था आहेत.

१. समाधीच्या पहिल्या अवस्थेमध्ये साधक आर्य सत्यांवर मनन व चिंतन करतो. या अवस्थेमध्ये साधकाला आनंदाची अनुभूती येते.

२. समाधीच्या दुसऱ्या अवस्थेमध्ये साधकाच्या मनात आर्यसत्यांविषयी गाढ श्रद्धा निर्माण होते. या अवस्थेमध्ये साधकाला आंतरिक आनंद व शांततेची अनुभूती येते.

३. समाधीच्या तिसऱ्या अवस्थेमध्ये साधकाच्या मनामधील सर्व विचार नष्ट होतात. आनंदाच्या अनुभवाविषयीसुद्धा तटस्थेचा भाव निर्माण होतो. सर्व मनोव्यापारांविषयी उदासीनता उत्पन्न झाली तरी शरीराची जाणीव राहते.

४. समाधीच्या चवथ्या अवस्थेत शरीराच्या विश्राम भावाची अथवा मनाच्या आनंदाची जाणीवही नाहीशी होते. सुख दुःखाच्या पलीकडील या अवस्थेला निर्वाण अवस्था म्हटले जाते. ही अवस्था प्राप्त केलेली व्यक्ती अर्हत या संज्ञेस पात्र होते.

सम्यक् समाधी म्हणजे व्यक्तीचा विश्वव्यापकतेकडे प्रवास होय. वैयक्तिक अस्तित्वाकडून सर्वव्यापी अस्तित्वाकडे जाताना चार 'ब्रह्मविहार' जोपासले जावेत असे बौद्ध दर्शनात सांगितले आहे. मैत्री, करुणा, मुदिता व उपेक्षा असे चार ब्रह्मविहार किंवा 'कुशल भावना' विकसित झालेला अर्हत् सर्व प्राणीमात्राबद्दल मनात मैत्री अथवा प्रेम जोपासतो. त्यांच्या दुःखाविषयी करुणा बाळगतो. स्वतः सारख्या व्यक्तीला पाहून आनंदित होतो व वाईट वागणाऱ्या लोकांचा तिरस्कार न करता त्यांच्या विषयी उपेक्षा बाळगतो.

चवथ्या आर्यसत्य मधील अष्टांग मार्गाला तीन भागात सुद्धा विभाजित केले जाते. दुःखांचा अंत करणाऱ्या मार्गाला प्रज्ञा, शील व समाधी या तीन अंगामध्ये दर्शविले जाते.

प्रज्ञा म्हणजे सम्यक् दृष्टि व सम्यक् संकल्प होय.

शील म्हणजे सम्यक् वाचा, सम्यक कर्म, सम्यक् आजीविका व सम्यक् व्यायाम होय.

समाधी म्हणजे सम्यक स्मृति व सम्यक समाधी होय.

**आपली प्रगती तपासा**

१. आर्य सत्ये कोणती आहेत ?
२. द्वादश निदान म्हणजे काय ?
३. अष्टांग मार्गामधील आठ अंगे कोणती आहेत ?
४. सम्यक् समाधी मधील अवस्था कोणत्या आहेत ?
५. निर्वाण म्हणजे काय ?

## ५.३ जैनांचे नीतिशास्त्र

जैन दर्शन व बौद्ध दर्शन ही समकालीन दर्शने आहेत. स्वतंत्रपणे विकसित झालेल्या ह्या दोन्ही दर्शनांना वेदप्रामाण्य मान्य नसल्यामुळे त्यांना नास्तिक दर्शने म्हटले जाते. ही दोन्ही दर्शने ‘अहिंसा’ या तत्त्वाला अत्याधिक महत्त्व देतात.

जैन हा शब्द ‘जिन’ या शब्दापासून आला आहे. जिन म्हणजे ज्याने विजय प्राप्त केला आहे अशी व्यक्ती. जिन शब्द तीर्थंकरांसाठी वापरला जातो. जैन दर्शनातील तीर्थंकर मोक्ष मार्गाचे मार्गदर्शक आहेत. त्यांनी स्वतःच्या वासना व इच्छावर म्हणजेच स्वतःवर विजय प्राप्त करुन मोक्ष मिळविला आहे. जैन धर्मात एकूण २४ तीर्थंकर आहेत असे मानले जाते. ऋषभदेव हे पहिले पार्श्वनाथ हे तेविसावे व वर्धमान महावीर हे चोवीसावे तीर्थंकर मानले जातात. भगवान महावीर हे शेवटचे तीर्थंकर असून जैन मतामध्ये त्यांनी नवचैतन्य आणले. आजच्या जैन दर्शनामध्ये भगवान महावीरांची शिकवण प्रामुख्याने दिसून येते.

जैन तत्त्वज्ञानामध्ये मानवी जीवनाचे परमोच्च ध्येय ‘मोक्ष’ हेच आहे. जीव हा शब्द आत्मा किंवा चैतन्य तत्त्व या आर्थी वापरला गेला आहे. पुद्गल ह्या कर्मकणांमुळे जीवाचे मूलतः अनंतज्ञानी, अंनतदर्शन, अनंतवीर्य व अनंतसुखी असे स्वरुप झाकले जाते. जीवाचा म्हणजे चैतन्याचा पुद्गलाशी म्हणजे जडद्रव्याशी संयोग हे बंधनाचे कारण आहे. पुद्गलापासून जीवाचा वियोग म्हणजे मोक्ष होय.

जैन दर्शनामध्ये मोक्षप्राप्तीसाठी आचार विषयक नियम घालून देण्यात आले आहेत. हे नियम यति तसेच गृहस्थाश्रमी लोकांसाठी सुद्धा आहेत. अन्य दर्शनाच्या तुलनेमध्ये जैन दर्शनातील नीतिनियम अधिक कठोर आहेत.

मोक्ष प्राप्तीसाठी सम्यक् दर्शन, सम्यक् ज्ञान व सम्यक् चरित्र असा त्रिविध मार्ग आवश्यक आहे. ह्या तीन अंगाना ‘ त्रिरत्न ’ अशी उपाधी दिली जाते.

### ५.३.१ त्रिरत्न :

जैन मतानुसार अज्ञान हेच बंधनाचे मूल कारण आहे. अज्ञानामुळे जीवामध्ये क्रोध, अहंकार, लोभ व माया हे चार विकार प्रविष्ट होतात. ह्या चार विकारांमुळे पुद्‌गल जीवाकडे आकृष्ट होते व जीव बंधनयुक्त होतो. बंधनाच्या मूल कारणाचा म्हणजेच अज्ञानाचा नाश झाल्यानंतरच मोक्षप्राप्ती संभव आहे. त्यासाठी सम्यक् दर्शन, सम्यक् ज्ञान व सम्यक् चरित्र असा त्रिविध मार्ग अनुसरायला हवा (सम्यक्-दर्शन-ज्ञानः चरित्राणि मोक्ष मार्गः ।)

### १. सम्यक् दर्शन:-

सम्यक दर्शन म्हणजे बौद्धिक विश्वास होय. यामध्ये योग्य दृष्टिकोन व सत्यावरील अढळ श्रद्धा अभिप्रेत आहे. जैन धर्मग्रंथांमधील शिकवण, तीर्थंकरांवर श्रद्धा असणारा साधक सम्यक् दर्शनचा पांथस्थ असतो. वेगवेगळ्या प्रचलित विश्वासांमधून सत्य शोधन करुन अंधविश्वासातून मुक्त होणे आवश्यक ठरते. ज्ञान प्राप्तीच्या मार्गामध्ये अडथळा बनणाऱ्या संशयाचे निराकरण व्हायला हवे. सम्यक् दर्शन या मार्गावर साधक अंधविश्वासाचा त्याग करुन संशयमुक्त होतो. त्याच्या विश्वासाला योग्य असा भक्कम आधार यात मिळतो.

### २. सम्यक् ज्ञान:-

जैन तत्त्वज्ञानामध्ये सांगितलेल्या तत्त्वांचे योग्य व संशयरहित ज्ञान म्हणजे सम्यक् ज्ञान होय. जीव व अजीव म्हणजेच सचेतन व अचेतन या तत्त्वांचे संपूर्ण ज्ञान या मार्गामध्ये प्राप्त होते. जीव व अजीव यामधील फरक न जाणल्यामुळे बंधन निर्माण होते. सम्यक् ज्ञानाच्या प्राप्तीमध्ये काही कर्म सुद्धा बाधक ठरते. कर्माचा नाश व जीव अजीव मधील भेदाचे ज्ञान झाल्यानंतर योग्य ज्ञान प्राप्त होते.

### ३. सम्यक् चरित्र:-

योग्य श्रद्धा व ज्ञान आत्मसात केल्यानंतरच त्यानुसार योग्य आचरण घडू शकते. सम्यक् चरित्र म्हणजे काया, वाचा व मन यांच्यावर नियंत्रण असलेले संयमित आचरण होय. योग्य आचरण केल्यामुळे नवीन कर्मबंध निर्माण होत नाहीत व जुने कर्मबंध नाहीसे होतात. संयमित व योग्य आचरण म्हणजे सम्यक् चरित्र हे सर्वात प्रभावशाली तत्त्व (रत्न) आहे.

क्रोध, अहंकार, लोभ व माया हे विकार (कषाय) नष्ट होऊन सर्वांसाठी प्रेमभाव पूर्णत्वाला गेलेल्या व्यक्तिला (आप्ताला) लोकहितकारी उपदेश करण्याचा अधिकार प्राप्त होतो. सम्यक चरित्राचे पालन करण्यासाठी पुढील आचरण आवश्यक आहे-

१. **समिती :** मार्गक्रमण, भाषण, भिक्षाग्रहण, वस्तू उचलणे अथवा ठेवणे, मल मूत्र विसर्जन याबाबत सतर्कता बाळगणे.

२. **गुप्ति :** शारीरिक, वाचिक व मानसिक अश्या स्वाभाविक प्रवृत्तींचा संयम राखणे.

३. **धर्मपालन :** सत्य, क्षमा, शौच, तप, संयम, त्याग, विरक्ति, मार्दव, साधेपणा व ब्रह्मचर्य ह्या १० प्रकारच्या धर्माचे पालन करणे.

४. **अनुप्रेक्षा :** जीव व अजीव यांच्या संबंधातील बारा भावांचे चिंतन करणे.

५. **परीषह :** भूक, तहान, उष्मा, थंडी इत्यादिपासून होणारा त्रास सहन करण्याची शक्ती जोपासणे.

६. **व्रते :** सम्यक् चरित्र प्राप्त करुन घेण्यासाठी सर्वात महत्त्वाची पायरी म्हणजे पाच व्रतांचे पालन होय. अहिंसा, सुनृत (सत्य), अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह या नीती मूल्यांचे पालन करणे म्हणजे व्रत होय. ह्या व्रतांचे कठोरपणे पालन संन्यासी 'महाव्रते' म्हणून करतात. गृहस्थांसाठी ही व्रते 'अणुव्रते' होतात. गृहस्थाश्रमी व्यक्तीने, अहिंसा, सत्य, अस्तेय, अव्यभिचार व संतोष (स्वतःच्या गरजा कमी करणे) ही तुलनेने सौम्य व्रते आचरणात आणावीत.

### ५.३.२ व्रतः नीतितत्त्वेः- 'महाव्रते' व 'अणुव्रते'

जैन दर्शनामध्ये सम्यक् चरित्रासाठी पाच व्रतांचे पालन महत्त्वाचे आहे. व्रत पालनाचा उद्देश चारित्र्य संवर्धन, आत्मशुद्धी व आत्मसाक्षात्कार आहे. गृहस्थ व संन्यासी या दोन्ही प्रकारच्या लोकांसाठी एकच आचारसंहिता आहे. अहिंसा, सुनृत (सत्य), अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह ही तत्त्वे संन्याशाने तंतोतंतपणे, कठोरपणे व कर्मठपणे आचरणात आणावीत. म्हणजेच संन्याशासाठी ही **'महाव्रते'** आहेत. महाव्रते संन्याशाला संपूर्ण वैराग्याकडे नेतात. पहिली तीन व्रते संन्यासी तसेच गृहस्थ यांच्यासाठी सारखीच आहेत. गृहस्थासाठी ब्रह्मचर्य म्हणजे व्यभिचार न करणे व अपरिग्रह म्हणजे स्वतःच्या गरजा कमी करुन संतोष मानणे आहे. ही पाच व्रते गृहस्थासाठी **'अणुव्रते'** आहेत. सामान्य माणसाला संन्याशाच्या पातळीपर्यंत नेण्यासाठी अणुव्रते म्हणजे एक प्रकारचे प्रशिक्षण ठरते. सामान्य माणूस व संन्यासी यासाठी निर्धारित केलेल्या आचार संहितेमध्ये केवळ अंशात्मक फरक आहे.

## १.अहिंसाः-

अहिंसा हे नीती तत्व सर्व भारतीय दर्शनांमध्ये महत्त्वाचे मानले गेले आहे. परंतु जैन दर्शनामध्ये संपूर्ण नीतिशास्त्राचा केंद्रबिंदू म्हणन ‘अहिंसा’ हे तत्त्व दिसून येते. जैन दर्शनामध्ये सर्व जीव समान मानले जातात. त्यामुळे साधकाने प्रत्येक जीव आदरणीय मानला पाहिजे. जीवन सर्वत्र आहे, हालचाल करणारे अथवा हालचाल न करणारे जीव आपल्या सभोवती आढळून येतात. जीवनाचा सन्मान प्रत्येकाने केला पाहिजे.

अहिंसा हे मूल्य अत्यंत व्यापक अर्थाचे आहे. अत्यंत सूक्ष्म जीव अथवा मनुष्य प्राणी या कोणालाही इजा न करणे म्हणजे अहिंसा होय. अहिंसा केवळ कृतीत नसून ती विचारांमध्ये व बोलण्यामध्ये सुद्धा अंमलात आणावयास हवी. दुसऱ्याला इजा करण्याचा विचारसुद्धा मनात आणावयास नको. तसेच दुसऱ्या कोणासही हिंसा करु देऊ नये. अहिंसा म्हणजे स्वतःच्या तसेच दुसऱ्याच्या जीवन रक्षणाविषयी आस्था होय. अहिंसा तत्त्व समता व बंधुता या भावनांवर आधारलेले आहे.

अहिंसा हे तत्त्व आत्मसात करण्यासाठी साधकाने **चार भावना** विकसित करावयास हव्यात. सर्व सजीवांसाठी साधकाच्या मनात **मैत्री** (प्रेम) असावयास हवी. अधिक प्रगत सजीवांसाठी मनामध्ये **मुदिता** (आनंद) भावना असावी. दुःखी सजीवांसाठी करुणा बाळगावी. साधकाविषयी दुर्भाव बाळगणाऱ्य सजीवांसाठी साधकाने **उपेक्षेची** भावना ठेवावी.

जैन साधू अहिंसा हे महाव्रत आचरताना चेहऱ्याला वस्त्राने झाकतात व हातात एक कुंचा घेतात ज्यामुळे श्वासोच्छवास करताना किंवा बोलताना कोणतीही हत्या किंवा हिंसा होऊ नये.

अणुव्रत म्हणून अहिंसा हे तत्त्व अनेक कृतींमधून प्रकट होते. प्रत्यक्ष इजा किंवा हिंसा, क्रूरपणा, आत्महत्या, गर्भपात, विनाशकारी कृत्यामध्ये सहभाग तसेच अन्य मनुष्यास अस्पृश्य समजणे ही सर्व कृत्ये हिंसेची रुपे आहेत. अश्या कृत्यांपासून दूर राहणे म्हणजे अहिंसा होय. अहिंसेचा अर्थ केवळ हिंसेपासून दूर राहणे नसून सर्व प्राणीमात्राबद्दल प्रेम बाळगणे हा सुद्धा आहे.

## २. सुनृत (सत्य):-

सुनृत म्हणजे सत्यनिष्ठा व खोटे बोलण्याचा त्याग करणे. जैन दर्शनात सुनृत म्हणजे केवळ सत्यवचन नसून प्रिय व हितकर असे सत्यवचन आहे. सत्य ह्या व्रताचे पालन काया, वाचा तसेच मानसिक स्तरावरही व्हायला हवे.

सुनृत अथवा सत्य हे व्रत सुद्धा अहिंसा या व्रताशी संबंधित आहे. खोटे बोलण्याने शाब्दिक हिंसा होते दुसऱ्या व्यक्तीच्या भावना दुखावल्या जातात.

सत्यवचनाचे व्रत आचरण्यासाठी साधकाने लोभ, भय, क्रोध यावर विजय मिळविला पाहिजे. दुसऱ्या व्यक्तीचा उपहास करणे ही सुद्धा सुनृत च्या विरोधी कृती आहे.

सुनृत पासून पुढील अणुव्रते येतात. व्यापार करताना योग्य वजनमापे वापरणे, खोटी साक्ष न देणे तसेच खोटे खटले दाखल न करणे, खोटे निर्णय न देणे, स्वार्थासाठी कोणाचीही गुपिते जाहीर न करणे, कोणत्याही प्रकारची बनावट कागदपत्रे न बनविणे इत्यादि.

**३. अस्तेय:-**

अस्तेय म्हणजे चोरी न करणे. जे आपल्याला दिले गेले नाही त्याचा स्वीकार करणे म्हणजे एक अपहार करणे होय. धन संपत्ति मनुष्याचे बाह्य जीवन आहे. धन हिरावून घेणे म्हणजे मनुष्याचा बाह्य प्राण घेणे आहे. चौर्यकर्म एक प्रकारची हिंसाच आहे. मनुष्याला त्याचे जीवन जगण्यासाठी संपत्तीची गरज असते. त्यामुळे धन जीवनाइतकेच पवित्र व आदरणीय आहे. जैन दर्शनामध्ये सर्वत्र व्यापून असलेले अहिंसेचे तत्त्व अस्तेय या व्रतामध्ये सुद्धा दिसते.

अस्तेय या व्रतापासून येणारी अणुव्रते पुढील प्रमाणे आहेत-दुसऱ्याच्या मालकीची वस्तू न घेणे, चोराला मदत न करणे, चोरीचा माल विकत न घेणे, कायद्याने मनाई केलेल्या वस्तूंची खरेदी न करणे. उद्योगधंद्यामध्ये वाईट क्लुप्त्या न वापरणे, विश्वस्ताच्या अधिकारांचा दुरुपयोग न करणे इत्यादि.

**४. ब्रह्मचर्य:-**

ब्रह्मचर्य म्हणजे वासनांचा त्याग करणे. जैनांच्या नीती दर्शनामध्ये ब्रह्मचर्य म्हणजे केवळ इंद्रियजन्य वासनांचा त्याग नसून सर्व प्रकारच्या इच्छा व वासनांचा त्याग आहे. सर्व प्रकारच्या आसक्तीचा त्याग, विचारांमध्ये भाषणामध्ये तसेच कृतीमध्ये सुद्धा व्हायला हवा. केवळ ऐहिक इच्छांचा त्याग नव्हे तर पारलौकिक सुखाच्या इच्छांचा त्याग करणे हेही ब्रह्मचर्य आहे.

ब्रह्मचर्य ह्या व्रताची अनुव्रते पुढीलप्रमाणे- वयाच्या किमान १८ वर्षापर्यंत ब्रह्मचर्यपालन, वयाच्या पंचेचाळीसाव्या वर्षानंतर विवाह न करणे, इंद्रिय निग्रह, व्याभिचार न करणे तसेच अनैसर्गिक इंद्रियोपभोग न घेणे इत्यादि.

**५. अपरिग्रह:-**

सर्व प्रकारच्या आसक्तीचा त्याग करणे म्हणजे अपरिग्रह होय. आवश्यकते पेक्षा जास्त धनाचा संपत्तीचा संचय केल्याने गरजू लोकांची दुरावस्था वाढते. अतिरिक्त संपदेचा विनियोग अन्य लोकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी व्हायला हवा.

या विश्वातील वस्तूंशी आपण आपल्या इंद्रियांच्या रुप, स्पर्श, गंध, चव व ध्वनी या द्वारे जोडले जातो. आपल्या इंद्रियांच्या विषयांबद्दल (रुप, स्पर्श इ.) अनासक्त राहणे, त्याचा त्याग करणे यातून अपरिग्रह व्रताचे पालन होते. एकूणच जगातील वस्तूंबद्दल निर्मोही असणे, अलिप्त असणे हा अपरिग्रह होय.

अपरिग्रह या व्रताची अनुव्रते पुढीलप्रमाणे आहेत. आवश्यकतेपेक्षा जास्त गोष्टींचा संग्रह न करणे, भेट वस्तू किंवा लाच न स्विकारणे, वैद्यकीय उपचार न लांबविणे, विवाहामध्ये धनाची मागणी न करणे तसेच धन न स्विकारणे इत्यादी

जैन दर्शनातील पाच व्रते कठोर आहेत. त्याचे पालन तंतोतंतरीत्या होणे अपेक्षित आहे. पाच महाव्रतांचे पालन कर्मठपणे व कठोरपणे करावयास हवे. मात्र सामान्य व्यक्तीसाठी ही पाच व्रते त्यांच्या सौम्य रुपात म्हणजे अणुव्रते म्हणून निर्धारित केली गेली आहेत.

जैनांच्या नैतिक तत्त्वज्ञानाचे वैशिष्ट्य म्हणजे ''अहिंसा'' ह्या तत्त्वाची सर्वव्यापकता होय. जैनांच्या आचार विषयक नियमावलींला अहिंसा तत्त्वांचा मुख्य आधार आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. त्रिरत्न म्हणजे काय ?

२. पाच व्रते / महाव्रते म्हणजे काय ?

३. अणुव्रते कोणती आहेत ?

४. जैनांच्या नीतिशास्त्रातील प्रमुख संकल्पना कोणती आहे ?

५. सम्यक् चरित्र मध्ये कोणते आचरण अपेक्षित आहे ?

६. जैनांच्या नीतिशास्त्रातील प्रमुख भावना कोणत्या ?

## ५.४ चार्वाकांचे नीतिशास्त्र

भारतीय तत्त्वज्ञानामध्ये चार्वाक दर्शनाचे स्वतःचे एक अनोखे स्थान आहे. भारतीय परंपरेमध्ये सहसा न आढळणारे भौतिकवाद व सुखवाद ही चार्वाक दर्शनाची वैशिष्ट्ये आहेत. चार्वाकांच्या अत्यंत वेगळ्या व बंडखोर विचारांमुळे चार्वाक अन्य भारतीय दर्शनांच्या टीकेस पात्र ठरले. चार्वाकाचे स्वतःचे लिखित साहित्य आज उपलब्ध नाही. त्यांचे विचार आपल्याला त्यांच्या टीकाकारांच्या टीकेमधून कळतात.

चार्वाकांचे विचार ‘लोकायत मत’ म्हणून ओळखले जातात. चार्वाकांच्या मते केवळ हेच जग म्हणजे हाच लोक अस्तित्वात आहे. या जगातील सर्वसामान्यांच्या दृष्टिकोनाचे प्रतिनिधीत्व चार्वाक दर्शन करते. चार्वाक हा शब्द ‘चर्व’ या पदापासून आला. म्हणजेच हे दर्शन खा, प्या आणि मजा करा. या विचारांचा पुरस्कार करते. चार्वाक ह्या शब्दाचा उगम चारु वाक् असाही सांगता येतो. म्हणजे चार्वाकांचे तत्त्वज्ञान अत्यंत आकर्षक होते.

### ५.४.१ चार्वाकांचे प्रमाणशास्त्र व सत्ताशास्त्रः-

चार्वाकांच्या मते ‘प्रत्यक्ष’ हे एकमात्र ज्ञानप्रमाण आहे. केवळ प्रत्यक्ष प्रमाणाने निश्चित व निःसंदिग्ध ज्ञान प्राप्त होते. ज्याचा इंद्रियाने अनुभव घेता येतो केवळ तेच अस्तित्वात असते. अनुमान व शब्द ही ज्ञानप्रमाणे विश्वसनीय नाहीत. या विचारांमुळे चार्वाक अनुभववादी व तार्किक प्रत्यक्षार्थवादी ठरतात.

सर्वसाधारणतः भारतीय तत्त्वचिंतक पाच मूलतत्त्वांचा स्वीकार करतात. ही पाच मूलतत्त्वे म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश होत. पहिली चार मूलतत्त्वे इंद्रियगम्य आहेत. त्यांचा अनुभव प्रत्यक्ष प्रमाणाने घेता येतो. मात्र पाचवे मूलतत्त्व आकाश, इंद्रियानुभवाच्या पलीकडे आहे. त्याचे केवळ अनुमान करता येते. म्हणून चार्वाक दर्शन केवळ पृथ्वी, आप, तेज व वायू या चार तत्त्वांचा स्वीकार करते. आकाश हे तत्त्व चार्वाकांना मान्य नाही. हे जग, त्यातील प्रत्येक वस्तू चार मूलतत्त्वांच्या संयोगाने बनली आहे. चार मूलतत्त्वांचा संयोग म्हणजे निर्माण असून त्यांचे विघटन म्हणजे विनाश होय.

प्रत्यक्ष प्रमाण आपल्याला केवळ भौतिक वस्तूंचे ज्ञान करुन देते. म्हणून केवळ जडद्रव्य ही अंतिम सत्ता ठरते. जड द्रव्य अंतिम सत्ता म्हणून स्वीकारल्याने चार्वाक दर्शन जडवादी किंवा भौतिकवादी ठरते. चार्वाक तत्त्वज्ञ इंद्रियगोचर विश्वाचे अस्तित्व मान्य करतात व स्वर्ग, नरक, ईश्वर, आत्मा इ. अनुभवास न येणाऱ्या संकल्पना नाकारातात. चार्वाकांच्या मते चैतन्य, आत्मा किंवा बुद्धी यांना स्वतंत्र अस्तित्व नाही. ही केवळ भौतिक प्रक्रियेची उपफले (By products) आहेत. ज्याप्रमाणे पित्ताशयामधून पित्त पाझरते त्याप्रमाणे जड द्रव्यामधून चैतन्य निर्माण होते. आत्मा म्हणजे चैतन्य हा गुणधर्म असलेला सजीव देह होय. (चैतन्य विशिष्ट देह एव आत्मा ।)

सचेतन शरीराचा मृत्यू होतो त्यावेळी व्यक्तीच्या संपूर्ण अस्तित्वाचा विनाश होतो. पूर्वजन्म, मृत्यूनंतरचे जीवन, स्वर्ग, नरक या सारख्या बाबींची चर्चा निरर्थक आहे. एकदा शरीराचा जळून नाश झाला की काहीही शिल्लक राहत नाही आणि परत कोणीही येऊ शकत नाही.

### ५.४.२ चार्वाकांचा सुखवादः-

भारतीय तत्त्वचिंतकांनी धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थाचा पुरस्कार केला. चार्वाक हे अनुभवास येणाऱ्या लोकाचे अस्तित्व स्वीकारतात. त्यामुळे या

जगाच्या पलीकडील प्राप्तव्य निरर्थक ठरते. चार्वाक धर्म व मोक्ष ह्या आध्यात्मिक पुरुषार्थाचा स्वीकार न करता केवळ काम हा पुरुषार्थ व त्याला साधन असणाऱ्या 'अर्थ' या भौतिक पुरुषार्थांचा स्वीकार करतात. (काम एव एक पुरुषार्थः। ) भारतीय तत्त्वज्ञानामध्ये केवळ चार्वाक दर्शन सुखवादी आहे. केवळ चार्वाक तत्त्वज्ञ सुख हेच जीवनाचे परमप्राप्तव्य मानतात.

चार्वाकांच्या मते मानवी अस्तित्व जड देहापुरते व ह्या एकमेव जीवनापुरते मर्यादित आहे. त्यामुळे शारीरिक सुख हीच एकमात्र चांगली गोष्ट प्राप्त करुन घेता येणे शक्य आहे. मानवी जीवनाचे ध्येय विद्यमान जीवनामध्ये जास्तीत जास्त सुख प्राप्त करुन घेणे व दुःख टाळणे हे आहे. अशा प्रकारे चार्वाक स्थूल सुखवादाचा पुरस्कार करतात.

मनुष्याचे जीवन ह्या भौतिक शरीरामध्ये सुख व दुःख यांच्याशी जोडले गेले आहेत. चार्वाकांच्या मते स्वर्ग आणि नरक सांसारिक सुख व दुःख यांची सांकेतिक नांवे आहेत. ते म्हणतात ''सुखमेव स्वर्गम्''। व ''दुःखमेव नरकम ।'' चार्वाक निखळ सुख ही संकल्पना नाकारतात. त्यांच्या मते प्रत्येक सुख नेहमीच दुःखमिश्रित असते. दुःखमिश्रित असूनही सुख हेच इष्ट आहे. मनुष्य दुःखाची मात्रा कमी करु शकतो पण दुःख पूर्णपणे नाहीसे करु शकत नाही. याची पुष्टी करण्यासाठी चार्वाक रोजच्या व्यवहारातील उदाहरणे देतात. ''माशामध्ये काटे आहेत म्हणून शहाणा माणूस मासे खाणे सोडून देत नाही.'' ''जनावरे नाश करतात म्हणून भात पिकविणे कोणी थांबवित नाही.'' सुखाची निवड करुन दुःखाचा अव्हेर करणे यातच शहाणपण आहे.

चार्वाकाच्या मते मनुष्याने नेहमी वर्तमान जीवनातील सुखाचा शोध घ्यावा. भविष्यकालातील सुखांची व्यर्थ आशा सोडून द्यावी. ''उद्याच्या मोरापेक्षा आजचे कबुतर बरे.'' ''झुडुपात असणाऱ्या दोन पक्ष्यांपेक्षा हातात असलेला एक पक्षी चांगला आहे. '' अशा प्रकारे चार्वाक मनुष्याच्या तात्काळ इच्छापूर्तीचे समर्थन करतात.

चार्वाकांच्या मते सर्व सुखे समान असतात. सुखांमध्ये गुणात्मक किंवा परिमाणात्मक असे कोणतेही भेद नसतात. सारासार विचार करीत वेळ न घालविता आपल्या इच्छांची पूर्ती करणे हेच जीवनाचे ध्येय आहे. कालांतराने मिळणाऱ्या सुखांपेक्षा ताबडतोब मिळणाऱ्या सुखांना प्राधान्य दिले पाहिजे. भूतकाळ निघून गेला आहे आणि भविष्यकाळ अनिश्चित आहे. मनुष्याच्या हातात फक्त वर्तमान काळ आहे. म्हणून वर्तमान सुखांचा त्याग करु नये. चार्वाक म्हणतात '' जोपर्यंत जीवन आहे तोपर्यंत इंद्रियजन्य सुखांचा उपभोग घ्यावा एकदा हा देह जळून नष्ट झाला की नंतर परत काय येणार आहे ?

यावत् जीवेत् सुखं जीवेत् तावत् वैषयिकैः सुखैः ।
भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनम् कुतः ।।

मनुष्य जीवनाचे परमोच्च ध्येय वैयक्तिक सुखाची प्राप्ती करुन घेणे होय. सुख हा नैतिकतेचा निकष आहे. दुःखापेक्षा अधिक सुख निर्माण करणारी कृती ''इष्ट

कृती आहे. सुखापेक्षा अधिक दु:ख निर्माण करणारी कृती अनिष्ट कृती आहे. त्या काळातील प्रचलित कर्मकांडाला चार्वाकांचा संपूर्ण विरोध होता. त्यांच्या मते सर्व धार्मिक विधी हे पुरोहित वर्गाच्या उदरभरणाचे मार्ग आहेत. वेद प्रामाण्याला विरोध करणारे चार्वाक स्त्रीयांबद्दल अत्यंत उदार दृष्टिकोन बाळगत होते. त्यांच्या मते सुख प्राप्त करुन घेण्याचा स्त्रीयांना पुरुषांइतकाच हक्क आहे.

चार्वाकांनी वैयक्तिक सुखांचा पाठलाग करण्यासाठी योग्य मार्गाचा अवलंब करावा असे सांगितले. सुख प्राप्तीसाठी,  शेती, गोपालन, व्यापार, राजाची चाकरी इत्यादि चांगल्या मार्गाने धन प्राप्त करावे.

कृषि गोरक्षवाणिज्य दण्डनीत्यादिभि : बुधै : ।
एतैरैव सदोपायैर्भोगाननुभवेद भुविः ।।

चार्वाकांनी प्रतिपादन केलेल्या सुखाच्या पाठलागाला अन्य भारतीय तत्त्वचिंतकांनी कडाडून विरोध केला. कालांतराने वात्स्यायनासारख्या चार्वाकांनी सुखाचे स्वरुप व सुखप्राप्तीची साधने याबाबतची मते परिष्कृत केली.

### ५.४.३ चार्वाकांचे योगदान:-

चार्वाकांचे नीतिशास्त्र म्हणजे उपनिषदांच्या नंतरच्या काळातील हट्टाग्रहावर एक प्रकारची प्रतिक्रिया होती. त्यांची बंडखोर चिकित्सक वृत्ती व अध्यात्मवादाबद्दल तिरस्कार यामुळे त्यांचे तत्त्वज्ञान भौतिक विश्वाशी जोडलेले राहिले.

तत्कालिन प्रचलित संकल्पनांबद्दल प्रश्न उपस्थित करुन चार्वाकांनी भारतीय तत्त्वज्ञानाला एकसुरी दुराग्रहापासून वाचविले. सातत्याने टीकेस पात्र होऊनही चार्वाकांच्या विचारांना एका स्वतंत्र दर्शनाचे स्थान मिळाले. यातून चार्वाकांच्या मताचे वैशिष्टपूर्ण स्थान लक्षात येते. तसेच प्राचीन भारतामध्ये असलेले विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य प्रकट होते.

### आपली प्रगती तपासा

१. 'चार्वक' या शब्दाचे अर्थ सांगा.
२. चार्वाकांच्या मते ज्ञानाचे योग्य प्रमाण कोणते आहे ?
३. चार्वाक कोणकोणत्या संकल्पना नाकारतात ?
४. चार्वाक त्यांचा सुखवाद कशा प्रकारे मांडतात ?

## ५.५ सारांश

भारतीय दर्शनांचे दोन पैलू आहेत सिद्धान्त व आचरण, तात्त्विक व नैतिक भारतीयांच्या मते सत्य, सौंदर्य व शिव ह्या आदर्शाना आपल्या जीवनात प्रत्यक्षपणे प्राप्त करुन घ्यायला हवे जीवनाचे परमोच्च ध्येय सत्याचा शोध घेऊन शिव (शुभ) प्राप्त करुन सौंदर्याची निर्मिती करणे हे आहे.

भारतीय आस्तिक तसेच नास्तिक दर्शने सत्तामिमांसा करताना नीतिमिमांसासुद्धा करतात. बौद्ध व जैन दर्शने आपल्या अनुयायांसाठी काही आचरणाचे नियम निर्धारित करुन नैतिक आचरणाला प्राधान्य देतात. बौद्ध व जैन दर्शने निवृत्तिवादी आहेत. चार्वाक दर्शन 'सुखप्राप्ती' हे जीवनाचे परमोच्च ध्येय मानतात. त्यामुळे ते सुखवादी ठरतात. त्याकाळी वेदांचा अतिशय प्रभाव असतानाही काही वेगळे मतप्रवाह म्हणजे नास्तिक दर्शने या भारतभूमीमध्ये विकसित झाले. त्यांनी भारतीय परंपरेला एकसुरी व हट्टाग्रही होण्यापासून वाचविले.

बौद्ध व जैन दर्शनांमध्ये अहिंसा ह्या तत्त्वाला महत्त्वपूर्ण स्थान आहे. जैन दर्शनामध्ये अहिंसा ह्या तत्त्वाचा अत्यंत व्यापक असा अर्थ दिसून येतो. सर्व जीवांचा विचार बौद्ध व जैन दर्शनांमध्ये अत्यंत सहिष्णूतेने झालेला दिसून येतो. चार्वाक दर्शन मात्र आत्मकेंद्री ठरते. आध्यात्मिक व सार्वत्रिक विचार करणाऱ्या भारतीय परंपरेमध्ये चार्वाकांचा भौतिकवादी, सुखवादी व स्व-केंद्रित विचार कसा निर्माण झाला हे एक आश्चर्य आहे. आस्तिक व नास्तिक परंपरांच्या दर्शनांच्या वाद-प्रतिवादामुळे एकूणच भारतीय दार्शनिक विचार समृद्ध झाले.

'अहिंसा' हे तत्त्व आजही भारतीयांच्या वैचारिक जीवनाचे महत्त्वाचे अंग आहे. भगवान बुद्ध, भगवान महावीर यांनी अंगिकार केलेल्या अहिंसा तत्त्वाचा महात्मा गांधींनी सुद्धा पुरस्कार केला. विनोबाजी भावे, महात्मा गांधी यांनी अहिंसा, सत्य व अपरिग्रह ही तत्त्वे यशस्वीरीत्या समाज जीवन व व्यक्तिचे जीवन यात अंमलात आणून दाखविली. सत्याग्रह भूदान चळवळ, चिपको आंदोलन यातून हे सार्थपणे दिसते.

## ५.६ विद्यापीठीय दीर्घोत्तरी प्रश्न

१. भगवान बुद्धानी सांगितलेल्या चार आर्य सत्यांचे वर्णन करा.

२. जैनांच्या नीतिशास्त्राची वैशिष्ट्ये काय आहेत ?

३. चार्वाकांच्या सुखवादाचे परीक्षण करा.

४. भगवान बुद्धांनी सांगितलेल्या आर्य अष्टांग मार्गाचे विवेचन करा.

५. टिपा लिहाः-

अ) अहिंसा ब) व्रत क) निर्वाण ड) त्रिरत्न इ) द्वादश निदान

*****

# ६

## प्रकरण ६

# स्वहितवादी नैतिकता (स्वहितार्थवादी नैतिकता)
# मानसशास्त्रीय व नीतिशास्त्रीय स्वहितवाद
## (Psychological and Ethical Egoism)

**घटक रचना**

६.० उद्दिष्ट्ये
६.१ प्रस्तावना
६.२ मानसशास्त्रीय स्वहितवाद (Psychological Egoism)
 ६.२.१ थॉमस हॉब्ज यांचा मानसशास्त्रीय स्वहितवाद
 ६.२.२ नीतिशास्त्र व मानवी स्वभाव
 ६.२.३ आत्मरक्षण व आत्महित
 ६.२.४ सामाजिक करार
 ६.२.५ मूल्यमापन
६.३ नीतिशास्त्रीय स्वहितवाद (Ethical Egoism) किंवा स्वहितवादी नीतीमत्ता
 ६.३.१ आयन् रँड यांचा नैतिक स्वहितवाद
 ६.३.२ ज्ञानाचे साधनमूल्य
 ६.३.३ मूल्यमापन
६.४ सारांश
६.५ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

## ६.० उद्दिष्टे

१) स्वहितवादी नीतिशास्त्राचे आकलन करुन घेणे.

२) थॉमस हॉब्ज यांचा मानसशास्त्रीय स्वहितवाद व श्रीमती आयन् रँड यांचा नीतिशास्त्रीय (नैतिक) स्वहितवाद समजून घेणे.

३) बद्धिनिष्ठ स्वहित व स्वार्थत्यागमूलक नीती यांतील फरक जाणून घेणे.

४) स्वहितवादी नीती विरुद्ध केवळ परहितवादी नीती यांच्यातील फरक जाणणे म्हणजेच स्वार्थवादी नीती व परार्थवादी नीती समजून घेणे.

## ६.१ प्रस्तावना

स्वहितवाद ही एक नीतिशास्त्रीय ध्येयाची व मूल्यांची मीमांसा करणारी अर्वाचीन काळातील विचारप्रणाली आहे. स्वहितवादी नैतिकता किंवा स्वहितार्थवादी नीतिमत्ता हे स्वहितवादी नीतिशास्त्राचे दुसरे नाव होय. स्वहितवादाचे दोन प्रकार आहेत.

१) मानसशास्त्रीय स्वहितवाद (Psychological Egoism)

२) नीतिशास्त्रीय स्वहितवाद (Ethical Egoism)

मानसशास्त्रीय स्वहितवादानुसार माणूस हा स्वभावतः स्वतःच्या हितासाठी प्रयत्नशील असतो. तो स्वतःच्या इच्छा आकांक्षा यांच्या पूर्तीसाठी झटत असतो. अर्थात माणूस स्वभावतः स्वार्थी असतो. ब्रिटिश तत्त्वज्ञ थॉमस हॉब्ज (इ.स. १५८८ते १६७९) हा मानसशास्त्रीय स्वहितवाद या मताचा आग्रही पुरस्कर्ता होता. नीतिशास्त्रीय स्वहितवादानुसार माणूस स्वभावतः स्वार्थी आहे की नाही ? हे महत्त्वाचे नाही. तो स्वभावतः केवळ स्वतःचेच हित साधतही नसेल. परंतु त्याने बुद्धिनिष्ठ स्वहितवादी असावे. स्वतःच्या बुद्धिनिष्ठ हितासाठी त्याने प्रयत्नशील असावे. अमेरिकन विदुषी श्रीमती आयन् रँड (इ.स. १९०५ ते १९८२) या नैतिक स्वहितवादाच्या आग्रही पुरस्कर्त्या होत्या. त्या आग्रहपूर्वक सांगतात की बौद्धिक स्वार्थ हा सद्‌गुण आहे.

## ६.२ मानसशास्त्रीय स्वहितवाद- थॉमस हॉब्ज (Psychological Egoism)

### ६.२.१ थॉमस हॉब्ज यांचा मानसशास्त्रीय स्वहितवाद (Psychological Egoism):

या विचारप्रणालीचा पुरस्कार थॉमस हॉब्ज (इ.स. १५८८-१६७९) यांनी केला. थॉमस हॉब्जचा जन्म इंग्लंडमध्ये मॉल्मेसबरी येथे झाला. त्याने ऑक्सफर्ड विद्यापीठात स्कोलॅस्टिकवादाचा आणि ॲरिस्टॉटलच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. त्याची कॅव्हेंडिश कुटुंबाचा एक खाजगी शिक्षक म्हणून निवड झाली. त्याने साहित्याच्या वाचनासाठी खूप वेळ खर्च केला. तसेच तत्त्वज्ञान, राजकीय तत्त्वज्ञान, गणित व विज्ञान यांचे अध्ययन करुन तो निष्णात झाला. प्रवासात व युरोपमध्ये त्याचा अनेक तत्त्वज्ञानी व वैज्ञानिक यांच्याशी संबंध आला. विशेषतः गॅलिलिओ, फ्रांसीस बेकन, केप्लर, देकार्त, गॅसेंडी, मेरसेने या वैज्ञानिकांची व तत्त्ववेत्यांची ओळखही झाली. पुढे त्याची प्रतिक्रिया स्कोलॅस्टिकवादाविरुद्ध बनली. तत्त्वज्ञानातील जुनी मते सुधारकाप्रमाणे निपटून काढली व तत्त्वज्ञानाचा व्यावहारिक व वैज्ञानिक उपयुक्ततेवर त्याने भर दिला. त्याने अनेक ग्रंथही लिहिले. त्यापैकी ‘लेव्हिएथन’ हा ग्रंथ त्याचा प्रसिद्ध आहे. तो एक राजकीय विचारवंत म्हणून जसा ओळखला जातो, तसाच एक ब्रिटीश अनुभववादी तत्त्ववेत्ता म्हणूनही ओळखला जातो.

### ६.२.२ नीतिशास्त्र व मानवी स्वभाव:

थॉमस हॉब्जवर पदार्थविज्ञान, गणितशास्त्र ह्या शास्त्रांचा परिणाम झाल्यामुळे त्याचा मानसशास्त्रीय दृष्टीकोन भौतिक स्वरुपाचा झाला आहे. त्याच्या मते संवेदना, कल्पना, भावना व मनोविकार ह्या सर्व मानसिक अवस्था असून त्या शरीराच्या अंतर्गत असलेल्या गतीचे अविष्कार आहेत. थॉमस हाब्जच्या कार्यावर दोन गोष्टींचा प्रभाव पडलेला आहे. पहिला प्रभाव सामाजिक व राजकीय पार्श्वभूमीचा आहे. त्याची प्रतिक्रिया धार्मिक अधिकाराविरुद्ध विशेषतः स्कोलॅस्टिकवादाविरुद्ध बनली. दुसरा प्रभाव विज्ञानाचा पडला. भौमितिक या वैज्ञानिक पद्धतीचे त्याला कौतुकही वाटले. ही भौमितिक पद्धती निश्चित आणि सार्वत्रिक ज्ञान आपणास देण्यास सक्षम आहे. या दोन्ही गोष्टींचा प्रभाव पडून हॉब्जच्या नैतिक व राजकीय विचारांवर त्याचा परिणाम झालेला आहे. त्याने मानसशास्त्रीय स्वहितवाद (Psychological egoism) या विचारसरणीचा पुरस्कार अर्वाचीन काळात केला. हॉब्जच्या मते माणूस हा स्वभावतः स्वतःच्या हितासाठी प्रयत्नशील असतो. तो स्वतःच्या इच्छा-आकांक्षा यांच्या पूर्तीसाठी झटत असतो. अर्थात माणूस स्वभावतः स्वार्थी असतो. हॉब्जच्या या विचारसरणीला 'मानसशास्त्रीय स्वहितवाद' असे म्हणतात. त्याने मानसशास्त्रीय स्वहितवादाचे जोरदार समर्थन केले. हॉब्जने मानवी स्वभावाचे (Human Nature) वर्णन '**लेव्हिएयन**' या ग्रंथात केले. त्याने मनुष्य हा स्वभावतःच स्वार्थी, दुष्ट, क्रुर असा चित्रीत केला आहे. मानवी स्वभावाबद्दल हॉब्ज म्हणतो की मनुष्य आपली सर्व प्रकारची कार्ये स्वार्थाने प्रेरित होऊनच करतो. नीतीमत्तेचा जन्म हा स्वार्थी वृत्तीतून झालेला आहे. मनुष्य कर्तव्याचे पालन का करतो तर त्या कर्तव्यपालनाने कोणत्या ना कोणत्या स्वरुपात बक्षिस मिळते. आपण अहिंसेचे पालन का करतो ? हॉब्ज म्हणतो की मी लोकांना मारले तर इतर लोक मला मारतील. परिणामी मला माझे सुख मिळणार नाही. आपण दया का करतो ? किंवा दुसऱ्याला दुःख झाल्यास आपल्याला दया का येते ? हॉब्ज म्हणतो की आपल्यालाही कदाचित तशी दुःखी अवस्था प्राप्त होईल अशी भीती निर्माण होते. म्हणजेच स्वतःचे भावी दुःख मनात येते म्हणून आपण दुसऱ्यावर दया करतो. एकूणच हॉब्जच्या मतानुसार मनुष्य स्वाभाविकतया स्वतःपुरता विचार करणारा म्हणजेच स्वार्थी असतो. स्वतःच्या हिताचे वा सुरवाचे साधन म्हणून तो इतरांचा विचार करीत असतो. दुसऱ्याबद्दल वाटणारे दुःख वा दया का येते तर स्वतःवर तसा प्रसंग येईल या भीतीतून उत्पन्न होते.

### ६.२.३ आत्मरक्षण व आत्महित:

हॉब्जच्या मते मानसाच्या ठिकाणी जन्मतःच आत्मरक्षण करण्याची प्रवृत्ती असते. मानवी आत्मरक्षणाचा नियम हा त्याच्या नैतिक व राजकीय जीवनाचे तत्त्व आहे. सर्व राजकीय संस्थांचा उगम त्याने आत्मरक्षण करण्यातून झाला आहे. स्वतः जगणे, स्वतःचे रक्षण करणे, सुखाने जीवन जगणे ही मानवाची जैविक प्रवृत्ती आहे. म्हणून माणूस आपल्या शरीराचे पोषण व रक्षण करण्यासाठी जे करणे आवश्यक आहे ते योग्य ठरते. हॉब्जच्या मते आत्मरक्षणासाठी व स्वहितासाठी व्यक्तीने कोणाचेही सहकार्य घ्यावे, कोणाचाही उपयोग करावा या नैसर्गिक स्वभावाला धरुन आत्मरक्षण व स्वहित हे सर्वश्रेष्ठ मूल्ये आहेत. हॉब्जच्या विचारात स्वतःच्या सुरक्षेचा, हिताचा विचार

प्रमुख असून त्याचे मानवी स्वभावाचे व प्रवृत्तीचे निरीक्षण हे अत्यंत अचूक व भेदक आहे. तसेच ते वास्तववादी व परखडपणे मांडणारे विचार आहेत.

थॉमस हॉब्ज हा एक राजकीय विचारवंत म्हणूनही प्रसिद्ध आहे. मानव शांती, सुखा-समाधाने कसा राहू शकेल, नागरी संघर्षात्मक परिस्थितीत तो घातक आणि भीती यापासून कसा मुक्त होईल, अशी सामाजिक व राजकीय व्यवस्था निर्माण करणे हे त्याचे प्रमुख ध्येय होते. माणसाचे जीवन व्यवस्थित कसे होणार ? प्रत्येकजण स्वार्थ प्रवृत्तीने कृती करु लागला तर संघर्षात्मक परिस्थिती निर्माण होईल. अशा संघर्षात्मक परिस्थितीचा नाश करण्यासाठीच समाज आणि राज्य निर्माण झाले आहे. एकूणच समाजाची निर्मितीसुद्धा स्वार्थ वृत्तीतून झाली आहे. आत्महित, आत्मसंरक्षण व आत्मपोषण या तीन हेतूंमळे समाजाची निर्मिती झाली आहे. त्यामुळे माणसे एकत्र येतात. हॉब्जने हे पुढील उदाहरणाने स्पष्ट केलेले आहे. आपण रात्रीच्यावेळी घराचे दरवाजे व खिडक्या बंद करुन त्यांना कडी व कलूप लावतो. त्याचे कारण आपण झोपी गेल्यावर आपल्या घरातील वस्तू लोक सुरक्षित राहू देणार नाहीत याची खात्री वाटत नसल्यामुळे आपण घराचे दरवाजे, खिडक्या बंद करुन त्यांना कुलपे लावतो व त्याच्या किल्ल्या स्वतःजवळ ठेवतो. प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या हिताचा व सुरक्षिततेचा विचार करते. मनुष्य हा मानसिक दृष्ट्या स्वहितवादी आहे हे त्याचे निरीक्षण मार्मिक आहे.

### ६.२.४ सामाजिक करार (Social Contract):

हॉब्जच्या मते आपले हक्क अबाधित राहण्यासाठी दोन अटी आवश्यक आहेत. पहिली अट म्हणजे प्रत्येकाने दुसऱ्याचे हक्क मान्य करण्याचा करार केला पाहिजे. तर दुसरी अट म्हणजे हा करार सुरक्षित राहण्यासाठी सामर्थ्यशाली एकात्मसत्ता निर्माण केली पाहिजे. त्यासाठी कायदे करुन त्याचे पालन करावे. हॉब्जच्या मतानुसार नीतीमत्तेची निर्मिती करणारा सामाजिक करार (Social contract) केला पाहिजे. तो करार मोडता कामा नये. समाजात राहावयाचे म्हणजे सामाजिक जीवनात माणसाने पाळवयाचे योग्य अयोग्य, चांगले वाईट, इष्ट-अनिष्ट याविषयीचे सर्व आदर्श सर्वसत्ताधिश शासनानेच ठरवावयाचे असतात. शासनाच्या सार्वभौमत्वापुढे व्यक्तीला स्वतःचे स्वातंत्र्य, वेगळे असे अधिकार, हक्क व नीती ही संभवत नाही. अन्याय कृतघ्नता, समानता यांना कायदेशीर बनविता येत नाही. युद्ध जीवनाचे रक्षण करील व शांतता जीवनाचा नाश करील असे कधीही घडू शकणार नाही. समाज व मानवता यांना टिकवून धरण्यात चांगले व वाईट ठरविणारे शास्त्र म्हणजे नैतिक तत्त्वज्ञान होय.

थॉमस हॉब्ज म्हणतो की, माणसाच्या प्रत्येक कृतीचा हेतू हा स्वहित (आत्महित), आत्मरक्षण व आत्मपोषण असल्यामुळे दुसऱ्या कशाचीही इच्छा माणसाला होत नाही हे योग्यच आहे. येथे बुद्धिपेक्षा निसर्गच माणसाला ध्येयासंबंधी योग्य मार्गदर्शन करु शकतो. बुद्धी ही माणसाला आपले ध्येय साध्य करण्यासाठी आवश्यक त्या साधनांचा विचार करावयाला लावते. या ध्येय साध्याच्या बुद्धीतून तौ नैतिक नियमांचे पालन करतो. जर या नैतिक नियमांचे पालन कोणी करीत नसेल तर राज्याने

किंवा सार्वभौम सत्ता असलेल्या शासनाने ते नियम पाळण्यास व्यक्तीला भाग पाडले पाहिजे.

थोडक्यात मनुष्य हा समाजशील प्राणी आहे ही ॲरिस्टॉटलची कल्पना हॉब्जने चुकीची ठरवून मनुष्य हा स्वभावतः समाजोन्मुख नसून तो एकाकी, स्वार्थी, दुष्ट असून, कुणाचा कुणावर भरवसा वा विश्वास नसल्यामुळे प्रत्येक व्यक्ती आत्मरक्षणासाठी, भीतीपोटी व शांततेचा मार्ग काढण्यासाठी तो बुद्धिने नियमबद्ध समाजाची मागणी करतो. समाजात राहाण्यासाठी करार करतो. त्याचा हा सामाजिक करार भीती व स्वार्थावर आधारलेला आहे. अर्थात हा करार सुरक्षित राहण्यासाठी सामर्थ्यशाली एकात्मसत्ता आवश्यक आहे. त्यासाठी सार्वभौम शासनाची आवश्यकता हॉब्ज मान्य करतो. त्यांनी लोककल्याण करावे. परंतु त्याला ईश्वराशिवाय कोणीही जाब विचारु शकत नाही. हॉब्जने राज्याला व तिच्या सार्वभौम सत्तेला महत्त्व देऊन त्याची त्यामागची भूमिका ही व्यक्तिच्या हिताची होती. हॉब्जच्या विचारात माणसाचे स्वहित हे त्याच्या सामाजिक हितात गुंतले आहे असे त्याच्या विचारसरणीहून दिसून येते. तसेच नीतीमत्तेचे मूळ सामाजिक भावनेत न शोधता बुद्धीत शोधण्याचे श्रेय हॉब्जच्या विचारात दिसून येते.

### ६.२.५ मूल्यमापनः

हॉब्जच्या मनसशास्त्रीय स्वहितवादात मानवी स्वभावाचे चित्रण हे अतिरेकी स्वरुपाचे आहे. हॉब्ज मानवी स्वभावाची एकच बाजू सांगतो. मनुष्य जर स्वार्थी, दुष्ट, व क्रूर आहे तर त्यांच्यात सामाजिक करार करण्याची भावना कशी निर्माण झाली ? जर सहकार्य, प्रेम ह्या भावना निर्माण होत नसतील तर मनुष्य अधिक दुष्ट होईल. सहकार्य व प्रेम भावना असल्याशिवाय सामाजिक करार घडून येत नाही. जॉन लॉकने हॉब्जच्या मानवी स्वभावर टीका करुन ती वेड्याच्या मेंदूतून निघालेली कल्पना आहे. रुसोच्या मते हॉब्जने केलेले मानवी स्वभावाचे चित्रण हे असत्य असून ते मानवी स्वभावाच्या विरुद्ध आहे.

हॉब्जची सार्वभौमत्वाची कल्पना ही व्यक्तीचे स्वातंत्र्य नष्ट करणारी आहे. सार्वभौम ही निरंकुश सत्ता असून प्रजेला त्यास विरोध करण्याचा अधिकार नाही. त्यामुळे सर्व व्यक्तींची स्थिती ही गुलामासारखी होते.

व्यक्ती नीतीमत्तेचे व कायद्यांचे पालन दंडशक्तीच्या भीतीमुळे करीत नसून त्यांना उपयोगी व आवश्यक अशा कायद्याचे पालन व्यक्ती करतात. हा हॉब्जचा विचार मान्य केल्यास कायदे हे मनुष्याच्या इच्छेवर आधारित आहे असे म्हणावे लागते.

हॉब्जच्या विचारावर अनेकांनी टीका केली असली तरी तो एक क्रांतीकारी राजकीय विचारांचा जसा जनक होता तसाच तो एक सुधारणादी अनुभववादी विचारवंत होता. त्याने भौमितिक पद्धतीचा व वैज्ञानिक पद्धतीच्या आधारे आपले नीतिशास्त्रीय व राजकीय विचार मांडले. त्याने मानसशास्त्रीय स्वहितवादाती मांडणी करुन एक मोलाचे योगदान दिलेले आहे. तो भौतिकवादी (जडवादी),

अनुभवसत्तावादी, मानसशास्त्रीय स्वहितवादी व विश्लेषक तत्त्वज्ञानाची मांडणी करणारा अर्वाचीन तत्त्वचिंतक होता.

**आपली प्रगती तपासून पहा :-**

१) मानसशास्त्रीय स्वहितवाद म्हणजे काय ?

२) थॉमस हॉब्जचा मानसशास्त्रीय स्वहितवाद म्हणजे काय ?

३) थॉमस हॉब्ज मानवी स्वभावाचे चित्रण कसे करतो ? हे चित्रण मानसशास्त्रीय स्वहितवादाचे समर्थन कसे करते ?

४) मानसशास्त्रीय स्वहितवाद व नीतिशास्त्रीय स्वहितवाद यामधील फरक कोणता ?

## ६.३ नीतिशास्त्रीय स्वहितवाद (Ethical Egoism)

आयन रँड (इ.स. १९०५ ते १९८२) यांचा जन्म सोवियट् रशियात लेनिनग्राड येथे २फेब्रुवारी १९०५ रोजी झाला. १९१७ साली सोवियट रशियात साम्यवादी क्रांती झाली. या राजवटीत विचारस्वातंत्र्य व भाषण स्वातंत्र्य यांच्यावर बंदी आली. १९२६ साली रँड यांनी रशिया सोडला व त्या अमेरिकेत आल्या. १९३१ साली त्यांनी अमेरिकेचे नागरिकत्व स्वीकारले तेव्हापासून त्यांनी संघटीत धर्म व हुकूमशाही वा एकाधिकारशाही यांना विरोध सुरु केला. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने त्या वास्तववादी होत्या. तसेच त्या निधर्मी बुद्धीवादी होत्या. त्यांच्यावर ॲरिस्टॉटल या ग्रीक तत्त्वज्ञाचा प्रभाव आढळून येतो. व त्यांनी हा प्रभाव मान्यही केलेला आहे.

### ६.३.१ आयन रँड यांचा नैतिक स्वहितवाद (Ethical Egoism):-

आयन् रँड यांच्या चिंतनावर जसा ऑरिस्टॉटलचा प्रभाव आहे. तसाच त्यांच्या नैतिक चिंतनावर 'अमेरिकेत स्वातंत्र्याचा जाहीरनामा' याचा ही प्रभाव आहे. या जाहीरनाम्यानुसार अर्थात स्वातंत्र्याच्या मसुद्यानुसार प्रत्येकाला स्वतःचे जीवन जगण्याचा मूलभूत अधिकार आहे. तसेच प्रत्येकाला स्वतःच्या स्वातंत्र्याचाही हक्क आहे. प्रत्येकाने स्वतःच्या सुखासाठी झटले पाहिजे. रँड म्हणतात. या मसुद्यात दुसऱ्याची सेवा करावी हा शब्दप्रयोग नाही.

आयन् रँड ही तत्त्ववेत्ती बुद्धीवादी, वास्तववादी व निरीश्वरवादी होती. ती आपल्या नैतिक चिंतनात तिच्या बुद्धिवादाची काही सुत्रे स्पष्टपणे मांडते. त्यातील पहिले तत्त्व असे आहे की मला जसा जगण्याचा अधिकार आहे, तसाच तो इतरांनाही आहे. दुसरे तत्त्व असे सांगते की प्रत्येकाने विचार करतांना संदर्भ लक्षात ठेवला पाहिजे. तिसऱ्या तत्त्वानुसार बुद्धिनिष्ठ राहणे म्हणजे लहरीनुसार जगणे नव्हे. बुद्धी

सर्वांच्या हक्कांचा विचार मान्य करते. बुद्धिवादी असणे म्हणजे आपण मनाच्या वा बुद्धीच्या साहाय्याने जगतो हे मान्य करणे होय.

अनेकदा असे म्हटले जाते की मनुष्य आपले ध्येय वा साध्य बुद्धीने निर्धारित करु शकत नाही. बुद्धी फक्त साधने निर्धारित करण्यास मदत करते. श्रीमती रँड ह्या या मताच्या विरुद्ध होत्या. त्यांच्या मते माणसाने बुद्धीच्या साहाय्याने आपल्या जीवनाची उद्दिष्ट्ये निश्चित करुन त्याची निवड केली पाहिजे. या संदर्भात बुद्धीचा उपयोग न केल्यास विनाश अटळ आहे.

जगण्याच्या तीन पद्धती (प्रारुपे) प्राणीमात्रांमध्ये वा सजीवांमध्ये दिसून येतात.

१) वनस्पती मॉडेल /प्रारुप

२) प्राणीपक्षी मॉडेल /प्रारुप

३) मानवी मॉडेल /प्रारुप

**१) वनस्पती मॉडेल** - वनस्पतीना व वृक्षवल्लींना आपली जागा सोडून जीवनाला पोषक द्रव्ये शोधावी लागत नाही. ज्या जमीनीत वनस्पती वाढतात. त्या जमीनीतूनच त्या आपली जीवनपोषकद्रव्ये मिळवितात. त्यासाठी त्यांना आपले स्थान सोडून इतरत्र जावे लागत नाही.

**२) प्राणीपक्षी मॉडेल** - पक्षी व प्राणी यांना आपले अन्न व पाणी शोधावे लागते. सिंह हा जंगलाचा राजा समजला जातो. त्यालाही आपले खाद्य शोधावे लागते. त्यासाठी जंगलात फिरावे लागते.

**३) मानवी मॉडेल** - मानवाला आपले खाद्य शोधावे तर लागतेच परंतु त्यासाठी उत्पादक श्रमही करावे लागतात. त्यासाठी त्याला कर्मांची वा कृतींची निवड करावी लागते. एवढेच नव्हे तर त्यासाठी त्याला विचार करावा लागतो. ज्ञानही मिळवावे लागते. जगण्यासाठी त्याला विचार करणे व ज्ञान मिळविणे अत्यावश्यक असते. म्हणूनच **'स्वार्थ हा सद्‌गुण'** आहे. या संदर्भात रँड म्हणतात - स्वार्थीपणा म्हणजे स्वतः बुद्धिनिष्ठ स्वहितांचा स्वतः पाठपुरावा करणे, तसेच स्वतःच्या बुद्धीने निर्णय घेवून स्वतःच्या उत्पादक श्रमावर जगणे होय. दुसऱ्यावर काहीही न लादता स्वतःच्या हितासाठी स्वतः कष्ट करणे होय. माणसे स्वभावाने परस्परांचे शत्रू नाहीत. तसेच स्वतःच्या बुद्धिनिष्ठ स्वार्थाचा विचार करणे, यात काहीही वाईट नाही. उलट तसे करणे चांगले आहे. स्वहितवादी माणूस हा आत्मप्रत्ययवान, स्वावलंबी व आत्मगौरववान असतो. तसाच तो प्रयत्नवादी व उत्पादक श्रमजीवी असतो. तो स्वतः त्याग करीत नाही व इतरांनाही त्याग करण्यास प्रवृत्त करीत नाही. स्वहिताविरोधी भूमिका घेणे म्हणजे आत्मप्रतिष्ठेला वा आत्मगौरवाला धक्का देणे होय. अशा अर्थाने **'स्वहित साधणे'** हा मोठा सद्‌गुण आहे.

आयन रँडने केवळ परहितवादी नीतीला कडाडून विरोध केला. परहितवादानुसार दुसऱ्याच्या हितासाठी वा भल्यासाठी स्वतःच्या हिताचा त्याग करणे ही खरी नैतिकता होय. रँडच्या मते परहितवाद शक्य असला तरी योग्य मात्र नाही. त्यांच्या मतानुसार परहितवाद हा माणसांना 'यज्ञीय पशू' म्हणूनच वागवतो. प्रत्येक प्रकारचा हुकूमशहा हा परहितवादाचा पुरस्कर्ता असतो. परहितवादाची भाषा वापरुन तो इतरांच्या हक्कांची मुस्कटदाबी करतो. तो इतरांचे विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य हिरावून घेतो.

रँडच्या स्वहितवादी नैतिकतेची वरील तत्त्वे सर्व मानवजातीला लागू होतात. कारण त्याच्या मते ही तत्त्वे बुद्धिनिष्ठ (Rational) आहेत.

### ६.३.२ ज्ञानांचे साधनमूल्यः-

रँड यांच्या मते ज्ञानाला सुद्धा स्वगत मूल्य (साध्य मूल्य) नाही. त्याला साधनमूल्य आहे. ज्ञानाला व वैज्ञानिक ज्ञानाला मूल्य आहे कारण ते जीवनाचे रक्षण करते. त्यामुळे जीवन समृद्ध व व्यापक बनते. जे ज्ञान हे कार्य करीत नाही, अशा ज्ञानाला काहीही अर्थ नसतो. दुसऱ्याला मदत करणे हे सामान्यतः चांगले कर्म म्हणून मान्यताप्राप्त आहे. रँड म्हणतात दुसऱ्याला मदत करणे यात चुकीचे वा वावगे नाही. परंतु दुसऱ्याला मदत करणे, हे मानवाचे नैतिक कर्तव्य नाही. ते मदत करणाऱ्याच्या निवडीवर अवलंबून असते. एखादा माणूस समाजसुधारणेचे कार्य करतो. हे त्याच्यासाठी नैतिकदृष्ट्या बंधनकारक नसते. तसे कारणे ही त्यांची आवड व निवड असते. एखादी व्यक्ती विचारपूर्वक ठरवून इतरांच्या उपयोगी पडते. समाज सुधारणेचे काम करते. ही त्याची निवड असते व असावी. हा त्याचा त्याने स्वतंत्रपणे व बुद्धिनिष्ठपणे घेतलेला निर्णय हवा.

### ६.३.३ मूल्यमापन :

श्रीमती आयन् रँड यांच्या स्वहितवादी नैतिकतेत व्यक्तीच्या बुद्धिनिष्ठ निर्णयाला व निवड स्वातंत्र्याला प्रधान मूल्य मानलेले आहे. स्वातंत्र्य, व्यक्तीची प्रतिष्ठा, स्वावलंबन, आत्मश्रद्धा, श्रमप्रतिष्ठा, प्रयत्नवाद ही महत्त्वाची मूल्ये रँड यांच्या नैतिक स्वहितवादात मान्य केलेली आहेत. सर्वसाधारणतः अतिरेकी व्यक्तीवाद व अतिरेकी समाजवाद घातक होत. माणूस हा समाजशील प्राणी असल्यामुळे त्याला इतरांच्या अस्तित्वाची व सामाजिक समस्यांची दखल ही घ्यावीच लागते. म्हणून माणसाने समाजात वावरताना वा वागतांना स्वहितवाद व समाजवाद, स्वहित वा स्वतःचे हित व इतरांचे भले यांच्यातील मध्य साधला पाहिजे.

एके ठिकाणी रँड समर्पक व उचित विधान करताना लिहितात. मी बुद्धीची (बुद्धिवादाची) समर्थक आहे. मी व्यक्तिवादाची वा भांडवलशाहीची समर्थक व रक्षक नाही. एकूणच आयन रँड ह्या एका विशिष्ट मानवतावादाच्या पुरस्कर्त्या होत्या. त्यांच्या मते मानवी क्षमतांवर विश्वास म्हणजे मानवतावाद होय. त्यांचा मानवी कर्तृत्वावर विश्वास होता. माणसाने स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे. माणूस हा बुद्धिमान प्राणी असल्यामुळे त्याने स्वतः विचार करुन मूल्यांची निवड केली पाहिजे, व त्याचा

पाठपुरावा केला पाहिजे. असे केल्याने तो त्याच्या नियतीचा, भविष्याचा शिल्पकार बनतो. मूल्यांची निवड करतांना त्याने प्रामाणिकपणे, निर्भयपणे व मुक्तपणे ती निवडली पाहिजे. रँड यांनी केवळ परहितवादाला विरोध केला. कारण परहितवादी नीतिमत्ता माणसाला परोपजीवी बनविते. दुसऱ्याच्या श्रमावर जगणारे लोक आळशी बनतात. काही इतरांचे शोषणही करतात. हुकूमशाही, दंडूकेशाही (फॅसिस्टस) व साम्यवादी या राजवटी सुद्धा परहितवादाचा पुरस्कार करतात. परिणामतः माणसे वापरली जातात. त्यांना यज्ञीयपशूंची वागणूक मिळते.

संकटकाळी वा आपत्कालीन परिस्थितीच्या संदर्भात विचार मांडतांना त्या एक मार्मिक उदाहरण देतात. एखाद्याची प्रियपत्नी संकटात असेल तर काय करावे ? पतीने पत्नीचा जीव वाचविण्यासाठी आटोकाट प्रयत्न करावेत आपला पैसा व वेळ खर्च करावा. हा बुद्धिनिष्ठ व नैतिक निर्णय आहे. पतीचे पत्नीवर अस्सल वा खरे प्रेम असेल तर तिला वाचविण्यासाठी केलेले कार्य हे त्याग नव्हे. ते स्वतःच्या बुद्धिनिष्ठ सुखाला उपयोगी वा पोषकच असते.

**आपली प्रगती तपासून पहा :**

१) नीतिशास्त्रीय स्वहितवाद म्हणजे काय ?

२) रँडच्या मते परहितवाद म्हणजे काय ? त्यांचा परहितवादाला का विरोध आहे ?

३) स्वार्थपरायणता हा सद्गुण आहे. (Virtue of Selfishness) असे रँड का म्हणतात ?

४) माणूस इतर माणसांना मदत करु शकतो का ? रँड माणसाच्या अशा वागण्याचे समर्थन कसे करतात ?

## ६.४ सारांश

स्वहितवादी नैतिकतेचे दोन प्रकार आहेत. मानसशास्त्रीय स्वहितवाद व नीतिशास्त्रीय स्वहितवाद. माणूस स्वभावतःच स्वतःच्या हितासाठी झटत असतो. किंबहूना तो स्वाभाविकतया स्वार्थी असतो. ह्या विचाराचा पुरस्कार थॉमस हॉब्ज ह्या ब्रिटीश तत्त्वचिंतकाने केला. त्याने लेव्हिएथन या ग्रंथात मानवी स्वभावाचे वर्णन करुन मनुष्य आपली सर्व प्रकारची कार्ये स्वार्थाने प्रेरित होऊन करतो. आत्मरक्षण, आत्महित व आत्मपोषण या तीन हेतूमुळे समाजाची निर्मिती झाली. त्यामुळे माणसे एकत्र येतात. हॉब्ज नीतीमत्तेची निर्मिती करणारा सामाजिक करार केला पाहिजे असे म्हणतो. तो करार मोडता कामा नये. बुद्धी माणसाला ध्येय साध्य करण्यासाठी आवश्यक त्या साधनांचा विचार करावयाला लावते. तो नैतिक नियमांचे पालन करतो. या नियमांचे पालन करण्यासाठी सार्वभौम सत्ता असलेल्या शासनाने किंवा राज्याने प्रयत्न करावेत व व्यक्तीला नीतीमत्तेचे व कायद्याचे नियम पाळण्यास भाग पाडावे. थॉमस हॉब्जच्या

विचारावर अनेकांनी टीका केली असली तरी तो एक क्रांतीकारक राजकीय विचारवंत होता. त्याने मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून स्वहितवादाची मांडणी करुन नीतिशास्त्रीय विचारात मोलाचे योगदान दिले आहे.

नैतिक स्वहितवादाची विचारसरणी आयन रँड या तत्त्ववेत्तीने प्रभावीपणे मांडली. माणसाने बुद्धीच्या सहाय्याने आपल्या जीवनाची उद्दिष्ट्ये (ध्येये) निश्चीत करुन त्यांची निवड केली पाहिजे. माणसाने विवेकनिष्ठ वा बुद्धिनिष्ठ स्वहितवादी असावे. रँडने जगण्याच्या तीन पद्धती स्पष्ट करुन स्वहितवादी माणूस हा आत्मप्रत्ययवान, स्वावलंबी, आत्मगौरवान, प्रयत्नवादी व उत्पादक श्रमजीवी असतो. अशा अर्थाने स्वहित साधने हा मोठा सद्‌गुण (Virtue of Selfishness) आहे असे आयन रँड म्हणतात. त्या परहितवादी नीतीला कडाडून विरोध करतात. कारण ही नीती इतरांचे हक्क, विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य यावर गदा आणते. रँडने ज्ञानाला साधन मूल्य आहे असे म्हटले. दुसऱ्याला मदत करणे यात चुकीचे वा वावगे नाही. परंतु दुसऱ्याला मदत करणे हे मानवाचे कर्तव्य नाही. ते मदत करणाऱ्याच्या निवडीवर अवलंबून असते. म्हणून रँड म्हणतात की माणसाने स्वतंत्रपणे व बुद्धिनिष्ठपणे निर्णय घ्यावेत. अशाप्रकारे आयन रँड या नीतीशास्त्रीय स्वहितवादात बुद्धिवादाचे समर्थन करतात व स्वहित साधने यालाच मोठा सद्‌गुण मानतात. रँडने हे विचार आपल्या स्वहित वा स्वार्थ परायणता एक सद्‌गुण (The virtue of selfishness) या ग्रंथात प्रभावीपणे मांडले आहे.

## ६.५ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

१) मानसशास्त्रीय स्वहितवाद म्हणजे काय ? थॉमस हॉब्ज यांचा मानसशास्त्रीय स्वहितवाद सांगून त्याचे मूल्यमापन करा.

२) नीतिशास्त्रीय स्वहितवाद म्हणजे काय ? आयन रँड यांचा नीतिशास्त्रीय स्वहितवाद स्पष्ट करुन त्याचे मूल्यमापन करा.

३) थॉमस हॉब्जचा मानसशास्त्रीय स्वहितवाद व आयन रँड यांचा नीतिशास्त्रीय स्वहितवाद यामधील फरक स्पष्ट करा.

४) आयन् रँड यांच्या मते परहितवाद म्हणजे काय ? त्यांचा परहितवादाला का विरोध आहे ? सविस्तर स्पष्ट करा.

५) ''स्वार्थपरायणता वा स्वहित हा सद्‌गुण आहे.'' सविस्तर चर्चा करा.

६) टिपा लिहा

अ) मानसशास्त्रीय स्वहितवाद ब) नीतिशास्त्रीय स्वहितवाद

क) स्वहितवाद व परहितवाद यांमधील फरक ड) स्वार्थपरायणता व सद्‌गुण

इ) सजीवांमधील जीवन जगण्याची प्रारुपे (मॉडेल्स)

फ) नीतिशास्त्र व मानवी स्वभाव ग) हॉब्जचा सामाजिक करार

*****

# ७

## प्रकरण ७

# आधुनिक नैतिक उपपत्ती

(MODERN MORAL THEORY)

**घटक रचना**


७.० उदिष्ट्ये

७.१ प्रस्तावना

७.२ कर्तव्याचे प्रकार

७.३ कांटचे नीतिशास्त्र

७.४ कांटचे निरुपाधिक आदेश

७.५ सुखवाद/उपयुक्ततावाद

७.६ सुखवादाचे प्रकार

७.७ जेरेमी बेथॅमचा परार्थ/नीतिशास्त्रीय सुखवाद

७.८ मिल्लचा उपयुक्ततावाद/गुणात्मक उपयुक्ततावाद

७.९ सारांश

७.१० विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न


## ७.० उद्दिष्ट्ये

१) कांट आणि मिल्ल यांचा आधुनिक नैतिक उपपत्ती म्हणून विद्यार्थाना चांगला परिचय करून देणे.

२) कृतीच्या प्रेरणांच्या विश्लेषणाच्या आधारित परिणाम कारक कृतींवर आधारित नैतिकतेचा अर्थ विकसीत करणे.

३) कांटने सांगितलेली नीतिमिमांसा आपणांस अभ्यासता येईल.

४) नीतिशास्त्रीय सुखवाद हा समाजाचा आदर्श कसा आहे ते पाहता येईल.

५) स्वार्थ व परार्थ सुखवादाचा अभ्यास करता येईल.

## ७.१ प्रस्तावना

नीतिशास्त्रात श्रेय, युक्त इ. संकल्पनांच्या अभ्यासाबरोबरच अधिकार व कर्तव्ये यांचाही विचार केला जातो. अधिकार व कर्तव्ये यांचा निकटचा संबंध आहे.

साधारणपणे असे मानले जाते की प्रत्येक अधिकारासोबत कर्तव्य येतेच. डॉ. शं.रा.तळघट्टींच्या मतानुसार एखाद्या परिस्थितीत जी गोष्ट करणे नैतिकदृष्ट्या उचित व आवश्यक असते त्यास कर्तव्य म्हणतात. नैतिक विचारात कर्तव्य संकल्पनेला महत्त्वाचे स्थान आहे. कर्तव्याची व्याख्या पुढीलप्रमाणे देखील केली जाते. 'जे देण्यास वा करण्यास आपण बांधले गेलेले असतो ते म्हणजे कर्तव्य होय.' एखाद्या ग्राहकाने दुकानातून वस्तूची खरेदी केल्यानंतर त्याची योग्य किंमत देणे हे ग्राहकाचे कर्तव्य आहे तर योग्य किंमत घेणे हा दुकानदाराचा अधिकार आहे.

सुखवाद ही एक नीतिशास्त्रीय ध्येयाची व मुल्यांची मीमांसा करणारी उपपत्ती आहे. मानवी जीवनाचे अंतिम ध्येय व त्यांच्या नैतिक वर्तनाचा मानदंड यांना अनुसरुन 'सुखवाद' सांगितला आहे. सुख हेच मानवी अंतिम साध्य आहे. सुखवादानुसार सुखाचा विचार केला पाहिजे. परंतु प्रश्न असा आहे की, स्वतःच्या सुखाचा विचार करावयाचा की सर्वांच्या सुखाचा विचार करावयाचा? जे मत स्वतःच्या सुखाला प्राधान्य दिले पाहिजे असे प्रतिपादन करते, त्या मतास स्वसुखवाद किंवा स्वार्थ सुखवाद म्हणतात. तर जे मत स्वतःपेक्षा इतरांच्या किंवा सर्वांच्या सुखाला प्राधान्य दिले पाहिजे असे प्रतिपादन करते त्यास पर सुखवाद किंवा परार्थ सुखवाद असे म्हणतात.

## ७.२ कर्तव्याचे प्रकार

कर्तव्याचे साधारणपणे दोन प्रकारात वर्गीकरण केले जाते.
१) वैयक्तीक कर्तव्ये २) सामाजिक कर्तव्ये

वैयक्तिक कर्तव्ये म्हणजे अशी कर्तव्ये की जी व्यक्तीच्या जीवनाशी निगडीत असतात. समाजाच्या हितासाठी, प्रयत्न करणे हे सामाजिक कर्तव्य झाले. Clarke या विचारवंताच्या मतानुसार कर्तव्यांचे तीन वर्गात वर्गीकरण केले जाते.

१) आत्मविषयक (स्व-विषयक) कर्तव्ये.
२) अन्य व्यक्तिविषयक कर्तव्य.
३) ईश्वरविषयक कर्तव्ये.

प्रत्येक व्यक्तीच्या स्वतःच्या काही गरजा असतात. त्या गरजांची पूर्ती करणे म्हणजे स्वविषयक कर्तव्य. या गरजा शारीरिक, बौद्धिक असू शकतात.

अन्य व्यक्तिविषयक कर्तव्यांमध्ये आपल्या कुटुंबविषयक कर्तव्यांचा तसेच समाज, राष्ट्र, पर्यावरण विषयक कर्तव्यांचा समावेष होतो. तर ईश्वरविषयक कर्तव्यांमध्ये ईश्वराविषयी प्रेम असणे, आपल्या कृती ईश्वरास समर्पित करणे यासारख्या कृत्यांचा समावेश होतो.

प्रत्येक व्यक्तीची उद्दिष्टे, क्षमता, बुद्धिमत्ता, कार्य करण्याची पद्धती वेगवेगळी असते. प्रत्येकाचे समाजात एक विशिष्ट स्थान असते. ब्रॅड्लेच्या मतानुसार या स्थानानुरुप त्यांची काही विशिष्ट कर्तव्ये असतात. अर्थातच प्रत्येक व्यक्तीची त्याच्या विशिष्ट स्थानानुरुप जरी काही विशिष्ट कर्तव्ये असली तरी काही अशीही कर्तव्ये असतात की जी सर्वांसाठी असतात. उदा. दुसऱ्यांच्या जीवनाला, त्यांच्या स्वातंत्र्याला मान देणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. नीतिशास्त्रात ज्या अनेक उपपत्या मांडल्या आहेत, त्याचे वर्गीकरण सी. डी. ब्रॉडने कर्तव्यवादी नीतिशास्त्र व प्रयोजनवादी नीतिशास्त्र असे केले आहे. ज्या नीतिविषयक सिद्धांतामध्ये कृत्यांची नैतिक युक्तायुक्तता वा कर्तव्यता ही त्याच्या परिणामांच्या चांगले वाईटपणावर अवलंबून नसते, तर ती स्वःअंतर्गत म्हणजे त्या कृत्यातच निहीत असते, असे प्रतिपादिलेले असते त्यास कर्तव्यवादी नीतिशास्त्र म्हटले जाते. याउलट जो सिद्धांत कृत्याची युक्तायुक्तता ही सर्वथा परिणामांच्या चांगले वाईटपणावर आधारित आहे असे प्रतिपादन करते त्यास प्रयोजनवादी नीतिशास्त्र म्हटले जाते.

## ७.३ कांटचे नीतिशास्त्र

कांटचा जन्म २२ एप्रिल १७२४ रोजी जर्मनीतील कोनिग्जबर्ग (Koenigsberg) येथे एका सामान्य कुटुंबात झाला. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात त्याला महान प्रज्ञावंत ज्ञानर्षी मानले जाते. कांटचे नीतिशास्त्र हे कर्तव्यवादी नीतिशास्त्र आहे. कांटने अनेक ग्रंथ लिहिले. त्यातील काही ग्रथांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

1) Critique of Pure Reason
2) Critique of Practical Reason
3) Critique of Judgement
4) Metaphysics of Morals

कांटने त्याच्या तत्त्वज्ञानाद्वारे बुद्धिवाद आणि अनुभववाद यात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे.

### ७.३.१ सत्संकल्प:

नीतिशास्त्रात कितीही नवीन नवीन मते आली तरी त्यातील कोणत्याही मताला कांटने सांगितलेल्या उपपत्तीची उपेक्षा करून चालणार नाही. शाश्वत स्वरुपाचा असा काही नैतिक विचार कांटच्या नीतिशास्त्रामध्ये निश्चीतपणे आहे. कर्तव्यवादी नीतिविचारकांमध्ये तो नेहमीच अग्रगण्य राहील. पण Groundwork of the metaphysics of Morals (नैतिकतेची सत्ताशास्त्रीय आधारभूमी) या पुस्तकाची सुरुवात तो प्राप्तव्याच्या संकल्पनेपासून करतो. कर्तव्यरत असणे हेच परम प्राप्तव्य होय अशा तऱ्हेचा त्याचा अंतिम निष्कर्ष आहे. जिला निःसंदेहपणे नेहमी चांगले म्हणता येईल, संदर्भ कोणताही असला तरी पुढील परिणाम काहीही झाले तरी जिला चांगलेच म्हणता येईल अशी गोष्ट कोणती आहे? कोणती गोष्ट अशी आहे की जी प्राप्त

झाल्यावर आणखी प्राप्तव्य असे काही उरतच नाही. अमक्यासाठी म्हणून चांगली असे नव्हे तर स्वयमेव चांगली आहे, कोणत्याही परिस्थितीत चांगलीच ठरेल अशी गोष्ट कोणती आहे ? या प्रश्नांची उत्तरे त्याने सुरूवातीलाच दिली आहेत.

या जगात अथवा जगाच्या बाहेरही, सत्संकल्पाशिवाय दुसरी कोणतीही गोष्ट अशी नाही, की जिला विना अट निरूपाधिकपणे चांगली म्हणावे. `Nothing can be conceived in this world, or even out of it, which can be called good, without qualification, except o good will'

बुद्धिमत्ता, शक्ती, संपत्ती, किर्ती, रूप, यौवन अशा कितीतरी गोष्टींना चांगले म्हणता येईल. पण त्यांचा चांगलेपणा सोपाधिक असतो. त्याला 'जर...तर'ची मुरड असते. त्याला काही अट असते. बुद्धिमत्ता ही गोष्ट चांगली असते हे खरे. पण त्याला अट आहे. तिचा निट उपयोग केला तरच ती चांगली ठरते. शक्तीसुद्धा चांगलीच गोष्ट आहे. पण दुर्बलांना छळण्यासाठी ती वापरली तर तिला चांगले म्हणता येणार नाही. संपत्ती, रुप इत्यादी बाबतीतही हेच म्हणणे लागू पडते. पण सत्संकल्पाचा चांगुलपणा अशा कोणत्याही बाह्य उपाधींवर अवलंबून नसतो. परिणाम काहीही झाले आणि इतर परिस्थिती कशीही असली तरी सत्संकल्पाला सदैव चांगलेच म्हणावे लागते. एखाद्या रुप-लावण्यवती स्त्रीच्या ठिकाणी सत्संकल्प आढळला अथवा जरा-जर्जर कुरुप स्त्रीच्या ठिकाणी तो प्रतीत झाला तरी एखाद्या स्वयंप्रकाशी रत्नाच्या तेजाप्रमाणे त्याचा चांगुलपणा अविचलच राहतो. निसर्गाचे दातृत्वात कद्रूपणा केला असेल तर (म्हणजे, ती व्यक्ती दुर्बळ, आंधळी, पांगळी अथवा बहिरी असेल तर) एखाद्या व्यक्तीचा संकल्प हा नुसता संकल्पच राहील. तो कृतीत परिणाम पावणार नाही. असे झाले तरी सत्संकल्पाची तेजाळता रतिमात्रही कमी होणार नाही.

सत्संकल्प म्हणजे केवळ चांगली इच्छा नव्हे. इच्छा निराळी, संकल्प निराळा. सर्व माणसे सुखी होवोत अशी नुसती इच्छा करणे सोपे आहे. पण नुसती इच्छा म्हणजे संकल्प नव्हे. इच्छा सफल होण्यासाठी जे जे करणे शक्य आहे ते ते सर्व करण्याची मनापासूनची तयारी, किंबहुना जे जे करण्याचा आंतरिक प्रयत्न म्हणजे संकल्प होय. कैलास पर्वत पाहावा, मानस सरोवर पाहावे, हिमालय पाहावा अशी इच्छा करणे ही एक गोष्ट आहे. आणि हिमालयावर प्रत्यक्ष जाण्याचा संकल्प करणे ही त्याहून भिन्न अशी दुसरी गोष्ट आहे. इच्छेचे रुपांतर कृतीत होईलच असे नाही दरिद्रि माणसाच्या मनोरथाप्रमाणे ती जागच्या जागी विरुनही जाईल. पण काही बाह्य अडथळा आला नाही तर संकल्पाची परिणती कृतीत होतेच. बाह्य अडथळे येऊ न देणे ही आपल्या स्वाधीनची गोष्ट नसल्याने कांट म्हणतो की खरा चांगुलपणा हा संकल्पाच्या ठिकाणीच राहतो.

मग प्रश्न निर्माण होतो की, संकल्प सत् कशामुळे ठरतो ? सत्संकल्पाची नियामक गोष्ट कोणती ? संकल्पात जे उद्दिष्ट अंतर्भूत असेल त्याच्या स्वरुपामुळे तो सत् अथवा चांगला ठरत नाही ही तर कांटची अगदी मूळची भूमिका आहे. इतरांना सुख द्यावे असा माझा संकल्प असेल तर त्या उद्दिष्टांमुळे तो चांगला ठरणार नाही. कारण अशा तऱ्हेचा चांगूलपणा हा आवश्यक स्वरुपाचा नव्हे. तो बाह्य गोष्टींवर

अवलंबून असल्यामुळे स्वप्रतिष्ठ नसतो. त्याचा चांगुलपणा अंतर्गत असावयास हवा. म्हणून कांटने म्हटले की, संकल्पाचा चांगुलपणा त्याच्यात अंतर्भूत असणाऱ्या प्रेरणेच्या स्वरुपामुळे ठरतो. ही प्रेरणा अनुकंपा, करुणा अशांसारख्या नैसर्गिक प्रवृत्तींची असेल तरीसुद्धा त्यातून स्फुरणाऱ्या संकल्पाला नैतिक मूल्य नाही; कारण नैसर्गिक प्रवृत्ती या मानसशास्त्रीय नियमांवर अवलंबून असतात; माझ्या स्वत्वांवर नव्हे. अनुकंपा मला वाटेल किंवा न वाटेल. ती माझ्या ठिकाणी नसल्यास ती मला अथवा आणखी कोणालाही मुद्दाम उत्पन्न करता येणार नाही. कर्तव्यप्रेरणा ही मात्र माझ्या ताब्यातील गोष्ट आहे. 'माझ्या ठिकाणी कर्तव्यबुद्धी नाही; मी काय करु ?' असे कोणालाच म्हणता येणार नाही. **'कर्तव्यासाठी कर्तव्य'** या एकाच भावनेतून जो संकल्प प्रेरित होतो तोच सत्संकल्प होय. कर्तव्य हे करावयाचे ते कशासाठी करावयाचे या प्रश्नास उत्तर नाही; कारण अमक्यासाठी करावयाचे म्हटल्यास ती गोष्ट कर्तव्याची उपाधी ठरेल आणि त्यामुळे कर्तव्याची कर्तव्यता नष्ट होईल. कर्तव्य भावनेविषयी आदरबुद्धी आपल्या मनात असतेच. कर्तव्यासाठी कर्तव्य याचा अर्थ कर्तव्यविषयक वा आदरबुद्धीच्या पोटी केलेले कर्तव्य असा होतो. केवळ कर्तव्यप्रेरणेतून मिळणारा आदेश निरुपाधिक असतो. तो फलनिरपेक्ष अथवा निष्काम असतो. निरुपाधिक आदेशाच्या सिद्धांताने कर्तव्याची ही फलनिरपेक्षता सांगितली जाते. निरुपाधिक आदेशाच्या सिद्धांताच्या अर्थाचा एक भाग आहे.

कांटच्या नीतिशास्त्रीयमीमांसेत, त्याचा निरुपाधिक आदेशाचा सिद्धांत प्रसिद्ध आहे. त्याचा 'क्रिटिक ऑफ प्रॅक्टिकल रीझन' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. नीतिचे सार्वभौमतत्त्व शोधून काढणे व ते प्रस्थापित करणे, हा या ग्रंथाचा प्रमुख उद्देश आहे. माणसाला नैतिक निर्णय घेण्याचा प्रसंग कोणत्या परिस्थितीत येतो व तो निर्णय घेताना, कोणता विशेष बुद्धि व्यापार मनुष्य करतो याचा शोध कांटने घेतला आहे, माणूस काही अंशी पशूसारखा वासनांच्या आहारी जाणारा आहे. तर काही अंशी विवेकशीलही आहे. माणसाचे निर्णय हे वासनात्मक असू शकतात व नैतिक ही असू शकतात. नैतिक निर्णय घेताना काहीतरी लाभण्याची अपेक्षा माणूस ठेवीत नसतो, तर कोणत्या तरी सार्वभौम तत्वाच्या प्रेरणेने मनुष्य नीतिमूल्यविषयक निर्णय घेतो. त्याप्रमाणे वर्तन करतो. कांटच्या नीतिमीमांसेची आधारभूमी पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) कांटचे नीतिशास्त्र स्पष्ट करा.

२) सत्संकल्प स्पष्ट करा.

## ७.४ कांटचा निरुपाधिक आदेशाचा सिद्धांत

कांट हा जगातल्या सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञापैकी एक होय. त्याचे नीतिशास्त्र कर्तव्यवादी वा फलनिरपेक्षवादी, नीतिशास्त्रीय दृष्टिकोनाचे सर्वोत्तम विवरण आहे. त्याचा नैतिक सिद्धांत ''**कर्तव्यासाठी कर्तव्य**'' या तत्वावर भर देणे हा आहे. हा सिद्धांत उपयुक्तवादाच्या संपुर्ण विरुद्ध आहे. कांटचे नीतिशास्त्र हे कर्तव्याची संकल्पना, नैतिक नियम आणि शुभसंकल्प यांचा मध्यबिंदू आहे.

कांटचा बुद्धिवाद प्रामुख्याने योग्य आणि अयोग्य या तत्वाचा विचार करतो. सुखवाद परिणामांना महत्व देतो. तर बुद्धिवादानुसार कृतीची योग्य, अयोग्यता तिच्या हेतूवरुन ठरत असते. कोणतीही कृती कर्तव्यानुसार झाली तर तिचे परिणाम लक्षात न घेता ती कृती इष्ट समजावी. योग्य कृती म्हणजे ती जी कर्तव्यानुसार केली जाते. जी अशी योग्य कृती करते, ती व्यक्ती चांगली व्यक्ती आहे.

सुखवाद सुखद प्रवृत्तींना महत्व देत असतो. तर बुद्धिवाद कर्तव्यांना महत्व देत असतो. सुखवाद भावनेवर आधारीत आहे तर बुद्धिवाद बुद्धिवर आधारीत आहे. सुखवाद योग्य आणि इष्ट यात भेद मानत नाही. ते इष्ट आहे तेच योग्य आहे या उलट कांटच्या मते योग्य (Right) हे इष्ट (Good) पेक्षा उच्च दर्जाचे आहे. एखादी गोष्ट जरी इष्ट वाटली तरी योग्य असेलच असे नाही. त्यांच्या मते, कर्तव्य हे योग्य आहे. कृतीची योग्य, अयोग्यता ठरवित असताना ती कृती कर्तव्यानुसार झाली आहे की नाही ते पाहिले जाते. कोणत्याही परिस्थितीत प्रत्येकाने आपल्या कर्तव्याचे पालन करावयास हवे.

कांटचे नीतिविषयक तत्व प्रामुख्याने 'मेटाफिझिक्स ऑफ मॉरल्स' या पुस्तकात आढळते. या विश्वात शुभेच्छा, शुभसंकल्पना खेरीज (सत् संकलल्पाखेरीज) कोणतीही गोष्ट अंतिम परमशिव नाही. या सिद्धांताने कांट आपल्या नीतिशास्त्राच्या विवरणास प्रारंभ करतो त्याच्या मते, या जगात किंवा या जगाच्या बाहेर नीतिशास्त्र जगाच्या बाहेर देखील सत् संकल्पाशिवाय एकही वस्तू मुलतः किंवा उपाधी शिवाय इष्ट नाही. ज्या गोष्टी सामान्यतः चांगल्या मानल्या जातात. उदा. सुख, भौतिक संपत्ती, प्रभुत्व इत्यादी. त्या वाईट चारित्र्य असलेल्या माणसांत आढळल्या तर त्या एकतर उपयोगी किंवा पूर्णतः अशिल, अर्धम्य, रुप धारण करतात.

उपाधीशिवाय कोणतीही गोष्ट इष्ट राहू शकते काय? हे ठरविण्यासाठी कांटने पुढील दोन निकषांचा आधार घेतला आहे.

अ) जी वस्तू मुलतः अथवा उपाधीशिवाय इष्ट असते त्या वस्तूचा इतरांशी संबंध आल्यास त्याचा परिणाम अनिष्ट होत नाही.

ब) अशा वस्तूंचा अंतर्भाव दुसऱ्या वस्तूमध्ये झाल्यास वस्तू अनिष्ट ठरत नाही.

हे दोन्ही निकष केवळ सत्संकल्पालाच लागू पडतात. मनुष्याच्या नैतिक स्वभावातूनच असा संकल्प उदयास येतो. हा सत्संकल्पच आपल्याला कोणत्याही परिणामांची अपेक्षा न ठेवता कृत्य करण्यास मार्गदर्शन करतो. कृतीची योग्य-अयोग्यता कृतीच्या हेतूवर सर्वस्वी अवलंबून असते. कोणतीही इच्छा म्हणजे संकल्प नाही. नैतिक नियमांचे पालन करण्यासाठी एकमेव हेतूने नैतिक नियमांच्या वृद्धिकरणासाठी माणसाच्या अंतःकरणात झालेली इच्छा म्हणजे शुभसंकल्प (Good will) किंवा सत्संकल्प होय. यात साधारणपणे दोन कृती आढळतात.

१) भावनेमुळे होणारी कृती.

२) तत्वामुळे होणारी कृती.

योग्य कृती ही भावनेमुळे निर्माण झालेली नसते. योग्य कृती ही केवळ तत्वामुळे केली जाते. तेव्हा ती व्यक्ती कोणीही असली तरी ती कृती एकसमान असते. जी कृती बुद्धीनुसार केली जाते, तीच कृती खऱ्या अर्थाने कर्तव्य समजली जाते. बुद्धीनुसार कृती करणे म्हणजे सामान्य तत्वानुसार कर्तव्यासाठी कर्तव्य करणे होय.

कांटच्या मते तत्वानुसार होणारी कृती दोन आदेशामुळे होऊ शकते.

१) सोपाधिक आदेश

२) निरुपाधिक आदेश

### ७.४.१ सोपाधिक व निरुपाधिक आदेश :

सोपाधिक व निरुपाधिक आदेशात पुढील प्रमाणे फरक आहे.

१) सोपाधिक आदेश म्हणजे असे तत्व जे कोणतेही विशिष्ट ध्येय संपादन करण्याकरीता उपयुक्त असते. तर निरुपाधिक आदेश म्हणजे असे तत्व की, जे कोणतेही ध्येय साध्य करण्याकरिता नसून मुलतःच त्याला महत्व प्राप्त होत असते.

२) सोपाधिक आदेश सर्वांना उद्देशून नसतो तर ज्या व्यक्ती विशिष्ट प्रयोजन साध्य मनात बाळगून कार्यरत असतात. त्यांच्यासाठीच असते ज्यांच्या डोळ्यापुढे विशिष्ट उद्दिष्ट असते त्यांनीच त्याचे पालन करायचे असते. या उलट निरुपाधिक आदेश प्रत्येक व्यक्तीस बिनाशर्त उद्देशून सांगितला जातो. आपले हेतू, उद्दिष्ट्ये जरी वेगवेगळी असली तरी त्यांचे पालन करणे आवश्यक आहे.

३) सोपाधिक आदेशाचे स्वरुप जर 'क्ष' हवे असेल तर 'य' करावे असे असते. तर निरुपाधिक आदेशाचे स्वरुप 'अ' कर असे असते.

४) सोपाधिक आदेश सर्व व्यक्तींना मान्य होणे शक्य नाही कारण व्यक्ती तितक्या प्रकृती या तत्वानुसार निरनिराळ्या व्यक्तींना निरनिराळ्या गोष्टींची इच्छा होऊ शकते. निरुपाधिक आदेश मुलतः योग्य असतो आणि म्हणून तो सर्व बुद्धिनिष्ठ माणसाला पटेल असा असतो. नैतिक नियम निरुपाधिक किंवा निरपेक्ष आदेश

असतात. निरुपाधिक आदेशही आपल्याच सद्सद्विवेक बुद्धीने दिलेली अंतिम आज्ञा होय. निरुपाधिक आदेश अमुक एक उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी नसतो. कृतीत अनुस्युत असणाऱ्या तत्वासाठी ती करावी असा आदेश असतो.

५) नैतिक नियम हे एकाच व्यक्तीस नव्हे तर प्रत्येक व्यक्तीस सर्व संभवनीय परिस्थितीत लागू असतो. निरुपाधिक आदेशामध्ये केवळ रुपात्मक साम्य असते द्रव्यात्मक साम्य नसते.

**आपली प्रगती तपासा.**

१) सोपाधिक व निरुपाधिक आदेशातील फरक सांगा.

___

___

___

___

## ७.४.२ निरुपाधिक (निरपेक्ष) आदेशांचे प्रकार (Kinds of Categorical Impreatives):-

कांटच्या मते निरपेक्ष/निरुपाधिक आदेशाचे चार प्रकार असून ते सार्वकालिक व सार्वत्रिक स्वरुपाचे आहेत. ते चार प्रकार पुढील प्रमाणे आहेत.

### १) ''नेहमी अशीच कृती करीत जा की, तिच्यामागील तत्व हे सार्वत्रिक नियम व्हावा अशी इच्छा त्याच समयी तुम्ही करु शकतील" (Always act on that maxim which you can will, at the same time, to become a universal law.)

या आदेशाचा अर्थ असा की, एखादे तत्व नियम म्हणून कधी स्वीकारले जाते? तर जेंव्हा एखाद्या तत्वाचे सार्वत्रीकरण झाले असेल. सर्वच व्यक्तींनी एखाद्या तत्वाला मान्यता दिली की तो नियम बनतो. परंतू एखाद्या तत्वाचे केवळ सामान्यीकरण होऊन चालत नाही. तर अशा तत्वानुसार जे आचरण घडते, त्यापासून कोणती ही विसंगती निर्माण होणार नाही हे ही पाहिले पाहिजे. एखाद्या तत्वाचे आपण सामान्यीकरण केले आणि त्याचा परिणाम हितावह झाला तर अशा तत्वास नैतिक तत्व समजून त्यानुसार आचरण केले पाहिजे. जर का अशा तत्वापासून विसंगती निर्माण होत असेल तर अशा तत्वास अनैतिक तत्व समजून त्याचा त्याग करावा असे कांटचे प्रतिपादन आहे.

या निरुपाधिक आदेशाचा उदाहरणांनी खुलासा करु या. समजा अडचणीत सापडल्यावर सुटका होण्यासाठी पुढे ते मोडण्यासाठी बुद्धीने एखाद्यास काही वचन द्यावे काय असा प्रश्न उपस्थित झाला तर निरुपाधिक आदेशाच्या तत्वाप्रमाणे तसे वचन देऊ नये अथवा दिल्यास ते वचन पाळावे असे निघेल. कारण, वचन पाळण्याचे तत्वच सार्वत्रिक होऊ शकेल. दिलेले वचन मोडावे असा नियम करु गेल्यास वचने दिली-घेतली जाणार नाहीत. आणि मग अर्थात ती मोडताही येणार नाहीत. या आदेशाच्या

तत्वानुसार वचन पाळावे हे कर्तव्य होय असे ठरते. उदा. चोरी करणे आणि सत्य बोलणे। या तत्वाचे सामान्यीकरण करुन ती आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणली तर यातील पहिल्या तत्वापासून समाजात विसंगती निर्माण होते. त्यामुळे अनैतिक ठरते. म्हणून अशा तत्वांचा त्याग केला पाहिजे. याउलट सत्य बोलणे या तत्त्वाचे सामान्यीकरण केल्यास त्याचा चांगला परिणाम होतो. कसलीच विसंगती निर्माण होत नाही. म्हणून अशा तत्वानुसारच वागले पाहिजे असे कांट सूचित करतो. अशाप्रकारे अयोग्य कृती आत्मविसंगत असते.

दुसऱ्याने आपल्याशी जसे वागावे अशी तुझी इच्छा असते तसे तू दुसऱ्याशी वर्तन ठेव अशी एक धर्माज्ञा आहे. तिला सुवर्णनियम म्हणतात. तिचा अर्थ कांटच्या आदेशाशी मिळताजुळता आहे. विल ड्युरंटने म्हटले आहे की, शेजाऱ्याचे आचरण ज्या तत्वाला धरुन असावे अशी आपली इच्छा असते ते नीतीचे तत्त्व होय.

**२) ''अशा रीतीने कृती कर, की तुझ्या कृतीमागील तत्त्व जणू तुझ्या संकल्पामुळे निसर्गनियम बनणार आहे'' (Act as the maxim of your action were to become, through your will, a general natural law.)**

नीतीच्या आदेशात बंधकत्व असते; कारण तो कोणतेही उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी नसतो. याला तो निश्चितार्थक आदेश असे नाव देतो. या ठिकाणी उद्दिष्ट असते. पण त्याच्या बाबतीत 'जर ते असेल तर....' असे म्हणावे लागत नाही. ते उद्दिष्ट वस्तुतः आहे. सुख हे ते उद्दिष्ट होय. सर्व माणसांना साधारण असे उद्दिष्ट आहे. 'सुख मिळवावेस' हा आदेश निश्चितार्थक आहे. माणसांना सुख पाहिजे असते आणि त्याच्यासाठी ती कृती करतात ही वस्तुस्थिती आहे. म्हणून या आदेशाच्या ठिकाणी आवश्यकता आणि बंधकत्व नाही. म्हणून 'सुख प्राप्त करुन घे' असा आदेश नैतिक नव्हे. नीतीच्या आदेशात बंदकत्व असते. कारण तो अमुक एक उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी नसतो. तोच निरुपाधिक आदेश. कृतीत अनुस्यूत असणाऱ्या तत्त्वासाठीच ती करावी असा तो आदेश असतो. ते तत्त्व म्हणजे नियमाच्या नियमपणाचे अथवा सार्वत्रिकतेचे तत्त्व होय.

नैतिकता ही बाह्य परिस्थितीत सामावलेली नसते. नैतिक नियम व्यक्तीवर बाहेरुन लादता येत नाहीत. नैतिकता ही आंतरिक स्वरुपाची असते. जेंव्हा एखादा नियम माझ्यावर बंधनकारक लादला जातो तेंव्हा तो खऱ्या अर्थाने नैतिकदृष्ट्या माझ्यावर बंधनकारक नसतो. परंतु आंतरिक प्रेरणेने, सारासार विचार करुन, निरपेक्ष बुद्धीच्याद्वारे एखादा नियम मी जेव्हा स्वतःवर लादून घेतो, तेव्हाच तो नियम नैतिकदृष्ट्या माझ्यावर बंधनकारक ठरत असतो असे कांटचे प्रतिपादन आहे.

कांटच्या मते ''**कर्तव्यासाठी कर्तव्य**'' करणे किंवा आदेशाचे पालन करणे हाच सद्गुण आहे. सद्गुणच व्यक्तीजीवनातील परम शिवतत्व (Supreme Good) आहे.

**३) ''मनुष्य व्यक्तीला, मग ती स्वतः तू असो वा इतर कोणीही असो केवळ साधन म्हणून न वागविता ती एक साध्यमूल्य आहे या दृष्टीने तुझे आचरण असू दे'' (Act so as to treat humanity whether in your own person or in that of another, always as an end, never merely as a Means.)**

या आदेशाचा अर्थ असा की, तुम्ही स्वतःला मानव समजत असाल तर इतरांनाही मानव समजणारे तुमचे वर्तन असले पाहिजे. समाजातील कोणत्याही व्यक्तीचा धर्म, वंश, जात, लिंग, आर्थिक परिस्थिती या भेदावर साधन म्हणून स्वतःच्या हितासाठी वापर करता कामा नये. वंशावर आधारित केला जाणार काळा-गोरा असा भेद, गुलामगिरी पद्धत, वेश्याव्यवसायाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अशा गोष्टींचा कांट निषेध करतो, कारण अशा गोष्टीत आपण इतर व्यक्तींना आपल्या हिताचे साधन समजतो. दैनंदिन जीवनात आपली इतर व्यक्तींना आपल्या हिताचे साधन समजतो. दैनंदिन जीवनात आपली दृष्टी अशीच असते. रिक्षावाला, हमाल, मोलकरीण, मजूर यांना आपण माणूस न समजता आपल्या हिताचे, गरजपूर्तीचे साधन समजत असतो. कांटच्या मते प्रत्येक व्यक्तीला स्वचःचे साध्य असते. तिचा आपल्याला साधन म्हणून वापर करता येणार नाही. एवढेच नाही तर व्यक्तीला स्वतःलाच स्वतःचे साधन म्हणून वापर करण्याचा नैतिक हक्क नाही. त्यामुळेच कांट आत्महत्या किंवा गैरव्यवहार करण्याच्या प्रवृत्तीचा निषेध करतो. कारण आत्महत्या करणारी व्यक्ती स्वतःच्या फायद्यासाठी स्वतःच्या व्यक्तीमत्वाचा वापर करत असते. म्हणून कांटच्या मते कोणतीही व्यक्ती स्वतःला मानव समजत असेल तर तिने इतरांनाही तसेच समजून वागले पाहिजे. प्रत्येकास इतरांचा साधन म्हणून वापर तर करता येणार नाहीच. परंतु स्वतःस देखील साधन समजता येणार नाही.

प्रत्येक मानवी व्यक्ती हे साध्यमूल्य आहे याचा अर्थ असाही घेता येईल की, माणसाशिवाय ज्या इतर गोष्टींना चांगल्या म्हटले जाते त्या कशासाठी चांगल्या आहेत असे विचारता येते. त्याला उत्तर म्हणून त्या सर्व गोष्टी माणसासाठी चांगल्या असतात असे सांगता येईल. पण माणसाचा चांगलेपणा (म्हणजे सत्संकल्प) कसासाठी असावा; माणसाने चांगले का असावे असे विचारता येत नाही. तो चांगलेपणा अंतिम आहे. निरुपाधिक आहे. सत्संकल्पाचा चांगलेपणा निरुपाधिक आहे हा कांटचा विचार प्रत्येक मानवी व्यक्ती हे साध्यमूल्य आहे या रीतीनेही सांगता येईल.

**४) ''साध्यमूल्यांच्या एका सुरचित जगाला किंवा साम्रज्याचा स्वतःला एक घटक समजून तू आचरण करीत जा.'' (Always act as a member of the kingdom of ends).**

या आदेशाद्वारे कांट असे प्रतिपादन करतो, की प्रत्येक व्यक्तीने साध्याच्या साम्राज्याचे नागरिक म्हणून जीवन जगले पाहिजे. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की साध्याचे साम्राज्य ही स्थलकालविशिष्ट मूर्त संकल्पना नाही. तर साध्याचे साम्राज्य म्हणजे बुद्धिनिष्ठ नैतिक माणसाचा असा समूह आहे की ज्यात संघर्ष, भेदभाव अशा गोष्टींना स्थान नसते. नैतिकतेच्या नियमांचे पालन करणाऱ्या व्यक्तींचा हा समूह

असतो. या साम्राज्याची नागरिक असणारी प्रत्येक व्यक्ती एकाच वेळी दोन प्रकारच्या भूमिका पार पाडत असते. जेंव्हा अशा व्यक्ती समाजाच्या हिताचे नैतिक नियम तयार करत असतात तेंव्हा त्या ईश्वराची किंवा राजाची भूमिका पार पाडत असतात. जेंव्हा आपणच केलेले नियम इतर व्यक्ती ज्या आदरणीय भावनेतून पाळतात, त्याच भावनेतून आपण इतर व्यक्ती पैकीच एक आहोत असे समजून स्वतःदेखील त्या नियमांचे प्रामाणिकपणे पालन करतात. तेंव्हा या व्यक्ती प्रजेची भूमिकादेखील पार पाडत असतात. म्हणून कांटच्या मते प्रत्येक व्यक्तीने अशा साम्राज्याचा किंवा सुरचित जगाचा नागरिक समजून जीवन जगले पाहिजे. कांटचा हा विचार महात्मा गांधीच्या विश्वस्त वृत्तीशी (Trusteeship) मिळता जुळता आहे. गांधीजींच्या मते- ज्या व्यक्तीजवळ जी संपदा आहे तिच्यावर त्याचा हक्क असतोच परंतु त्याने असेही समजले पाहिजे की माझ्या संपदेवर माझ्याएवढाच इतरांचाही समान हक्क आहे. या जगात मी एकटाच नाही इतरही अनेक व्यक्ती आहेत म्हणून माझ्या आचरणाची रीत अशी व्हावी की त्यांनाही ती मान्य व्हावी. अशा परिपूर्ण नैतिक जगात समरुपता असेल. सर्व समान असतील.

**आपली प्रगती तपासा.**

१) पहिला व दुसरा कांटचा निरुपाधिक आदेश थोडक्यात सांगा.

२) तिसरा व चौथा कांटचा निरुपाधिक आदेश थोडक्यात सांगा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

**७.४.३ कांटच्या निरुपाधिक आदेशाचे परीक्षण :-**

१) मानवी स्वभावात दोन प्रमुख घटक आढळतातः बुद्धी आणि भावना. सुखवाद्यांनी केवळ भावनांचाच विचार केला तर बुद्धिवाद्यांनी केवळ बुद्धीचाच विचार केला. म्हणून दोन्ही मते एकांगी आढळतात. आपल्या आयुष्यात भावना देखील महत्वाच्या असतात. वास्तविक कृतीचा उदय भावनेतूनच होत असतो भावना किंवा इच्छा कृतीला प्रेरणा देणाऱ्या असतात म्हणून इच्छांचा अंत केल्यास सर्वच कर्मांचा आणि त्या बरोबर नीतिचाही अंत होईल.

२) कांटच्या मताप्रमाणे भावनांचे आपण निर्मूलन केल्यास नैतिक कर्मातील आशय निघून जाऊन त्या जागी आकारात्मकता असते. कारण त्याने दिलेल्या नीतितत्वाच्या आधारे आपण कोणती कृती करावी यासंबंधी नीट बोध होत नाही. कांटचे तत्व व्यवहारात लागू पडू शकत नाही. हा त्याच्या तत्वातील प्रमुख दोष आहे. प्रत्येक कृतीला सामान्यीकरणाचे तत्व लावून पाहिल्यास जवळ जवळ सर्वच कृती अयोग्य ठरतात. दानशूर माणूस प्रत्येक व्यक्तीने दानशूर असावे अशी इच्छा करु शकत नाही कारण जर प्रत्येक व्यक्ती दानशूर बनली तर दान घेणारा कोणीच उरणार नाही. त्याचप्रमाणे ब्रम्हचर्य प्रत्येकाने पाळावे असे कोणी म्हणणार नाही, कारण त्यामुळे मनुष्य जातच संपुष्टात येईल. व्यावहारिक जीवनात ब्रम्हचर्य,

दानशूरपणा हे सद्‌गुण मानले जातात परंतु या कृती कांटच्या तत्वानुसार अयोग्य ठरतात.

३) कांटचे तत्व आकारात्मक आहे. हे तत्व विशिष्ट प्रकारच्या कृतीशी संबंधीत आहे. कोणत्याही कृतीचा तो परिस्थिती निरपेक्ष विचार करतो. परिस्थिती निरपेक्ष विचार काही कृतीच्या बाबतीत शक्य असला तरी सर्वच कृतीच्या बाबतीत शक्य नाही. काही कृती मूळातच योग्य आहे कारण त्यांचे सामान्यीकरण होऊ शकते, म्हणजे एकदा ती योग्य आहे असे समजून आपण स्वत: तिला अपवाद राहू नये असे कांट समजतो. परंतु रॅशडालच्या मतानुसार आपण कधी विशुद्ध, निस्वार्थी बुद्धीने व विवेक बुद्धीने काही विशिष्ट नैतिक आदेशांना अपवाद ठरतो.

   उदा. आपण अनावश्यक मानवी दु:ख टाळण्यासाठी सत्य घटनांपासून परावृत्त होतो.

४) कांटचे तत्वज्ञान फलनिरपेक्षतावादी वा कर्तव्यवादी आहे. अशा तत्त्वज्ञानात दोन किंवा अधिक कर्तव्याच्या परस्पर संघर्षाच्या समस्या उद्‌भवतात. कांटने त्याचे निरसन करण्याचा प्रयत्न केलेला नाही. कांटचा सामान्य निकष आपल्या नैतिक जीवनातील अडचणीचे निरसन करण्यास पुरेसा नाही.

५) ''**कर्तव्याकरीता कर्तव्य**'' प्रत्येकाने करावे. आपल्या सत्संकल्पाने सांगितलेल्या नैतिक नियमांनुसार प्रत्येकाने आचरण करावे. हे सांगत असताना मनुष्याचे नेमके कर्तव्य कोणते? सत्संकल्प मनुष्याला नेमके काय सांगत असतो हे कांटने स्पष्ट केलेले नाही. म्हणूनच जॅकोबी या विचारवंताने असे सांगितले आहे की, कांटचा सत्संकल्प म्हणजे असा संकल्प होय की जो कोणत्याही गोष्टीचा संकल्प करु शकत नाही.

**आपली प्रगती तपासा.**

१) कांटच्या निरुपाधिक आदेशाचे परीक्षण करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ७.५ सुखवाद/उपयुक्ततावाद (Utilitarianism)

मिल्लने आपल्या नैतिक सिद्धांतास 'उपयुक्ततावाद' (Utilitarianism) असे नाव दिले. केवळ त्या शब्दाचा अर्थ पाहिला तर असा अर्थ निघेल की एखादी कृती युक्त की अयुक्त हे ठरविण्याचा निकष म्हणजे त्या कृतीचे होणारे परिणाम. केवळ शब्दांतून निघणारा हा अर्थ मानल्यास त्यात सुखवाद येतोच असे नाही. पण, ज्यांनी हा शब्द सुरुवातीस वापरला, त्यांनी संबंध सुखवादाशी अनिवार्यतया जोडला. कृतीची

युक्तता तिच्या स्वरुपावरुन अथवा तिच्या मागील प्रेरणेवरुन ठरवायची नसून तिच्या परिणामांवरुन ठरवायची असते आणि प्राप्त परिस्थितीत ज्या कृतीमुळे जास्तीत जास्त सुख निर्माण होईल तीच कृती योग्य होय हे सांगण्यासाठी मिल्लने आपले 'उपयुक्ततावाद' (Utilitarianism) पुस्तक लिहिले.

**७.६.१ सुखवाद म्हणजे काय?:**

मानवाच्या आचरणाचा चांगला - वाईटपणा हा परिणामांच्या सुख-दुःखात्मक स्वरुपावर अवलंबून असतो. असे सांगणाऱ्या नीतिमीमांसेला 'सुखवाद' असे म्हणतात. ''सुख हाच नीतिचा मानदंड असे सांगणाऱ्या ध्येयवादी प्रकाराला सुखवाद असेही म्हणतात.''

'भावनेच्या आदेशाप्रमाणे आचरण करण्यातच व्यक्तीचे आत्मकल्याण समावलेले आहे. असे प्रतिपादन करणाऱ्या सिद्धांतास सुखवाद असे म्हणतात.'

सुखवादाचे अनेक प्रकार सांगितले जातात. तथापि आपल्याला केवळ नीतिशास्त्रीय सुखवादाचे स्वरुप पहावयाचे आहे. सुख हाच नैतिकतेचा अंतिम निकष आहे. सुखाच्या अनुषंगाने व्यक्तीच्या आचरणाचे मूल्यमापन केले पाहिजे असे प्रतिपादन करणारी विचार सरणी म्हणजे नीतिशास्त्रीय सुखवाद होय.

सुखवाद म्हणतो की, सुख हे सर्वोच्च मूल्य आहे, जीवनाचे उच्चतम ध्येय आहे. सुखवादी विचारसरणीचे समर्थन करण्याच्या दृष्टीने सुखवाद्यांनी सुखवादाचे प्रमुख दोन प्रकार केले आहे. १) मानसशास्त्रीय सुखवाद २) नीतिशास्त्रीय सुखवाद.

## ७.६ सुखवादाचे प्रकार

सुखवादाचे प्रकार आपणास पुढीलप्रमाणे पहाता येतील.

**७.६.१ मानसशास्त्रीय सुखवाद : (Psychological Hedonism):**

या उपपत्तीनुसार मानवी जीवनात प्रत्येक व्यक्तीच्या पाठीमागे सुखाची अपेक्षा (इच्छा) असते. मनुष्य जेंव्हा-जेंव्हा इच्छा करतो, तेव्हा-तेव्हा तो सुखाचीच इच्छा करत असतो. धन, वस्तू, सन्मान इ. गोष्टी माणसाला सुखासाठीच हव्या असतात. म्हणून प्रत्येक मानवी इच्छा ही शेवटी सुखेच्छा असते. मानवाचा स्वभाव काय आहे हे मानसशास्त्रीय सुखवाद स्पष्ट करतो. या सुखवादात माणूस प्रत्यक्षात काय करतो? म्हणजेच वास्तव काय आहे. याचे स्पष्टीकरण करण्यात येते.

प्रत्येक मनुष्य सुख इच्छित असतो. सुख सर्वच क्रियांचा हेतु असतो. सुख संपादनाच्या हेतूशिवाय अन्य हेतू मानवासमोर असूच शकत नाही. व्यावहारिक जीवनात निरनिराळ्या व्यक्ती वस्तूंकरिता धडपडत असलेल्या दिसतात. कुणी

ज्ञानप्राप्तीचा प्रयत्न करतात, तर कुणी दुसऱ्याच एखाद्या ध्येयाची सिद्धी करण्याचा प्रयत्न करतात तर कुणी धन प्राप्तीचा प्रयत्न करतात, कुणी सद्‌गुणी बनण्याचा प्रयत्न करतात. प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्यातरी ध्येयासाठी वेडा झालेला दिसतो. परंतु या सर्व ध्येयरुप मानल्या गेलेल्या वस्तू स्वयं अंतिम साध्यरुप नसून दुसऱ्याच कोणत्या तरी ध्येयाची सिद्धी करण्याकरिता साधनरुप आहेत. व ते अंतिम ध्येय म्हणजे दुसरे तिसरे कोणतेही नसून सुख हेच आहे. सुख हे त्याचे एकमेव लक्ष्य आहे. सुखाचा शोध घेणे हा मानवाचा स्वाभाविक धर्म आहे असे मत प्रतिपादन करतो. म्हणजे या विधानाद्वारा मनाचे वास्तववादी चित्र रेखाटतो म्हणून या वादाला मानसशास्त्रीय सुखवाद असे म्हणतात.

प्राचीन काळात सिरॅनिक पंथ तर आधुनिक काळात जेरेमी बेंथॅम व मिल्ल यांनी नीतिशास्त्रीय सुखवादाला मानसशास्त्रीय सुखवादाची बैठक दिली व सुखवादाचे प्रतिपादन केले आहे.

## ७.६.२ नीतिशास्त्रीय सुखवाद (Ethical Hedonism) :-

'सुख' हेच मानवी जीवनाचे अंतिम ध्येय आहे. 'सुख' या नीतिच्या मानदंडावर आचरणाचा चांगला वाईटपणा ठरविला पाहिजे. 'सुख' हे ध्येय मानणाऱ्या विचाराला 'नीतिशास्त्रीय सुखवाद' असे म्हणतात. मनाच्या सुखपूर्ण अवस्था फक्त वांछनीय आहेत व दुःखपूर्ण अवांछनीय. मग त्या कोणत्याही कारणाने निर्माण झालेल्या असोत. हे मत एपिक्यूरस, हॉब्स, बेंथॅम, मिल्ल, सिज्विक इ. विचारवंतानी स्वीकारलेले आहे. परंतु या ठिकाणी प्रश्न निर्माण होतो। की, सुख म्हणजे नेमके काय? दुःखाचा अभाव, इंद्रियजन्य सुख की कोणतीही प्रिय अशी मानसिक अवस्था.

सामान्यपणे असे म्हणता येईल की, जो अनुभव माणसाला इतर कोणत्याही कारणाने नव्हे, तर त्या अनुभवाकरीताच आवडतो तोच सुखदायी अनुभव होय. यालाच नैतिक सुखदायी विचार म्हणतात. नैतिक सुखवाद हे मुल्यात्मक विधान आहे. या सुखवादानुसार प्रत्येक मनुष्याला इतर वस्तूंची इच्छा होवू शकते. पण त्याने सुखाची इच्छा करणे इष्ट आहे. याचाच अर्थ नैतिक सुखवादानुसार सुख वांछनीय आहे.



**नीतिशास्त्रीय सुखवादाचे प्रमुख दोन प्रकार पडतात ते पुढीलप्रमाणे :**

अ) स्व-सुखवाद/स्वार्थ सुखवाद

ब) परसुखवाद/परार्थ सुखवाद/उपयुक्ततावाद

नैतिक सुखवादी उपपत्तीनुसार प्रत्येकाने अधिकाधिक सुख मिळवावे. हे मान्य केले तर असा प्रश्न उपस्थित होते की हे आधिकाधिक सुख कोणाचे असावे ? स्वतःचे की इतराचे ? या प्रश्नावरुन नैतिक सुखवादाचे वरील दोन प्रकार सांगितले जातात.

### ७.६.३ स्व-सुखवाद/स्वार्थ सुखवाद : (Egoistic Hedonism):

स्वार्थ सुखवादास अहकेंद्री सुखवाद असेही म्हणतात. प्रत्येकाने स्वतःच्या सुखाला प्राधान्य दिले पाहिजे व प्रत्येकाने स्वतःसाठी जास्तीत जास्त सुख संपादन करावे असे स्वार्थ सुखवाद प्रतिपादन करतो. सुखप्राप्ती हे नीतीचे ध्येय आहे. असे मत हा स्व-सुखवाद प्रतिपादन करतो, पण हे सुख कोणाचे ? यावर स्व-सुखवाद्यांनी असे मत व्यक्त केले की. हे व्यक्तीचे स्वतःचे सुख आहे.

स्वतःचे सुख प्राप्त करणे हे सुखवाद्यांच्या मते नीतिचे परमोच्च ध्येय आहे या विचार प्रवाहानुसार ज्या कृतीमुळे स्वतःचे जास्तीत जास्त सुख प्राप्त होते ती कृती इष्ट होय. प्राचीन सिरेनिसिझम, चार्वाकाचा सुखवाद किंवा एपिक्युरसचा सुखवाद हे जवळपास याच मताचा पुरस्कार करतात. आधुनिक काळातील या मताचे पुरस्कर्ते म्हणून हॉब्ज, गॅसेन्डी, स्पिनोझा व सिझ्विक हे सांगता येतात.

### ७.६.४ परार्थ सुखवाद/उपयुक्ततावाद : (Altruistic Hedonism):

नैतिक सुखवादाचा दुसरा प्रकार म्हणजे परार्थ-सुखवाद/उपपयुक्ततावाद होय.

**परार्थ सुखवादाचे मुख्य सूत्र :**

''अधिकांश लोकांचे अधिकांश सुख'' (Greatest Happiness of the Greatest Number) हाच नैतिकतेचा निकष होय.

असे मत प्रतिपादन करणाऱ्या विचार प्रवांहास परार्थ सुखवाद असे म्हणतात. या सुखवादानूसार ज्या कृतीमुळे 'अधिकांश लोकांचे अधिकांश सुख' साधले जाईल अशीच कृती नैतिक समजून तिचा स्वीकार केला पाहिजे. या विचार सरणीत कृतीचा परिणाम किंवा उपपयुक्तता लक्षात घेतली जाते. म्हणून या विचारांस '**उपयुक्ततावाद**' असेही म्हणतात.

उपयुक्ततावादाचे अगदी जवळून निरीक्षण केल्यास उपयुक्ततावाद हा तीन महत्वपूर्ण मुद्यांचा विचार करीत असलेला दिसून येतो. पहिला प्रश्न असा की योग्य

कृती कोणती ? उत्तमोत्तम परिणाम ज्या कृतीमुळे घडून येतात त्या कृतीला योग्य कृती असे म्हणतात. हे पहिल्या प्रश्नाला उपयुक्ततावादाने दिलेले उत्तर आहे. दुसरा प्रश्न असा की कोणते परिणाम नैतिक मोलाचे आहेत? सुख आणि सुख फक्त नैतिक मोलाची वस्तू आहे हे त्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर आहे. नैतिक मोल किंवा किंमत मोजण्याचा निकष कोणता? हा तिसरा प्रश्न असून ''अधिकांश लोकांचे अधिकांश सुख'' हा निकष आहे असे त्या तिसऱ्या प्रश्नाला उत्तर आहे.

या सिद्धांतात अंतर्निहित असलेली अमूर्त कल्पना अठराव्या शतकातील मॅकेन्झी, शॉप्टसबरी व बटलर यासारख्या नीतिपंडितांच्या लिखाणातून स्पष्ट रुपात मांडली गेली आहे. स्वतःचे विचार जगासमोर ठेवण्याची महत्ववाची दोन कारणे होती. एकतर त्यांना हॉब्जचा स्वार्थसुखवाद खंडित करावयाचा होता. दुसरे असे की मनुष्य हा स्वभावतःच दुसऱ्याच्या भल्याचा विचार करतो, दुसऱ्याचे हित विचारात घेऊन जीवन जगतो. म्हणजे परसुख किंवा सहानुभूती ही मानवी जीवनाशी अविभाज्यपणे संबद्ध आहे. हे त्यांना सिद्ध करुन दाखवावयाचे होते. हिटचसने (Hutcheson) ''नैतिक आचाराचे वास्तव किंवा भौतिक ध्येय अधिकांश लोकांचे अधिकांश सुख हे आहे.'' या विधानाच्या रुपाने वरील परार्थसुखवादी विचारसरणीला निश्चितपणा प्रदान केला व पुढे हेच विधान इंग्लंडमधील सिज्वीक, बेन्थॅम व मिल्ल या नीतिपंडितांनी स्वतःच्या नैतिक विचारसरणीचे ध्येयवाक्य म्हणून उचलून धरले व त्याच्या आधारावर स्वतःचे नैतिक विचार मांडले आहेत.

या ठिकाणी आपण जेरेमी, बेन्थॅम व जे. एस. मिल्ल या दोन विचारवंतांच्या नीतीशास्त्रीय सुखवादाविषयक भुमिकांचा परामर्श घेणार आहोत.

**आपली प्रगती तपासा.**

१. सुखवाद म्हणजे काय ?

२. सुखवादाचे प्रकार सांगा.

३. मानसशास्त्रीय व नीतिशास्त्रीय सुखवाद स्पष्ट करा.

४. स्व सुखवाद व परार्थ सुखवाद स्पष्ट करा.

## ७.७ जेरेमी बेंथॅमचा परार्थ/नीतिशास्त्रीय सुखवाद (परिणामात्मक उपयुक्ततावाद)

जेरेमी बेंथॅम या ब्रिटिश तत्वज्ञाने सुखवादाची मुलतत्वे शोधावी यासाठी नीती आणि कायदे यांची मुलतत्वे हा ग्रंथ लिहिला. त्यांची मूळ भूमिका नीतीशास्त्राची नसून

विधीशास्त्राची होती. परंतू त्यातूनच त्यांनी सुखनिष्ठ उपयुक्ततावाद किंवा सार्वत्रिक सुखवाद सांगितला आहे.

**बेंथॅमचा नीतिशास्त्रीय सुखवाद :-**

बेंथॅम हा परार्थ सुखवादी विचारसरणीचा असला तरी तो आपल्या विचारात स्वार्थ प्रवृत्तीकडे झुकलेला दिसतो. म्हणून त्याच्या विचारात स्वार्थधिष्ठित परार्थ सुखवाद असे म्हणतात.

बेन्थॅमच्या मतानुसार प्रत्येक व्यक्तिच्या ठिकाणी स्वः प्रेम (Self Love) व पर प्रेम (Benevolence) अशा दोन सहज प्रवृत्ती दिसून येतात. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास प्रत्येक व्यक्तिची स्व प्रेमाची भावना अधिक प्रबळ असते. कारण जेंव्हा अधिक निर्णायक परिस्थिती निर्माण होते. तेंव्हा व्यक्तिला परप्रेमाच्या तुलनेत स्व-प्रेमच अधिक महत्वाचे वाटते.

माणसाचे कल्याण कशात आहे हे नुसतेच कल्पनेने ठरविणे मान्य नाही. बेन्थॅमच्या मते, प्रत्येक माणून सुखाच्या मागे लागला आहे. निसर्गानेच तशी रचना केली आहे. या नैसर्गिक रचनेचा आधार घेवून सुखवादास बेंथॅमने परमप्राप्तव्य मानले आहे. त्यांची सुखवादाची विचार सरणी मानसशास्त्रीय सुखवादावर आधारलेली आहे. म्हणून त्यांच्या विचारसरणीला मानसशास्त्रीय सुखवाद असे म्हटले जाते. पण त्यांनी नीतीशास्त्रीय सुखवाद सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या विचारसारणीला सुखनिष्ठ उपयुक्ततावाद किंवा सार्वत्रिक सुखवाद किंवा उपयुक्ततावाद अशी नावे असली तरी त्याच्या विचारात कृतीच्या उद्दिष्टांना म्हणजेच ज्या कृतीचे परिणाम अधिकाधिक सुख देणारे असतील ती कृती वा तिची उपयुक्तता चांगली ‘अधिकतम लोकांचे अधिकतम हित (सुख)’ असा उपयुक्ततावादाचा दृष्टिकोन त्यांच्या विचार सरणीचा आहे. परंतू सुख हे परम प्राप्तव्य का मानावे? याचे स्पष्टीकरण बेंथॅमने दिलेली नाही. बेंथॅम म्हणतो की, सुख आणि दुःख या दोन सार्वभौम अधिपत्याच्या प्रभूत्वाखाली निसर्गाने माणसाला ठेवले आहे. माणसाची ओढ केवळ सुखाकडे व दुःख टाळण्याकडे आहे असे त्यांचे मत आहे.

बेंथॅमने सुखाची एकूण सात मोजमापे सांगितली. या सात परिमाणांच्या आधारावर सुखाचे मोजमाप करुन कृतीची युक्तता ठरवावी. सुखाचा आकार लक्षात घेवून त्याने ती मोजमापे पुढीलप्रमाणे सांगितली आहेत -

१) तीव्रता. (Intensity)

२) दीर्घकाळता. (Duration)

३) फलद्रुपता. (Fruitfulness)

४) निश्चितता (Certainity)

५) शुद्धता (Purity)

६) निकटता (Nearness)

७) व्यापकता (Extensity)

बेंथॅमच्या सुखवादामध्ये कृतीच्या उद्दिष्टाला महत्व आहे. कर्त्याचा हेतू गौण आहे. मानवी सुखाची विपुलता हे उद्दीष्ट आहे. नैतिकतेचे मोजमाप या उद्दिष्टांच्या अनुरोधानेच करावे. बेंथॅम हा उपयुक्ततावादी आहे. त्याच्यापुढे अखिल मानवाच्या जास्तीत जास्त सुखासाठी मानवास उद्युक्त कसे करावयाचे हा प्रश्न आहे. स्वतःचे सुख मिळविणे ही नैसर्गिक प्रेरणा आहे. त्यातूनच सुख कसे निर्माण करता येईल. त्याला बेंथॅमने नीतीचे अनुशासक (Sanctions of Morality) असे म्हटले आहे.

नीतिला अनुसरुन असणाऱ्या आचरणासाठी प्रेरणा कुठून आणायची हा बेंथॅमपुढे प्रश्न होता. उपयुक्ततावादाच्या दृष्टीने ज्या कृती युक्त होत आणि ज्या कृती उपयुक्त यांच्या बाबतीत जाणीवपूर्वक भावना निर्माण करण्यात येते, असे बेंथॅमचे मत आहे. त्यामुळेच अधिकांचे अधिक सुख (बहुतांचे बहुत सुख) या आदर्शकडे पोहोचता येईल. 'जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त सुख किंवा अधिकात्म लोकांचे अधिकात्म सुख' (Greatest happiness of the greatest number) या तत्वाचा त्याने उपयोग केल्यामुळे त्याच्या नैतिक विचाराला सार्वत्रीक सुखवाद किंवा उपयुक्ततावाद असे म्हणतात.

सुखाचे मोजमाप करताना त्याचे पुढील गुणधर्म लक्षात घ्यावे असे बेंथॅमचे म्हणणे आहे.

### ७.७.१ बेंथॅमची सुखावरील मोजमापे पुढीलप्रमाणे :-

**१) तीव्रता (Intensity) :**

दोन सुखांपैकी जे सुख आपल्याला अधिक तीव्रतेने जाणवते त्या सुखाचे परिणाम अधिक असते. असे सुख ज्या कृतीतून निर्माण होते तीच कृती नैतिकदृष्ट्या श्रेष्ठ समजावी अर्थात ही तीव्रता संदर्भानुसार बदलणारी असू शकते. सौम्य सुखापेक्षा तीव्र सुख अधिक आकर्षक असते. उदा. अन्न सेवनातून मिळणारे सुख हे कादंबरी वाचनातून मिळणाऱ्या सुखापेक्षा तीव्र वाटत असेल तर अन्न सेवन हे नैतिकदृष्ट्या श्रेष्ठ समजावे. जेष्ठ मधापेक्षा मधाची गोडी तीव्र असते.

**२) दीर्घकाळता (Duration) :**

दोन सुखांपैकी जे सुख अधिक काळ टिकणारे असते ते श्रेष्ठ समजावे. अल्प कालीन टिकणाऱ्या सुखापेक्षा दिर्घकालीन टिकणारे सुख हे अधिक प्रिय असते. फटाके उडवण्याच्या सुखापेक्षा फराळाचे जिन्नस खाण्यातील सुख अधिक टिकते.

**३) फलद्रुपता (Fruitfulness) :**

काही सुखे ही निव्वळ सुखे असतात. त्याच्यापासून काहीही नवनिर्मिती होत नाही. परंतु काही सुखे अशी असतात की, जी स्वतःपासून इतर सुखाची निर्मिती करतात. अशा सुखानाच श्रेष्ठ समजावे.

**४) निश्चितता (Certainity) :**

अनिश्चित सुखापेक्षा जे सुख निश्चित असते तेच श्रेष्ठ समजले पाहिजे. झोपणे या सुखापेक्षा फिरावयास जाण्याचे सुख पसंत करावे कारण फिरण्यामुळे सुख तर मिळते पण आरोग्याचेही सुख मिळते.

**५) शुद्धता (Purity) :**

दुःख मिश्रित नसलेले सुख हे दुःखमिश्रित सुखापेक्षा अधिक चांगले असते. अनेक दुःखे सोसून धंद्यात खूप नफा मिळवण्यापेक्षा धोपटमार्गी कमी पगाराची नोकरी पत्करावी.

**६) निकटता (Nearness) :**

दुरस्थ सुखापेक्षा समीप असणारे सुख परिणामदृष्ट्या श्रेष्ठ असते. म्हणूनच असे म्हणता येईल की, हातचे सोडून पळत्याच्या मागे लागू नये. काही काळानंतर मिळणाऱ्या सुखापेक्षा ताबडतोब मिळणारे सुख अधिक पसंद केले जाते. चार वर्षांनी काश्मीरची सफर करण्यापेक्षा यंदा महाबळेश्वरला जाणेच बरे.

**७) व्यापकता (Extensity) :**

दोन सुखांपैकी ज्या सुखाचा परिणाम जास्तीत जास्त लोकांवर होतो, त्या सुखाचे मोजमाप अधिक असते. असे सुख ज्या कृतीतून निर्माण होते तीच नैतिक समजावी.

अशा प्रकारे या सात परिणामांच्या आधारावर सुखाचे मोजमाप घेऊन आचरणाची शुद्धाशुद्धता ठरवावी. या पद्धतीप्रमाणे जे आचरण अधिकांश व्यक्तींच्या अधिकांश सुखसंपादनात उपयुक्त ठरेल ते सदाचरण समजले जाते. म्हणून या वादाला उपयुक्ततावाद असे म्हणतात.

या सर्व गुणधर्मावर विचार करुन सुखाची निर्मिती करावी. असे सांगितल्यावर सुखाचे वाटप करण्यासाठी त्याने न्यायाचे एक तत्व सांगितले. ''प्रत्येक माणसाला एक म्हणून मोजावे आणि कोणालाही तो इतराहून कोणी अधिक आहे, असे मोजू नये.'' (Every one is to count for one and nobody for more than one).

उपयुक्ततावादी नैतिक विचारात कृतीच्या उद्दीष्टांना महत्व असते. अधिकाधिक मानवी सुख प्राप्त करणे हे कृतीचे उद्दिष्ट होय कृतीच्या उद्दिष्टांमूळे मिळणाऱ्या सुखासंबंधी उपयुक्ततावादी तत्ववेत्याला विचार करण्याचे कारण नाही. त्याचा मुलभूत प्रश्न नैसर्गिक प्रेरणेचा उपयोग करुन असे कोणते उपाय योजावेत की, ज्यांमुळे व्यक्तीच्या स्व-सुखार्थ केलेल्या प्रयत्नांतून आपोआपच सार्वजनिक सुखाचा

संचय वाढ होत जाईल. बेंथॅम व मिल्ल यांना फक्त नैतिक कृती करण्यास व्यक्तीस कसे उद्युक्त करता येईल ? हा महत्वाचा प्रश्न वाटतो.

बेंथॅमने उपयुक्ततावादी विचारात ज्या रीतीने व्यक्तीला सार्वजनिक सुखात भर घालण्यासाठी उद्युक्त करता येईल. त्या रीतींना नीतिचे अनुशासन असे म्हटले जाते. उपयुक्ततावादाच्या दृष्टीने कृती युक्त होते आणि ज्या कृती अयुक्त आहेत याबाबत जाणीवपूर्वक भावना समाजात निर्माण करण्यात येते हेच नीतीचे आंतरिक अनुशासन होय. कारण या भावना सद्सद्विवेक बुद्धीकडून निर्माण होतात. यामूळेच बहुतांचे बहुत सुख किंवा पुष्काळाचे पुष्कळ सुख या उद्दिष्टाकडे पोहचता येईल. या बरोबरच बेंथॅमने नीतिच्या बाह्य अनुशासकांविषयी विचार मांडले आहेत. त्यांच्या मते, बाह्य अनूशासके ही शासकीय सामाजिक, धार्मिक क्वचित नैसर्गिक ही असू शकतात.

जर व्यक्ती स्वार्थ प्रवृत्तीची आहे तर मग ती व्यक्ती परार्थासाठी का झटते ? या प्रश्नाला उत्तर देतांना बेन्थॅम म्हणतो की, चार प्रकारच्या नीती प्रेरकांमुळे व्यक्ती स्वार्थी असून देखील परार्थासाठी झटते. ती चार नीतिप्रेरके (अनुशासके) पुढीलप्रमाणे

## ७.७.२ नीतिप्रेरके/अनुशासके :

अ) नैसर्गिक/भौतिक अनुशासके ब) राजकीय अनुशासके क) सामाजिक अनुशासके ड) धार्मिक अनुशासके

नीति-अनुशासकाची (प्रेरकाची) कल्पना ही मुख्यतः नीतीकडे पाहण्याच्या वैध वा वैधानिक दृकष्टकांनातून पुढे आलेली दिसते. म्हणजेच तिच्या बाह्य नियमात्मक अधिकाराशी निकट संबंध आहे. अनुशासक याचा मूळ अर्थ दृढीकरण वा स्थिरीकरण करणारा घटक. या दृष्टीने कायद्यांना बळकटी आणून त्यांची कार्यवाही प्रभावी करणाऱ्या शिक्षेला उद्देशून अनुशासक ही कल्पना मांडली गेली. नीति-अनुशासकांची चर्चा बेंथॅम व मिल्ल यांनी विस्तृतपणे करुन अनुशासकाच्या मूळच्या अर्थाचा नैतिक विचारात विस्तार केला, त्यानुसार कर्तव्यविषयक नियमांना दृढता प्राप्त करुन देणाऱ्या कोणत्याही गोष्टींना, म्हणजेच कर्तव्याचरणास प्रेरक असलेल्या हेतूंना, नीति-अनुशासके किंवा नीति-प्रेरके असे म्हटले जाते. सुखवादानुसार सुखमय व दुःखमय या मूलभूत प्रेरणा असल्याने अनुशासकेही सुख-दुःखकारक स्वरुपाची असतात.

बेंथॅमने अनुशासकांचे चार प्रकार सांगितलेले आहेत. शारीरिक, राजकीय, नैतिक व धार्मिक.

### अ) नैसर्गिक/भौतिक अनुशासके :

जेव्हा सुख वा दुःख निसर्गतः ओघाने प्राप्त होते तेव्हा त्यास शारीरिक अनुशासक म्हणतात. उदा. अजीर्णाने होणारे क्लेश. निसर्ग नियमानुसार येणारी काही सुखे आणि दुःखे आपल्या नैतिक आचरणाला प्रेरणा देतात. उदा. अतिरेकी सुखोपभोगांनी आपली गात्रे शिथिल होतात आणि त्यांचे सुखोपभोगाचे सामर्थ्यच क्षीण

होते ही गोष्ट त्या अतिरेकापासून आपल्याला वाचविण्यास कारणीभूत होते. यात संकल्पाचा किंवा अध्यवसायाचा संबंध नसतो.

**ब) राजकीय अनुशासके :**

कायदेभंगास होणारे सरकारी शासन हे राजकीय अनुशासकाचे उदाहरण होय. चोरी, खून इत्यादि गुन्ह्यांना शासनसंस्थेचे प्रतिनिधी दंड देतात आणि त्यामुळे आपण त्या कृत्यापासून अलिप्त राहतो. यात शासकाच्या अध्यवसायाचा संबंध येतो.

**क) सामाजिक अनुशासके :**

अधिकार नसलेल्या अशा सर्वसामान्य जनांच्या अध्यवसायाचा जेथे संबंध येतो तेथे नैतिक अनुशासक प्रभावी असते. समाजातील व्यक्ती स्वार्थी आचरणाची निंदा करतात आणि परोपकारी आचरणाची स्तुती करतात. उदा. वाळीत टाकणे, नैतिक बाबतीत स्तुती अगर निंदा करणे इत्यादी.

**ड) धार्मिक अनुशासके :**

जेव्हा सुखदुःखांचा संबंध दैवी ईहेशी जोडला जातो तेव्हा ते धार्मिक अनुशासक म्हटले जाते. परमेश्वर सत्कर्माबद्दल बक्षीस देतो आणि दुष्कर्माबद्दल दंड देतो या विश्वासामुळेही माणसे सत्कर्माकडे ओढली जातात आणि दुष्कार्मापासून अलिप्त राहतात. उदा. स्वर्ग, नरक इत्यादी.

वरील विवेचनावरुन असे दिसून येते की, व्यक्तीच्या केवळ नैतिकच नव्हे तर सामाजिक, राजकीय, धार्मिक अशा सर्वांगीण जीवनात व तत्संबंधी विचारांतही अनुशासक ही संकल्पना महत्वाची आहे. तिच्या चर्चेचे श्रेय बेंथॅम व मिल्ल यांच्याकडे असले तरी इतर नीतिशात्रज्ञांच्या विचारातही ती व्यापक अर्थाने भिन्न-भिन्न रुपात अभिप्रेत आहेतच. जेथे नैतिक अधिकाराचा प्रश्न उद्‌भवतो तेथे नीति-अनुशासकेही आलीच- मग ती बाह्य, आंतरीक वा अन्य कोणत्याही स्वरुपाची असोत. अनुशासक ही कल्पना मुख्यतः 'बक्षीस व शिक्षा' या मानसशास्त्रीय तत्त्वांवर आधारलेली असल्याने सर्वसामान्य जनांच्या वर्तनास लागू पडते, पण हीच तिची मर्यादाही आहे. 'श्रेष्ठांच्या नीती'ला (संत वा साधुपुरूष) ती लावता येत नाही.

या चार नीती प्रेरकांकडे बक्षिस व शिक्षा अशा दोन शक्ती असतात. मनुष्याचा स्वभावच असा असतो की त्याला बक्षिस प्रिय व शिक्षा अप्रिय असते.

**आपली प्रगती तपासा**

१) सुखाची मोजमापे (परिमाणे) कोणती ?

२) नीतिशास्त्रातील उपयुक्ततावादातील नैतिक अनुशासके कोणती ?

३) बेंथॅमचा नीतिशास्त्रीय सुखवाद काय आहे ?

### ७.७.३ परिक्षण:

बेंथॅमने सुचविलेली सुखाची मोजमापे व्यावहारिक नाही. त्यांचा कृतीमध्ये वापर करणे शक्य नाही. बेंथॅमच्या मतानुसार दु:खापेक्षा सुखची मात्रा अधिक असणे ही त्या कृतीच्या योग्यतेची निश्चिती होय. उलट सुखापेक्षा दु:खाची मात्रा अधिक असणे त्या कृतीच्या अयोग्यतेची निश्चिती होय. बेंथॅम म्हणतो. 'सुख मोजा व दु:ख मोजा, जे शिल्लक असेल त्यावरुन कृतीच्या योग्यायोग्यतेचा प्रश्न सुटेल.' परंतु सुख किंवा दु:ख या मानसिक घटना असल्यामुळे त्याचे व्यक्तिबाह्य अशा साधनानी मोजमाप करणे शक्य नाही.

सुखालाच माणसाचे परमप्राप्तव्य का मानावे? म्हणून याचा विचार बेंथॅमने केला नाही. त्याच्या मते, प्रत्येक माणूस सुखाच्या मागे आहे. प्रत्येकास अनुभवास येते. मानवी मनाच्या रचनेचा नैसर्गिक आधार घेऊन सुखालाच माणसांचे परमप्राप्तव्ये बेंथॅमने मानले आहे. म्हणूनच बेंथॅमच्या विचारसारणीला ''मानसशास्त्रीय सुखवाद'' असे म्हटले जाते. तर माणसाच्या विशिष्ट मनोरचनेमुळे ते सुखाची इच्छा करीत असतील तर तशी इच्छा करणे हा मानसशास्त्रीय नियम होईल. त्याला नैतिक उपपत्ती म्हणता येणार नाही. माणसाने सुखाची इच्छा का करवी? याचा शोध घेतला तर तो नैतिक सिद्धांत म्हणून मानता येतो. असा प्रयत्न जॉन स्टूअर्ट मिल्ल याने केला. तसा प्रयत्न बेंथॅमच्या लिखाणात आढळत नाही.

बेंथॅमने मानवाच्या नैसर्गिक प्रेरणेवर भर देऊन अधिकाधिक सुख मिळविणे एवढेच उद्दीष्ट समोर ठेवले. त्यामुळे त्याच्या विचार सरणीला मानसशास्त्रीय सुखवाद असे म्हणतात. परंतु सुख प्राप्त करणे ही एक नैसर्गिक प्रेरणा होय. तिला माणसाचे परमप्राप्तव्य का मानावे? याचे समर्थन करण्याचा प्रयत्न बेंथॅमने केला नाही.

बेंथॅमच्या मते, उपयुक्ततावादाचे नैतिक ध्येय परसुख आहे आणि तोच असेही म्हणतो की, परसुखसंपादनात आपले सुख साधले जाते. म्हणून आपण परसुखार्थ झटतो किंवा झटावे. परंतु या दोन विधानांमध्ये विरोध दिसून येतो. पहिल्या विधानात परसुख साध्य ठरते तर दुसऱ्या विधानात तेच परसुख स्वसुखसंपादनाचे साधन असल्याचे दिसून येते. याप्रमाणे बेंथॅमचा परार्थसुखवाद शेवटी स्वार्थसुखवादात अंत पावतो. म्हणूनच बेंथॅमच्या नैतिक सुखवादाला परार्थसुखवाद म्हणताना स्वार्थाधिष्ठित परार्थसुखवाद म्हणून मानावे लागते.

### आपली प्रगती तपासा

१) बेंथॅमच्या नीतिशास्त्रीय सुखवादाचे परिक्षण स्पष्ट करा.

## ७.८ मिल्लचा उपयुक्ततावाद / गुणात्मक उपयुक्ततावाद (Mill's Utilitarianism)

जॉर्ज स्टूअर्ट मिल्ल हा एक इंग्रज तत्वज्ञ व नीतीपंडित होता. त्याने आपल्या नैतिक सिद्धांतास 'उपयुक्ततावाद' असे नाव दिले. त्याच्या नैतिक सिद्धांतानुसार कृतीच्या युक्तायुक्तेचा एकमेव निकष म्हणजे कृतीचा परिणाम होय. ज्या कृतीमुळे जास्तीत-जास्त लोकांचे सुख निर्माण होईल ती कृती योग्य होय. हे मत प्रतिपादन करण्यासाठी त्याने 'उपयुक्ततावाद' (Utilitarianism) हे पुस्तक लिहिले.

जॉर्ज स्टुअर्ट मिल्ल ने उपयुक्ततावादी किंबहुना नीतीशास्त्रीय सुखवादाचा पूरस्कार केला आहे. बेन्थॅम प्रमाणेच 'पूष्कळांचे पुष्कळ सुख' किंवा 'अधिकतम लोकांचे अधिकतम सुख' येथे साध्य होईल, तेच नैतिकदृट्या चांगले असे मिल्ल मानतो, परंतु बेंथॅमच्या विचारापेक्षा मिल्लचे विचार काही बाबतीत भिन्न आहेत. बेंथॅमने सुखाचे जे गणित सांगितले त्यात सुखाच्या परिणांमाचाच केवळ विचार केला असून सुखाच्या गुणवत्तेचा विचार केला नाही. त्यामुळे मिल्लचा उपयुक्ततावाद बेंथॅमच्या उपयुक्ततावादापेक्षा वेगळा ठरतो.

मिल्लच्या मते, निसर्गातच सर्व माणसे सुखाच्या पाठीमागे असतात. असा सर्वत्र अनुभव येतो. प्रत्येक माणसाला सुख हवे असते हे सिद्ध करण्यासाठी त्याने पुढीलप्रमाणे युक्तीवाद केला.

''**जे पाहिले जात असते ते पाहण्यायोग्य असते, जे ऐकले जात असते ते ऐकण्यायोग्य असते, जे इच्छीत असते ते वांछण्यायोग्य (इच्छीण्यायोग्य) असते, सर्व लोक सुख इच्छीतात, म्हणून सुख इच्छीण्यायोग्य असते.**''

वरील युक्तीवादाप्रमाणे मिल्ल सुखवाद सिद्ध करतो. त्याने ''आपण जे जे इच्छीतो ते आपले सुख '' अशी सुखाची व्याख्या केली. या व्याख्येमधील सर्व माणसे सुखाच्या पाठीमागे असतात. हे विधान सिद्ध होत नाही. मिल्लच्या व्याख्येमध्ये अनेक दोष आढळून येतात. त्याच्या युक्तीवादात चक्रीय दोष निर्माण झाला आहे. माणूस कशाची इच्छा करतो? या प्रश्नाचे उत्तर तो सुखाची इच्छा करतो असे मिल्लचे मत आहे. पुन्हा सुख म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर माणूस ज्या कशाची इच्छा करतो ते मिल्लच्या या उत्तरातून काही एक निष्पन्न होत नाही.

इच्छीत गोष्ट प्राप्त झाल्यावर प्रत्येकाला इष्ट प्राप्तीचे सुख असते. कारण सुखाचा विचार घेण्यापूर्वी माणसाच्या एखाद्या गोष्टीची ही इच्छा होते.

उदा. भूकेलेल्या माणसाला अन्नाची इच्छा होते. अन्न मिळून तृप्ती झाल्यास त्याला सुख प्राप्त होईल. म्हणजेच अन्नाची इच्छा हे सुखाचे कारण आहे. सुखामुळे इच्छा केली जाते. हे म्हणणे चूकीचे आहे. मिल्लने सदैव सुख हवेच असते. हे एक मानसशास्त्रीय सत्य आहे, असे वाटू लागते.

मिल्लने मांडलेल्या मानसशास्त्रीय सुखवादातून त्याला नीतीशास्त्रीय सुखवाद उभा करायचा आहे. 'सुख हेच प्राप्तव्य आहे' हे त्याने पुढील युक्तीवादामध्ये सिद्ध केले.

**'एखादा पदार्थ दृश्य आहे, त्याला पुरावा म्हणजे तो पदार्थ प्रत्यक्ष दिसतो हाच आहे. याहून दुसरा असूच शकत नाही. माणसे सुखाची इच्छा करतात, याला पुरावा म्हणजे प्रत्यक्षात आपणास तसे दिसतेच हा होय. त्यामुळे सुख ही गोष्ट इच्छा करण्यास योग्य अशीच आहे.'**

एखाद्या गोष्टीची इच्छा केली जाते. त्यावरून तशी इच्छा करणे योग्य आहे. असे सिद्ध होत नाही. दिसणे आणि दृश्य या दोन शब्दातील संबंधासारखा संबंध एखादी गोष्ट इच्छिणे आणि एष्टव्य (इच्छा) या दोन शब्दातील संबंध सारखे नाहीत. मिल्लने वरील युक्तीवादात 'सुख हे इष्ट आहे' हे सिद्ध केले असेल परंतु सुख हे इच्छा करण्यास योग्य आहे का? हे मात्र मिल्लने सिद्ध केले नाही. सुख हीच चांगली गोष्ट आहे. असे मानले तर जितके सुख अधिक तितकेच ते अधिक चांगले आणि म्हणून आपण ते अधिकाधिक पसंत करणे असे निष्पन्न होईल. परंतु मिल्लने असे म्हटले आहे की, **'सुखात लोळणाऱ्या डूकराच्या आयुष्यापेक्षा दुःखात होरपळणाऱ्या माणसाचे आयुष्य पसंत करावे. मुर्ख माणसाच्या समाधानी आयुष्यापेक्षा असमाधानी सॉक्रेटिसचे जीवन अधिक चांगले.'**(It is better to human being dissatisfied than Pig satisfiled. It is better to be Socrates, dissatisfied than a fool Satisfied). याचाच अर्थ सुखात प्रकारभेद आहे. मिल्लचे म्हणणे असे की माणसाने केवळ अधिक सुख मिळवावे असे नाही तर, सुखाच्या दर्जाचाही त्याने विचार करावा, वरच्या प्रतीचे थोडे सुख हे खालच्या प्रतीच्या केवढ्याही मोठ्या सुखापेक्षा अधिक चांगले होय असे मिल्लने म्हटले आहे.

सुखा-सुखामध्ये प्रकारभेद केल्यास सुखवाद नष्ट होतो. जर सुख हेच मूल्य मानले तर जितके सुख अधिक तितके त्याचे मूल्य अधिक, परंतु असे होत नाही. कारण सुखाचे मूल्य सुखामुळे ठरत नाही. तर सुखाची प्रतवारी लावणे हेच खरे मूल्य आहे. सुखाचे प्रकारभेद मानण्याने सुखवादच नाकारला जातो. हे मिल्लच्या लक्षात आले नाही.

ज्या अर्थी प्रत्येक व्यक्तीचे सुख हेच तिचे हित होय. त्या अर्थी सर्वांचे जास्तीत जास्त सुख हे कोणत्याही व्यक्तीचे हित होय. मिल्लने काढलेला हा निष्कर्ष चुक आहे. सुख एकमेकांत मिसळता येत नाही. एकाचे सुख आणि दुसऱ्याचे सुख मिळून मोठा सुखानुभव तयार होत नाही. यावरुन सांगितलेल्या सुखनिष्ठ उपयुक्ततावादास त्याला योग्य तो पुरावा देता आला नाही, असे टीकाकार म्हणतात. मिल्लने पुढील युक्तीवाद सिद्ध केला. ''प्रत्येक व्यक्तीचे सुख सर्व व्यक्तीच्या समूहाला इष्ट आहे. म्हणून सर्वांचे सुख प्रत्येकाला इष्ट आहे.'' मिल्लच्या या युक्तीवादात समूहाभास नावाचा तर्कदोष निर्माण झाला आहे.

मिल्लच्या सुखनिष्ठ उपयुक्ततावादावरील काही आक्षेपांवर आपण विचार केला परंतु मिल्लच्या लिखाणात थोड्या विसंगती असल्यामुळे जरी आक्षेप घेता आला तरी अशी विसंगती निर्माण होणे स्वाभाविक आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे मिल्लने जे लिखाण केले त्याचे उद्दिष्ट सामाजिक संस्थामध्ये बदल घडवून आणणे आणि मानवी जीवन अधिक समृद्ध करणे हे होते. त्याने '**उपयुक्ततावाद**' या पुस्तकात अंतिम उद्दिष्टांच्या प्रश्नांबाबत साक्षात सिद्धांत देता येणे शक्य नसते. असे म्हटले आहे. ज्या अर्थी त्याने अंतिम उद्दिष्ट्ये असा अनेकवचनी शब्दप्रयोग केला आहे. त्या अर्थी सुख हेच एकजिनसी, एकरस उद्दिष्ट माणसापेक्षा असते. असे मिल्ल मानत नव्हता. माणसाची अंतिम उद्दिष्ट्ये घेऊ शकणाऱ्या चांगल्या गोष्टी अनेक आहेत. त्याचा संग्रह करणारी एखादी व्यापक रचना केली तर ती स्वीकारता येईल किंवा तिचा अव्हेर करता येईल. परंतु तिचा सिद्धांत देता येणार नाही असे मिल्लने स्पष्ट म्हटले आहे. माणसाला इष्ट असणाऱ्या सर्व गोष्टीचा निर्देश तो सुख या संकल्पनेने समाधान म्हणजे सुखच असते.

बेंथॅमने सांगितलेल्या सात सुखवादी परिमाणांमध्ये मिल्लने 'गुण' Quality हे आठवे परिणाम सुचविले आहे. यावरून बेंथॅमचा संवेदनात्मक उपयुक्ततावाद म्हणून व त्यामानाने मिल्लचा सुसंस्कृत उपयुक्ततावाद म्हणून मानावे लागते. तसेच बेंथॅमने सुचविलेले चारही प्रेरक बाह्य स्वरूपाचे असल्यामुळे नैतिक प्रेरक म्हणून त्यांचा स्वीकार करणे उचित ठरत नाही. ते खऱ्या नीतिमत्तेला जन्म देऊच शकत नाही. म्हणून मिल्लने पाचवा आंतरिक प्रेरक मानला व त्याच्याद्वारा नैतिक जीवनाची व परार्थसुखवादाची संगती जुळवून आणली.

बेंथॅमने जी चार अनुशासके सांगितलेले आहेत ती शारीरिक (भौतिक), राजकीय, सामाजिक व धार्मिक ही होत. कमी-अधिक प्रमाणात ही सर्वच शारीरिक अनुशासके होत. कारण शेवटी या प्रत्येक बाबतीत सुख-दुःख हे शारीरिक पातळीवरीलच आहे. म्हणून मिल्ल बाह्य अनुशासके म्हणतो व त्याव्यतिरिक्त सद्सद्भावना हे महत्त्वाचे आंतरीक अनुशासक स्वीकरतो. सत्कृत्यांचे समाधान व दुष्कृत्यांची टोचणी ही सद्सद्भावनेच्या अनुशासकत्वाचे स्वरुप होय. ते मानसिक स्वरुपाचे व म्हणूनच अधिक प्रभावी आणि महत्त्वाचे आहे. सद्सद्भावनेचे महत्व ध्यानात घेऊनच बटलरने तीस केवळ अनुशासक न मानता नैतिक सर्वाधिकारी मानले आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) मिल्लचा नीतिशास्त्रीय सुखवाद स्पष्ट करा.

२) मिल्लचा उपयुक्ततावाद स्पष्ट करा.

### ७.८.१ परिक्षण:

मिल्लने सांगितलेल्या पहिल्या युक्तीवादात ‘शब्दसाम्यमूलक’ तर्कदोष घडला आहे. कारण ‘जे इच्छिले जाते ते इच्छिण्या योग्य असते’ हे बरोबर आहे काय? इच्छिलेल्या सर्वच गोष्टी असतात का? आपण वाईट गोष्टींची इच्छा केली तर ती इच्छिण्या योग्य असते का? अर्थातच नाही म्हणून मिल्ल चे मत योग्य वाटत नाही.

मिल्लने सुख म्हणजेच Happiness व उपयूक्तता म्हणजे Utility या शब्दाचा पर्याय म्हणून वापरला आहे. म्हणून ‘सुख’ हेच अंतिम ध्येय आहे असे मिल्लचे म्हणने योग्य दिसते. असा अर्थ घेतला तर मिल्लचा सुखवाद आणि G.E. मूरच्या मतानुसार उपयुक्ततावाद यामध्ये तत्त्वतः फरक नाही असे वाटते.

मिल्लने सुखाचे श्रेष्ठ-कनिष्ठ असे प्रकार केले हे मूरला गैर वाटते. परंतु मिल्लच्या मनात ‘सुख’ या शब्दाचा अर्थ इष्ट गोष्टीची प्राप्ती आणि त्याचबरोबर असणारे समाधान असा होता. त्यामुळे इष्ट गोष्टीच्या दर्जा प्रमाणे त्यात फरक असणे शक्य आहे.

सुख ही इच्छा करण्यास योग्य अशी गोष्ट आहे. या मिल्लच्या मतावर मूरने कडाडून हल्ला केला आहे. एखादी गोष्ट घडते म्हणून ती घडावी किंवा ती चांगली आहे. असे त्यातूनच मूल्य निष्पन्न करावे याला मूर प्राकृतीकतेचा तर्काभास असे म्हणतात. परंतु माणसाचे प्राप्तव्य आणि त्याची इच्छा याचा संबंध तोडता येणार नाही. अंतिम कल्याणाची जी कल्पना करायची त्यासाठी माणसाची प्रकृती विचारात घेतलीच पाहिजे म्हणून मिल्ल म्हणतो त्याप्रमाणे माणसाच्या प्रकृतीत ‘सुख’ हा महत्वाचा घटक आहे. म्हणून कोणत्याही इच्छा केल्याशिवाय अंतिम कल्याणाची कल्पना कशी करणार?

सुखाची इच्छा करणे ही तर माणसाची प्रवृत्ती आहे. म्हणूनच प्राकृतिक तर्काभास हा तर्कदोष मिल्ल कडून घडला हे म्हणणे बरोबर नाही. जी.ई. मूरच्या म्हणण्याप्रमाणे एखादी गोष्ट चांगली आहे हे सिद्ध करणे, बुद्धीला अशक्य आहे. असाच विचार मिल्लने सुद्धा मांडला होता. त्याच्या मते अंतिम उद्दिष्टांच्या प्रश्नाबाबत साक्षात सिद्धता देता येणार नाही. म्हणून मिल्लने माणसाची उद्दिष्टे कोणती असावीत याचा विचार केला. असा विचार करतांना मिल्लच्या शब्दरचनेत काही विसंगती असल्या तरी त्याच्या विचाराचा ओघ बरोबर होता.

### आपली प्रगती तपासा

१) मिल्लच्या सुखवादाचे परिक्षण स्पष्ट करा.

## ७.९ सारांश

कांटचा 'निरूपाधिक आदेशा'चा नियम सार्वदेशिक, निरूपाधिक, अनिवार्य व अनुभपूर्व स्वरूपाचा असून प्रज्ञेमध्ये अनुस्यूत असतो. त्याची जरी स्पष्ट जाणीव सर्वसामान्य माणसाला नसली तरी तो या नियमाचा दावा मान्य करतो. या नियमाने त्याचे नीतिविषयीचे निर्णय निर्धारित होत असतात व तो त्याच्या इष्टानिष्टतेच्या निर्णयाचा गमक व माप किंवा निकष असतो.

व्यक्ती व समाजाच्या समस्यांमध्ये अनेक घटक महत्वपूर्ण भूमिका पार पाडत असतात या घटकांमध्ये महत्वाचा घटक म्हणजे अधिकार व कर्तव्याची योग्य जाणीव व त्यांचे आवश्यक त्या परिस्थितीनुरुप आचरण होय. प्रत्येकाला आपले जीवन परिपूर्ण बनविण्यासाठी इतरांवर अवलंबून रहावे लागते. हे अवलंबित्व व्यक्तिच्या जन्मापासून ते मृत्यूच्या शेवटच्या क्षणापर्यंत असते. आपल्या समस्यांमधून बाहेर येण्यासाठी आपणांस इतरांच्या सहकार्याची आवश्यकता असते. पण अशा वेळेस त्याने हे देखील लक्षात ठेवले पाहिजे की, इतरांना त्यांच्या अडचणीत मदत करणे हे आपले कर्तव्य आहे.

कर्तव्य हे करावेच लागते. शिवाय कर्तव्य करत असतांना तेथे परतफेडीची अपेक्षा ठेवायची नसते. थोडक्यात अगदी निरपेक्ष भावनेने प्रत्येकाने आपल्या जीवनातील कर्तव्ये पार पाडली पाहिजेत. हाच मुद्दा इम्यान्युएल कांट या जर्मन तत्त्ववेत्याने आपल्या नीतिमीमांसेस स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच भगवद्‌गीतेतील निष्काम कर्मयोगाची संकल्पना देखील कर्तव्याशी निगडीत आहे. कर्मे करतांना फलाची अपेक्षा न ठेवता 'ईश्वरार्थ' कर्तव्ये करावी ही गीतेची प्रमुख नैतिक शिकवण आहे.

सुखवाद ही एक नीतिशास्त्रीय ध्येयांची व मुल्यांची मीमांसा करणारी उपपत्ती आहे. मानवाच्या आचरणाचा चांगला वाईटपणा हा कृतीच्या परिणामांच्या सुख-दुःखात्मक स्वरुपावर अवलंबून असतो असे सांगणाऱ्या नीतिमीमांसेला सुखवाद असे म्हणतात. सुखाचे दोन प्रकार पडतात १) मानसशास्त्रीय सुखवाद २) नीतिशास्त्रीय सुखवाद.

नीतिशास्त्रीय सुखवादाचे दोन प्रकार पडतात. १) स्व-सुखवाद २) परसुखवाद/परार्थ सुखवाद. नैतिक सुखवादी उपपत्तीनुसार प्रत्येकाने अधिकाधिक सुख मिळवावे हे तत्व मान्य केले तर असे अधिकाधिक सुख कोणाचे? सुख म्हणजे शारिरिक सुख नव्हे तर सुख म्हणजे चित्ताचे समाधान व आत्म्याचा संतोष होय. ईश्वराच्या चिंतनातून मिळणारे सुख हे इंद्रियांपासून मिळणाऱ्या सुखापेक्षा श्रेष्ठ असते. समष्टीचे सुख नीतिचे ध्येय म्हणून स्वीकारण्यात व तसेच सुखा सुखामधील प्रकार भेद मान्य करण्यात मिल्लने सुखवादाला निश्चितच प्रतिष्ठा मिळवून दिली पण एक सुसंगत नैतिक तत्वज्ञान म्हणून त्याचे एकूण मत मात्र स्वीकारता येत नाही.

## ७.१० विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

१) कांटचा निरुपाधिक आदेशाचा सिद्धांत सविस्तर स्पष्ट करा.

२) कांटचे निरुपाधिक आदेश सांगून त्याचे मुल्यमापन करा.

३) कांटचे नीतिशास्त्र स्पष्ट करून, कांटचे निरुपाधिक आदेशाचे सिद्धांत स्पष्ट करा.

४) बेंथॅमच्या नीतिशास्त्रीय सुखवादाचे सविस्तर विवेचन करा.

५) सुखवाद म्हणजे काय ? नीतिशास्त्रीय सुखवाद स्पष्ट करा.

६) स्वार्थ व परार्थ सुखवाद सविस्तर स्पष्ट करा.

७) टिपा लिहा.

१) सोपाधिक आदेश

२) कांटचे निरुपाधिक आदेश

३) सोपाधिक व निरुपाधिक आदेशातील फरक

४) सत्संकल्प

५) स्वार्थ सुखवाद

६) परार्थ सुखवाद

७) नीतिची अनुशासके

८) सुखाची परिमाणे.

*****

# ८

**प्रकरण ८**

# पर्यायी नीतिशास्त्रीय उपपत्त्या

## (Alternative Ethical Theories)

(स्त्रीवादी नितिशास्त्र व अस्तित्ववादी नीतिशास्त्र)

**घटक रचना**

८.० उद्दिष्ट्ये

८.१ प्रस्तावना

८.२ स्त्रीवादी नीतिशास्त्र - कॅरोल गिलीगन

- ८.२.१ लिंगभेद - नि:पक्षपाती पुरुष आणि भावबंध (आस्था) असणाऱ्या स्त्रीया
- ८.२.२ स्व-प्रतिमा पुरुष विलगता आणि स्त्रीची संबंधता.
- ८.२.३ स्त्रीच्या नैतिक विकासाच्या अवस्था मानसशास्त्रीय दृष्टीकोन
- ८.२.४ कुणाची काळजी करता ?
- ८.२.५ मूल्यमापन

८.३ अस्तित्ववादी नीतिशास्त्र जिन पॉल सार्त्र

- ८.३.१ अस्तित्ववाद म्हणजे काय ?
- ८.३.२ सार्त्रचे अस्तित्ववादी नीतिशास्त्र.
- ८.३.३ निवडीचे स्वातंत्र्य (Freedom of choice)
- ८.३.४ कुश्रद्धा (दांभिकता Bad faith)
- ८.३.५ असतेपणा आणि नसतेपणा (Being and nothingness)
- ८.३.६ मूल्यमापन

८.४ सारांश

८.५ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

## ८.० उद्दिष्ट्ये

१. आधुनिक काळातील पाश्चात्य स्त्रीवादी नीतिशास्त्राचे आकलन करुन घेता येईल.

२. लिंगभेद, भावबंध किंवा आस्था असणाऱ्या स्त्रीया, स्त्रीची संबंधता, स्त्रीयांचा नैतिक विकास (Moral development) यांचा तसेच स्त्रीवादी नीतिशास्त्रचा (Feminist Ethics) अभ्यास करता येईल.

३. अस्तित्ववाद म्हणजे काय ? ही विचारसरणी समजून घेणे.

४. सार्त्रचे अस्तित्ववादी नीतिशास्त्र जाणून घेणे.

## ८.१ प्रस्तावना

पाश्चात्य देशात स्त्री मुक्तीच्या व स्त्री पुरुष समतेच्या विचारांना केंद्रस्थानी मानून अनेक प्रकारचे तात्त्विक सिद्धांत अनेक विचारवंतानी मांडले. त्यातून स्त्रीवादाची अनेक रुपे पुढे आली. त्यातीलच एक रुप म्हणजे स्त्रीवादी नीतिशास्त्र होय. स्त्रीवादी नीतिशास्त्र ही विचारसणी गेल्या दोन दशकापूर्वी उदयाला आली. ही विचारसरणी अमेरिकन स्त्रीलेखिका व मानसशास्त्राच्या प्राध्यापिका श्रीमती कॅरोल गिलीगन यांनी मांडून त्याचा पुरस्कार केला. स्त्रीयांची नैतिक विचारांमधील ठळक वैशिष्ट्ये कोणती हे सांगून भावबंधाचे (आस्थेचे) नीतिशास्त्र (Ethics of care) म्हणून स्त्रीवादी नीतिशास्त्राचे जोरदार समर्थन करुन स्त्री पुरुष समतेचे नैतिक तत्त्वज्ञान मांडले.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी सत्ताशास्त्राला व चिद्वादी तत्त्वज्ञानाला विरोधी असे अनेक विचार प्रवाह निर्माण झाले. या वैचारिक प्रवाहांनी तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाला नवीन दृष्टीकोन दिले. यात प्रामुख्याने तार्किक प्रत्यक्षार्थवाद, विश्लेषणवाद, फलः प्रामाण्यवाद, नववास्तववाद, अस्तित्ववाद ह्या विचारप्रणाल्या होत. या विविध विचारप्रणाल्यांपैकी अस्तित्ववाद ही सत्ताशास्त्राला विरोधी अशी विचारप्रणाली आहे. या विचारप्रणालीचा पुरस्कार किर्केगार्द, कामू यास्पर्स, मार्शेल, हायडेगर व सार्त्र या तत्त्ववेत्यांनी केला. ते अस्तित्ववादी तत्त्वज्ञ म्हणूनही ओळखले जातात. त्यांनी मानवाच्या अस्तित्वाचा प्रमुख विचार मांडला. अस्तित्व व सारतत्त्व यांच्यात भेद करुन मानवी अस्तित्वाला केंद्रस्थानी मानून, मानवी समस्यांकडे पाहाण्याचा अस्तित्ववाद हा एक नविन दृष्टीकोन त्यांनी दिला. विशेषतः सार्त्र ह्या फ्रेंच अस्तित्ववादी तत्त्वज्ञाने अस्तित्ववाद व मानवतावाद व इतरही अनेक ग्रंथ लिहून त्यांने अस्तित्ववादी नीतिशास्त्राचे विचार मांडले. स्त्रीवादी नीतिशास्त्र व अस्तित्ववादी नीतिशास्त्र या दोन आधुनिक काळातील नीतिशास्त्रीय उपपत्त्या असून त्यांचा अभ्यास आपण या प्रकरणात करणार आहेत.

## ८.२ स्त्रीवादी नीतिशास्त्र - कॅरोल गिलीगन Feminist Ethics (Ethics of Care)

आधुनिक काळात स्त्रीजीवनाच्या अनेक अंगानी सांगोपांग विचार बुद्धिवादी विचारवंत करीत आहेत. समाजात स्त्रीयांविषयी भेडसावणाऱ्या ज्वलंत समस्याही आहेत. हुंडाबळी, अमानुष छळ, बलात्कार, स्त्री भ्रूणहत्या इ. सामाजिक समस्या भेडसावतात. स्त्रीमुक्तीची समस्या, लिंगभेद, विविध क्षेत्रातील स्त्रीयांचे स्थान व भूमिका, स्त्रीपुरुष समानता, स्त्रीवादी नीतिशास्त्र या विविध अंगानी स्त्रीवादी आपले विचारमंथन करीत आहेत. 'स्त्रीवादी नीतिशास्त्र' ही आधुनिक विचारधारा गेल्या दोन दशकापूर्वी उदयास आली. ही विचारप्रणाली अमेरिकन स्त्रीलेखिका व मानसशास्त्राच्या प्राध्यापिका श्रीमती कॅरोल गिलीगन यांनी प्रभावीपणे मांडली. कॅरोल गिलीगन यांनी

१९८२ मध्ये ''विभिन्न आंतरिक आवाज'' (In a different voice) या ग्रंथात स्त्रीवादी नीतिशास्त्राचे (Feminist ethics) प्रभावीपणे समर्थन केले. कॅरोल गिलीगन यांचा जन्म इ.स. १९३६ मध्ये अमेरिकेत झाला. त्या हारवर्ड विद्यापीठात मानसशास्त्र व शिक्षणशास्त्राच्या प्राध्यापिका होत्या. त्यांनी स्त्रीयांचा नैतिक विचारांचा विकास होण्याचे ठळक वैशिष्ट्य विशद केले. नातेसंबंध जोडण्याची आस्था किंवा भावबंध हे ठळक वैशिष्ट्य सांगून स्त्रीवादी नीतिशास्त्रात स्पष्ट केले. त्यांनी भावबंधाचे वा आस्थचे नीतिशास्त्र (Ethics of Care) यावर अधिक लक्ष केंद्रित केले. किंबहूना स्त्रीवादी नीतिशास्त्राचे समर्थन केले आणि स्त्री पुरुष समानतेच्या नीतिशास्त्राचा पुरस्कार केला.

### ८.२.१ लिंगभेद - निःपक्षपाती पुरुष आणि भावबंध (आस्था) असणाऱ्या स्त्रीया:-

गेल्या अनेक शतकांपासून नैतिक सिद्धांतवादी दोन प्रमुख मूल्यांबद्दल बोलतांना दिसतात. ती दोन मूल्ये म्हणजे न्याय व प्रेम होत. श्रेयस, युक्त, कल्याण, निर्णय व उपयुक्तता या नैतिक संकल्पानांमध्ये आज अनेक बदल पहावयास मिळतात. श्रीमती गिलीगन यांनी स्त्रीयांच्या विभिन्न आवजांची ओळख करुन देण्यासाठी 'भावबंध' (आस्था-आपुलकी) यासाठी care हा इंग्रजी शब्द उपयोगात आणतात. गिलीगनच्या मते जबाबदाराची जाणीव हे वास्तव स्वीकारुन या जगातील विविध समस्यांचा व दुःखांचा नाश करता येतो. आपण जेव्हा जबाबदारी किंवा न्याय हे शब्द वापरतो तेव्हा माणसाकडून काही चुकीचे कृत्य झाले तर त्याला आपल्या कृत्याबद्दल अपराधी असल्याचे वाटते. परंतु भावबंध वा आस्था असणाऱ्या स्त्रीया इतरांची दुःखे वा वेदना समजून त्या इतर स्त्रीयांच्या दुःखांचा उपशम करण्यासाठी आपुलकीने वा ममतेने लक्ष घालतात. ज्या स्त्रीया काहीच न करणाऱ्या म्हणून त्या स्वतःच जबाबदार असतात. कॅरोल गिलीगन आपल्या 'विभिन्न आंतरिक आवाज' (In a different Voice) या ग्रंथात काही नैतिक संकल्पनांचा उहापोह करुन, न्याय, कर्तव्य, हक्क व अधिकार या नैतिक संकल्पनांचा विचार स्त्रीया कशा प्रकारे करतात हे प्रभावीपणे मांडतात. गिलीगनच्या मते स्वप्रतिमा (Self Image) ह्या न्याय व भावबंध या संकल्पनांना नैतिक निर्णय घेण्यासाठी आधारभूत ठरतात. त्यांनी परिमाणात्मक व गुणात्मक संबंधावर आधारित भावबंध (आस्था) विषयक नीतिशास्त्र (Ethics of care) आणि न्यायाचे नीतिशास्त्र (Ethics of Justice) असा भेद स्पष्ट केला. व्यक्तिचे हक्क वा अधिकार, कायद्यापुढे सर्व समान, निःपक्षपाती खेळ ही नैतिक ध्येये व्यक्तिनिरपेक्ष म्हणून साध्य करावयाची असतात.

### ८.२.२ स्वप्रतिमा :-
### पुरुषाची विलगता आणि स्त्रीची संबंधता वा संलग्नता :-

गिलीगनने अनेक स्त्रीयांना आमंत्रित करुन आपल्या स्वत्वप्रतिमेविषयीचा आवाज काय सांगतो या विषयी विचारले असता त्यांना पुढील उत्तरे स्त्रीयांकडूनच ऐकावयास मिळाली. याविषयी काही स्त्रीया अबोल वा अनुत्तरित झाल्या, तर काही

स्त्रीया अडखळत बोलत होत्या तर काही स्त्रीया एकत्रीतरित्या स्वत्वप्रतिमेविषयीची अभिव्यक्ती करतांना आढळल्या की जो इतर स्त्रीयांना मार्गदर्शक ठरणारा होता. या स्त्रीवादी दृष्टीकोनात ओळख व जवळीकता यांचा प्रतिसाद पुढीलप्रमाणे दिसून आला. स्त्री ही आपल्यामध्ये एक माता, एक मुलगी, एक प्रियसी (प्रेमीका), एक मैत्रीण अशा संबंधते विषयी बोलतात. स्त्रीया या प्रामुख्याने नातेसंबंधाचे वर्णन करतात. या उलट पुरुष हे विलगतेबद्दल (Separtion) बोलतात. 'मी' असा शब्दप्रयोग करुन विलगता दर्शवितात. ते आत्मकेंद्री असतात. पुरुष आपल्याला मिळालेल्या यशाचे गमक व्यक्तिगत पातळीवर इतरांना स्वतःपासून वेगळेच समजतात. पुरुषाची ही विलगता एकांगी दृष्टीकोनाची आहे. अर्थात लहानमुलांच्या बाबतीत स्त्रीलिंगी व पुलिंगी स्वप्रतिमा ह्या भाकित वा कपोलकल्पित कल्पनांसारख्या आहेत.

गिलीगनच्या मते पुरुषीप्रतिमा या स्त्रीलिंगी नातेसंबंधाच्या आकृतीबंधाशी सुसंगत असतात. साधारणपणे प्रौढ पुरुषाचे मैत्रीचे संबंध अधिक विस्तृत असले तरी त्यांच्यात मैत्रीची जवळीकता नसते. याउलट स्त्रीयांमध्ये अनेकांशी आपुलकी वा जवळीकता करण्याचा कल अधिक असतो. अनेक केंद्राशी वा संघटनेशी त्या संपर्कात राहून जवळीकता घडवून आणतात. नातेसंबंध जोडण्याचा केंद्रवर्ती दृष्टीकोन स्त्रीयांमध्ये असल्याने समूहाच्या कार्यात मिसळतात. त्या समूहाला एकत्रित धरुन ठेवतात व आपुलकीने लक्ष घालून इतरांसाठी परीश्रमही करतात.

सिगमंड फ्रॉईड या मानसशास्त्रज्ञाने व्यक्तिमत्त्व विकासाची मनोलैंगिक उपपत्ती मांडली. मनोलैंगिक विकासाच्या सहा अवस्थांपैकी लिंगवर्ती अवस्थेत (३ ते ६ वर्षापर्यंतच्या कालावधी) मुलांचा लैंगिक विकास कसा होतो ? मुलांना लैंगिकभेद कसा समजतो? हे फ्रॉइडने सांगितले. गिलीगन ह्या फ्रॉईडने सांगितलेल्या लिंगवर्ती अवस्थेच्या पूढेही जाऊन लैंगिक भेदाच्या जाणीवा मुलांमुलींमध्ये व तरुणतरुणीमध्ये कशा विकसीत होतात हे स्पष्ट करतात. पुरुष इतरांपासून विलग दिसतात. तर स्त्रीया इतरांशी संबंध जोडण्याचा विचार करतात. लिंगभेद हा प्रामुख्याने कुमारांमध्ये दिसून येतो. तरुण स्त्री व पुरुष स्वजाणीवयुक्त असतात. तेव्हा त्यांच्याठिकाणी लिंगभेद ओळख व नैतिक निर्णय घेण्याची जबाबदारी येते. कुमारवयीन मुले स्वतःला स्वतंत्र व स्वायत्त समजतो. तेव्हा त्याच्याठिकाणी न्यायाची एक नैतिक परिपक्वता विकसीत होते. तो स्वतःकडे स्वायत्त म्हणून पहातो. या उलट कुमारवयीन मुली स्वतःला भावबंध (आस्था) विषयक अशा जबाबदारीने इतरांशी संबंधतेने वा संलग्नतेने (Connectedness) पहातात. ममता/आपुलकी ठेवतात.

### ८.२.३ स्त्रीच्या नैतिक विकासाच्या अवस्था एक मानसशास्त्रीय दृष्टीकोनः-

मानसशास्त्रज्ञांनी व्यक्ति विकासातील नैतिक व बौद्धिक विकासाचा अभ्यास करुन त्यांनी असा निष्कर्ष काढला की, पुरुषांचे अनुभव बालीश म्हणून योग्य तर नैतिकतेविषयीचे विचार अयोग्य असल्यामुळे पुरुषांनी घालून दिलेले आदर्श वा मानदंड स्त्रीया या स्वीकारीत नाहीत. गिलीगन ह्या हारवर्ड विद्यापीठात लॉरेन्स कोहलबर्ग यांचे सहकारी म्हणून व प्राध्यापिका म्हणून कार्यरत होत्या कोहलबर्गने सूचविलेल्या नैतिक विचारांच्या विकासातील अवस्था व सांगितलेल्या सिद्धांत कल्पनेचे नैतिक द्वंद्व

(HYPOTHETICL MORAL DILEMMA) यांचा गिलीगनने अभ्यास करुन स्त्रीयांचा नैतिक विचार प्रक्रियेचा विकास कसा होतो यावर भर दिला.

कोहलबर्ग या मानसशास्त्रज्ञाने नैतिक विचारविषयक विकासाच्या तीन प्रमुख पातळ्या (अवस्था) सांगितल्या. याचे विवेचन पहिल्या प्रकरणात केलेले आहे.

१) पूर्व सांकेतिक नैतिक पातळी (Preconventional Morality)
२) सांकेतिक नैतिक पातळी (Conventional Morality)
३) सांकेतिकोत्तर नैतिक पातळी (Post Convention Morality)

### ८.२.४ कुणाची काळजी करता ?

कोहलबर्गच्या नैतिक विकासाच्या वरील तीन प्रमुख अवस्थांचे प्रारुप (मॉडेल) घेऊन गिलीगनने त्यावर टीका केली व स्त्रीवादी नितिशास्त्राचे वा भावबंध (आस्था) विषयक नीतिशास्त्राचे (Ethics of Care) तीन दृष्टीकोन मांडले. कोहलबर्ग पुरुषाच्या नैतिक विकासावर भर देतो. तर गिलीगन स्त्रीच्या नैतिक विकासावर भर देते. गिलीगनने स्त्रीच्या नैतिक विकासाच्या तीन अवस्था सांगितल्या. त्या पुढीलप्रमाणे-

**१) प्रारंभिक जीवनाकडून व्यक्तिगत जगण्याकडे :-**

या अवस्थेत स्त्रीया एक जीवाची हत्या म्हणून स्वतःमध्ये शोधतात. या प्रतिकूल जगात त्या स्वतः एकाकी आहेत असे त्यांना वाटते. १८ वर्षे वयाच्या सूसन या गर्भवती स्त्रीला आपल्या गर्भाविषयी विचारले असता, ती म्हणाली मला हा गर्भ नको आहे. या स्त्रीच्या नकारार्थी व अहंकेद्रवादी विचाराला गिलीगनने नैतिक शून्यवाद (Moral Nihilism) असे म्हटले आहे. खरोखर या स्त्रीला काय हवे असते, या निवडविषयक समस्येला सामोरे जावे लागते. तसेच एक माता म्हणून मला मूल हवे आहे. अशा म्हणणाऱ्या स्त्रीला मला गर्भाची काळजी घ्यावयाची आहे असे म्हणतात. येथे नवीन जन्माला येणाऱ्या नवजात अर्भकाच्या संबंधाचा अर्थ अभिप्रेत आहे.

**२) आत्मत्याग एक चांगुलपणा (Goodness as self-sacrifice):**

स्त्रीची नैतिकता ही कोहलबर्गच्या सांकेतिक पातळीवरील (Conventional level) अवस्थेत स्वार्थी न राहता इतरांसाठी त्याग करणारी होते. नीतिमत्तेच्या या अवस्थेत इतरांची काळजी घेण्याची क्षमता, इतरांबद्दलची आवड विकसीत होते. स्त्रीचा आत्मत्याग एक चांगुलपणा ठरतो.

**३) निवडीच्या परिणामांची जबाबदारी (Responsibility for consequences of choice):**

कोहलबर्गची तिसरी अवस्था ही सांकेतिकोत्तर नैतिक विकासाची अवस्था असून हा विकास विवेकानुसार होतो. निवड केलेल्या गोष्टींच्या परिणामांची जबाबदारी

ही स्वच्छेने स्वीकारणे होय. गिलीगनने या प्रारुपाला (मॉडेलला) ''नितिमत्तेच्या निर्णयाचे सार'' (Essence of Moral decision) असे म्हटले आहे. अहिंसा या नैतिक तत्त्वाचे इतरांना व स्वतःला इजा किंवा दुःख न देणे हे ध्येय गिलीगनच्या या प्रारुपात येते.

### ८.२.५ मूल्यमापनः

स्त्री पुरुष असा नैसर्गिक लिंगभेद असला तरी येथे प्रश्न उपस्थित होतो की, नितिमत्तेत लिंगभेद कुठे असतो ? पूर्वीच्या काही तत्त्ववेत्यांनी पुरुषापेक्षा स्त्रीया कमी बुद्धिमत्तेच्या असतात. असे म्हटले आहे. परंतु त्यांचे हे म्हणणे नीतिमत्तेला आधारभूत ठरते का ? सामान्यतया असे आढळून येते की पुरुषापेक्षा स्त्रीयांमध्ये नैतिक विकास कमी होतो. वॉलस्टोन क्राफ्टचा ह्या विचाराला विरोध आहे. त्याच्या मते स्त्री पुरुषांमध्ये एक बुद्धिशील प्राणी म्हणून दोहोंची बौद्धिक क्षमता सारखीच असते. याशिवाय दोहोंचाही नैतिक विकास समान होतो. जरी त्यांच्यात लिंगभेद असला तरी बौद्धिक क्षमता व नैतिक विकास सारखाच होतो. स्त्रीमध्ये बुद्धिमत्ता कमी असते. याचे वॉलस्टोन क्राफ्टच्या मते स्त्रीयांना दिले गेलेले चुकीचे शिक्षण (Miseduction) होय.

गिलीगनने कोहलबर्गच्या नैतिक विकासाच्या अवस्थांचे प्रारुप (मॉडेल) एक बौद्धिक परिमाण व न्याय संकल्पना म्हणून नीतिमत्तेत गृहीत धरलेले आहे. गिलीगनने स्त्रीयांमधील नैतिक विकास हा त्यांच्या नातेसंबंध (Relationship) जोडण्यातील त्यांचा भावबंध (आस्था) यावर अधिक प्रकाशझोत टाकून सुस्पष्ट केला आहे. काही नीतिशास्त्रज्ञांच्या मते नीतीमत्तेच्या विकासावस्थेत न्याय या संकल्पनेपेक्षा भावबंध (आस्था care) ही संकल्पना अधिक महत्त्वाची आहे.

पुरुषांपेक्षा स्त्रीया कमी सामाजिक भूमिका बजावतात. हा लिंगभेदाविषयीचा विचार समाजाने (Society) स्त्रीयांवर लादला आहे काय ? आजही जगाच्या काही भागात पुरुषांप्रमाणेच शिक्षणाचे सर्व फायदे स्त्रीयांना दिलेले नाहीत. स्त्रीयांना सामाजिक कार्यात, सत्तेत व इतर क्षेत्रात संधी देण्यात सहभागी केलेले नाही. म्हणूनच वॉलस्टोन क्राफ्ट म्हणतात की स्त्री पुरुषाच्या लिंगभेदाविषयी समाजाने विषमतेची दिलेली वागणूक योग्य नव्हे. स्त्री पुरुष समतेचा विचार ही बौद्धिक समज म्हणून समाजाला यायला हवी. स्त्रीपुरुषांमधील लिंगभेग, वांशिकभेद दूर ठेवून स्त्री पुरुष समतेची सामाजिक व राजकीय तत्त्वज्ञांनी मांडणी केली पाहिजे असे गिलीगनही म्हणतात. त्यांनी स्त्रीवादी नीतिशास्त्रात आधुनिक पद्धतीने मांडलेला नैतिक विकासाच दृष्टीकोन महत्त्वाचा आहे. त्यांनी स्त्रीवादी नितिशास्त्रात दिलेले योगदान आधुनिक काळाशी सुसंबंधीत आहे.

### आपली प्रगती तपासून पहा :-

१) भावबंध (आस्था) विषयक नीतिशास्त्र व न्यायाचे नीतिशास्त्र यामधील भेद सांगा.

२) स्वप्रतिमेबद्दल पुरुषाची विलगता व स्त्रीयांची संलग्नता कशी दिसून येते ?

३) गिलीगनने स्त्रीच्या नैतिक विकासाच्या कोणत्या अवस्था सांगितल्या ?

४) गिलीगनने स्त्रीवादी नीतिशास्त्राचे समर्थन कसे केले ?

## ८.३ अस्तित्ववादी नीतिशास्त्र जिनः- पॉल सार्त्र

अस्तित्ववाद (Existentialism) ही विसाव्या शतकातील सत्ताशास्त्राला व चिद्वादी तत्त्वज्ञानाला एक विरोधी विचारप्रणाली आहे. ही विचारप्रणाली मानसघटनाशास्त्राची सुधारित मांडणी आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. अस्तित्ववादात ''मानवाच्या अस्तित्वाचा'' प्रमुख विचार मांडलेला आहे. या विचारप्रणालीचा पुरस्कार किर्केगार्द, यास्पर्स मार्टिन हायडेगर, मार्सेल, कामु व सार्त्र इ. तत्त्ववेत्यांनी केला. अस्तित्ववाद्यानी मानवी जीवनातील भयानक अर्थशून्यता, व्याकूळता, भय, भीती, निराशा, अस्वस्थता ताण-तणाव, काळजी चिंता, संघर्ष, मृत्यू इ. संकल्पनांचे विश्लेषण करुन मानवी अस्तित्वाचा सखोल विचार केला. मानवी जीवनाचे सार, मानवी जीवनाचा अर्थ व मानवी जीवनाची मूल्ये व नीती या प्रश्नांकडे पहाण्याची अस्तित्ववाद ही प्रमुख विचारप्रणाली होय. या विचारप्रणालीत 'मानवी प्रश्न' केंद्रस्थानी मानून मानवी चिंता, निराशा, भय प्रेम, संघर्ष, व्याकुळता, सार, मृत्यू, स्वातंत्र्य या संकल्पनांचे विश्लेषण करुन मानवी जीवनाविषयी सूक्ष्म व सखोल चिंतन अस्तित्ववाद्यांनी केले. अस्तित्ववादी विचारप्रणाली ही आधुनिक काळातील वैचारिक चळवळ आहे.

### ८.३.१ अस्तित्ववाद म्हणजे काय ?

सोरेन किर्केगार्द हा डॅनिश तत्त्वज्ञ आधुनिक अस्तित्ववादाचा जनक मानला जातो. किर्केगार्द, यास्पर्स व मार्शेल हे आस्तिक अस्तित्ववादी तर मार्टिन हायडेगर व सार्त्र हे नास्तिक अस्तित्ववादी होते. ग्रीक तत्त्वचिंतक सॉक्रेटिस याच्या विचारात अस्तित्ववादाची बीजे दिसतात. भारतीय तत्त्वज्ञानात अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाचा विचार गौतमबुद्धांच्या विचारात दिसून येतो. सॉक्रेटिस व गौतम बुद्धांनी मानवी अस्तित्वमूलक विचार प्रथम मांडले. २० व्या शतकात 'अस्तित्ववाद' हा शब्द सारेन किर्केगार्दच्या चिंतनातून पुढे आला. अस्तित्ववादातील अस्तित्व हा शब्द जगाचे अस्तित्व, ईश्वराचे अस्तित्व, वस्तुंचे अस्तित्व या शब्दांपेक्षा वेगळा आहे. **''अस्तित्व म्हणजे मानवाचे अस्तित्व, माझे अस्तित्व''** अशा अर्थाने वापरला आहे. मानवी अस्तित्व म्हणजे उच्च विकासासाठी झटत असलेले मानवी व्यक्तिमत्त्व होय. अस्तित्ववाद म्हणजे मानवाचे स्वत्व, स्वातंत्र्य, स्वतः निर्णय घेण्याची जबाबदारी व त्यानुसार निर्भयपणे कृती करणे होय, यातच माणसाचे अस्तित्व आहे. किर्केगार्दने अंतर्मूख होऊन प्रत्येक माणसाने आंतरिक जीवन स्वतः शोधले पाहिजे असा अस्तित्ववाद शब्द प्रथम प्रचलित केला. त्याच्या समोरचा माणूस स्वतःचे अस्तित्वच हरवून बसला आहे. व्यक्तीचे अस्तित्व वा त्यांचे स्वत्व जेव्हा समाजात धोक्याचे होऊ लागते तेव्हा माणसे रुढीग्रस्त व भयभीत

होतात. तो स्वतःला विसरतो. सामाजिक भीतीने, दंडशक्तिच्या भयाने पैसा, सत्ता व प्रलोभणे यांच्या अमिषाने माणूस हा स्वतःचे निर्णय, स्वातंत्र्य व जबाबदारी हरवून बसतो. अशा वेळी किर्केगार्द म्हणतो की, जरी माणूस म्हणून माणसे जन्माला आली तरी त्याला खऱ्या अर्थाने माणूस व त्याचे स्वत्व व्हायचे असते. तो स्वातंत्र्याचा शोध घेतो.

### ८.३.२ सार्त्रचे अस्तित्ववादी नीतिशास्त्र. (Existential Ethics):

जिन पॉल सार्त्र हा फ्रेंच नास्तिक अस्तितवादी तत्त्वज्ञ होय. त्याने अस्तित्ववाद आणि मानवतावाद (Existentialism and humanism), असतेपणा आणि नसतेपणा, Critique of Dialectical Reason हे ग्रंथ लिहिले. तो काही काळ तत्त्वज्ञानाचा प्राध्यापकही होता. तो साहित्यात वैशिष्टपूर्ण स्थान निर्माण करणारा एक प्रतिभावंत तत्त्वचिंतक होता. त्याने लिहिलेल्या साहित्यकृतीतून मानवी जीवनाचा अर्थ समजून घेण्याची तळमळ व्यक्त होते. सार्त्रच्या मते मानवी जीवन हे विविध प्रकारच्या समस्यांनी व आव्हानांनी भरलेले आहे. विशिष्ट परिस्थितीत कोणता निर्णय घ्यावा ही नैतिक समस्या प्रत्येक मनुष्यात निर्माण होते. त्याच्या मते धार्मिक व देववादी माणसे परावलंबी बनतात व आपले कल्याण करणारा कुणीतरी आहे असे समजून दुबळी बनतात. सार्त्रला सत्ताशास्त्रीय व ज्ञानशास्त्रीय समस्यांपेक्षा नीतिशास्त्रीय समस्यांमध्ये अधिक रस होता म्हणूनच इतर अस्तित्ववाद्यांपेक्षा त्याची भूमिका काहीशी वेगळी वाटते. त्याने स्वतःच आपण अस्तित्ववादी असल्याचे म्हटले आहे.

सार्त्रच्या मते माणूस हा जन्मतःच स्वातंत्र्य असून तो स्वतःचा निर्णय स्वतः घेतो. निवड व स्वातंत्र्य यांचा बोध घेऊन आपल्याला पाहिजे तसा बनवितो. म्हणूनच माणसाने स्वतःच्या कृतीची निवड करुन त्याची जबाबदारी निर्भयपणे स्वीकारली पाहिजे. स्वतः विचार करुन स्वतः निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य याचा बोध अस्तित्ववाद या पदाने होतो. एकूणच सार्त्रने मानवी स्वातंत्र्यावर सखोल चिंतन केलेले आहे. सार्त्रने अस्तित्व (Existence) आणि सारतत्त्व (Essence) यांच्यात भेद करुन मानवी अस्तित्वाला प्राधान्य दिले. त्याने अस्तित्ववादाचे एक सूत्र मांडले ‘‘अस्तित्व हे सारतत्त्वाच्या आधी येते. (Existence precedes Essence) .या सूत्राचा अर्थ स्वतःचे आयुष्य घडविणाऱ्या माणसाच्या संदर्भात ‘अस्तित्व हे आधी असते व नंतर सारतत्त्व असते. माणसाचे वैशिष्ट्य हे आहे की, त्याचे अस्तित्व आधी येते व माणसाचे ‘स्वत्व’ हे सारतत्त्व नंतर येते. थोडक्यात अस्तित्व हे पूर्ववर्ती आहे तर सारतत्त्व हे उत्तरवर्ती आहे ही अस्तित्ववादाची मुख्य भूमिका आहे. माणूस व इतर वस्तुंचा भेद दाखविण्यासाठी सार्त्र पुढील उदाहरण देतो. माणसाने बनवलेली कागद कापण्याची सुरी व माणूस यांची तुलनाही सार्त्र करतो. सुरी निर्माण करणाऱ्या कारागिराच्या मनात सुरी म्हणजे काय ? ती कशी बनवायची, तिचा उपयोग काय याविषयीची आधी कल्पना करतो. त्या कल्पनेनुसार तो ती सुरी बनवितो. कागद कापण्याची सुरी अमूक प्रकारची असावी. तिच्याकडून अमूक एक काम व्हावे असे आधी ठरलेले असते त्या प्रमाणे सुरीचे असणे हे त्या सुरीचे सारतत्त्व होय. सुरीची संकल्पना केली म्हणजे कारखान्यात जेव्हा प्रत्यक्षात अस्तित्वात येते तेव्हा तिचे गुणधर्म आधीच धरलेले असतात. सुरीचे सारतत्त्व अस्तित्वाच्या आधी येते हा एक अर्थ होय. (प्रा. श्रीनिवास दीक्षितांनी

अनुवादित केलेल्या इ.स. १९०० पासूनचा नीतिविचार ह्या मेरी वॉरनॉक यांच्या पुस्तकातील अस्तित्ववाद जे.पी.सार्त्र या प्रकरणाचा संदर्भ येथे घेतलेला आहे.) दुसऱ्याबाजूला मानवी व्यक्तीची कोणी साधी संकल्पना केलेली असते. त्याबरोबर काहीएक विशिष्ट हेतू साधण्यासाठी त्या अस्तित्वात येतात असे म्हणता येणार नाही. त्या अस्तित्वात येतात. बस्स एवढेच.

सार्त्रच्या अस्तित्ववादी सूत्रानुसार मनुष्य प्रथम अस्तित्वात येतो. नंतर त्याचे स्वत्व म्हणजेच सारत्तत्त्व येते. पाश्चात्य धर्मशास्त्रानुसार ईश्वराच्या मनात माणसाचे सारतत्त्व अगोदर असते नंतर ईश्वर माणसाला अस्तित्वात आणतो. हा पाश्चात्य धर्मशास्त्राच्या विरुद्ध विचार सार्त्रने मांडलेला आहे. मनुष्य हा कोणत्याही संकल्पनेनुसार बनविला गेलेला नाही. ईश्वराने निर्माण केलेली प्रतिमा म्हणजे माणूस हे सार्त्रला मान्य नाही. कारण सार्त्र हा ईश्वर मानत नाही. तो निरीश्वरवादी होता.

### ८.३.३ निवडीचे स्वातंत्र्यः

सर्व अस्तित्ववाद्यांनी स्वातंत्र्याविषयीचे विचार मांडले. पण मानवी स्वातंत्र्यावर सखोल चिंतन सार्त्रने केलेले आहे. त्यामुळे तो स्वातंत्र्याच्या संदर्भात अस्तित्ववादाचा केंद्रबिंदू ठरला आहे. सार्त्रच्या मते स्वातंत्र्य हा माणसाचा स्वभाव आहे. माणूस जन्मतःच स्वतंत्र असून त्याची निवड करुन तो स्वतःचा निर्णय स्वतःच घेतो. म्हणूनच सार्त्र म्हणतो की माणसाने स्वतःच्या कृतीची जबाबदारी निर्भयपणे स्वीकारली पाहिजे. माणसाने स्वतः विचार करुन स्वातंत्र्य आणि निवड यानुसार स्वतः निर्णय घेतला पाहिजे. असा निर्णय घेतांना तो चांगला की वाईट, त्यानुसार केलेली कृत्ये योग्य की अयोग्य या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे निकष सार्त्रने मांडलेले नाही. माणसाने समाजात वावरतांना माझी निवड कशीही असली तरी ती माझी निवड आहे. म्हणून ती चांगली आहे असे म्हणून चालत नाही. त्याला स्वत्वाची जाणीव असून त्या कर्माची जबाबदारी स्वीकारावी लागेल. सार्त्रने माणसाचे स्वत्व, स्वातंत्र्य व स्वयंनिर्णय व त्यानुसार होणारी कर्माची जबाबदारी याावर जोर अधिक दिला आहे. सार्त्रने कागद कापण्याच्या सुरीचे जे उदाहरण वर दिलेले आहे ते तितकेसे बरोबर नाही. त्याला सारतत्त्वात (Essence) अधिक रस होता. अस्तित्ववादाच्या सिद्धांताप्रमाणे स्वतंत्र निवडीमुळे व्यक्तिमत्त्व घडत गेले पाहिजे ही गोष्ट सार्त्रच्या विचारात वगळली गेली. व त्याच्या जागी निवडीचे स्वातंत्र्य ही अमूर्त गोष्ट सार्त्रने आणून बसविली आहे. त्यामुळे कृतीचा कर्तासुद्धा एक अमूर्त अस्तित्व होऊन राहतो असे समालोचन मेरीवॉरनॉक यांनी केले आहे.

फ्रेंच गणिती तत्त्ववेत्ता देकार्तने ''मी विचार करतो म्हणून मी आहे.'' (Cogito ergo sum) देकार्तने मी एक जाणणारी विचार करणारी व्यक्ती या पद्धतीने स्वतःचे अस्तित्व सिद्ध केले. देकार्तच्या वरील प्रमेयातील विचार करणारा किंवा जाणणारा माणूस हा शून्य वा निरर्थक जगात अवतीर्ण झाला आहे की या जगात आपण अनावश्यक व उपरे आहोत हे त्याला जाणवते. एकंदर जगताविषयी घृणा येते. त्याला कुणाचाच आधार नसल्याने जबाबदारी मात्र वाढत जाते. निराधारता, यातना व चिंता यामुळे त्याला एक प्रकारची भीती वाटते. सार्त्र देकार्तच्या पुढे जाऊन असा दावा करतो की, जाणीवेचे सारभूत तत्त्व म्हणजे ती कोणत्यातरी विषयाकडे रोखलेली

असते. येथे सार्त्रच्या विचारावर मानसघटनावादी तत्त्वज्ञ हूसर्लचा प्रभाव पडलेला दिसून येतो. जाणीव ही विषयलक्षी (Intentional) असते. त्याचे त्याने स्पष्टीकरण न देता सार्त्रने ती गृहीत धरलेली आहे. जाणीव असलेल्या व्यक्तिस सार्त्र आत्मनेसत् (being for itself) असे म्हणतो. तर जाणीवरहित वस्तू या स्वरुपसत् being in themselves) होत. या वस्तू मूर्तपणे अस्तित्वात असतात. स्वरुपसत् वस्तुंच्या अस्तित्वाला कोणताही धक्का न लागता तशाच राहातात. सार्त्रच्या मते जाणीव ही अस्तित्वात असते. ती बाह्य विषयांशी संबंधित राहूनच असते. सार्त्र येथे जाणीव असलेल्या व्यक्ती व विषयवस्तूंचे जग यांच्या संबंधाचा विचारही करतो आत्मनेसत् असलेल्या चेतन व्यक्ती स्वरुप सत् (being in themselves) होण्याची इच्छा असतात. जगातील पदार्थांची विविधता व अव्यवस्था ध्यानात घेतल्याने त्यांना शिसारी (nausea) किंवा वीट येतो. आपण सर्वस्वी स्वतंत्र आहोत. हे व्यक्तीच्या लक्षात आल्यावर त्यांनी व्याकूळता (Anguish) वा अस्वस्थता येते. या ठिकाणी शिसारी व व्याकूळता हे शब्द भावनायुक्त असून या भावनांना तो प्राधान्य देतो. हा विचार व्यक्त करण्यासाठी सार्त्रने मानवी जीवन व्यर्थ किंवा अर्थहीन आहे असे म्हटले. सार्त्रच्या विचारात मानवी जीवन अर्थहीन आहे असे येण्याचे कारण म्हणजे मनुष्याचे स्थान केवळ विचारी एवढेच नसून कशानेही नियत न झालेला जगातील क्रियावान घटक होय. सार्त्र स्वतःच्या अंतर्यामी कृतीचे सामर्थ्य असलेला आणि स्वतःला हवे तसे बनविण्यास स्वतंत्र असलेला कृतीशील मानव यावर अधिक भर देतो. जबाबदारी व निवडीचे स्वातंत्र्य यावर त्याने अस्तित्ववादी नीतिशास्त्रात प्रामुख्याने महत्त्व दिले आहे.

### ८.३.४ कुश्रद्धा (दांभिकता-Bad faith):

सार्त्रच्या मते माणूस पूर्णपणे स्वतंत्र असून स्वतःची निवड स्वतःच करु शकतो. स्वतःचे भवितव्य स्वतः घडवू शकतो. त्यामुळे स्वतःच्या कृतीला माणूस स्वतःच जबाबदार असतो. हे सर्व विसरुन तो जेव्हा इतर कशावर तरी श्रद्धा ठेवतो ती त्याची पळवाट असते. ही त्याची श्रद्धा कुश्रद्धा (Bad faith) होय कुश्रद्धा म्हणजे निवडीच्या स्वातंत्र्याला दिलेला नकार होय. अमुक एका रीतीने कृती करण्यासाठी आपण बांधलो गेलो आहोत. अशारीतीने स्वतःकडे पाहिल्यास ''मला निवडायचे स्वातंत्र्य नाही.'' तर आपण स्वतःलाच फसवीत आहोत. येथे कुश्रद्धा किंवा दांभिकता म्हणजे स्वतःला फसविणारा (आत्मवंचनेचा) प्रकार होय. आपण कृतीची निवड करण्यास असमर्थ असणे म्हणजे दांभिकता वा कुश्रद्धा होय. आपण अनेक सबबी, आवडी-निवडी व मते सांगतो तेव्हा त्या नियत होतात. अशा व्यक्तीबद्दल दांभिकता वा कुश्रद्धा ही संकल्पना उपयोगी पडते. व्यक्ती दांभिकतेचा स्वीकार अशाकरिता करतो की काय करावे याची निवड करण्याची आवश्यकता राहणार नाही. अशी जाणीवरहित स्वरुपसत् अशी वस्तू बनविण्याचा प्रयत्न करते.

सार्त्रने एक नैतिक सिद्धांत मांडून त्या सिद्धांताची तुलना कांटच्या कर्तव्यवादी सिद्धांताशी केली आहे. सार्त्र म्हणतो की एक माणूस म्हणून स्वतःचे स्वातंत्र्य हे माझे उद्दिष्ट असणारच. त्यासाठी प्रयत्नशील असेल तर इतरांचे स्वातंत्र्य हे माझे उद्दिष्ट अनिवार्य होते. एक साध्य म्हणून स्वातंत्र्याची इच्छा करताना त्याचे सार्वत्रीकरण केले नाही आणि इतरांच्या स्वातंत्र्याचा समावेश केला नाही तर माझी इच्छा आत्मव्याघाती

होईल. ज्या स्वातंत्र्याचा व्यक्ती विचार करते ते नियतत्त्वाच्या विरुद्ध असलेले निवड स्वातंत्र्य नव्हे तर ते राजकीय स्वातंत्र्य होय. हा विचार स्वीकारला तर अनेक उद्दिष्ट्ये तयार होऊन त्यातून नैतिक व राजकीय कृतीचा कार्यक्रम निघू शकतो.

### ८.३.५ असतेपणा आणि नसतेपणा (Being and nothingness)

सार्त्र असतेपणा व नसतेपणा या पुस्तकात म्हणतो की सर्व मूल्यांचा उगम हा स्वतःमध्ये आहे हे नैतिक कर्त्याच्या लक्षात आले म्हणजे त्याच्या स्वातंत्र्याला आत्मजाणीव येईल. व्याकुळतेत स्वतःचे प्रकटीकरण करील. ही व्याकुळता मूल्यांचे एकमेव उगमस्थान आहे ज्याच्यामुळे हे जगत अस्तित्वात येते. त्या रितेपणातही त्या स्वातंत्र्याचा अविष्कार होईल. कृती करण्याच्या शक्यता इतर व्यक्तींच्या संदर्भात वास्तवात येईल. त्याही निवड करु शकतात. त्यांची निवड माझ्या निवडीवर परिणाम करु शकतात. ज्या विशिष्ट परिस्थितीत निवड केली जाते त्यात स्वातंत्र असलेली व्यक्ती आपली सुटका करुन घेऊ शकते असे सार्त्र म्हणतो.

### ८.३.६ मूल्यमापनः

अस्तित्ववादी तत्त्वज्ञ सार्त्र हा मानवकेंद्री तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करतो. तो मानवी अस्तित्वाला महत्त्व देऊन कृती करण्याचे स्वातंत्र्य, निवड व स्वयंनिर्णयाची जबाबदारी निर्भयतेने करणे यातच मानवाचे अस्तित्व आहे. सार्त्रचा माणूस स्वातंत्रपणे आपल्या भविष्याला आकार देणारा आहे. त्याने नियतवादाचा धिक्कार करुन, ईश्वरी निर्मित माणूस त्याला मान्य नाही. तो ईश्वरावर श्रद्धा ठेवीत नाही. या अर्थाने तो निरीश्वरवादी आहे. स्वातंत्र्य ही माणसाची सत्ताच आहे असे सांगतो. अस्तित्व स्वातंत्र्य असे समीकरण सर्वच अस्तित्ववादी मांडतात. त्याने स्वातंत्र्याची व्याख्या दिली नाही. सार्त्रच्या अस्तित्ववादी विचारात अनेक प्रकारची अतिरंजीत विधाने व त्याच्या विचारातील विसंगती, उणीवा व मर्यादा मेरी वॉरनॉकने आपल्या इ.स. १९०० पासूनचा नीतिविचार या ग्रंथात प्रभावीपणे मांडल्या आहेत. त्यामुळे अस्तित्ववाद ही विचारप्रणाली फार काळ तग धरु शकली नाही.कारण जेथे विवेकाचा धिक्कार असतो तेथे तत्त्वज्ञानाची भरभराट होत नाही. अस्तित्ववाद ही एक मानवी जीवनासंबंधीचे प्रामाणिक आकलन असून अस्तित्ववाद्यांनी ही एक वैचारिक चळवळ उभी करुन त्यांचे योगदान नाकारता येणार नाही. सार्त्रचे अस्तित्ववादी तत्त्वज्ञानच अपूर्ण असल्याने त्यात संदिग्धता व मर्यादा आढळून येणे हे वास्तव आहे.

### आपली प्रगती तपासून पहा :

१) अस्तित्ववाद म्हणजे काय ?

२) 'अस्तित्व हे सारतत्त्वाच्या आधि येते' या अस्तित्ववादी सूत्राचा अर्थ सांगा.

३) सार्त्र हे निवड स्वातंत्र्यावर व कृतीच्या जबाबदारीवर जोर का देतात ?

४) सार्त्रच्या आत्मनेसत् व स्वरुपसत या संकल्पनांचा अर्थ सांगा.

५) सार्त्रने प्रतिपादन केलेली कुश्रद्धा (Bad faith) म्हणजे काय ?

६) अस्तित्ववादी नीतिशास्त्राचे मूल्यमापन करा.

## ८.४ सारांश

आधुनिक काळात स्त्रीचा भावबंध व स्त्रीपुरुष समानता या विचारांना केंद्रस्थानी मानून प्रा. कॅरोल गिलीगन यांनी स्त्रीवादी नीतिशास्त्राचा प्रामुख्याने पुरस्कार केला. त्यांनी लिंगभेदानुसार निःपक्षपाती पुरुष व भावबंध (आस्था)असणाऱ्या स्त्रीयांची वैशिष्ट्ये सांगून न्याय, कर्तव्ये व अधिकार या नैतिक संकल्पनांचा व स्त्रीयांची वैशिष्ट्ये सांगून न्याय, कर्तव्ये व अधिकार या नैतिक संकल्पनांचा स्त्रीया कशाप्रकारे विचार करतात हे स्पष्ट करतात. स्वप्रतिमाबाबत पुरुषांची विलगता व स्त्रीची संलग्नता कशी असते याचे विवेचन करतात. स्त्रीच्या नैतिक विकासाच्या अवस्था स्पष्ट करण्यासाठी कोहलबर्गप्रणीत नैतिक विकासाच्या अवस्थांचे प्रारुप घेऊन नव्याने मांडणी करतात. स्त्रीवादी नीतिशास्त्राचा आधुनिक दृष्टीकोन विशद करुन स्त्रीपुरुष समतेचे लिंगभेद व वंशभेद दूर ठेवून सामाजिक व राजकीय तत्त्वज्ञानाची मांडणी करतात.

अस्तित्ववाद ही एक २० व्या शतकातील सत्ताशास्त्रविरोधी विचार प्रणाली असून किर्केगार्द हा या विचारप्रणालीचा जनक होय. यास्पर्स, मार्शेल, हायडेगर, कामू व सार्त्र हे अस्तित्ववादाचे पुरस्कर्ते होत. त्यांनी मानवाच्या अस्तित्वाचा प्रमुख विचार मांडला. विशेषतः सात्रने अस्तित्ववाद व मानवतावाद व इतरही अनेक ग्रंथ लिहून मानवी जीवनाच्या अर्थाचे खरे रहस्य मांडले. सार्त्रने मानवी स्वातंत्र्याचे सखोल चिंतन करुन अस्तित्व हे सारतत्त्वाच्या आधि येते. हा प्रमुख विचार मांडला. त्याने माणसाचे स्वत्व, स्वातंत्र्य, स्वयंनिर्णय व त्यानुसार कर्माची जबाबदारी यावर अधिक भर दिला. कुश्रद्धा, असतेपण व नसतेपण याचेही अस्तित्ववादी नीतिशास्त्रातील महत्त्व सांगून मानवकेंद्री तत्त्वज्ञानाचा व मानवी स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. तो निरीश्वरवादी होता. त्याने पाश्चात्य धर्मशास्त्राविरुद्धचे विचार अस्तित्ववादी विचारात मांडले. त्याच्या विचारात अनेक उणीवा, विसंगती व मर्यादा मेरीवॉरनॉक यांनी १९०० पासूनचा नीतिविचार या ग्रंथात दाखवून दिल्यामुळे ही विचारसरणी फार काळ तग धरु शकली नाही. तरीही या विचारप्रणालीचे महत्त्व नजरेआड करुन चालणार नाही.

## ८.५ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

१) कॅरोल गिलीगन यांच्या स्त्रीवादी नीतिशास्त्राचे सविस्तर विवेचन करुन त्याचे मूल्यमापन करा.

२) अस्तित्ववाद म्हणजे काय ? सार्त्रचे अस्तित्ववादी नीतिशास्त्र सविस्तर स्पष्ट करुन त्याचे मूल्यमापन करा.

३) टिपा लिहा

अ) सार्त्रचे अस्तित्ववादी नीतिशास्त्र

ब) स्वप्रतिमा म्हणून पुरुषाची विलगता व स्त्रीची संलग्नता

क) स्त्रीच्या नैतिक विकासाच्या अवस्था

ड) गिलीगनचे स्त्रीवादी नीतिशास्त्र

इ) अस्तित्ववाद

फ) कुश्रद्धा

ग) आत्मनेसत् व स्वरुपसत्  यामधील फरक

*****

# १

## प्रकरण १
# शिक्षेच्या उपपत्त्या
(Theories of Punishment)

**घटक रचना**

१.० उद्दिष्ट्ये
१.१ प्रस्तावना
१.२ शिक्षेचा अर्थ
१.३ शिक्षेच्या उपपत्त्या
१.४ फाशीची (मृत्यूदंडाची) शिक्षा.
१.५ देहान्त शिक्षेचे समर्थन
१.६ सारांश
१.७ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

## १.० उद्दिष्ट्ये

१) शिक्षेचा अर्थ समजावून घेता येईल.
२) शिक्षेच्या विविध उपपत्त्या कोणत्या आहेत याविषयीचे आकलन होईल.
३) फाशीची शिक्षा योग्य आहे की नाही ते समजेल. फाशीच्या शिक्षेचे समर्थन कसे करता येईल यासंबंधीचे आकलन होईल.

## १.१ प्रस्तावना

पाप अथवा दुराचरण ही गोष्ट म्हटल्यावर तिचे निराकरण कसे करावयाचे हा प्रश्न मात्र नीतिमीमांसेचा होऊ शकतो. 'दुरितांचे तिमिर' घालविण्यासाठी अपराधी व्यक्तीस शिक्षा करणे ही मानवी संस्कृतीत निर्माण झालेली एक रीत आहे. म्हणून शिक्षेसंबंधी तात्त्विक विचार हा नीतिमीमांसेत करावा लागतो. नीतिला स्वतःप्रामाण्य आहे. पण तिचे बल तोकडे पडते. नीतीला जसे प्रामाण्य आहे तसे सामर्थ्यही असते तर नीती ही विश्वरचनेचे नियामक तत्व बनली असती. Had it strengh as it hath manifest authority, it would absolutely rule the world (Bishop Butler) पण प्रत्यक्षात तसे घडत नाही. म्हणून जगात अपूर्णता आहे. दुःख आहे,

दुर्जनता आणि दुरित आहे. त्याचे काही निराकरण व्हावे म्हणून 'अपराध्यास दंड' ही संस्था निर्माण झाली.

माणसाकडून अनेक वेळा अपराध होतात. त्या अपराधांना आपण अनैतिक (वाईट) असे म्हणतो. व्यक्ती ज्या वेळेस अनैतिक मार्ग निवडते त्या कृतीला अनैतिक कृती म्हणणे म्हणजे आपण त्याला अपराध म्हणतो. आजच्या समाजात गुन्हेगारी/ अनैतिक कृत्य करणारे चोर, गुंड, दुष्ट, दुर्जन आहेत. अशा गुन्हेगारांकडून समाजाचे स्वास्थ्य बिघडते. सामाजिक विकास थांबतो, प्रगतीला अडसर ठरतो. त्यामुळे गुन्हेगारीची समस्या किंवा अशुभ घटना दूर करण्यासाठी शिक्षेची अथवा दंडनीतीचे कार्य मोलाचे आहे. गुन्हेगाराने कायदा मोडल्यावर त्याला शिक्षा द्यावी का? असा प्रश्न नीतीशास्त्राला पडतो. त्यामुळे ती एक नैतिक समस्या बनते. गुन्हेगारांना शिक्षा देताना त्यात अनेक दोष किंवा उणिवा दिसून येतात.

## ९.२ शिक्षेचा अर्थ व कार्य

जेंव्हा व्यक्तीकडून कायद्याचे उल्लंघन होते तेंव्हा ती व्यक्ती अपराधी किंवा गुन्हेगार ठरते. या गुन्हेगारास शिक्षा होऊ शकते. समाज विरोधी व्यक्ती वागली की ती अपराधी ठरते. अशा अपराध्यास शिक्षा मिळणे योग्य आहे. शिक्षेमध्ये पुढील गोष्टी गृहीत धरलेल्या असतात.

१) शिक्षा ही गुन्ह्याबद्दल देण्यात आली पाहिजे.

२) शिक्षा ही मानवाने देण्यात आली पाहिजे.

३) कायद्याचे उल्लंघन झाल्यामुळे वस्तुनिष्ठ पद्धतीने शिक्षा सत्ताधारीने दिली पाहिजे। गुन्हेगाराला शिक्षा देताना शिक्षा द्यावी का? शिक्षा कोणाला द्यावी? या संबंधीचे प्रश्न विचारात घ्यावे लागतात. लहान मुले, आजारी व्यक्ती, वेडे, प्राण्यांचे वर्तन, दहशतीला बळी पडून वाईट कृत्य करणारी माणसे शिक्षेपासून वगळण्यात येतात. तरीही त्यांना किती शिक्षा द्यावी हे प्रश्न उपस्थित होतात. कायद्याचे अज्ञान शिक्षा टाळण्यासाठी सबब चालू शकत नाही.

उदा. मद्यपान करुन मोटार चालविणारा चालक. मद्यपान करुन मोटार चालविणे हा गुन्हा आहे. हे त्यास माहिती नाही असे तो सांगू शकत नाही. शिक्षा टाळण्याची ही सबब नव्हे.

जगात दुर्जनता आहे. समाजात गुन्हे होतात माणसे अपराध करतात. एखाद्याने अपराध केला याचा अर्थ, समाजात जी नैतिक धारणा असते अथवा जो नैतिक तोल असावा असा आपला संकल्प असतो, त्याला काही धक्का लागला असा होईल तो पुन्हा आणावा, निर्माण झालेले दुर्जनत्व हे कोणत्या तरी रीतीने निपटून काढावे, हे शिक्षेचे अथवा दंडनीतीचे कार्य आहे असे स्थूल मानाने मानता येईल.

## ९.३ शिक्षेच्या उपपत्त्या (Theories of Punishment)

शिक्षेचे हे कार्य लक्षात ठेवून शिक्षेसंबंधीच्या निरनिराळ्या उपपत्तींचा विचार करणे आवश्यक आहे. प्राप्तव्यवादी आणि कर्तव्यवादी या नीतिमीमांसेच्या दोन प्रमुख उपपत्त्या आहेत. त्याला अनुसरून शिक्षेसंबंधीच्या उपपत्त्यासुद्धा मुख्यतः दोन प्रकारच्या आहेत. कारण शिक्षचे कार्य ढासळलेल्या नैतिक तोलाची पुनःस्थापना हे आहे. नीतीच्या अर्थाकडे पाहण्याच्या दोन तऱ्हा आहेत. म्हणून शिक्षेसंबंधीसुद्धा त्यांना समांतर अशा दोन उपपत्त्या प्राप्तव्यवादी अथवा उपयुक्तावादी आहे. आणि दुसरी नियमवादी अथवा कर्तव्यवादी आहे. शिक्षेच्या उपपत्त्या पुढील प्रमाणे आहेत.

## ९.३.१ शिक्षेची प्रतिशोध उपपत्ती (प्रायश्चित्त) (Retributive Theory of Punishment):

एखाद्या व्यक्तीने गुन्हा केल्यास ती व्यक्ती शिक्षेस पात्र आहे, या एकमेव कराणासाठी शिक्षा देण्याचा उद्देश असतो. या उपपत्तीचा पुरस्कार कांट या जर्मन तत्त्ववेत्त्याने आपल्या Philosophy of Law या ग्रंथात केला. न्यायालयीन शिक्षा व्यक्तीने गुन्हा केल्यास तिला दिली जावी. केवळ गुन्हेगाराला शिक्षा दिल्यामुळे तिच्यातून दुसरी चांगली गोष्ट निर्माण होईल म्हणून शिक्षा दिली जाते. हे स्पष्ट होण्यासाठी कांटने पुढील उदाहरण दिले आहे. समाजातल्या एखाद्याने आत्महत्या करण्याचे ठरविले तर काही निष्पन्न होणार नाही. गुन्हेगाराला शिक्षा दिली पाहिजे. ब्रॅडले व बोसांके या नीतीपंडीतांनी सुद्धा प्रतिशोध उपपत्तीला मान्यता दिली आहे. ब्रॅडले म्हणतो आपण शिक्षेला पात्र असल्याने आपण ती स्वीकारतो. या शिवाय कुठल्याही उद्देशाने गुन्हेगाराला शिक्षा दिली गेल्यास ती अनैतिक ठरेल आणि त्या व्यक्तीवर घोर अन्याय होईल.

बोसांके म्हणतो की शिक्षेचा हेतू पापाचा व गुन्ह्याचा नाश करणे आहे, पण दुःख देणे नव्हे. जर गुन्हेगाराला शिक्षा दिली नाही तर त्याचे कृत्य वाईटच ठरेल. त्याच्या वाईट कृत्याचा नाश करण्यासाठी त्याला शिक्षा दिली पाहिजे. या उपपत्तीनुसार गुन्हेगाराला शिक्षा झालीच पाहिजे. भावनेची कदर होता कामा नये. कायद्यासमोर सर्व समान आहेत. श्रीमंत असो वा गरीब असो, गुन्हेगाराविषयी भेदभाव न करता त्याला शिक्षा देणे आवश्यक आहे. न्यायाधीश गुन्हेगाराला सुडाच्या भावनेतून शिक्षा देत नसून त्याने केलेल्या गुन्ह्याच्या बदल्यात त्याला शिक्षा देत असतो. एवढेच नव्हे तर ते न्यायाधीशाचे कर्तव्य आहे.

एखाद्या गुन्हेगाराने ज्या प्रकारचा गुन्हा केलेला असेल त्याला त्याच प्रकारची शिक्षा मिळावी असे समर्थन ही उपपत्ती करते. मराठीतील 'जशास तसे' 'करावे तसे भरावे' या म्हणीचा अवलंब केला जातो. एखाद्या व्यक्तीने किंवा गुन्हेगाराने एखाद्याचा दात पाडला किंवा हात तोडला तर त्या गुन्हेगाराचाही दात पाडणे किंवा हात तोडणे अशी शिक्षा देणे होय. थोडक्यात प्रतिशोध उपपत्ती ``Tooth for Tooth or Eye for Eye" या न्यायतत्वावर आधारलेली आहे. गुन्हेगाराला त्याच्या गुन्ह्याबद्दल या प्रकारची शिक्षा किंवा प्रायश्चित मिळाले पाहिजे म्हणून या उपपत्तीस प्रायश्चित उपपत्ती असेही म्हणतात.

शिक्षेची प्रतिशोध उपपत्ती जे मानतात ते या सूडभावनेचा पुरस्कार करीत नाहीत. सूडबुद्धी ही एक भावना आहे. भावनेच्या भरात केलेली कृती नैतिक होणार नाही असे कर्तव्यवादी नीतिमीमांसक मानतीलच मानतील. सूडबुद्धीतील भावनेचा म्हणजे विकाराचा अंश काढून टाकण्यासाठी समाजाने न्याययंत्रणा निर्माण केली आहे. समाजाचा नैतिक विवेक न्यायाधीशाच्या मुखाने शिक्षा सुनावतो. न्यायाधिशाच्या मनात सूडाची भावना नसते. म्हणून प्रतिशोध उपपत्ती पत्करल्यावर आपण असंस्कृत माणसाच्या सूडबुद्धीपाशी येऊन पोहोचतो असे बिलकुल नाही. या उपपत्तीचे म्हणणे इतकेच आहे की, गुन्हा केला हेच शिक्षा करण्यास पुरेसे समर्थन आहे. शिक्षेचे फायदे काय होतील याचा विचार करणे म्हणजे अपराधी माणसाकडे तो इतरांच्या हिताचे साधन आहे अशा दृष्टीने पाहिल्यासारखे होईल. ही दृष्टी नीतिशास्त्राला मंजूर असणार नाही, कारण मनुष्यव्यक्ती हे साध्य आहे, साधन नाही.

**आपली प्रगती तपासा.**

१. शिक्षेची प्रतिशोध उपपत्ती स्पष्ट करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

**प्रतिशोध उपपत्तीचे मुल्यमापनः-**

१) प्रतिशोध उपपत्तीत गुन्हेगाराला त्याने केलेल्या गुन्हासाठी त्याच प्रकारची शिक्षा देणे हे सुसंस्कृत माणसाला शोभत नाही. गुन्हेगाराने व्यक्तीचा दात पाडला म्हणून गुन्हेगाराचाही दात पाडावा हे योग्य नाही. कारण त्याला जी शिक्षा दिली जाते ती सूडभावनेतून तयार झाली आहे. म्हणून ही उपपत्ती सूडाच्या भावनेला उत्तेजन देते. सूड ही एक भावना आहे. भावनेच्या भरात केलेली ही कृती नैतिक (चांगली) नाही.

२) ही उपपत्ती स्वीकारली तर गुन्हेगारांना शिक्षा होऊनही गुन्हेगारीचे प्रमाण वाढतच आहे याचे स्पष्टीकरण ही उपपत्ती देत नाही.

३) कांट, ब्रॅडले, टी.एच.ग्रीन व हेगेल या तत्त्ववेत्यांनी ही उपपत्ती स्वीकारली असली तरी रॅशडाल या तत्ववेत्याने या उपपत्तीस विरोध केला आहे. त्याच्यामते 'दाताला दात' 'डोळ्याला डोळा' ही न्यायकल्पना चुकीची आहे. सध्या गुन्हेगाराला शिक्षा न्यायसंस्था देते. पण सूडभावनेतून शिक्षा दिली जात नाही. सूड ही खाजगी बाब आहे. याचेही स्पष्टीकरण ही उपपत्ती देत नाही.

४) या उपपत्तीत शिक्षेच्या परिणामाचा विचार केलेला नाही. कारण कठोर शिक्षा देऊनही जे गुन्हेगार सराईत आहेत, त्यांच्यावर परिणाम होईल की नाही याचे स्पष्टीकरण ही उपपत्ती देत नाही. याशिवाय गुन्ह्याचे प्रमाण न पाहता न्यायाधीश

वाटेल ती शिक्षा गुन्हेगाराला देऊ शकतो. गुन्हा भयंकर असूनही शिक्षा कमी झालेली असते, याचेही स्पष्टीकरण ही उपपत्ती देत नाही.

५) रॅशडालच्या मते ही उपपत्ती असमाधानकारक आहे. कारण बरेच गुन्हे मानासिक विकृतीतून घडतात. अशा विकृत गुन्हेगारास उपचाराची आवश्यकता असते, शिक्षेची नसते. अर्थात रॅशडालच्या या उपपत्तीमधला आक्षेप चुकीचा आहे. कारण प्रत्येक गुन्हा मानसिक विकृतीतून उदभवत नाही. आज जे गुन्हे घडतात. जसे खून, दरोडे, बलात्कार, फसवणूक, भ्रष्टाचार इ. प्रकारचे गुन्हे जाणीवपूर्वक व योजनाबद्ध पद्धतीने केले जातात. याचा अर्थ अशाप्रकारचे गुन्हे करणाऱ्या व्यक्ती विकृत असतात, हे रॅशडालचे म्हणणे चुकीचे आहे. उलट अशा प्रकारच्या अनैतिक कृती केल्या तर त्या गुन्हेगाराला शिक्षा करणे हे नैतिकदृष्ट्या योग्य आहे.

## १.३.२ शिक्षेची निवारणवादी (प्रतिबंद) उपपत्ती:- (Deterrent Theory of Punishment)

शिक्षेची ही एक महत्वाची उपपत्ती असून या उपपत्तीनुसार गुन्हगार गुन्हा शाबित झाल्यावर तो शिक्षेस पात्र आहे. केवळ या एकाच कारणामुळे गुन्हेगाराला शिक्षा दिली जावी असा उद्देश या पाठीमागे असतो. या उपपत्तीनुसार गुन्हेगारावर वचक बसावा आणि गुन्हेगारानं तो गुन्हा पुन्हा करु नये, यासाठी त्याला चांगली अद्दल घडावी. या उद्देशाने शिक्षा देणे आवश्यक आहे. गुन्हेगाराला शिक्षा दिली म्हणजे ती शिक्षा इतर लोक पाहून त्यांच्यावरही वचक बसण्यास मदत होते. समाजामध्ये गुन्हेगारांकडून पुन्हा तसल्या प्रकारचे गुन्हे होऊ नयेत म्हणून त्यास शिक्षा देण्यात यावी हा उद्देश या उपपत्तीचा आहे.

शिक्षेच्या निवारणवादी उपपत्तीमध्ये गुन्हेगाराला गुन्ह्यापासून परावृत्त करणे किंवा त्यास पायबंद घालणे किंवा वाईट कृत्यापासून त्याला प्रतिबंध घालणे हा उद्देश असतो. म्हणून या उपपत्तीला **'प्रतिबंध'** उपपत्ती म्हणतात. ही उपपत्ती एका न्यायधीशाने मोठ्या मार्मिकपणे व चातुर्याने गुन्हेगारास शिक्षा देतांना व्यक्त केली आहे. एका गुन्हेगाराने एका मेंढपाळाच्या मेंढ्या चोरल्या नंतर त्या गुन्हेगाराला पकडले व न्यायाधीशासमोर हजर केले. त्यावेळेस न्यायधिशाने गुन्हेगाराला सांगितले की, ''तू मेंढ्या चोरल्यास म्हणून तुला शिक्षा देण्यात येत नसून पुन्हा मेंढ्या चोरल्या जाऊ नयेत यासाठी शिक्षा देण्यात येत आहे''. न्यायाधिशाच्या या वाक्यात इतर लोकांना या गुन्ह्यापासून प्रतिबंध करण्याचा प्रमुख उद्देश असतो.

या उपपत्तीत समाजातील गुन्हेगारी नियंत्रीत करण्यासाठी शिक्षा उपयुक्त ठरते. त्यामुळे लोकांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण होते. या उपपत्तीत बहुसुख हे गृहीत धरलेले आहे.

वर सांगितलेली निवारणवादी उपपत्ती ही मूलतः उपयुक्तवादी आहे. तीमध्ये शिक्षेचे फायदे विचारात घेतले जातात. पण वर सांगितलेले आक्षेप तिच्यावर येत असल्यामुळे तिच्या ऐवजी जिच्यात शिक्षेचा कोणताही फायदा विचारात घेतला जात

नाही अशी दुसऱ्या टोकाची एक उपपत्ती स्विकारली जाते. तिचे नाव प्रतिशोध उपपत्ती असे आहे. कांट, ब्रॅडले यांनी तिचा पुरस्कार केला आहे.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्नः शिक्षेची निवारणवादी उपपत्ती स्पष्ट करा.

**निवारणवादी उपपत्तीचे मुल्यमापनः-**

१) या उपपत्तीचे गुन्हेगाराला गुन्ह्याबद्दल शिक्षा झाली पाहिजे. म्हणजे गुन्हेगार शिक्षेशिवाय सुटता कामा नये. म्हणून गुन्हगाराला समाजासमोर शिक्षा करुन लोकांना/समाजाला जबर बसावी हा असतो पण एखाद्या वेळेस गुन्हेगार न सापडता दुसऱ्या निरपराध व्यक्तीला शिक्षा देणे हे अन्यायकारक होते. या संबंधीचे स्पष्टीकरण ही उपपत्ती देऊ शकत नाही.

२) घडलेला गुन्हा व त्याबद्दल दिलेली शिक्षा यामध्ये फार अंतर पडते. लोकांना त्या शिक्षेचे परिणाम काय आहेत हे समजण्यास वेळ लागतो. शिवाय शिक्षेचे प्रमाण, प्रतिबंधासाठी कोणती शिक्षा न्यायधिश करतो, त्यामुळे निवारणवादी उपपत्ती क्रुर ठरण्याची शक्यता असते.

३) या उपपत्तीमुळे लोकांना भीतीच्या दडपणाखाली सदाचारी बनविणे हे योग्य नाही. भीती आणि अनिती यांच्यात फरक राहत नाही. भीतीपोटी शिक्षा देऊन नैतिक बनविते हे या उपपत्तीत योग्य दिसत नाही. भीतीपोटी शिक्षा देण्याची शक्यता या उपपत्तीत असेल तर ते योग्य नव्हे.

४) प्रसारमाध्यमांद्वारा जसे आकाशवाणी, दूरदर्शन आणि वर्तमानपत्र इत्यादीमधून शिक्षेस पुरेशी प्रसिद्धी दिली गेली, तर शिक्षेची ही उपपत्ती अधिक प्रभावी ठरेल. या उपपत्तीत गुन्हेगारांचे पुनर्वसन करायचे असेल तर प्रसिद्धीने हे उद्दिष्टसाध्य होणार नाही म्हणजे गुन्हेगाराचे पुनर्वसन होणार नाही. अशाप्रकारे शिक्षेची निवारणवादी उपपत्ती ही शिक्षेचे समाधानकारक समर्थन देण्यात अपुरी ठरते.

## १.३.३ शिक्षेची सुधारणावादी उपपत्ती (Reformative Theory of Punishment):-

शिक्षेसंबंधी आणखीही एक उपपत्ती आहे. तिचे नाव सुधारणावादी उपपत्ती असे आहे. शिक्षेचे कार्य अपराध्याची सुधारणा करावी असे या उपपत्तीत मानले जाते. ही उपपत्ती स्वीकारूनच मराठीत 'शिक्षा' हा शब्द आलेला आहे. 'शिक्ष्'या क्रियापदाचा अर्थ शिकवणे असा आहे.

आज सुसंस्कृत समाजात या शिक्षेची उपपत्ती मानवतावादी दृष्टीने गुन्हेगाराकडे पाहते. गुन्हेगाराला शिक्षा द्यायची म्हणजे नेमके काय करायचे? तर त्याला वाईट गोष्टींपासून दूर करून त्याच्यात सुधारणा घडवून आणणे होय. गुन्हेगारामध्ये शिक्षेऐवजी सुधारणा घडवून आणणे हा मूलभूत उद्देश या उपपत्तीमागे आहे. गुन्हेगाराला शिक्षा देण्याऐवजी शिक्षण द्यावे. नीतीचे पाठ शिकवावे व सुसंस्कृत किंवा चांगला नागरिक बनविणे याचाच अर्थ तुरुंगाचे रुपांतर संस्कार शाळेत करावे असे स्पष्टीकरण ही उपपत्ती करते. गुन्हेगार गुन्हगारीकडे का वळला? त्याची मानसिक अवस्था कोणती होती? गुन्हेगारीची कारणे शोधून गुन्हगारांच्या हृदयात परिवर्तन घडवून आणून त्यांच्यात सुधारणा होण्याची शक्यता आहे, असे ही उपपत्ती स्पष्ट करते. पाश्चिमात्य कारागृहात ख्रिस्ती धर्म उपदेशक नियमितपणे कैद्यांची भेट घेऊन खरे काय? खोटे काय? चांगले काय? वाईट काय? यामधील फरक समजावून सांगतात आणि कैद्यात नैतिक परिवर्तन घडवून आणण्याचे प्रयत्न करतात. गुन्हगार सुधारेल अशी त्यांना आशा ही वाटते. गुन्हेगार निश्चितच सुधारू शकेल अशी खात्री या उपपत्तीच्या समर्थकांना वाटते.

**आपली प्रगती तपासा.**

१. शिक्षेची सुधारणावादी उपपत्ती स्पष्ट करा.

**सुधारणावादी उपपत्तीचे मुल्यमापनः-**

१) या उपपत्तीची नैतिक जबाबदारी नाहीशी होते. कारण गुन्हेगाराला शिक्षा न देता उलट त्याला दया व सहानभूती दाखवून त्यांच्यात सुधारणा घडवून आणली जाते. चांगला नागरिक बनविणे असा उद्देश या उपपत्तीचा आहे. पण जे लोक वेडे अज्ञानी किंवा मानसिक दृष्ट्या विकृत आहेत. त्यांच्या बाबतीत कोणती सुधारणा घडवून आणायची याचे स्पष्टीकरण ही उपपत्ती देवू शकत नाही. शिवाय गुन्हेगाराला शिक्षा न देता त्यांच्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी कोणत्या नीतीचे पाठ शिकवावे हा ही एक मोठा प्रश्न आहे. उलट गुन्हेगारामध्ये सुधारणा होईल असे ठाम म्हणता येत नाही. या उलट त्यांचे नैतिक अधःपतन होण्याची शक्यता असते.

२) भीतीने मानवात सुधारणा होवू शकत नाही केवळ भीती दाखवून खोट्याचे परिवर्तन करता येत नाही. जर एखाद्या व्यक्तीस शिक्षा करणे भाग पडते तर त्या व्यक्तीस सुसंस्कृत म्हणू शकत नाही. या उपपत्तीत वाल्याचा वाल्मिकी होऊ शकतो. हे हृदय परिवर्तन काही व्यक्तींच्या बाबतीत होऊ शकते पण सर्व गुन्हेगारांच्या बाबतीत हृदय परिवर्तन होणार नाही व ते सुधारणारही नाहीत.

३) गुन्हेगाराला आपण नैतिक गोष्टीचे उल्लंघन केले आहे, हे समजले पाहिजे. त्याची सद्सद्विवेक बुद्धी जागृत झाली पाहिजे. पण सुधारणेमुळे या गोष्टी गुन्हेगाराला समजतीलच असे नाही. याचे योग्य ते समर्थन ही उपपत्ती देऊ शकत नाही.

### १.३.४ समावेशक उपपत्ती:-

शिक्षेच्या वर दिलेल्या उपपत्ती अपुऱ्या असल्यामुळे त्या प्रत्येकीतील सत्यांश घेऊन खालीलप्रमाणे एक सर्वसमावेशक उपपत्ती देता येईल.

मुळात व्यक्ती शिक्षेला पात्र होते ते तिने काही अपराध केला होता म्हणून. इतरांचा काही फायदा व्हावा म्हणून ती शिक्षेस पात्र ठरत नाही. प्रतिशोध उपपत्तीतील हा भाग स्वीकारण्यासारखा आहे. त्यामुळे निरपराध माणसास शिक्षा करण्याचा प्रश्नच येणार नाही. पण शिक्षेचे प्रमाण किती असावे हे ठरवताना तिच्या परिणामांकडे नजर देणे वावगे नाही. अपराधी व्यक्तीने गुन्हा करून इतरांच्या अधिकारावर ज्या मर्यादेपर्यंत आक्रमण केले असेल त्या मर्यादेपर्यंत तिने आपले अधिकार गमावले आहेत. पण या मर्यादाच्या आत राहून परिणामांकडे नजर ठेऊन शिक्षेचे प्रमाण कमी-जास्त करता येईल. हे म्हणणे स्वीकारल्यास निवारणवादी उपपत्तीतील सत्यांश आपण घेतला असे होईल. अगदी क्वचित प्रसंगी असे घडेल की अपराध्याला नैतिकदृष्ट्या जबाबदार धरण्याऐवजी तो अज्ञानी आणि मानसिक रोगी आहे हा दृष्टीकोन योग्य होईल. अशा थोड्या बाबतीत सुधारणावादी उपपत्तीसुद्धा मान्य करता येईल. या उपपत्तीत तिन्ही प्रसिद्ध उपपत्तींचा संग्रह केला गेला आहे.

## १.४ फाशीची (मृत्युदंडाची) शिक्षा:- (Capital Punishment)

देहांत शासन म्हणजे गुन्हेगाराच्या गळ्याला फास लावून त्यास मरेपर्यंत टांगणे होय. खुनासारख्या अतिगंभीर गुन्ह्याबद्दल फाशीची शिक्षा ठोठावली जाते. पुर्वीच्या काळी ही शिक्षा घरफोडी अशा इतरही शुल्लक गुन्ह्यासाठी दिली जात असे. आजच्या सुसंस्कृत समाजात फाशीची शिक्षा रानटी आणि अत्यंत क्रुर व अमानुष प्रकारची शिक्षा आहे. म्हणून काही सुसंस्कृत राष्ट्रातून फाशीची शिक्षा रद्द करण्यात आली आहे. कारण त्यांना एखाद्या मानवाचा अशा पद्धतीने जीव घेणे रानटी व क्रुरपणाचे वाटते. म्हणून गुन्हेगाराला मृत्यूदंडाची शिक्षा देण्याऐवजी शिक्षेचा एखादा चांगला मार्ग शोधणे आवश्यक वाटते. आपल्या घराची एखाद्याने घरफोडी केली म्हणून आपण त्याचे घर फोडत नाही. तसेच एखाद्याने खून केला म्हणून आपण त्याला ठार मारत नाही. शिवाय ही शिक्षा गुन्हेगाराचा जगण्याचा  हक्क हिरावून घेते. शिवाय ही शिक्षा गुन्हेगाराला भीतीने देण्यात येते. ही शिक्षा योग्य की अयोग्य या विषयक पुढील मते आहेत.

### ९.४.१ फाशीच्या शिक्षेसंबंधी अनुकूल मतेः

१) प्रत्येकाला जिवंत राहण्याचा हक्क आहे. जर एखाद्या गुन्हेगाराने खून केला तर त्याने त्या माणसाचा जिवंत राहण्याचा हक्क हिरावून घेतला, अशा अनैतिक कृत्याना देहदंड किंवा फाशीची शिक्षा देणे योग्य होय.

२) देशद्रोह, राजद्रोह, खून आणि सामाजिक स्वास्थ्य धोक्यात आणणाऱ्या गुन्हेगारांसाठी फाशीची वा मृत्युदंडाची शिक्षा देणे आवश्यक आहे.

३) मृत्यूदंड किंवा देहदंडाची शिक्षा ही इतर शिक्षेपेक्षा अधिक परिणामकारक असल्यामुळे इतरांवर जबर बसते व गुन्हेगाराला दहशत बसते. म्हणजे मृत्यूदंडाची शिक्षा ही प्रतिबंधक ठरते. अर्थात मृत्यूची भीती ही गुन्हेगाराच्या बाबतीत प्रतिबंधक ठरु शकते.

४) काही विचारवंताच्या मते फाशीच्या शिक्षेपेक्षा जन्मठेपेची शिक्षा बरी पण जन्मठेपेच्या शिक्षेमुळे गुन्हेगाराला जन्मभर असाध्य यातना सोसाव्या लागतात. तसेच गुन्हेगारांवर संरक्षणाचा खर्च वाढतो. जन्मठेप भोगूनही गुन्हेगार सुधारेल याची खात्री देता येत नाही. समाजालाही त्याच्याविषयी सहानुभूती वाटत नाही. म्हणून फाशीची किंवा देहदंडाची शिक्षा देणे योग्य आहे.

५) देहान्त शिक्षेचे समर्थन करणारा शिक्षेचा प्रतिशोध सिद्धांत होय. या सिद्धांतानुसार गुन्हेगाराला शिक्षा झालीच पाहिजे. त्याने एखाद्या व्यक्तीचा जीव घेतला तर त्याला देहांताची शिक्षा देवून भरपाई केली पाहिजे.

अशाप्रकारे फाशीच्या शिक्षेच्या समर्थनार्थ अनुकूल मते मांडण्यात आली आहेत. त्याच्यात फाशीची शिक्षा देणे हे २० व्या शतकातील सुसंस्कृत माणसाला शोभत नाही. कारण या शिक्षेत अनेक दोषही आहेत.

### ९.४.२ फाशीच्या शिक्षेसंबंधी प्रतिकुल मतेः-

१) २० व्या शतकाचा उत्तरार्धात व २१ व्या शतकाच्या प्रारंभी अनेक अंगानी वैज्ञानिक, तांत्रिक व सांस्कृतिक प्रगती झालेली आहे. अशा सुसंस्कृत समाजात गुन्हेगाराला फाशी देणे मानवतेला काळीमा फासणारे आहे. गुन्हेगारांचा जगण्याचा हक्क हिरावून घेणे हे योग्य नव्हे. फाशी देतांना गुन्हेगाराला अपराधी न मानता मानवी दृष्टीकोन समोर ठेवून त्याला योग्य अशीच पर्यायी शिक्षा दिली पाहिजे. शिवाय अनेक गुन्हेगारांना फाशीची शिक्षा देवून ही गुन्हेगारी कमी झाली नाही. अर्थातच फाशीची शिक्षा ही सामाजिक अपयशाची बनली आहे.

२) मानव हा नेहमी वाईटच असतो असे नव्हे तर परिस्थिती त्याला गुन्हेगार बनवण्यास प्रवृत्त करते. म्हणून अशा गुन्हेगाराची सुधारणा करावी पण फाशी देवू

नये असा दृष्टीकोन '**ॲम्नेस्टिक इंटरनॅशनल सोसायटी**' या मानवी हक्क संरक्षण करणाऱ्या संस्थेने मांडला आहे. त्यांच्या मते फाशीची शिक्षा ही मानवतावादाला कलंक लावणारी आहे. म्हणून या शिक्षेऐवजी गुन्हगारला सुधारण्याची संधी द्यावी.

३) गुन्हेगारांने भयंकर स्वरूपाचा गुन्हा केल्यास त्याला मरेपर्यंत फाशी दिल्याने गुन्ह्याची भरपाई होत नाही. मग फाशीची शिक्षा का द्यावी ?

४) कधी कधी चुकीच्या न्यायदानामुळे निरपराधी व्यक्तीला देहदंडची शिक्षा मिळण्यीची शक्यता असते. अपराधी म्हणून निरपराधी व्यक्तीलाच फाशी दिली जाते आणि निरपराधी व्यक्तीला फाशी दिली तर त्यची शिक्षा भरून कशी काढणार. म्हणजेच न्यायदानातील चुकीची दुरुस्ती करणे हे अशक्य आहे. निरपराध व्यक्तीला फाशी दिल्यावर खरा गुन्हेगार नंतर शाबीत होतो. निरपराधी व्यक्तीवर झालेला अन्याय या शिक्षेमुळे भरुन काढणे अशक्य आहे.

वरील विवेचनानंतर देहांताची शिक्षा (मृत्युदंडाची शिक्षा) ही काही विशिष्ट गुन्हेगारांना देण्यात यावी. जसे अतिरेकी, बलात्कार करणारे, खुन करणारे, राजद्रोह, देशद्रोह करणारे यांना ही शिक्षा देण्यात यावी असे वाटते. तेव्हा मृत्युदंडाची किंवा देहदंडाची शिक्षा नसणे हे योग्य दिसत नाही.

## ९.५ देहान्त (मृत्युदंडाच्या) शिक्षेचे समर्थन

इतिहासात फार प्राचीन कालापासून देहान्ताच्या शिक्षेची पद्धत सुरु आहे. केवळ एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीचा जीव घेतला एवढ्या एकाच कारणावरुन ही शिक्षा दिली जाई असे नाही. राजद्रोह, व्यभिचार अशा भिन्न-भिन्न प्रकारच्या गुन्ह्यांबद्दल या शिक्षेस मान्यता होती. १८ व्या शतकाच्या आसपास या शिक्षेला विरोध होऊ लागला. इटालियन तत्त्वचिंतक सिसेरे बॅक्करिआ याने १७६४ मध्ये शिक्षेच्या या प्रकाराबद्दल विरोध दर्शविणारे एक पुस्तक लिहिले. व्होल्टेअर, ह्यूम व ॲडम स्मिथ यांनीही देहान्ताच्या शिक्षेविरुद्ध चळवळीत भाग घेतला.

कांटच्या प्रतिशोध उपपत्तीचा (Retributive Theory) देहान्ताच्या शिक्षेला विरोध असणार नाही. त्या उपपत्तीच्या मते ती शिक्षा गुन्हागाराची कमाई आहे. ती आपण नाकारणे हा समाजाचा गुन्हा होईल. ही समाजाची अनैतिकता ठरेल. समाजमान्य न्यायोचित रीतीने ती शिक्षा माफ केली गेली तर मात्र या उपपत्तीचा त्याला विरोध असणार नाही. अपराध्यास शासन व्हावे आणि गुन्हेगारांना जबर बसावी या हेतूने शिक्षा देण्याला निवारणवाद्यांचा विरोध नाही. अपराध्यास शासन व्हावे आणि भावी गुन्हेगारांना जरब बसावी या हेतूने शिक्षा देण्याला निवारणवाद्यांचा विरोध नाही. विरोध असतो तो जिवे मारण्याला. अपराध्यास पुरेसा पश्चाताप होण्यास त्याला आपण संधी देत नाही. तसा पुरेसा पश्चाताप होऊन त्या प्रकारचा गुन्हा तो परत करणार नाही अशी

योग्य अधिकाऱ्यांची खात्री झाल्यास त्या अपराधकर्त्यांची देहान्ताची शिक्षा रद्द करावी असे सुधारणावादी उपपत्तीचे प्रतिपादन असेल.

शिक्षेला विरोध करणाऱ्या निवारणवादी किंवा सुधारणावादी तत्वचिंतकांचे म्हणणे असते की, शासनाने एका व्यक्तीला देहान्ताची शिक्षा करणे हा मानवी व्यक्तीत्वाच्या अधिकाराचा भंग आहे. दुसऱ्या बाजुची प्रतिशोध उपपत्तीचे समर्थक म्हणतात की, सर्वसामान्य न्यायाचा हा प्रश्न आहे. खुन्याला जिवंत सोडणे हा खून झालेल्या व्यक्तीवर आणि तिच्या आप्तेष्ट स्वकीयांवर अन्याय नाही का? जपान, अमेरिका सोडून इतर बहुतेक सर्व विकसित राष्ट्रांचा त्या शिक्षेस विरोध आहे. तर भारतासह इतर विकसनशील देशात त्या शिक्षेस मान्यता आहे.

पूर्वी शिक्षा भर रस्त्यात अनेकांच्या नजरेस पडावी अशा रीतीने देत असत. आता एकतर तुरुगांच्या आवारात फाशी देतात किंवा सुधारलेल्या देशांतून विषारी इंजेक्शनने किंवा विजेच्या धक्याने गुन्हेगार व्यक्तीचा मृत्यु घडवून आणतात. पण जसजसा उदारमतवादी शिक्षणाचा प्रसार होईल, निरोगी लोकशाहीची प्रगती होईल तसतशी सूडाच्या भावनेची तीव्रता कमी होईल. आणि दुसऱ्या माणसाची हत्या करावी इतक्या अंशापर्यंत ती चढणार नाही. धार्मिक कडवेपणाने निरपराध लोकांच्या हत्या होत राहतील. जर धर्माचे संस्थापक अथवा संघटनात्मक रुप बदलून आपण वैयक्तिक स्वरुप देऊ शकू तर धार्मिक दंगलीही संपतील.

शिक्षेची निवारणवादी उपपत्ती लक्षात घेतली तर, दुसऱ्या माणसाचा जीव घेण्याइतके ज्याचे मन सूडबुद्धिने व्यापलेले आहे तो या अपराधाचे परिणाम काय होतील याचा विचारच करु शकत नाही. 'मी मेलो तरी बेहत्तर पण तूझा काटा काढेन.' असे स्वत:शी म्हणतच तो आपल्या विरोधकाची हत्या करतो. लोभासारख्या इतर भावना प्रबळ होऊन जेव्हा माणूस सदोष मनुष्यवधाची कृती करु पाहतो अशा थोड्या वेळी आपण विचार केला किंवा त्याने विचार केला तर फाशी जाऊ या भीतीने तो हत्येपासून परावृत्त होईल. त्याने गुन्हा केला म्हणून त्याला आपण शिक्षा नाकारणे हा समाजाचा गुन्हा होईल. ती समाजाची अनैतिकता ठरेल.

## १.६ सारांश

समाजामध्ये विविध समस्या अस्तित्वात असलेल्या दिसून येतात. अशा समस्याना सामाजिक समस्या असे म्हणतात. कारण त्यांचे परिणाम संपूर्ण सामाजिक स्वास्थ्यावर होत असतो. या सामाजिक समस्यांपैकी एक महत्वाची समस्या म्हणजे गुन्हेगारीची समस्या होय. व्यक्तीच्या हातून वेगवेगळ्या परिस्थितीत गुन्हे घडत असतात. काही व्यक्तींच्या हातून नकळत गुन्हा घडतो तर काही व्यक्ती जाणूनबुजून गुन्हा करतात. अशा परिस्थितीत प्रश्न असा निर्माण होतो की, खरा गुन्हेगार ओळखायचा कसा? कारण नकळत/अज्ञानाने गुन्हेगार किंवा निरपराध नसलेल्या व्यक्तीला देखील शिक्षा होऊ शकते.

दुसरा प्रश्न असा उपस्थित होतो की, गुन्हेगाराला शिक्षा करावी की सुधारण्याची संधी द्यावी? यावर असे म्हणता येईल की सर्वच गुन्हेगारांकडून नकळत गुन्हे घडत नाहीत त्यामुळे जे गुन्हेगार जाणूनबुजून पून्हा-पून्हा गुन्हे करतात त्यांना शिक्षा देणे हाच पर्याय उरतो. गुन्हेगाराला शिक्षा देण्याचे उद्देश हे भिन्न असल्याने या संदर्भात शिक्षेच्या तीन उपपत्या सांगितल्या आहेत.

थोडक्यात असे म्हणता येईल की, शिक्षेविषयक स्पष्ट करण्यात आलेल्या तीनही उपपत्या समाजामध्ये उपयुक्त असून त्या लागू पडतात याचे कारण आज समाजात वरील तीनही उपपत्तीत बसणाऱ्या गुन्हेगार व्यक्ती दिसून येतात. कारण त्यांना शिक्षा देण्यासाठी उद्देश भिन्न आहेत.

## ९.८ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

१) शिक्षा म्हणजे काय? शिक्षेची निवारणवादी व प्रतिशोध उपपत्ती सविस्तर स्पष्ट करा.

२) शिक्षा म्हणजे काय ?शिक्षेची प्रतिशोध व सुधारणावादी उपपत्ती स्पष्ट करा.

३) शिक्षेच्या विविध उपपत्त्या थोडक्यात स्पष्ट करा.

४) टिपा लिहाः-

१) शिक्षेची निवारणवादी उपपत्ती

२) शिक्षेची प्रतिशोध उपपत्ती

३) शिक्षेची सुधारणावादी उपपत्ती

*****

# १०

## प्रकरण १०

# व्यावसायिक नीतिशास्त्र

# (Professional Ethics)

**घटक रचना**

१०.० उद्दिष्ट्ये

१०.१ व्यावसायिक आचारसंहितेचे महत्त्व.

१०.२ व्यापाराचे नीतिशास्त्र

१०.३ उद्योजकांची सामाजिक जबाबदारी

१०.३.१ महामंडळ म्हणजे काय ?

१०.३.२ कायदेशीर व्यक्ती कोण आहे ?

१०.४ उद्योजकांची सामाजिक जबाबदारी म्हणजे काय ?

१०.५ उद्योजकांच्या सामाजिक जबाबदारी विषयीचे समर्थनात्मक मुद्दे (अनुकूल युक्तिवाद)

१०.६ उद्योजकांच्या सामाजिक जबाबदारी विषयीचे विरोधात्मक मुद्दे (प्रतिकूल युक्तिवाद)

१०.७ सारांश

१०.८ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

## १०.० उद्दिष्ट

- व्यावसायिक आचारसंहितेचे महत्त्व समजावून घेता येईल.
- व्यापाराच्या नीतिशास्त्राची गरज याची माहीती करुन घेता येईल.
- उद्योजकांची सामाजिक जबाबदारी बद्दलची जाणीव करुन घेता येईल.
- उद्योजकांची सामाजिक जबाबदारी विषयी समर्थनात्मक व विरोधात्मक मुद्दे परिचित होतील.

## १०.१ व्यावसायिक आचारसंहितेचे महत्त्व

'व्यवसाय' हा शब्द विशिष्ट प्रकारच्या क्षेत्रामध्ये विशिष्टपूर्ण कौशल्य प्राप्त केलेल्या मर्यादित व्यक्तीचा असा समुह की जो इतर व्यक्तीपेक्षा त्या क्षेत्रात अधिक चांगल्या पद्धतीने कार्य करु शकतो. १८१९ पासून अमेरिकेतील व्यापारी आणि

व्यावसायिक समूहाने (जमावाने) स्वीकारलेल्या नीतिशास्त्राच्या आचारसंहितेला 'व्यावसायिक नीतिशास्त्र' म्हणून ओळखले जाते. समाजाच्या योग्य व्यवस्थेसाठी समाजाचे आधुनिकीकरण आणि कामाची विभागणी हे अधिकाधिक गरजेचे होत आहे. विशिष्ट क्षेत्रामध्ये कामाची सूक्ष्म विभागणी, वैशिष्टपूर्ण कौशल्य अतिशय महत्त्वाचे बनत आहेत, आणि त्याचबरोबर व्यावसायिक नीतिशास्त्राला महत्त्व प्राप्त होत आहे.

व्यवसायामध्ये समाजाला सेवा देण्याच्या हेतू अंतर्भूत आहे. 'व्यावसायिक' समाजाच्या कल्याणासाठी कार्यरत असतात असे समजले जाते. सार्वजनिक हिताच्या प्रगतीसाठी आदर्श व्यावसायिक व्यक्तींना सेवा देण्यासाठी आमंत्रित करतात. उदा. जेव्हा एखादा डॉक्टर एखाद्या व्यक्तीस सल्ला देतो तेव्हा स्वतःला किती मिळकत मिळेल यापेक्षा त्या व्यक्तीचे आरोग्य चांगल्या पद्धतीने कसे सुधारेल या गोष्टीला डॉक्टरने प्राधान्य द्यायला हवे. व्यवसायामध्ये सेवा ही गुणात्मक स्वरुपाची असते. जास्तीत जास्त सामाजिक हिताच्या प्रगतीसाठी खाजगी हितांना उत्तेजन दिले जाते.

व्यवसायामध्ये मोबदला घेण्याची तत्त्वे व्यवसायानुसार भिन्न भिन्न असतात. उदा. अध्यापकीय व्यवसाय व इतर सरकारी नोकरी मध्ये काम सुरु करण्यापूर्वी नियमित वेतनासाठी मान्यता असते. इतर काही व्यावसायिक स्वतःचे कौशल्य व त्यांच्या सामाजिक स्तरानुसार त्यांच्या गिऱ्हाईकाकडून त्यांच्या मनानुसार मोबदला घेतात. हा मोबदला स्थिर नसून बदलणारा असतो. इतर काही व्यवसायामध्ये केलेल्या कामाच्या प्रमाणानुसार टक्केवारीप्रमाणे मोबदला निश्चित केला जातो. उदा. आर्किटेक्चर (वास्तुविद्याशास्त्रज्ञ) आणि सेल्समन यांनी केलेल्या एकूण कामाच्या किंमतीच्या काही टक्के मोबदला म्हणून मिळतो.

व्यावसायिक किंवा पेशांच्या संदर्भात आचारसंहिता जबरदस्तीने अमलात आणण्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

१) व्यवसायात प्रवेश करणारा नवीन व्यक्ती आणि व्यवसायातील जुन्या व्यक्ती यांच्या संबंधाबाबत व्यावसायिक आचार संहिता योग्य मार्गदर्शन करते. आपापल्या क्षेत्रांमध्ये परिपक्व व यशस्वी असणाऱ्या व्यावसायिकांकडून व्यवसायामध्ये नव्याने प्रवेश करणाऱ्या व्यक्तीला निरनिराळ्या प्रकारची कौशल्ये आणि तांत्रिक बाबी शिकण्याची गरज असते. कनिष्ठ व्यावसायिक आणि श्रेष्ठ व्यावसायिक यांच्या संबंधातील सामाजिक नियंत्रण ठेवण्यासाठी व्यावसायिक आचारसंहिता एक मोजमाप म्हणून कार्य करते.

२) व्यावसायिक आचारसंहिता व्यवसायाच्या सदस्यातील आत्मीयसंबंध निर्माण करण्यासाठी आणि इतर व्यवसायातील सदस्यांची नालस्ती न करणे यांसाठी उपयोगी पडते. व्यावसायिक आचारसंहितेची ही भूमिका महत्त्वाची आहे. कारण प्रत्येकजण आपला व्यवसाय इतर व्यवसायापेक्षा श्रेष्ठ असल्याचे समजतात. त्यामुळे निरनिराळ्या, व्यवसायामधील व्यक्तीच्यामध्ये संघर्ष निर्माण होतो. यामुळे व्यवसायाचा मुख्य उद्देश बाजूला पडून कलुषितता निर्माण होते. व्यावसायिक आचारसंहिता आरोग्यदायक स्पर्धेसाठी मदतरूप होते व प्रत्येक व्यवसाय उत्कृष्ट गुणवत्तेपर्यंत पोहचण्यासाठी व्यावसायिक आचारसंहित उत्तेजन देते.

३) उद्धटपणाचा सार्वजनिक देखावा, ढोंगीपणा किंवा शिस्तीचा अभाव इत्यादी गोष्टी व्यवसायामध्ये असतील तर त्या विशिष्ट व्यवसायातील सामान्य माणसाचा आत्मविश्वास नाहीसा होतो. व्यवसायातील व्यावसायिकांची वर्तणूक चांगली राहण्यासाठी आचारसंहितेमध्ये निरनिराळे दंड देण्याची व्यवस्था असते. व्यवसायातील सदस्यत्व रद्द करणे हा एक व्यवसायातील सार्वजनिक आत्मविश्वास पुन्हा उभा करण्याचा एक मार्ग आहे.

४) कोणत्याही व्यक्तीला व्यवसायामध्ये समाविष्ट करुन घेण्यासाठी निश्चित प्रकारची गुणवत्ता ठरवण्याची गरज आहे. सर्वसाधारणपणे हे कार्य श्रेष्ठ व्यावसायिक किंवा सरकारकडून केले जाते. या व्यावसायिक मंडळाची विशिष्ट प्रकारच्या गुणवत्तेचे स्वरुप निश्चित करण्याची जबाबदारी असते. व्यावसायिक योग्यता, व्यावसायिक योग्यतेचे सदस्यत्व, व्यावसायिक मंडळाचे सदस्यत्व कार्य पूर्ण करण्याचे मूल्यांकन, तांत्रिक बाबींचे मूल्यांकन इत्यादी सर्व बाबी व्यावसायिक आचारसंहितेत नमूद केलेल्या प्रमाणभूत तत्त्वानुसार ठरविले जाते. व्यावसायिक मंडळे स्वतःच उत्कृष्ट न्यायाधीश आहेत.

परंतु प्रत्यक्ष व्यवहारामध्ये प्रभावीपणे व्यावसायिक आचारसंहिता लागू करण्यामध्ये आणि पुरेशा प्रमाणात निश्चित करण्यामध्ये व कालानुरुप त्यामध्ये सुधारणा करण्यामध्ये अनेक प्रकारच्या समस्या आहेत. जरी वास्तवामध्ये पूर्णपणाने आचारसंहिता लागू करता येत नसली तरी आचारसंहितेची गरज आपण नाकारु शकत नाही.

**आपली प्रगती तपासा**

१) व्यवसाय या शब्दापासून आपणास काय समजते ?

२) व्यावसायिक नीतिशास्त्राची व्याख्या सांगा.

३) तुमच्या मतानुसार व्यावसायिक नीतिशास्त्र जबरदस्तीने लागू करणे समाजातील व्यावसायिकांना मदत रुप होऊ शकते का ? चर्चा करा.

४) कोणाच्या हीतासाठी व्यावसायिक कार्यरत असतात, असे समजले जाते ?

५) कोणत्या प्रकारे व्यावसायिक नीतिशास्त्र हे सामाजिक नियंत्रण म्हणून कार्यरत असते ?

६) व्यवसायातील सामाजिक आत्मविश्वास कसा वाढवला जाऊ शकतो.

७) व्यावसायिकांची वर्तणूक कशी नियमित केली जाऊ शकते ?

## १०.२ व्यापाराचे नीतिशास्त्र

आपण अनेक प्रकारच्या जाहिराती, निरनिराळ्या प्रसार माध्यमाद्वारे जोडल्या जाणाऱ्या वैश्विक संबंधाने आणि जीवघेण्या स्पर्धेने वेढलेल्या विश्वामध्ये राहत आहोत. २१ व्या शतकातील जाणीवपूर्वक वाढणाऱ्या व्यापाराच्या ठिकाणी नैतिक व्यापाराची प्रक्रिया आणि कृतिशिलता याची मागणी वाढत आहे. व्यापार गृहे, कारखाने आणि बाजारपेठा गिऱ्हाईकांना राजा समजून सुरु होत आहेत. याचवेळी नवीन सार्वजनिक पुढाकार आणि कायदे यांच्या माध्यमातून व्यापारी नीतिशास्त्र सुधारण्यासाठी कारखान्यावरती दबाव आणला जात आहे. अनैतिक मार्गाचा वापर करुन व्यापारी कमीवेळात जास्त नफा मिळवू शकतात. तथापि काळाच्या ओघामध्ये या प्रकारची वागणूक आर्थिक व्यवस्था ढासळण्यास कारणीभूत ठरते. या सर्व प्रकारच्या संबंधाचा अभ्यास करणे हे व्यापारी नीतिशास्त्रचा अभ्यास विषय आहे. व्यापारी नीतिशास्त्र हे उपयोजित नीतिशास्त्र असून ते नैतिक तत्त्वे आणि व्यापारिक वातावरणामध्ये निर्माण होणाऱ्या नैतिक समस्येचे परीक्षण करते. व्यापारी वर्तणूकीच्या सर्व अंगाना ते लागू पडते आणि व्यक्तीच्या वागणूकीस आणि व्यापारी संघटनेशी पूर्णपणे संबंधित असते. उपयोजित नीतिशास्त्र हे वैद्यकीय, तांत्रिक कायदेशीर आणि व्यापार या वेगवेगळ्या क्षेत्रातील नैतिक प्रश्न हाताळण्याचे काम करते.

व्यापारी नीतिशास्त्र हे आदर्शवादी शास्त्र तसेच वर्णनात्मक विद्याशाखा असे दोन्ही प्रकारचे असू शकते. सामुदायिक व्यवहार आणि जीवनांतील विशेष व्यासंगाचा विचार करता ते प्राथमिक आदर्शवादी शास्त्र आहे. प्रबोधिनीच्या क्षेत्रामध्ये वर्णनात्मक विद्याशाखेचा दृष्टिकोन घेतला जाऊ शकतो.

ऐतिहासिक दृष्टिकोनातून पाहता १९८० ते १९९० च्या दशकांमध्ये व्यापारी नीतिशास्त्रामध्ये प्रचंड प्रमाणात प्रगती झाल्याचे दिसून येते. ही प्रगती मुख्य महामंडळामध्ये आणि प्रबोधिनीमध्ये झालेली दिसून येते. काही घटनेमध्ये महामंडळाने त्यांच्या आंतरिक मूल्यांची पुर्नव्याख्या व्यापारी नीतिशास्त्राचा विचार करुन केलेली आहे.

पण सध्याचा देखावा वेगळाच आहे. व्यापार हा केवळ जास्तीत जास्त पैसे मिळण्याच्या दृष्टिकोनातून केला जातो. आजचा व्यापार गिऱ्हाईकांचे हित केंद्रस्थानी ठेवून केला जात नाही. जाहिरातीच्या भूमिकाही बदलल्या आहेत. पूर्वी जाहिरातीमुळे निर्माण केलेल्या उत्पादनाविषयी खरी माहिती गिऱ्हाईकांना मिळत होती. परंतु सध्याच्या व्यापार विश्वामध्ये जाहिरातीमुळे खोटी माहिती गिऱ्हाईकापर्यंत जाते. त्यामुळे गिऱ्हाईकांना तयार झालेल्या उत्पादनां विषयी चुकीचे मार्गदर्शन होत आहे. त्यामुळे अशा अनेक घटना आहेत. त्यामध्ये गिऱ्हाईकांच्या दृष्टीने त्यांना हितकारक असलेले उत्पादन मिळत नाही. जाहिरातीशिवाय अनेक सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी संघटना, ग्राहक मार्गदर्शक समाज हे व्यापारी नीतिशास्त्रामध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. यामुळे जाहिरातीच्या विश्वावर आपण थोडेतरी नियंत्रण आणू शकतो.

सध्या व्यापारी जीवन हे अत्यंत गुंतागुंतीचे बनत आहे. म्हणून विशिष्ट प्रकारच्या आचारसंहितेची गरज आहे. यामुळे व्यापार व्यवहारामध्ये नैतिक बनू शकतो. काही विशिष्ट प्रकारचे हेतू आहेत.

अ) खोट्या जाहीरीतींपासून मुक्तता होऊन सामाजिक आत्मविश्वास वाढवणे.
ब) निश्चित नैतिक प्रमाणभत्ता नक्की करुन सध्याच्या जीवघेणी स्पर्धेवर मर्यादा आणणे.
क) लबाडी फसवणूक करणारे व्यापारी समाजामध्ये सर्वांना माहीत होणे.

व्यापारातील अनेक नैतिक गोष्टी सोबत जास्तीत जास्त गैर मार्गाने पैसे मिळवण्याच्या इच्छा सर्वसाधारणपणे सर्वत्र सहजच झाली आहे. उदा. दुधामध्ये पाणी मिसळणे, दुसऱ्यांचे नावाजलेल्या कंपनीचे नाव वापरुन माल विकणे, मालाचे चूकीचे प्रदर्शन करणे, चुकीची माहीती हाताळणे, जादा किंमती लावणे, मालाच्या समाप्तीच्या तारखेनंतरही माल विकणे, बाटल्या दिसायला खूपच मोठ्या पण वास्तवात त्यामध्ये खूप कमी माल असणे इत्यादी.

वास्तविक पाहता व्यापारी माणसांने त्यांच्या मजूरांकडे योग्य पद्धतीने लक्ष देऊन मजूरांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. परंतु दुर्दैवाने आज व्यापारी वर्ग त्यांच्या मजूरांची काळजी घेत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे व्यापारी वर्गाचा फक्त फायदाच मिळवणे हा उद्देश नसून सेवेवरती जोर देऊन सामाजिक दृष्टिकोन विकसित व्हायला हवा. परंतु दुर्दैवाने आज या गोष्टीचा विसर पडलेला आहे.

व्यापारी नीतिशास्त्राच्या संदर्भातील काही नैतिक संकल्पना पुढील प्रमाणे आहेत.

- उद्योजकांची सामाजिक जबाबदारी (Corporate social responsibility (CSR)
- या अंतर्गत कंपनी आणि समाजामध्ये असलेले नैतिक हक्क आणि नैतिक कर्तव्य यांची वादविवादात्मक पद्धतीने चर्चा केली जाते.
- कंपनी आणि तिथे भाग भांडवलदार (Shareholders) विश्वस्तांची जबाबदारी यांच्यातील नैतिक अधिकार व कर्तव्ये याबाबतीत निर्माण होणाऱ्या समस्येच्या संदर्भातील संकल्पना.
- निरनिराळ्या कंपनीमधील संबंधाविषयीचे निर्माण होणाऱ्या नैतिक समस्या उदा. दुसऱ्यांची कंपनी ताब्यात घेणे, औद्योगिक हेरगिरी करणे.
- नेतृत्वाच्या समस्या (Leadership issues)
- उद्योगाचा वा कंपनीचा ताबा (Corporate goverance)
- महामंडळाकडून मिळणारे राजकीय योगदान

**आपली प्रगती तपासा**

१. व्यापारी नीतिशास्त्र म्हणजे काय ?

२. ''आदर्शवादी व्यापारी नीतिशास्त्र' या पासून आपणांस काय समजते ?

३. व्यापारी नीतिशास्त्रामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या घटकांची नावे सांगा.

४. व्यापारी नीतिशास्त्राच्या संदर्भातील कोणत्याही दोन नैतिक संकल्पना सांगा.

## १०.३ उद्योजकांची सामाजिक जबाबदारी (Corporate Social Responsibility)

### १०.३.१महामंडळ (Corporation) म्हणजे काय ? (What is a corporation?):

अनेक व्यक्ती किंवा संस्था शेअर्स (Partial ownership) च्या बदल्यात भांडवल गुंतवतात अशा रोखेधारकांच्या (Stockholders) मालकीच्या संस्थेला महामंडळ (Corporation) असे म्हणतात. व्यापारी महामंडळामध्ये रोखे (Stock) खरेदी करणारे बहुतेक रोखेधारक (Stock-holders) हे त्यांच्या लक किंवा दीर्घकालीन गूंतवणूकीच्या किंमतीमध्ये त्यांना आवड असते. म्हणून बहुतेक रोखेधारक त्यांना नफा मिळत असेल तर रोखे विकतांना दिसतात किंवा त्यांच्या रोख्यांना (Stocks) येणाऱ्या काळामध्ये जास्त किंमत येईल या आशेने रोखे (Stock) ठेवतात. काही जणांना महामंडळाच्या वेगवेगळ्या प्रक्रियेवरती नियंत्रण ठेवण्यास आवडते. ते महामंडळ चालवतात. महामंडळाचे संचालक मंडळ, अधिकारी, इतर व्यवस्थापक हे शेअर होल्डर्सना जबाबदार असतात.

### १०.३.२ कायदेशीर व्यक्ती कोण आहे ? (Who is a corporate?):

कायदेशीर अधिकार आणि कायदेशीर कर्तव्य असणाऱ्या व्यक्तीला कायदेशीर व्यक्ती (Corporation) असे म्हटले जाते. ही व्यक्ती नागरी न्यायालयांमध्ये फिर्याद करु शकते किंवा याच्यावर फिर्याद होऊ शकते आणि गुन्हेगारी न्यायालयामध्ये ही व्यक्ती प्रयत्न करु शकते. ही व्यक्ती संपत्ती मिळवू शकते व कायदेशीर करारनाम्यामध्ये प्रवेश करु शकते. सर्व कायदेशीर व्यक्ती या कायद्यानुसार असतात. उदा. बिर्ला कंपनी समूह, रिलायन्स उद्योग समूह या कायदेशीर व्यक्ती आहेत.

## १०.४ उद्योजकांची सामाजिक जबाबदारी म्हणजे काय ? (What is Corporate Social Responsibility)

**खालील प्रश्न स्वत:शी विचारा.**

१. कार्पोरेशन (Corporation) ही कायदेशीर व्यक्ती आहे. म्हणून मानवांप्रमाणे त्यांना नैतिकता आणि कर्तव्यता असते काय ?

२. कार्पोरेशनची (संचालक मंडळ, अधिकारी व व्यवस्थापक) यांची अधिक जबाबदारी असते काय ?

३. जर होय तर ती कोणती ?

या प्रकारचे प्रश्न विचारणे म्हणजे उद्योजकांची सामाजिक जबाबदारी (Corporate Social Responsibility) यांच्या संदर्भातील मुद्दे उपस्थित करणे होय. ते मुद्दे पुढील प्रमाणे सांगता येतात. महामंडळे (Corporation) आणि

त्यांच्यांतील कायदेशीर व्यक्ती (Corporate) यांचे समाजातील नोकर, वातावरण, ग्राहक, राष्ट्र इत्यादी प्रती त्यांचे असलेले नैतिक कर्तव्यांचा विचार करता त्यांना आवश्यक असलेल्या नियमांच्या पलीकडे त्यांची जबाबदारी जाते का ?

कायद्याला अपेक्षित असलेल्या पेक्षा जास्त सुरक्षित उत्पादनाची निर्मिती केली जाऊ शकते. का ? इत्यादी मुद्द्यांचा विचार उद्योजकांच्या सामाजिक जबाबदारीमध्ये केला जातो.

Carroll आणि Buchholtz यांच्या मतानुसार उद्योजकांची सामाजिक जबाबदारी (Corporate social responsibility (CSR) यांची व्याख्या पुढील प्रमाणे केली जाते. वेळेत एखाद्या ठिकाणी सामाजिक, आर्थिक, कायदेशीर, नैतिक, विवेकपूर्ण इत्यादी गोष्टींची अपेक्षा ज्या संस्थेकडून केली जाते. ती संस्था म्हणजे उद्योजकांची सामाजिक जबाबदारी (Corporate social responsibility) होय.

(According to carroll and Buchholtz, corporate social responsibility (CSR) can be defined as the economic, legal, ethical and discretionary expections that society has of organizations at a given point in time". CSR ची संकल्पना म्हणजेच अशी संस्था की ज्यातील गुंतवणूकदार स्वतःची मिळकत मिळवणे व नियमाचे पालन करणे या जबाबदारी सोबत चारित्र्य, नैतिक आणि परोपकारी वृत्ती या जबाबदारीचे पालन करतात. अशी संस्था म्हणजेच CSR होय. महामंडळ (Corporation) च्या परंपरागत संकल्पनेमध्ये त्यांची प्राथमिक जबाबदारी मालकांची किंवा रोखेधारी (Stockholders) यांचे हित पाहणे ही होती. परंतु CSR या संस्थेची संकल्पना अतिशय व्यापक आहे. CSR या संकल्पनेत संस्थेच्या स्टॉक होल्डर सोबत इतर संस्थेतील बाबी म्बणजे मजूर, पुरवठा करणारे ग्राहक, स्थानिक समाज, स्थानिक राज्य, तसेच सांघिक राज्य, वातावरणीय समुह आणि इतर खास आवड असणारे समूह इत्यादींचीही जबाबदारी घेतली जाते.

Corporate Social Responsibieity (CSR) हे व्यापारी नीतिशास्त्राशी संबंधित आहे. परंतु व्यापारी नीतिशास्त्राशी एकरुप (Identical) नाही. CSR हे आर्थिक, कायदेशीर, नैतिक आणि विवेकपूर्ण तारतम्य इत्यादी संस्थेच्या सर्व जबाबदारींना समाविष्ट करते. तर व्यापारी नीतिशास्त्र हे सर्वसाधारणपणे संस्थेतील नैतिक न्याय आणि संस्थेतील व्यक्ती किंवा समूह यांच्या वर्तुणुकाशी संबंधित असते. अशाप्रकारे व्यापक स्वरुपामध्ये असलेल्या CSR चा व्यापारी नीतिशास्त्र अनेक घटकांपैकी एक घटक समजले जाते.

Carroll आणि Buchholtz यांच्या व्याख्येनुसार CSR चे स्वरुप सर्वांगीण (Multifaceted) असून त्या व्याख्येमध्ये चार जबाबदाऱ्या सांगितलेल्या आहेत. प्रथम जबाबदारी ही आर्थिक स्वरुपाची जबाबदारी आहे. या व्याख्येमध्ये सांगितलेल्या आर्थिक जबाबदारीनुसार समाजाच्या अपेक्षेप्रमाणे उत्पादन निर्माण करुन ग्राहकांच्या इच्छेनुसार त्यांना गरज असलेली सेवा संस्थेने द्यावी आणि उत्पादनाची

सेवेची किंमत योग्य असावी. याच बरोबर संस्था गतिशील नफ्यामध्ये असून भागभांडवलदारांच्या हिताचाही विचार करणारी असावी.

द्वितीय जबाबदारी म्हणजे कायदेशीर जबाबदारी (Legal responsibilities) होय. कायदेशिर जबाबदारीमध्ये मुख्यतः संस्थेने व्यापाराच्या ठिकाणी स्पर्धा करतांना कायद्यांचे पालन करणे अपेक्षित आहे. प्रक्रियेच्या संदर्भातील कायदेशिर नियम. ग्राहक आणि उत्पादन कायदा वातावरणीय कायदा, मजूरांचा कायदा इत्यादी हजारो प्रकारच्या कायद्यांचे पालन संस्थेला करावे लागतात.

तृतीय जबाबदारी म्हणजे नैतिक जबाबदारी (The Ethical responsibilities) होय. नैतिक जबाबदारीमध्ये संस्थेतला कायद्याच्या पलिकडे जाऊन समाजाच्या हिताचा विचार करावा लागतो. याचा अर्थ कायद्याचे नियम पाळणे यापेक्षा अधिक काही तरी समाजासाठी करण्याची अपेक्षा नैतिक जबाबदारीमध्ये येते. अशा प्रकारच्या जबाबदारीचा उल्लेख कायद्यामध्ये नसतो.

चतुर्थ प्रकारची जबाबदारी म्हणजे विवेकपूर्ण योग्य, अयोग्य गोष्टी (The discretionary responsibility) ओळखून योग्य गोष्टी अमलात आणणे होय. यामध्ये संस्थेचे सदस्य चांगले नागरिक असण्याची गरज आहे. तसेच परोपकारासाठी आधारभूत असणारे आणि समाजाला कायदेशीर असणाऱ्या कार्यक्रमाचा समावेश या जबाबदारीमध्ये होतो.

**इतिहास (History):**

उद्योजकांची सामाजिक जबाबदारी (Corporate social responsibilities (CSR) चे स्वरुप आणि व्याप्ती काळानुसार बदललेली आहे. CSR ची संकल्पना सापेक्षतया नवीन आहे. १९६० पासून या संकल्पनेचा वापर होत आहे. १९६० आणि १९७० मधील नागरी हक्क चळवळ, उपयोगवाद आणि वातावरणवादयामुळे समाजाच्या व्यापाराकडून असलेल्या अपेक्षेवरती परिणाम झालेला दिसून येतो. जास्त सत्ता, जास्त जबाबदारी (With great power have great responsibility) या सर्वसाधारण तत्त्वानुसार सामाजिक समस्येचा अंत करणे आणि सामाजिक समस्या सोडवण्यासाठी त्यामध्ये सहभागी होणे. यावर CSR लक्ष्य केंद्रित करत आहे.

समान व्यवसाय संधी, उत्पादन सुरक्षा, मजुर सुरक्षा आणि वातावरणाचे रक्षण यासाठी व्यापाराच्या संबंधित अनेक कायदेशीर हुकूम (Legal mandates) अमलात आणले. यापुढे जाऊन एखादी समस्या व्यापारामुळे निर्माण झालेली असली तरी स्वयंप्रेरणेने व्यापारी संस्थेने या समस्या सोडवण्यासाठी सहभागी व्हावे. अशी समाजाकडून अपेक्षा करण्यास सुरुवात झाली. महामंडळांनी (Corporation) त्यांच्या आर्थिक आणि कायदेशीर जबाबदारीच्या पुढे जाऊन समाजाच्या कल्याणाची जबाबदारी उचलावी, या दृष्टिकोनांवर CSR चा हा दृष्टिकोन सध्या विश्वामध्ये प्रभुत्व मिळवत आहे.

## १०.५ उद्योजकांच्या सामाजिक जबाबदारी विषयीचे समर्थनात्मक मुद्दे (अनुकुल युक्तिवाद) (Arguments for corporate social responsibility)

### १) सत्ता आणि जबाबदारी सोबतच असतात:

उद्योग (Corporate) जगतातील अनेक टिकाकारांचा दृष्टिकोन आहे की महामंडळा (Corporation) मुळे अनेक प्रकारच्या सामाजिक समस्या निर्माण होत असल्यामुळे त्यांनी त्या सामाजिक समस्येचा विचार करुन सोडवण्याचा प्रयत्न करायला पाहिजे. हा दृष्टिकोन बाळगणारे महामंडळाच्या (Corporation) उत्पादन, विपणनशास्त्र व कला (Marketing) हिशोबशास्त्र (Accounting) इत्यादी बाबींवर टिका करतात. महामंडळे (Corporatiens) मुक्तपणे आणि प्रामाणिकपणे त्यांच्या वेगवेगळ्या प्रक्रियेमध्ये काम करुन उत्पादन गुणवत्ता, सुरक्षित उत्पादन निर्माण करुन चांगल्या प्रकारचा व्यवसाय करु शकतात. असे ते महामंडळांना (Corporation) सूचित करतात.

### २) स्वहित (Self Interest):

स्वहित (Self-Interest) हा CSR या पेक्षा खूप वेगळा मुद्दा (Argument) आहे. हा दीर्घकालीन दृष्टिकोन सूचित करतो की सध्या वर्तमानकाळी उद्योजकांनी सामाजिक जबाबदारी (Corporate social responsibility) ने खात्रीपूर्वक असे वागले पाहिजे की ज्यामुळे भविष्यकाळामध्ये चांगले वातावरण निर्माण होईल. हा दृष्टिकोन अल्पकालीन फायद्याच्या पलीकडील असून समाजातील वर्तमानकालीन केलेल्या गुंतवणूकीचे फायदे भविष्यकाळात होतील. हे स्पष्ट करणारा आहे. याशिवाय उद्योजक (Corporate) जगतांमध्ये सामाजिक जबाबदारी मध्ये गुंतून राहणे जास्त हितावह आहे कारण carroll आणि Buchholtz यांच्या मतानुसार यामुळे कायदेकानून करुन ते अंमलात आणण्याच्या सरकारच्या मध्यस्थीला अगोदरच अटकाव करता येतो.

### ३) सामाजिक जबाबदारी (Social Respnsibility):

शेवटी काही सूचना करतात की व्यापाराने सामाजिक जबाबदारी गृहीत धरली पाहिजे. कारण खाजगी स्वतंत्र अस्तित्व असणाऱ्या आणि कार्यरत असणाऱ्या मधील जे आहेत. जगातील प्रगल्भ असणाऱ्यापैकी उद्योजक (Corporate) जगत हे एक प्रभावी असून त्यांच्याकडे प्रचंड प्रमाणात आर्थिक उगम आहे. अशा प्रकारे जगताला सर्वोत्कृष्ट ठिकाण बनवण्यासाठी व्यापाराने त्यांची माणसे व आर्थिकभांडवल यांचा उपयोग करायला पाहिजे.

## १०.६ उद्योजकांची सामाजिक जबाबदारीविषयी विरोधात्मक मुद्दे (प्रतिकूल युक्तिवाद) (Arguments Against CSR)

### १) आर्थिक मुद्दा (The Economic Argument):

आर्थिक मुद्दा (The Economic Argument) हा कदाचित अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ मिल्टन फ्राईडमन (Milton Friedman) शी घनिष्ठ संबंधित आहे. मिल्टन फ्राईडमन यांनी सांगितले आहे की व्यापाराने प्राथमिक नियमांचे पालन केले तरी सुद्धा त्याची प्राथमिक जबाबदारी व्यापाराच्या मालकालाच फायदा होणे हा आहे. हा उपयुक्ततावादी दृष्टिकोन आहे. मुक्त व्यापार (Free Market) च्या निरनिराळ्या प्रक्रिया सामाजिक समस्या सोडवू शकल्या नाहीत तर ती समस्या सोडवण्याची जबाबादारी व्यापाराची नसून सरकारची जबाबदारी बनते.

### २) स्पर्धात्मक मुद्दा (Competitive Argument) :

आजचे युग हे जीवघेणी स्पर्धेचे युग आहे. यामुळे व्यापारामध्येही इतर स्पर्धक व्यापाराबरोबर स्पर्धा करतात. ही स्पर्धा इतर व्यापारापेक्षा एकाच प्रकारच्या व्यापारामध्ये जास्त असते. जीवघेणी स्पर्धेमुळे एकाच प्रकारच्या व्यापारामध्ये एका व्यापाऱ्याला इजा होऊ शकते. Carroll आणि Buchholtz यांच्या मतानुसार CSR जागतिक (वैश्विक) संदर्भात वाढत असल्याने सामाजिक अपेक्षेतील मतभेद किंवा भिन्नता येणाऱ्या वर्षात कमी होणार आहे.

### ३) कार्यक्षमतेचा मुद्दा (The capability argument):

शेवटी काहींच्या मते सामाजिक समस्यांना व्यापार योग्य पद्धतीने हाताळत नाही. हे कार्यक्षमतेच्या मुद्द्यावरुन सूचित केले जाते की व्यापारामध्ये असलेले कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापक यांना व्यापाराच्या संदर्भातील विशिष्ट प्रकारचे प्रशिक्षण (Training) दिलेले असते. ते प्रशिक्षण विशिष्ट व्यापाराच्याच संदर्भात असते. म्हणून असे कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापक गुंतागुंतीचे सामाजिक समस्येशी त्यांचा संबंध नसल्याने ते अशा प्रकारच्या समस्या सोडवू शकत नाहीत. त्यांना सामाजिक समस्या सोडवण्याचे ज्ञान किंवा कौशल्य नसते.

यावरुन सूचित होते की कॉर्पोरेट (Carporate) च्या सामाजिक समस्येतील सहभागामुळे परीस्थिती वाईट बनते. कार्यक्षमतेच्या मुद्द्यांवरुन सूचित होते की महामंडळे (Corporation) सामाजिक हित उत्कृष्ट सेवा, गुणवत्तापूर्ण उत्पादन आणि ते लोकांना परवडणाऱ्या किंमतीला विकून साधू शकतात.

**आपली प्रगती तपासा:**

१) महामंडळे (Corporation) म्हणजे काय ?

२) महामंडळावर (Corporation) फिर्याद होऊ शकते का ? कारण काय ?

३) CSR चा अर्थ काय होतो ?

४) महामंडळे (Corporation) चा परंपरागत दृष्टिकोन काय आहे ?

५) महामंडळाच्या (Corporation) च्या व्यापक दृष्टिकोनांमध्ये कशाचा समावेश आहे ?

६) CSR आणि व्यापारी नितिशास्त्र Business Ethics मधील फरक स्पष्ट करा.

७) स्वहित मुद्दा (Self interest argument) म्हणजे काय ?

८) मिल्टन फ्राईडमनचा (Milton Friedmans's) CSR विरोधातील मुद्दा कोणता ?

## १०.७ सारांश (Summary)

व्यावसायिक किंवा अशासकीय संघटना यांना व्यवसाय व्यवस्थित करण्यासाठी स्वीकारलेली आचार संहिता म्हणजे व्यावसायिक नीतिशास्त्र (Professional Ethics) होय. ही व्यावहारिक आचार संहिता म्हणजेच व्यावसायिक जबाबदारीची आचारसंहिता आहे. ती अवघड सामाजिक समस्या, अवघड निर्णय या संदर्भातील स्पष्टीकरण देऊन कोणती वर्तणूक नैतिक किंवा योग्य किंवा न्यायी आहे स्पष्ट करते.

व्यापारी नीतिशास्त्र (कॉर्पोरेट नीतिशास्त्र) हे एक उपयोगित नीतिसास्त्राचे रुप आहे. व्यापारी वातावरणामध्ये निर्माण होणारी नैतिक तत्त्वे किंवा नैतिक समस्यांचे परिक्षण व्यापारी नीतिशास्त्र करते. हे व्यापारी वर्तणूकीच्या सर्वांगाला लागू पडते आणि संपूर्ण संस्था आणि संस्थेतील व्यक्तीची वागणूक या संदर्भात असते.

व्यवस्थापन Management हे नैतिक आचारसंहिता ही नैतिक उपपत्तीला (Moral Theary) गती देण्यासाठी स्वीकारत नाहीत तर गुंतागुंतीच्या समाजामध्ये संस्था चालवण्यासाठी नैतिक आचार संहितेची त्यांना व्यावहारिक पातळीवर गरज असते. या मध्ये नैतिक संकल्पना महत्त्वाची भूमिका बजावतात.

नैतिक आचारसंहितेची वेगवेगळी रुपे आहेत. ती संपूर्ण समाजातील संस्कृती, शिक्षण आणि धर्म यांना लागू होतात.

उद्योजक सामाजिक जबाबदारी (CSR) हे स्वनियंत्रित व व्यापार प्रारुप (Business model) मध्ये एकरुप झालेल्या कार्पोरेट (Corporate) चे एक रुप

आहे. CSR हे धोरण कायद्याचे तत्त्व, नैतिक प्रमाणभूतता, आंतरराष्ट्रीय आदर्श असलेले, स्वयंनियंत्रिक तंत्र म्हणून कार्य करते. कंपनीच्या कृतिशिलतेची जबाबदारी स्वीकारणे किंवा कवटाळणे आणि त्यांचे वातावरण, ग्राहक, नोकर, मजूर, समाज यांच्यावरील निरनिराळ्या सकारात्मक प्रभावाच्या कृतीमधून उत्तेजन देणे हे CSR (उद्योजक सामाजिक जबाबदारी) चे ध्येय आहे.

## १०.८ विद्यापीठीय दिर्घोत्तरी प्रश्न

१) व्यावसायिक नीतिशास्त्राची व्याख्या सांगा आणि व्यावसायिक आचारसंहितेची गरज स्पष्ट करा.

२) व्यापारी नीतिशास्त्र यावर टीप लिहा.

३) CSR ची व्याख्या सांगा आणि सामाजिक जबाबदारीच्या अनेक पैलूंच्या (अंगाच्या) स्वरुपाचे स्पष्टीकरण द्या.

४) उद्योजकांच्या सामाजिक जबाबदारी (CSR) च्या समर्थनात्मक मुद्दे सांगा.

५) उद्योजकांच्या सामाजिक जबाबदारी (CSR) च्या विरोधात्मक मुद्दे सागा.

*****

# प्रथम वर्ष कला

# तत्त्वज्ञान अभ्यासपत्रिका क्र. १

# नैतिक तत्त्वज्ञान

## (Moral Philosophy)

**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. अनिल बनकर**
साहाय्यक प्राध्यापक-नि-साहाय्यक संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

**संपादक व लेखक** : **प्रा. एन्. एच्. फापाळे,**
उपप्राचार्य व सहयोगी प्राध्यापक,
बी. एन्. एन्. कॉलेज,
भिवंडी, जि-ठाणे.

**लेखक** : **डॉ. एस्. जी. निगळ,**
सहयोगी प्राध्यापक,
वल्लभ वेदांत ॲकॅडेमी आणि रिसर्च सेंटर,
तत्त्वज्ञान विभाग,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. डॉ. नमिता निंबाळकर**
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख,
बिर्ला कॉलेज, कल्याण.

**प्रा. सरस्वती डुबे**
व्याख्याती, तत्त्वज्ञान विभाग,
इस्माईल युसूफ कॉलेज,
जोगेश्वरी (पू.),मुंबई.

**प्रा. सुनिल एस. गवरे**
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख,
शिवळे कॉलेज, मुरबाड, जि-ठाणे.